नं. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५८१

# किल्ला

सुभाषचंद्र यांची
भाषणे आणि लेख'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. २८१ | विभाग निबंध | क्रमांक ३८
पुस्तकाचें नांव लाल किल्ला
लेखक वा. वि. आवळेकर
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006849

किंमत ३॥ रुपये.

# लाल किल्ला

नेताजी सुभाषचंद्र यांची
भाषणे आणि लेख

अनुवादक :
**चं. वि. बावडेकर**

REFBK-0006849

किंमत ३॥ रुपये.

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार, पुणें २.

१ सर्व हक्क सुरक्षित
२ मुखपृष्ठावरील चित्र दिनानाथ दलाल

मुद्रक
न. वि. गोडसे
श्रीशिवाजी प्रिंटिंग वर्क्स,
४९५ शनवार, पुणें २.

देशभक्तीच्या गुन्ह्यासाठीं
हिंदुस्थानांतील कारागृहांत
ज्यांनी हालअपेष्टा
सोसल्या
त्या सर्वांना.

म.ग्रं.सं.ठाणें.

## अर्घ्यप्रदान

प्रवासाचे संकल्प मी नेहमींच करतों. हल्लीं माझा असला एखादा बेत ऐकून कुणीतरी स्नेही विचारतो, ' कुठं जाणार आहांत तुम्ही ? काश्मीरला ?' मी नकारार्थी मान हलवितों. तो पुन्हां म्हणतो, ' ताजमहालावरच्या स्वारीची तयारी चाललीय् वाटतं ? ' ओठावर थोडेंसें हंसू आणून मी पुन्हां नकार दर्शवितों. तो उत्सुकतेनें प्रश्न करतो, ' एकदां सेवाग्रामला जाऊन यायचंय् असं मागं म्हणत होतां तुम्ही. तिकडं जायचा बेत चालला असेल बहुधा. होय ना ?'

त्याच्या या तिसऱ्या प्रश्नालाही मी जेव्हां मानेनें नाहीं म्हणून उत्तर देतों तेव्हां मात्र त्याच्या चेहऱ्यावर चिडखोरपणा दिसूं लागतो. यापुढें मौनव्रत पाळलें तर त्याचें रूपांतर मारामारींत होण्याचा संभव आहे हें ओळखून मी त्या स्नेह्याचें समाधान करण्याकरितां म्हणतों, ' कलकत्त्याचा ध्यास घेतलाय्

माझ्या मनानं ! ' 'परवांच्या दंग्यावर कादंबरी लिहायचा बेत आहे वाटतं ?' ' छे ! कादंबरीलेखनाचं हें तंत्र माझ्यासारख्याला जमण्यासारखं नाहीं. अहो, दंग्यावर कादंबरी लिहिण्याकरितां जर कलकत्त्याला जाणं आवश्यक असेल, तर युद्धावर कादंबरी लिहिण्याकरितां लेखकाला लष्करांत दाखल व्हावं लागेल. आणि एकाद्या कथेंत विमानाच्या अपघाताचं हुबेहुब वर्णन करायचं म्हटलं तर विमानांत बसून त्याला हटकून अपघात होईल अशी तरतूद करायची व पायलट मेला तरी स्वतः सहीसलामत सुटायची त्याला आगाऊ व्यवस्था करून ठेवावी लागेल. ! ' ' तें जाऊं द्या ! तुम्ही कलकत्त्याला कां जाणार आहांत तें सांगा ना आधीं. '

माझी थट्टेची वृत्ति एकदम मावळून जाते. क्षणभर अस्वस्थपणानें हातांची चाळवाचाळव करून गंभीर स्वरानें मी त्याला उत्तर देतों, ' सुभाषबाबूंचं निवासस्थान पाहायला—सुभाषबाबू ज्या खोलींत रहात होते त्या पवित्र स्थळाचें दर्शन घ्यायला—त्यांच्या चिरसहवासांतल्या बाह्यतः निर्जीव दिसणाऱ्या तिथल्या वस्तु जो मूक संदेश देतील तो ऐकायला. '

## २

माझे हे उद्गार कोणाला अंध विभूतिपूजेचे द्योतक वाटतील. चटकन् भावनाविवश होणाऱ्या कविमनाची ही एक लहर आहे, असेंही कोणी म्हणेल. त्यांना मी एवढेंच उत्तर देईन— मी विभूतिपूजक आहे; पण अंध मात्र नाहीं. जिथें जिथें सौंदर्य, सामर्थ्य, किंवा साधुत्व यांची प्रचीति येते, तिथें तिथें सर्वसामान्य मनुष्याचा अहंभाव साहाजिकच लोप पावतो. त्याचें मस्तक नकळत त्या तेजापुढें नम्र होतें. त्याचें हृदयकमल ज्या दिव्यत्वाच्या साक्षात्कारानें क्षणभर कां होईना विकसित झालेलें असतें, त्याच्या पूजेकरतां तो आतुर होतो. रम्यत्वाची, भव्यत्वाची, दिव्यत्वाची किंबहुना कुठल्याही प्रकारच्या अलौकिकत्वाची ओढ हा मानवी मनाचा

किंचित् गूढ पण चिरंतन असा धर्म आहे. या अलौकिकाचें दर्शन ज्या ज्या व्यक्तीच्या कृतींतून जगाला होतें, तिचें विशेषत्व, वीरत्व किंवा विभूतिमत्त्व हा मानवतेच्या पूजेचा विषय होतो. आपले प्राचीन ऋषी भगवान् सूर्यनारायणाला वंदन करून अर्घ्यप्रदानें देत असत. अंधकारांतून प्रकाशाकडे नेणाऱ्या आणि आपल्या तेजानें चराचर सृष्टीच्या जीवनविकासाला साहाय्य करणाऱ्या निसर्गाची ती पूजा आजच्या देव न मानणाऱ्या मनाला सुद्धां किती अर्थपूर्ण वाटते ! राम आणि कृष्ण,बुद्ध आणि ख्रिस्त,किंवा शिवाजी,मॅझिनी, लिंकन आणि लेनिन या महापुरुषांच्या व्यक्तित्वाचें आपल्या मनाला जें अद्भुत आकर्षण वाटतें तें अशाच प्रकारचें असत नाहीं काय ? सुभाषबाबूंचें सारें चरित्रही इतकें प्रेरक आणि रोमहर्षक झालें आहे कीं इतिहास त्यांना जगांतल्या सर्वश्रेष्ठ देशभक्तांच्या पंक्तींत मानाचें स्थान देईल याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. कारण इतिहास व्यक्तींच्या यशापयशाची कधींच पर्वा करीत नाहीं. तो मानवी मनाची गरुडभरारी तेवढी कौतुकानें पाहतो. मनुष्याच्या अंतःकरणांतल्या त्यागाच्या गगनचुंबी ज्वाळांचें नर्तन त्याला बेहोष करून सोडतें. दिव्य स्वप्नांच्या मागून धांवत असतांना आपला कडेलोट होत आहे याचेंही ज्याला भान रहात नाहीं त्याच्या समाधीवर फुलें वाहण्यांतच त्याला धन्यता वाटते. इतिहासाच्या चाळणींतून मोठमोठे राजे हां हां म्हणतां गळून पडतात. पण तानाजीसारखे वीरपुरुष मात्र वरच चमकत राहतात. जें जें लौकिक आहे, पार्थिव आहे, सामान्य आहे, तें तें इतिहास झटकन् विसरून जातो. जें जें अलौकिक आहे, उदात्त आहे, असामान्य आहे, तें तें तो जपून ठेवतो. सुभाषचंद्र बोस हें नांव तो नेहमींच आदरानें आणि प्रेमानें उच्चारील याचें कारण हेंच आहे.

## ३

सुभाषबाबूंची जन्मपत्रिका पाहून ज्योतिष्यांनीं बाल सुभाषच्या भवितव्या-

विषयीं काय काय भविष्यें वर्तविलीं होतीं याची माहिती मला नाहीं. मात्र त्यांच्यापैकीं कुणाचेंही भविष्य खरें ठरलें असेल अशी आशाच करायला नको ! नवा इतिहास घडविण्याकरितां ज्या व्यक्तीचा अवतार असतो, तिला शनिमंगळसुद्धां थरथर कांपत असले तर त्यांत नवल कसलें ? किंबहुना सुभाषबाबूंच्या मातापितरांना तरी त्यांच्या भावी कर्तृत्वाची कधीं पुरी कल्पना करतां आली असेल काय ? त्यांच्या वडिलांच्या डोळयांपुढून सुभाष आय्. सी. एस्. होऊन बडा अधिकारी झाल्याचें स्वप्न अनेकदां तरळत गेलें असेल. पित्याच्या या अपेक्षेप्रमाणें सुभाषबाबू आय्. सी. एस्. होऊन मातृभूमीला परत आले. पण तें कांहीं नोकरशाहीच्या जुलमी राज्ययंत्रांतलें एक चक्र होऊन आधींच दीनदुर्बळ झालेल्या आपल्या देशबांधवांना डोळे मिटून भरडण्यासाठीं नव्हे, तर त्या राक्षसी पोलादी यंत्राचे तुकडे तुकडे करून त्यांची मुक्तता करण्याचें कंकण हातांत बांधण्याकरितां! चिमुकला सुभाष जसा जसा मोठा होऊं लागला, मॅट्रिकमध्यें दुसरा नंबर पटकावून त्यानें जेव्हां कॉलेजांत प्रवेश केला, तेव्हां प्रभावतीदेवींनीं आपला मुलगा लवकरच बडा वकील होईल, तो खोऱ्यानें पैसा मिळवूं लागेल आणि मग एक रूपगुणसंपन्न मुलगी बहू म्हणून त्याच्या जोडीनें वंदन करण्याकरितां आपल्यापुढें येऊन उभी राहील असें मनोराज्य केलें असलें तर त्यांत अस्वाभाविक असें काय होतें ? कुठलीही माउली आपल्या लाडक्या लेकाविषयीं अशाच प्रकारच्या गोड कल्पना करीत असते. पण कॉलेजांत जाणाऱ्या सुभाषनें आपल्या मातोश्रींच्या या मनोराज्याला एके दिवशीं केवढा जबर धक्का दिला. इंटरमध्यें असलेला अठरा वर्षांचा सुभाष शेले–कीट्स यांचा काव्यरस चाखण्यांत किंवा शेक्सपीअरच्या नाटकांचीं पारायणें करण्यांत गुंग होऊन गेला असता तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहींच नव्हतें. या मुग्ध वयांत बहुतेक मुलें स्वप्नाळु काव्यसृष्टीनेंच आकृष्ट होत असतात. पण इंटरमधला सुभाष यावेळीं आकाशांत उंच उंच जाणाऱ्या शेलेच्या चंडोलाच्या भराऱ्यांचें कौतुक

करण्यांत गुंग झाला नव्हता. त्याचें मन त्या आकाशापलीकडच्या परम तत्त्वाचा परिचय करून घेण्याकरितां धडपडत होतें. शेक्सपीअरपेक्षां शंकराचार्यांशीं गुजगोष्टी करण्यांत त्याला आनंद होऊं लागला होता. जगावें कीं मरावें या हॅम्लेटच्या सुप्रसिद्ध स्वगतांतल्या प्रश्नापेक्षांही अधिक गंभीर अशी समस्या सोडविण्याच्या नादाला तो लागला होता. जगावें कीं मरावें या कूटप्रश्नापेक्षां हा जगणारा किंवा मरणारा कोण आहे या प्रश्नानें त्याला बेचैन करून सोडलें होतें. हा प्रश्न घराच्या चार भिंतींत बसून कधींच सुटत नाहीं आणि पुस्तकी पांडित्य या बाबतींत कुणालाच मार्गदर्शन करूं शकत नाहीं हें लक्षांत येतांच त्यानें घराला रामराम ठोकला, कॉलेजची रजा घेतली. कॉलेजांत शिकणारा हा भाविक नवयुवक आपली उत्कट आध्यात्मिक तृषा शांत करण्याकरितां गिरिकंदराकडे वळला. सद्‌गुरूच्या दर्शनाकरतां तो तीर्थक्षेत्रें धुंडाळूं लागला.

सुभाषबाबूंच्या चरित्रांतला हा प्रसंग जेव्हां जेव्हां माझ्या डोळ्यांसमोर उभा रहातो, तेव्हां तेव्हां बुद्धाच्या जीवनांतला क्रांतिक्षण मला आठवतो. राजपुत्र सिद्धार्थ अशाच एका उत्कट विरक्तीच्या क्षणीं सिंहासन सोडून संन्याशी झाला. सद्‌गुरूचा शोध करीत या क्षेत्राहून त्या क्षेत्राला जाणाऱ्या तरुण सुभाषचें समाधान करणारी व्यक्ति त्या वेळीं त्याला भेटली नाहीं हें आधुनिक भारताचें केवढें भाग्य! ब्रह्मज्ञानाचा नाद सोडून देउन सुभाष जेव्हां परत कॉलेजांत दाखल झाला तेव्हां त्याच्या कुटुंबांतल्या साऱ्या मंडळींना हायसें वाटलें असेल. त्याच्या सोबत्यांच्या मनांत आलें असेल, ‘ या विसाव्या शतकांत इंग्रजी विद्या हीच ब्रह्मविद्या आहे. मॅट्रिकमध्यें दुसऱ्या आलेल्या ह्या तरुणाला हिमालयांतील कंदमुळें खाऊन ध्यानधारणा करीत बसणें शक्य तरी आहे काय? छे! तिथें सुद्धां त्याच्या डोळ्यांपुढें डौलदार बंगले नाचूं लागतील, ऐटदार मोटारी धांवूं लागतील. प्रीतीपेक्षांही परमार्थाचा मार्ग अधिक कांटेरी असतो हें त्याला लवकरच उमगलें हें बरें झालें. आतां ही

स्वारी पुस्तकांतला किडा बनणार, इंटरला पहिल्या वर्गात येणार आणि बी. ए.ला पहिल्या वर्गात पहिला नंबर पटकावून—!'

पण बी. ए. होण्यापूर्वीच सुभाषला तें कॉलेज सोडावें लागलें. इंटरमध्यें असतांना परमार्थाच्या ओढीनें त्यानें कॉलेजकडे पाठ फिरविली होती. आतां त्याचें उत्कट देशप्रेम वर उसळून आलें. त्या कॉलेजांतल्या ओटेन नांवाच्या एका गोऱ्या प्रोफेसराला हिंदी विद्यार्थ्यांचा अपमान करण्यांत मोठा आनंद वाटत असे. हिंदुस्थानाविषयीं आणि हिंदी जनतेविषयीं तुच्छतेनें बोलणें हा त्याचा स्वभावधर्मच होऊन बसला होता. बिचारे परीक्षार्थी विद्यार्थी ही निंदानालस्ती मुकाट्यानें ऐकून घेत. पण बी. ए. मध्यें असलेल्या सुभाषला या गुलामी मनोवृत्तीची चीड आली. तोंडाला येईल तें बोलणें फार धोक्याचें असतें हा धडा मग्रारनिल्हे प्रोफेसरांना शिकविण्याकरितां सुभाषनें त्यांना यथास्थित चोप देण्याची व्यवस्था केली आणि त्या कॉलेजला रामराम ठोकला.

सुभाषबाबूंचें मन किती भावनाशील होतें, त्यांची आपल्या मातृभूमीवर किती विलक्षण भक्ति होती, तिचा शाब्दिक अपमानसुद्धां त्यांना कसा संतप्त करून सोडीत असे, हें या प्रसंगावरून स्पष्ट दिसतें. त्यांच्या स्वभावाचे हे सारे विशेषच पुढें विविध मार्गांनीं विकसित होत गेले आणि एके काळीं संन्यासी व्हावयाला निघालेला नवभारताचा हा सुपुत्र त्याचा सेनापति झाला.

## ४

मोठ्या माणसांचीं मनें वज्रापेक्षां कठोर आणि फुलाहून कोमल असतात एवढेंच सांगून महाकवि भवभूति थांबत नाहीं. तीं केव्हां व कशीं वज्रकठोर अथवा कुसुमकोमल होतात हें सांगणें सोपें नसल्यामुळें त्यानें ' लोकोत्तराणां चेतांसि को न विज्ञातुमर्हति '—असामान्य माणसांचीं मनें अनाकलनीय असतात—हेंही सत्य त्याच्या पाठोपाठ सांगून टाकलें. सुभाषबाबूंची नुसती विद्यार्थिदशा पाहिली तरी भवभूतीची ही मार्मिक उक्ति किती सत्यपूर्ण

आहे याची प्रचीति येते. ज्या व्यक्तीच्या विशीपूर्वीच्या आयुष्यांतच विरक्ति आणि देशभक्ति यांची वातचक्रें विलक्षण वेगानें भिराभिरत गेलीं, तिचें पुढचें जीवन वादळवाऱ्यांनीं, गडगडणाऱ्या मेघांनीं आणि कडकडणाऱ्या विजांनीं भरून जावें यांत नवल कसलें ? १९२१ पासून १९४१ पर्यंतच्या वीस वर्षांच्या सुभाषबाबूंच्या आयुष्यक्रमांत काय काय घडलें याची जंत्री देण्यापेक्षां काय काय घडलें नाहीं असा प्रश्न विचारणेंच अधिक उचित होईल. १९४३मध्यें आझाद हिंद सेनेचा सेनापति होऊन 'कदम कदम बढाय जा' असा स्वातंत्र्याचा संदेश देणाऱ्या या महापुरुषानें सार्वजनिक आयुष्याच्या प्रारंभीं संपादकाचें काम केलें आहे. या वृत्तपत्राचें नांवसुद्धां लक्षांत ठेवण्याजोगें आहे-फॉर्वर्ड—पुढें चला. ' हिंदी बांधवांनों, स्वातंत्र्य हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. पण तो आज तुम्हांला सुखासुखी मिळणार नाहीं. त्या स्वातंत्र्याचा मोबदला तुम्हांला दिलाच पाहिजे. स्वातंत्र्य फक्त एकच मोबदला मान्य करीत असते- रक्त !—'असे पुढें तेजस्वी उद्गार काढणाऱ्या या वीरपुरुषानें कलकत्ता कार्पोरेशनचा चीफ ऑफिसर म्हणून काम केलें होतें हें कळल्यावर जीवन हें कादंबरीहून अद्भुतरम्य असतें असें कोण मनांत म्हणणार नाहीं ? या वीस वर्षांच्या काळांत सुभाषबाबूंच्या ज्वलज्जहाल देशभक्तीनें ब्रिटिश साम्राज्यशाही खिळखिळी करून सोडण्याकरितां किती संस्था स्थापन केल्या, देशांतील व देशाबाहेरील किती चळवळींना चालना दिली, प्राणघातक रोग पाठपुरावा करीत असतांही किती वेळां हंसतमुखानें तुरुंगाची यात्रा केली, याची गणतीच करतां येणार नाहीं.

अशा या चमत्कृतिपूर्ण जीवनमंदिरावर कळस चढविण्याकरतांच कीं काय १९४१ च्या आरंभीं डोळ्यांत तेल घालून पहारा करणाऱ्या ब्रिटिश सरकारच्या हातांवर तुरी देऊन सुभाषबाबू हिंदुस्थानांतून बाहेर पडले, जर्मनीच्या नभोवाणीवरून बोलूं लागले. जपानचें साहाय्य मिळवून

आणि ब्रह्मदेशांत आझाद हिंद सरकार स्थापन करून आपली मातृभूमि दास्यमुक्त करण्याकरितां ते सेनापति म्हणून पुढें सरसावले—

सारेंच एक विलक्षण, अद्भुतरम्य स्वप्न वाटतें. पण या एका क्षणभंगुर स्वप्नानें या दुर्दैवी दलित देशाला केवढा दिलासा दिला.

## ५

अशीं स्वप्नें महाकवींना पडतात; नाहीं असें नाहीं. पण तीं साकार होतात महापुरुषांच्या जीवनांतच ! सुभाषबाबूंच्या व्यक्तित्वांत कुठल्याही लोकविलक्षण स्वप्नाला रंगरूप देण्याचें सामर्थ्य होतें. आधुनिक भारतांतले माधवराव रानड्यांपासून मानवेंद्ररॉयपर्यंतचे थोर विचारवंत घ्या, राममोहन रॉय पासून आण्णासाहेब कर्व्यांपर्यंतचे वंद्य सुधारक पहा किंवा झांशीच्या राणीपासून जयप्रकाश नारायण पर्यंतचे स्वातंत्र्याकरितां हातावर घेऊन मृत्यूशीं झुंज करणारे शूर बंडखोर बघा — या सर्व इतिहास घडविणाऱ्या श्रेष्ठ व्यक्तींत सुभाषबाबूंइतकें वैचित्र्यपूर्ण व्यक्तित्व क्वचित्‌च आढळेल. माणसाच्या मानसिक घडणींत विरोधी गुण असतील तर ते एकमेकांना मारक होऊन त्या व्यक्तीला बहुधा कर्तृत्वशून्य करून सोडतात, त्यांच्या रस्सीखेचींतच तिची जीवनशक्ति खर्च होऊन वाया जाते, असा जगाचा अनुभव आहे. पण गांधीजीप्रमाणें सुभाषबाबूही या नियमाला अपवाद ठरले. त्यांच्या जीवनांत विरोधी गुणांचा विचित्र संकर किंवा उग्र संघर्ष न होतां मनोहर संगमच झाला. कवि, संत, वीर व शास्त्रज्ञ असे मोठ्या माणसांचे चार प्रकार मानले तर स्वभावतः गांधीजींची गणना संतांत करावी लागेल आणि सुभाषबाबूंचें नांव कवींच्या मालिकेंत गुंफणें योग्य होईल. गांधीजींचें मानवतेवरचें प्रेम हें कविवृत्तींतून निर्माण झालेलें नाहीं आणि त्यांच्या सत्य—अहिंसेच्या निष्ठेला शास्त्रज्ञांच्या अनुभवांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. या सर्वांचा उगम त्यांच्या अंतःप्रेरित साधुत्वांत आहे. अशा मनोवृत्तीच्या मनुष्याला सभोव-

ताली चाललेली हिंसेची, असत्याची, भोगलालसेची आणि आत्मविक्रयाची पूजा पाहून जगाचा उबग येतो. तो जगाकडे पाठ फिरवून आत्मानंदांत दंग होऊन जातो. असा मनुष्य पूज्य मानला जातो; पण तो सहसा राष्ट्राचा नेता किंवा द्रष्टा होऊं शकत नाहीं. गांधीजी भारताचे अनभिषिक्त सम्राट् झाले ते केवळ आपल्या फकिरी बाण्यामुळें नव्हे. त्यांच्यांतल्या फकिरानें चाळीस कोटी जनतेच्या लढ्यांत उडी टाकली, त्यानें आपल्या आत्मशक्तीनें या जनतेचें सुप्त सामर्थ्य जागृत केलें, म्हणून त्यांना तें अलौकिक पद प्राप्त झालें. गांधीजींमधला संत या दोषपूर्ण जगाला कंटाळला नाहीं. उलट हें जग बदलून टाकण्याची इच्छा बाळगणारा त्यांच्यांतला वीर या अनुभवांनीं जागृत झाला. साधुत्व व वीरत्व यांचें अभूतपूर्व मोहक मिश्रण त्यांच्यांत झालें आहे. गांधीजी हें कोडें आहे असें जें कित्येकांना वाटतें त्याचें कारण हेंच आहे.

सुभाषबाबूंच्या संबंधानेंहि असेंच म्हणतां येईल. ते स्वभावतः कवि होते. ते संत होण्याचाही संभव होता. ऐन विशींत उद्भवलेली त्यांची ब्रह्मज्ञानाची तळमळ सोडून दिली तरी खालीं दिलेल्या त्यांच्या आठवणीवरूनसुद्धां त्यांच्या कविमनाचें संतप्रवृत्तीशीं किती निकटचें नातें होतें याची कुणालाही सहज कल्पना येऊं शकेल.

ती आठवण अशी आहे—'सिंगापूरला सुभाषबाबूंच्या निवासस्थानीं त्यांच्या खोलींतल्या मेजावर एक स्टॅण्ड हवा होता. जर्मनीहून त्यांचेबरोबर आलेले मि. हसन हे त्यांचे खाजगी चिटणीस होते. सुभाषबाबूंनीं त्यांना स्टँड आणावयाला सांगितला. दुसऱ्या दिवशीं एक सुंदर स्टँड टेबलावर ऐटींत विराजमान झाला. तो पाहून सुभाषबाबूंनीं हसन यांना प्रश्न केला, ' मी तुम्हाला काल स्टँड आणावयाला सांगितला होता ना ? ' स्टँड समोर दिसत असूनही सुभाषबाबू हा प्रश्न आपणांला कां विचारीत आहेत हें हसन यांना कांहीं केल्या कळेना. त्यांनीं उत्तर दिलें, ' स्टँड टेबलावर आहे कीं ! ' 'कसा काय आहे तो ? ' नेताजींनीं प्रश्न केला. ' चांगला आहे ' चिटणीसांनीं

उत्तर दिलें. ‘ पुन्हां एकदां नीट पहा ’ सुभाषबाबूंनीं सांगितलें. हसननीं खूप निरखून पाहिलें. पण त्या स्टॅंडमध्यें काय दोष आहे हें डोकें खाजवूनसुद्धां त्यांच्या लक्षांत येईना. त्यांनीं मृदु स्वरांत उत्तर दिलें ‘ स्टॅंड चांगला आहे. त्यांत कांहीं दोष नाहीं. ’ सुभाषबाबू म्हणाले ‘ त्या स्टॅंडच्या तळाशीं एका स्त्रीचं लहानसं नग्न चित्र आहे. तें तुमच्या नजरेला कसं आलं नाहीं ? असला स्टॅण्ड माझ्या टेबलावर नको. सरळ समुद्रांत फेंकून द्या तो ! ’

सुभाषबाबूंमधला हा संत ध्या किंवा परोपरीनें प्रगट होणारा कवि घ्या, दोघेहि त्यांच्यांतल्या देशभक्तांत विलीन होऊन गेले होते, हा त्यांच्या व्यक्तित्वाचा असामान्य विशेष आहे. सामान्यतः कल्पना आणि कर्तृत्व यांचीं जगें भिन्न असतात. पण सुभाषबाबूंमधल्या कवीनें आपल्या तीव्र भावनांचें चित्रण करण्याकरतां बंदुकीची लेखणी आणि रक्ताची शाई यांचाच उपयोग केला, याचें कारण हा कवि समजूं लागल्यापासून आपल्या कल्पनेच्या कुंचल्यानें एकच सुखस्वप्न रंगवीत आला होता. तें स्वप्न म्हणजे आपल्या मातृभूमीचें स्वातंत्र्य होय. गुलामगिरीनें खालीं घातलेली मान जिनें आतां आत्मविश्वासानें वर केली आहे, जिच्या हातापायांतील शृंखला नुकत्याच गळून पडल्या आहेत आणि डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारा थांबल्यामुळें जी स्वातंत्र्याचीं आणि वैभवाचीं नवीं स्वप्नें पाहूं लागली आहे अशा भारतमातेची हा कवि कळूं लागल्यापासून मानसपूजा करीत आला होता. तीं स्वप्नें शक्य तितक्या लवकर सत्यसृष्टींत उतरावींत म्हणून कुठलेंही साहस करणें हा त्याचा स्वभावधर्म होऊन बसला होता. जपानच्या साहाय्यानें इंग्रजांच्या साम्राज्य सत्तेचे उच्चाटन करण्याचा डाव फसला आणि अपघाताच्या रूपानें मृत्यु समोर येऊन उभा राहिला तेव्हां हें कविमन हंसत हंसत स्वतःशीं असेंच गुणगुणत राहिलें असेल—

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनियां बेहोष धावलों ध्येयपथावरती ।

कधिं न थांबलो विश्रांतीस्तव पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे ।
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार, क्रांतिचा गर्जा जयजयकार !

## ६

क्रांति– मातृभूमीला बंधमुक्त करणारी राजकीय क्रांति— ही सुभाषबाबूंची इष्ट देवता होती. या देवतेचा अवतार जगांत कधींही सुखासुखी होत नाहीं हें ते जाणून होते. त्या अवतारासाठीं जीवनाच्या महायज्ञांत कणाकणानें स्वतःची आहुति देण्याचा जो धर्म अंगीं बाणवावा लागतो तो त्यांनीं आमरण मोठ्या निष्ठेनें आचरला. वृत्रासारख्या बलाढ्य असुराचा वध करण्याकरतां दधीचीनें क्षणाचाही विलंब न लावतां स्वतःचें बलिदान केल्याची जी वैदिक कथा आहे तिची आठवण व्हावी असाच सुभाषबाबूंचा त्याग आहे. आपल्या मातृभूमीला गुलाम बनविणाऱ्या मोंगल सत्तेपुढें स्वप्नांतसुद्धां मान वांकवणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून ती पार पाडण्याकरितां रानावनांतून दगडाच्या उशीवर आपलें श्रांत मस्तक ठेवणाऱ्या प्रतापचें स्मरण व्हावें अशीच त्यांची देशभक्ति जाज्वल्य आहे.

मात्र ही देशभक्ति केवळ उत्कट भावनेवर अधिष्ठित झालेली नव्हती. त्या भावनेला जगांतल्या राजकारणाच्या विविध प्रवाहांची, त्यांच्या संघर्षांची, सर्व वर्तमान संघर्षांचा व्यावहारिक दृष्टीनें कसा उपयोग करून घ्यावा या ज्ञानाची आणि तें ज्ञान कृतींत उतरविण्याकरतां लागणाऱ्या साहसी मुत्सद्दीपणाची अतुल जोड मिळाली होती. जणुं कांहीं या एकाच व्यक्तींत चाणक्य आणि चंद्रगुप्त किंवा रामदास आणि शिवाजी यांच्या गुणांचें संमेलन झालें होतें.

या वैशिष्ट्यामुळेंच सुभाषबाबू आंतरराष्ट्रीय राजकारणाचा हिंदी स्वातंत्र्याकरितां उपयोग करून घेऊं शकले. त्यांच्या पूर्वींच्या अनेक पुढाऱ्यांना

तात्त्विक दृष्ट्या या प्रश्नाचें आकलन झालें होतें. पण असहकारितेचा उदय होण्यापूर्वी ज्या नेमस्त नेत्यांनीं या बाबतींत प्रयत्न केलें होते, त्यांचीं तोंडें परिस्थितीमुळें फक्त इंग्लंडकडे वळलेलीं होतीं. इंग्लंडमध्यें चळवळ करावयाची, तिथल्या लोकांना इथली वस्तुस्थिति समजावून सांगावयाची आणि तिथल्या प्रागतिक मानल्या जाणाऱ्या पंथांचें शक्य तेवढें सहकार्य संपादन करून हिंदुस्थानच्या बाबतींत ब्रिटिश सरकारवर दाब आणावयाचा असें सामान्यतः त्या धोरणाचें वर्णन करतां येईल. गोखल्यांसारख्या धुरंधर प्रागतिक मुत्सद्यांनीं आपल्या काळांत ही दृष्टि जागृत ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा केली, असेंच उद्यांचा इतिहास म्हणेल. पण पहिल्या महायुद्धापूर्वी या पद्धतीच्या प्रचाराला जेवढें महत्त्व होतें तेवढें ते नंतर उरलें नाहीं. दोन महायुद्धांमधला हा काळ हिंदी राजकारणांतला गांधीप्रणीत राजकीय आंदोलनांचा काळ होय. या काळांत असहकारिता, कायदेभंग आणि चलेजाव अशा चढत्या पायऱ्यांनीं गांधीजींनीं या राष्ट्रांत जागृति करून त्याला स्वातंत्र्याच्या दृष्टीनें पुष्कळच पुढें नेलें यांत शंका नाहीं. पण या काळांत युरोपमध्यें ज्या घडामोडी चालल्या होत्या — पराभूत जर्मनीचे पुनरुत्थानाकरतां चाललेले प्रचंड प्रयत्न, राज्यक्रांतीच्या पायावर समतावादी समाजरचनेचें मंदिर बांधण्याकरितां प्राण पणाला लावून रशिया करीत असलेली प्रगति, डळमळीत होऊं पहाणारें आपलें साम्राज्यसिंहासन स्थिर करण्याकरतां ब्रिटन खेळत असलेले डावपेंच, एक ना दोन अशा कितीतरी गोष्टी सांगतां येतील—त्यांच्याकडे गांधीजींनीं आत्मीयतेनें म्हणा अथवा आपलें ध्येय साध्य करून घेण्याकरितां त्यांचा कांहीं उपयोग करून घेतां येईल अशा मुत्सद्दीपणाच्या दृष्टीनें म्हणा, सहसा पाहिलें नाहीं. जवाहरलालांना या परिस्थितीचें संपूर्ण ज्ञान नव्हतें असें नाहीं. स्पेनमधल्या किंवा चीनमधल्या जनतेच्या लढ्यांविषयीं काँग्रेसनें जी आपुलकी दाखविली ती जवाहरलालजींच्या प्रेरणेनेंच ! असें असूनही दुसऱ्या महायुद्धाचे काळे ढग युरोपच्या क्षितिजावर जेव्हां गडगडाट करूं

लागले, तेव्हां 'सावध व्हा, सिद्ध व्हा, परतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र होण्याची पर्वणी महायुद्धाच्या रूपानं पुन्हां येत आहे' हें सांगण्याकरतां जवाहरलाल पुढें सरसावले नाहींत. तें काम सुभाषबाबूंनीं केलें. दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी सहा महिने आधीं त्रिपुरी येथें भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनांत या वीर मुत्सद्यानें हडसून खडसून आपल्या सहकाऱ्यांना बजावलें होतें 'सहा महिन्यांच्या आंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यावं अशी आपण मागणी केली पाहिजे. त्या मुदतींत ही मागणी पुरी करण्यांत आली नाहीं तर आपलें जें कांहीं सामर्थ्य असेल तें पणाला लावून ब्रिटनशीं लढा देण्याची आपण तयारी केली पाहिजे.'

## ७

त्या वेळीं गांधीजी असला लढा पुकारायला तयार नव्हते. पण पुढें तीन वर्षांनीं 'करेंगे या मरेंगे' असा संदेश लोकांना देऊन त्यांना तीच गोष्ट करावी लागली. सुभाषबाबूंच्या भविष्यवाणीकडे १९३९–४० मध्यें काँग्रेसनें थोडें अधिक लक्ष दिलें असतें तर? तर काय झालें असतें याची गोड स्वप्नें—छे! यादवीच्या काळ्याकुट्ट छायांनीं अंधारलेल्या या काळांत तीं स्वप्नें अधिकच मोहक आणि दाहक वाटूं लागतात— विफलतेची काळजांत रुतलेलीं शल्यें अधिक सलूं लागतात.

१९२० पासून १९४० पर्यंत गांधीजींनीं स्वातंत्र्यसंपादनाकरतां जो मार्ग चोखाळला त्याविषयीं कोणाचेंही दुमत होणें शक्य नाहीं. १९२० सालीं असहकारितेचा पुरस्कार करतांना खुद्द त्यांनींच असे स्पष्ट उद्गार काढले होते, 'हिंदुस्थानच्या हातीं जर आज तलवार असती तर ती त्यानं उपसली असती!' पण कुटिल साम्राज्यशाहीनें जनतेला पिढ्यानुपिढ्या निःशस्त्र करून ठेवलें होतें. निःशस्त्रपणा हा दारिद्र्याप्रमाणेंच मनुष्याला निर्बळ आणि निःसत्त्व करून सोडणारा एक मोठा शाप आहे. या दोघांच्याही पोटीं

भेकडपणा, दुबळेपणा आणि गुलामी वृत्ति यांचा जन्म होतो. दारिद्र्याप्रमाणें निःशस्त्रपणाही माणसाला नेहमींच खालीं मान घालून चालायला शिकवितो. त्याला पृथ्वीवरले कांटेकुटे आणि दगडधोंडे दिसूं लागतात. कांहीं केल्या आकाशांतल्या फुलांकडे आणि हिरेमाणकांकडे त्याचें लक्षच जाऊं शकत नाहीं. दीडशें वर्षांच्या निःशस्त्रपणानें आणि दर पिढीला द्विगुणित होत जाणाऱ्या दारिद्र्यानें आलेला हा आत्म्याचा करंटेपणा नाहींसा करण्याकरितां तेहतीस कोटी हिंदी लोकांच्या हातांत एक नवें शस्त्र देण्याचा गांधीजींनीं निर्धार केला. माणसाचा आत्मा पोलादाहूनही खंबीर असतो हा अनुभव त्यांनीं आफ्रिकेंतल्या लढ्यांत घेतला होता. जागृत झालेल्या आत्मशक्तीचें शस्त्र सैतानी सत्तासुद्धां हिरावून घेऊं शकत नाहीं, उलट प्रसंगीं त्याच्या तेजस्वीपणापुढें त्या सत्तेच्या पोलादी शस्त्रांनाच नमतें घ्यावें लागतें अशी त्यांची तिथल्या प्रयोगांत खात्री होऊन चुकली होती.

क्रांतीची पूर्वतयारी या दृष्टीनें गांधीजींचें हें नेतृत्व देशाला किती उपकारक झालें हें सुभाषबाबूंच्या शब्दांतच सांगणें योग्य होईल. १९४३ सालच्या गांधीजयंतीदिवशीं आधुनिक भारताच्या या गुरुतुल्य सर्वश्रेष्ठ सत्याग्रही नेत्याला परदेशांतून वंदन करतांना सुभाषबाबू म्हणाले——

> ‘ १९२० मध्यें आपलें असहकारितेचें नवें शस्त्र घेऊन गांधीजी जर पुढें सरसावले नसते तर हिंदुस्थान जमिनीला खिळून राहिला असता, असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्रयत्नांत त्यांनीं बजावलेली कामगिरी अपूर्व आणि अतुलनीय आहे. प्राप्त परिस्थितींत कोणाही एकट्या माणसाला उभ्या जन्मांत यापेक्षां जास्त कांहीं करतां आलं नसतं. ’

पण गांधीजींनीं निर्माण केलेलें हें शस्त्र लोकजागृतीच्या दृष्टीनें कितीही उपयुक्त ठरलें तरी देशाच्या पायांतल्या गुलामगिरीच्या शृंखला शक्य तितक्या लवकर त्यानेंच तुटतील अशी अंधश्रद्धा मात्र सुभाषबाबूंनीं कधींच बाळगली

नाहीं. आजच्या जगांतलें राजकारण हा एका रक्तामांसाच्या कुटुंबांतील कलह, जिवाभावाच्या मित्रांतलें भांडण किंवा प्रामाणिक विरोधकांतला मतभेदाचा प्रश्न नसून तो भक्ष्य आणि भक्षक यांच्यांतला अटीतटीचा लढा आहे हें ते कधींच विसरले नाहींत.

इंग्लंड हें ब्राह्मणांचें राष्ट्र असतें तर गांधीजींच्या आत्मशक्तीनें त्याला तत्काळ शरण आणलें असतें. पण तें कणाकणांत बनियांचें राष्ट्र आहे ! या राष्ट्रांतल्या कुठल्याही मुत्सद्यांचें काळीज त्याच्या छातीखालीं टिकटिक करीत नाहीं. तें नेहमीं त्याच्या खिशांत धडधडत असतें. ब्रिटनकडून स्वातंत्र्य मिळवायचें म्हणजे उग्र देवतेला प्रसन्न करून एखादा वर पदरांत पाडून घेणें नव्हे किंवा रणभूमीवर एकाद्या वीर पुरुषाशीं लढून त्यानें पादाक्रांत केलेला आपला देश परत मिळविणेंही नव्हे. इंग्लंडमधल्या एकाद्या प्रामाणिक पुरुषानें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयीं कितीही जिव्हाळा दाखविला तरी दोन देशांच्या राजकीय संबंधांत 'Man is kind but men are cruel' (मनुष्य दयाळु आहे, पण माणसें कठोर असतात) ही रवींद्रांची उक्तिच शेवटीं खरी ठरते. ब्रिटिश मुत्सद्दी नेहमींच गोड गोड बोलतात. पण अशी साखर पेरतां पेरतां त्या साखरेला गुप्तपणानें विषाचे पाणी कसें द्यायचें ही कला-छे ! या गोष्टीची ते कलेंत कधींच गणना करीत नाहींत. ती त्यांच्या तळहाताचा मळ होऊन बसली आहे !

हिंदुस्थानांतील कोट्यवधि लोकांच्या अठराविश्वे दारिद्र्याच्या पायावरच इंग्लंडच्या ऐश्वर्याचे उंच उंच मनोरे उभे आहेत हें तिथल्या प्राथमिक शिक्षका-पासून पंतप्रधानापर्यंत प्रत्येकाला पुरेपूर ठाऊक आहे. या पायाला कुणी सुरुंग लावूं लागला कीं हे सर्व उदार लोक बेचैन होतात. मग मुत्सद्दी आपल्या पोतड्यांतून कमिट्या, कमिशनें, आणि राऊंड टेबलें काढतात. या खेळण्यांनीं काम भागत नाहीं असें वाटलें तर सत्ताधारी अधिकारी बंदुका आणि मशीनगन्स यांचा उपयोग करून बघतात. आणि तेवढ्यानेंहि हा विराट

अग्नि विझणार नाहीं असें वाटलें तर सत्तासंक्रमणाचें उदक हातावर सोडण्याचीं अघळपघळ वचनेंहि देतात. मात्र तोंडानें हीं राज्यनौकेचे कर्णधार वचनें देत असतांनाच पुढें हातानें त्यांना हरताळ कसा फांसायचा याचा विचार करण्यांत त्यांचीं डोकीं गुंतलेलीं असतात.

मुत्सद्दीपणीचे मुखवटे बदलण्यांत ब्रिटन कितीहि पटाईत असलें, त्यांतले अनेक मुखवटे प्रथमदर्शनीं अत्यंत सोज्वळ भासले, तरी याचा अर्थ सैतानाला साधूचा अभिनय साध्य केल्याशिवाय या जगांत जगतां येत नाहीं एवढाच आहे. हें कटु सत्य आधुनिक भारताच्या सर्व नेत्यांत सुभाषबाबूंइतकें दुसऱ्या कुणीहि संतत ध्यानांत ठेवलें नाहीं. जनतेला जागृत करणारें आत्मशक्तीचें गांधीजींचें तत्त्वज्ञान शस्त्रशक्तीच्या बळावर आपलें साम्राज्य टिकवूं इच्छिणाऱ्या कुटिल राजनीतीला शह देऊं शकलें तरी तिच्यावर मात करूं शकेलच असें नाहीं, हें सुभाषचंद्रांनीं पूर्णपणें ओळखलें होतें. ही देवादेवांची लढाई नाहीं; देव आणि राक्षस यांचें हें युद्ध आहे. सौजन्य आणि सामर्थ्य यांच्या संग्रामांत कुठली तरी विशेष शक्ति सत्पक्षाच्या साहाय्याकरितां धांवून आली नाहीं, तर त्याचाच जगांत पराजय होण्याचा अधिक संभव असतो— नव्हे तो हटकून होतो— ही पुराणकाळापासून पदोपदीं प्रत्ययाला येणारी गोष्ट, गांधीजींच्या मार्गाचें मोठेंपण मान्य करूनहि, सुभाषबाबू मुळींच विसरले नाहींत. म्हणूनच संधि मिळतांच त्यांनीं आपला स्वतःचा मार्ग चोखाळला.

## ८

गेल्या पाव शतकांत महात्माजींनीं मोठमोठे राष्ट्रीय लढे लढविले असले तरी त्यांच्या हातांत जो ध्वज आहे त्याचा रंग राष्ट्रधर्माचा नाहीं; तो रंग मानवधर्माचाच आहे. त्यांची भूमिका सेनापतीची नाहीं ती ऋषीची आहे. जगाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून प्रत्येक व्यक्तीनें संयम व संन्यास यांचा

जीवनांत एका मर्यादेपर्यंत अवलंब केला पाहिजे हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. सुभाषबाबूंच्या अंतर्मनावर संन्यस्त वृत्तीचा पगडा कमी होता असें नांहीं. पण त्यांच्या हातांतला ध्वज राष्ट्रधर्माचा होता; मानवधर्माचा नाहीं. त्यांनीं आपल्या मानस—मंदिरांत सदैव पूजा केली ती आत्मिक विकासाच्या अपूर्णतेमुळें दुःखी झालेल्या मानवतेची नाहीं; अज्ञानांत, दारिद्र्यांत आणि गुलामगिरींत खितपत पडलेल्या हिंदमातेची. 'सर्वे तु सुखिनः सन्तु' हें तत्त्व त्यांनाहि संमत होतें. पण जगांतल्या दीन, दुःखी आणि दलित अशा या सर्वांच्या अग्रभागीं अश्रु गाळीत आपले देशबांधव उभे असल्याचें दृश्य त्यांना सदैव दिसत होतें. मानवधर्माचें ध्येय हें मृगजळ नसेल ! पण तें दुर्लभ अमृत आहे, पिढ्यानूपिढ्या गुलामगिरीच्या अग्निकुंडांत पिचत पडलेल्या राष्ट्राला स्वातंत्र्यांची जी दाहक तृषा लागते ती तृप्त करण्याचें सामर्थ्य वाऱ्यावरून येणाऱ्या या अमृताच्या चार तुषारांत असूं शकत नाहीं, ही जाणीव सुभाषबाबूंच्या रोमारोमांत जागृत होती. जेते जितांना स्वातंत्र्याचें दान कधींच करीत नसतात, जागृत झालेले जित जेत्यांच्या हातून स्वातंत्र्य हिसकावून घेत असतात, कुठल्याहि देशाच्या पायांतल्या राजकीय शृंखला गोलमेजपरिषदेंतल्या वाटाघाटींनीं तुटून पडत नसतात, रक्तरंजित रणांगणावरच त्यांचे तुकडे तुकडे होण्याची शक्यता असते, या गोष्टींचा सुभाषचंद्रांना आयुष्यांत कधींहि विसर पडला नाहीं. आझाद हिंद सेनेची स्थापना करण्याची संधि मिळण्यापूर्वीं दहा वर्षें आधीं त्यांनीं काढलेले उद्गार पहावेत. त्यांतहि त्यांचें हें उत्कट स्वातंत्र्यप्रेम आणि त्यापायीं सर्वस्वाचा त्याग करण्याची भावना हीं स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसून येतात. ते उद्गार असे आहेत.

'प्रफुल्ल गुलाबपुष्पाचा सुगंध तुम्हांला हवा आहे ना ? मग आधीं त्याच्या कांट्यांचें स्वागत करा. हंसत हंसत उदय पावणाऱ्या उज्ज्वल उषेचें हास्य तुम्हांला पहायचें आहे ना ? मग रात्रीच्या भयाण अंधकारांतल्या कधींहि

न संपणाऱ्या घटका हंसत मुखानें घालविण्याला आधीं सज्ज व्हा. स्वातंत्र्याचा आनंद आणि समाधान यांची तुम्ही उत्सुकतेनें वाट पहात आहां. ठीक आहे. पण त्यांची किंमत तुम्हांला दिली पाहिजे. स्वातंत्र्याची किंमत -या जगांत त्याचें मोल एकच आहे — जो सर्वस्वाचें दान देऊं शकतो त्याच्यांचे पदरांत स्वातंत्र्य पडतें.'

पुढें दहा वर्षांनीं सुभाषबाबूंनीं ब्रह्मदेशांत आपले हे उद्गार कसे सार्थ करून दाखविले हें या पुस्तकांतल्या त्यांच्या प्रत्येक भाषणावरून- त्या भाषणांतल्या शब्दाशब्दाला मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरितां अहर्निश तळमळणाऱ्या या श्रेष्ठ आत्म्याच्या उदात्त दीप्तीनें जें तेज चढलें आहे त्यावरून- सहज दिसून येईल. सुभाषबाबूंच्या हृदयांतल्या देशभक्तीच्या ज्योतीनें असंख्य आबालवृद्धांच्या अंतःकरणांत निस्तेज होऊन पडलेले देशप्रेमाचे नंदादीप पुन्हां प्रज्वलित केले. शालिवाहनानें मातींतून सैनिक निर्माण केल्याची कथा आम्ही हिंदी लोक विसरून गेलों होतों. तिची प्रचीति या वंगवीरानें आम्हां चाळीस कोटी लोकांना आपल्या कर्तृत्वानें पुन्हां आणून दिली. या वीरश्रेष्ठाच्या ओजस्वी आवाहनानें अबला मानली गेलेली हिंदी स्त्री जागृत झाली. मोहिनीचें रूप टाकून तिनें महिषासुरमर्दिनीचा अवतार धारण केला. त्याच्या एका शब्दावरून आपली सारी संपत्ति ओवाळून टाकण्याकरतां व्यापारी वृत्तीचे पुरुषसुद्धां अहमहमिकेनें पुढें सरसावले. त्यानें दुरून दाखविलेल्या लाल किल्ल्याच्या दर्शनानें आग्नेय आशियांतील प्रत्येक हिंदी हृदय थरारलें, धुंद होऊन गेलें. पैसा, आप्त, सौख्य, प्राण- कुणाला कशाचेंहि भान राहिलें नाहीं. त्या सर्वांच्या डोळ्यापुढें अहोरात्र एकच चित्र नाचत होतें—आग्र्याचा लाल किल्ला—त्या किल्ल्यावर डौलानें फडकणारा तिरंगी झेंडा! मातृभूमीच्या स्वातंत्र्याचें प्रतीक असलेल्या या स्वप्नानें सुभाषबाबूंना वेड लावलें—सुभाषबाबूंनीं त्या स्वप्नसृष्टीची सत्यसृष्टी करण्याचें कंकण हातीं बांधून आपल्या अनुयायांना वेडें करून सोडलें.

९

दुर्दैवानें हें स्वप्न स्वप्नच ठरलें ! पण भंग पावलेलें कुठलेंहि उदात्त स्वप्न हें चक्काचूर झालेल्या हिरकणीसारखें असतें. त्याच्या कणाकणांतून तेजाचा आविष्कार होत असतो. स्वप्नांचें खरें सामर्थ्य त्यांच्या प्रेरक शक्तींत असतें हें लक्षांत घेतल्यावर सुभाषबाबू यशस्वी झाले नाहींत, याची खंत कोण करीत बसेल ? त्यांच्या स्वातंत्र्यस्वप्नानें भारतांत एक नवयुग निःसंशय निर्माण केलें आहे. या नव्या युगाचें स्वागत करतांना हिंसा-अहिंसा यांचा काथ्याकूट करीत बसणारांच्या बुद्धीची कींवच करावी लागेल. गांधीजींनीं आयुष्यभर अहिंसेचा आत्यंतिक पुरस्कार केलेला असला तरी भ्याड, दुबळ्या, आणि पळपुटया अहिंसेपेक्षां आर्तत्राणाकरतां किंवा आत्मसंरक्षणाकरतां केलेली हिंसा शतपटीनें श्रेष्ठ आहे असें ते नेहमींच म्हणत आले आहेत. जगांतल्या क्रूर जुलुमावर आक्रमण करणारी अहिंसा त्यांना हवी आहे. सात्विकतेची भूमिका न सोडतां अघोर अन्यायाशीं निकराची झुंज घेणारी अहिंसा महात्माजींना हवी आहे. युद्धाची शिकवण हाच त्यांच्या जीवनाचा एकमेव संदेश आहे असें म्हणतां येईल. मात्र हें युद्ध हरतऱ्हेच्या जुलमाविरुद्ध, प्रत्येक प्रकारच्या गुलामगिरीविरुद्ध, माणसाला पशूच्या पायरीवर नेऊन पोंचविणाऱ्या सर्व प्रचलित रूढींविरुद्ध आणि कायद्यांविरुद्ध, किंबहुना स्वतःच्या मनांतल्या एकूण एक असत्प्रवृत्तींविरुद्ध मनुष्यानें पुकारलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष आहे. महात्माजींची ही शिकवण सुभाषबाबूंनीं आमरण अक्षरशः आचरणांत आणली. आझाद हिंद सेनेच्या रूपानें त्यांनीं शस्त्रशक्तीचा अवलंब केला म्हणून काय त्यांनीं हिंसेचा पुरस्कार केला असें म्हणावयाचें ? छे ! हिंसा ही कृतीवरून सिद्ध होत नाहीं; ती हेतूवरूनच निश्चित केली पाहिजे. शस्त्र आणि शास्त्र यांच्या दुरुपयोगानें गांजलेल्या आजच्या जगांत-साम्राज्यशाहीच्या, भांडवलशाहीच्या, आणि हुकूमशाहीच्या

रूपानें जियें अघोर हिंसा रक्तानें लडबडलेल्या आपल्या हजारों जिभा चाटीत क्षणोक्षणीं विकट हास्य करीत आहे अशा ह्या दुर्दैवी जगांत—मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरतां, चाळीस कोटि लोकांच्या मानेवरला साम्राज्यसत्तेचा रक्त-शोषक राक्षसी हात उखडून टाकण्याकरितां केलेल्या धडपडीला हिंसा हें नांव देण्यांत काय अर्थ आहे ? या प्रयत्नांना हिंसा म्हणावयाचें असेल तर रावणाचा वध करणाऱ्या रामाची सुद्धां आपल्याला क्रूर हिंसकांत गणना करावी लागेल.

सुभाषबाबूंच्या ब्रह्मदेशांतल्या अकल्पित आणि अलौकिक कर्तृत्वावर जागतिक राजकारणाचे खेळ खेळलेल्या रॉयसारख्या बुद्धिवंतांकडून दुसऱ्या तऱ्हेचा एक आक्षेप घेण्यांत येतो. तो म्हणजे जपानच्या मदतीनें हिंदुस्थान स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांचा पोकळपणा ! चूड दाखवून वाघ घरांत आणण्यापैकींच हा प्रकार होता असें या आक्षेपकांचें म्हणणें आहे. तें मान्य करूनहि त्यांना एक प्रश्न सहज विचारतां येईल. एखाद्या घरांत सिंहानें दीर्घकाल आपलें बस्तान ठोकलें असलें, त्या सिंहाच्या पंजांतून सुटण्याची धडपड करून घर-मालक अगदीं हताश होऊन गेला असला, त्या धडपडींत झालेल्या जखमांतून वाहणारें रक्त निमूटपणें पाहण्याखेरीज आपल्याला दुसरें कांहीं करतां येणें शक्य नाहीं अशा प्रकारच्या निराशेनें त्याच्या मनावर पगडा बसविला असला, तर घरांत येणाऱ्या वाघाला प्रतिबंध करण्याची इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न होणें शक्य आहे काय ? वाघ घरांत शिरल्यावर घराच्या मालकीसंबंधानें त्याचें व सिंहाचें द्वंद्वयुद्ध सुरू होईल आणि त्यांत दोघेहि रक्तबंबाळ होऊन मरणाच्या दारीं पडले म्हणजे आपोआपच आपलें घर आपल्याला परत मिळेल अशी त्या मालकानें कल्पना केली असली तर ती केवळ मूर्खपणाची ठरेल काय ? सिंह म्हातारा झाला असल्यामुळें त्याला चटकन् लोळवून वाघानें घराचा ताबा घेतला तर त्या वाघाविरुद्ध एखादें प्रचंड अस्वल उठवितां येईल असा विचार त्यानें आधींच करून ठेवला नसेल काय ?

राजकारण हा नुसता कुशाग्र बुद्धीचा अथवा पुस्तकी पांडित्याचा खेळ नाहीं. मुत्सद्यांची कुटिल बुद्धि जशी त्याला अनपेक्षित कलाटणी देते, तशा जनमनाच्या क्षुब्ध भावनाहि त्याला अदृष्ट वळण लावूं शकतात. हिंदी मनांतल्या राष्ट्रीय भावनांच्या सागराला सुभाषबाबूंनीं एका अशक्य वाटणाऱ्या पद्धतीनें उधाण भरती आणली. या भरतीनें निःशस्त्रपणामुळें निर्माण झालेला हिंदी मनाचा एक मोठा न्यूनगंड नाहींसा केला, समाजसेवेपलीकडे स्त्रीला कार्यक्षेत्र नाहीं या रूढ समजुतीचें उच्चाटन करून तिनें सेविकेचें सैनिकांत रूपांतर केलें, आधुनिक हिंदी तरुणीला हातांतली ओष्ठरंगाची कांडी भिरकावून द्यायला लावून तिथें तिनें लीलेनें बंदुकीची स्थापना केली. भारताच्या घरांघरांतून आणि त्या घरांत बोबडे बोल बोलणाऱ्या बालकाबालकाच्या मुखांतून 'जयहिंद' हा उज्ज्वल घोष सुभाषबाबूंनीं निनादित करविला. पोटभरू कारकूनहि बंडखोर देशभक्त होऊं शकतो हें सिद्ध करून सर्वसामान्य हिंदी मनुष्याच्या आत्मविश्वासावरली काजळी त्यांनीं झाडून टाकली.

भारताच्या स्वातंत्र्याचा आजकाल घडत असलेला इतिहास हें आमचें नवें रामायण आहे. या रामायणांतली प्रतिज्ञा–पालनासाठीं वनवास स्वीकारणाऱ्या आणि वानरसेनेच्या साह्यानें राक्षसांवर विजय मिळूं इच्छिणाऱ्या सत्यव्रत रामाची भूमिका गांधीजींच्याकडे आली आहे. स्वभावाभिन्नतेमुळें मतभेद होत असूनहि रामचंद्राशीं एकनिष्ठ राहणारा लक्ष्मण जवाहरलालांच्या रूपानें जनतेपुढें उभा आहे. या महाकाव्यांतली सुभाषबाबूंची भूमिका भरताची होती. भरतानें सत्यासाठीं प्रत्यक्ष आपल्या मातेची जशी निर्भर्त्सना केली तशी सुभाषचंद्रांनींहि गांधीजींसारख्या नेत्यांशीं जरूर तेव्हां निकराची झुंज घेतली. आणि लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा फडकविल्यानंतर भारताच्या लोकसिंहासनावर गांधीजींची स्थापना करून आपण हिमालयांत निघून जाऊं अशा अर्थाचे त्यांचे ब्रह्मदेशांतले उद्गार वाचले म्हणजे तर राम वनवासाहून परत येईपर्यंत त्याच्या पादुकांची पूजा करीत संन्यस्त वृत्तीनें राजाचें

कर्तव्य करीत राहणाऱ्या भरताची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. हें नवें हिंदी रामायण अजून पुरें व्हायचें आहे. या रामायणाच्या पुढच्या भागांनाहि भरताची अत्यंत आवश्यकता आहे. पृथ्वीच्या पाठीवर तो कुठेंतरी सुरक्षित असावा– आपल्या प्रिय अयोध्येला त्यानें पुन्हां जयजयकारांत परत यावें– त्याच्या आत्म्याच्या तेजस्वी किरणांनीं सारा जनसमुद्र उजळून निघावा—आज प्रत्येक हिंदी मनुष्य मनोमन हीच इच्छा करीत आहे. पण माणसाची भावपूर्ण इच्छा आणि दैवाची लहरी क्रीडा यांचा या जगांत मेळ पडतोच असें नाहीं.

तें कांहींहि असो ! या पुस्तकांत संकलित केलेल्या भाषणांतले सुभाषबाबूंचे तेजस्वी उद्गार हिंदी जनतेच्या कानांत सदैव घुमत राहतील, स्वातंत्र्यपर्वताची कंटकमय चढण चढतांना ते तिची नेहमींच सांथ करतील. ते दुबळ्यांना सबळ, भ्याडांना शूर, आणि क्षुद्रांना उदात्त करून सोडतील.

## १०

सुभाषबाबूंच्या भाषणांचा परिचय करून देण्याला प्रस्तावकाची खरोखरीच जरूरी नाहीं. मी हे दोन शब्द लिहायला प्रवृत्त झालों तो त्यांच्या कर्तृत्वाविषयीं मला वाटणारा आदर व्यक्त करण्याकरतां आणि––

दुसरें एक कारण आहे. या भाषणांचा अनुवाद करणारे श्री. चं. वि. बावडेकर हे पंचवीस वर्षांपूर्वीचे शिरोड्याच्या शाळेतले माझे विद्यार्थी आहेत. त्यांनीं पत्रकाराचा पेशा पतकरल्यामुळें मराठी साहित्याचें—विशेषतः विनोद व विडंबन या क्षेत्रांचें–नुकसान झालें असें मला नेहमींच वाटतें. तें पूर्णपणें भरून काढणें आतां त्यांना शक्य नसलें तरी या पुस्तकांत व्यक्त झालेलें आपलें अनुवादकौशल्य अशा प्रकारचीं इतर पुस्तकें मराठी वाचकांपर्यंत नेऊन पोंचविण्याच्या कामीं त्यांनीं वापरावें अशी माझी त्यांना आग्रहाची विनंति आहे. ज्याला यथार्थतेनें राजकीय म्हणतां येईल असें वाङ्मय मराठींत

अद्यापिहि फारसें नाहीं. आजच्या मतामतांच्या गलगबल्यांत आणि पत्रा-पत्रांच्या घूळफेंकींत राष्ट्रांतल्या थोर देशभक्तांचे आणि जगांतल्या श्रेष्ठ विचारवंतांचे प्रामाणिक उद्गार जागृत होऊं लागलेल्या बहुजनसमाजापर्यंत नेऊन पोंचाविणें हें एक अत्यंत निकडीचें राष्ट्रकार्य आहे. नद्यांइतकेंच त्यांचें पाणी दूरदूरच्या शेतांना नेऊन पोंचविणाऱ्या कालव्यांचेंहि महत्त्व असतें हें मी काय बावडेकरांना सांगायला हवें ?

१२—१—४७ }
कोल्हापूर }

वि. स. खांडेकर

हिंदुस्थानच्या राजकीय संग्रा-
मांत गांधीजींनीं बजावलेली
कामगिरी

ता. २ आक्टोबर १९४३
रोजीं बँगकॉक येथून ध्वनि-
क्षेपित केलेलें भाषण.

१

आजच्या दिवशीं आपले सर्वश्रेष्ठ पुढारी महात्मा गांधी यांचा ७५ वा वाढदिवस जगभर पसरलेले सर्व हिंदी लोक ठिकठिकाणीं साजरा करीत आहेत. ज्या व्यक्तीचा आपण सन्मान करतों आणि जिला आपण प्रेमादराची सुमनांजलि वाहातों त्या व्यक्तीच्या जीवितकार्याबद्दल भाषण करण्याचा अशा प्रसंगींचा शिरस्ता आहे. तथापि महात्मा गांधींचें चरित्र आणि कार्य यांच्याशीं हिंदी जनता एवढी सुपरीचित आहे कीं, जर त्यांच्या चरित्रकथनाला मीं प्रारंभ केला तर हिंदी जनतेच्या बुद्धिमत्तेचा मीं अपमान केल्यासारखें होईल. म्हणून तसें करण्याऐवजीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामांत महात्माजींचें स्थान कोणतें आहे याचें मूल्यमापन करण्याचा मी प्रयत्न करणार आहें. महात्मा गांधींनीं हिंदुस्थानची केलेली सेवा आणि हिंदी

स्वातंत्र्यप्रयत्नांत बजावलेली कामगिरी एवढी अपूर्व आणि अतुलनीय आहे कीं, आमच्या सर्वकालीन राष्ट्रीय इतिहासांत त्यांचें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जाईल.

हिंदुस्थानच्या इतिहासांत महात्मा गांधींचें स्थान कोणतें आहे याचें बिनचूक मूल्यमापन करण्यासाठीं ब्रिटिशांनीं हिंदुस्थान कसा जिंकला याचें विहंगमावलोकन करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या भूमीवर ब्रिटिशांनीं ज्या वेळीं प्रथम आपला पाय ठेवला त्या वेळीं हिंदुस्थानची भूमि धनधान्यसंपन्न होती, तिच्यातून समृद्धीचे पाट वहात होते आणि हिंदुस्थानच्या ऐश्वर्यानें आकर्षित होऊनच कंगाल इंग्रज लोक साता समुद्रांपलीकडून इथें आले, हें आपणां सर्वांना माहीत आहे. आज आपल्या निदर्शनास असें येत आहे कीं, राजकीय दास्याचा आणि आर्थिक शोषणाचा परिणाम म्हणून हिंदी लोक भुकेनें आणि उपासमारीनें मरत आहेत आणि एका काळीं दरिद्री आणि गरजू असलेले ब्रिटिश लोक हिंदुस्थानच्या संपत्तीवर आणि साधन-सामुग्रीवर पोसून गलेलठ्ठ आणि सधन झाले आहेत. दुःख आणि क्लेश, अपमान आणि यातना यांची आंच लागून अखेरीस हिंदी जनतेला असें कळून चुकलें कीं, आपल्यापुढें निर्माण झालेल्या अनेकविध प्रश्नांवर एकच इलाज आहे आणि तो म्हणजे आपलें गमावलेलें स्वातंत्र्य फिरून संपादन करणें हाच.

हिंदुस्थान जिंकून घेण्याच्या ब्रिटिशांच्या कार्यपद्धतीकडे पाहिलें तर आपल्याला असें दिसून येतें कीं, देशांतल्या कुठल्याहि भागांत समग्र हिंदी जनतेशीं एकत्र लढा देण्याचा प्रसंग त्यांनीं स्वतःवर येऊं दिला नाहीं अथवा सबंध हिंदुस्थान एकदम जिंकून घेऊन तो व्यापून टाकण्याचाहि प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. उलटपक्षीं लढाईला तोंड लावण्यापूर्वी जनतेपैकीं एकाद्या गटाला लांचलुचपतीनें वश करून घेण्याचेच प्रयत्न ते सतत करीत आले. बंगालमध्यें असेंच घडलें. बंगालची गादी सेनापति मीर जाफर याला देऊं

करून ब्रिटिशांनीं त्याला वश करून घेतलें. त्या वेळीं हिंदुस्थानांत धार्मिक अथवा ज्ञातीय प्रश्न उपस्थित झाला नव्हता. बंगालचा शेवटचा स्वतंत्र राजा सिराजउद्दौला हा मुसलमान होता आणि त्याच्या मुसलमान सेनापतीनेंच त्याचा विश्वासघात केला; पण त्याचा हिंदु सरदार मोहनलाल हा सिराजउद्दौलाबरोबर अखेरपर्यंत लढत राहिला. हिंदुस्थानच्या इतिहासांतील या घटनेमुळें आम्ही हा धडा शिकलों कीं, विश्वासघात होऊं नये म्हणून आणि विश्वासघाताचें पारिपत्य व्हावें म्हणून जर वेळींच उपाय योजले गेले नाहींत तर कुठल्याहि राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य टिकविण्याची आशाच धरावयास नको. तथापि दुर्दैवानें बंगालमधील घटनांनीं हिंदी जनतेचे डोळे वेळींच उघडले नाहींत. बंगालमध्यें सिराजउद्दौलाचा पाडाव झाल्यानंतर जरी हिंदी जनतेनें ब्रिटिशांविरुद्ध एकजूट केली असती तरी ह्या उपऱ्या परक्याला हिंदुस्थानच्या भूमीवरून हाकून लावण्याच्या कामीं तिला यश आलें असतें. आपलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं हिंदी लोक लढले नाहींत असें कोणीहि म्हणणार नाहीं; पण ते सर्व एकत्र येऊन लढले नाहींत. ज्या वेळीं ब्रिटिशांनीं बंगालवर स्वारी केली त्या वेळीं त्यांच्या पिछाडीला येऊन कोणीहि त्यांच्यावर हल्ला चढविला नाहीं. त्यानंतर पुढें जेव्हां दाक्षिण हिंदुस्थानांत ब्रिटिशानीं टिपू सुलतानाविरुद्ध लढाई दिली त्या वेळींहि मध्य हिंदुस्थानांतून मराठे अथवा उत्तरेकडून शीख यांपैकीं कोणीहि टिपू सुलतानाच्या मदतीसाठीं धांवून गेले नाहींत. बंगालच्या पाडावानंतरहि जर दक्षिण हिंदुस्थानांत टिपू सुलतान, मध्य हिंदुस्थानांत मराठे आणि उत्तरेला शीख असा ब्रिटिशांविरुद्ध एकदम उठाव झाला असता तर ब्रिटिशांना हुसकून लावणें शक्य झालें असतें. तथापि आमच्या दुर्भाग्यामुळें तसें घडून येऊं शकलें नाहीं. म्हणूनच एका वेळीं हिंदुस्थानच्या एका भागावर हल्ला चढवून नंतर आपलें राज्य आस्ते आस्ते सर्व देशभर पसरणें ब्रिटिशांना शक्य झालें. हिंदुस्थानच्या इतिहासांतील या दुःखद प्रकरणामुळें

आपण हा धडा शिकलों कीं, शत्रूविरुद्ध एकजूट करून जर हिंदी जनता उभी राहिली नाहीं तर स्वतःचें स्वातंत्र्यसंपादन करणें तिला कधींहि शक्य होणार नाहीं आणि जर कदाचित् स्वातंत्र्य हें तिला मिळवितां आलें तरी तें टिकवितां येणें शक्य नाहीं.

हिंदी लोकांचे डोळे बऱ्याच उशीरा उघडले. १८५७ सालीं अखेरीस ते जागे झाले आणि देशांतील निरनिराळ्या भागांतून त्यांनीं ब्रिटिशांवर संघटित होऊन हल्ला चढविला. हें युद्ध सुरू होतांच– ज्याला ब्रिटिश इतिहासकार 'शिपायांचें बंड' असें म्हणतात आणि आम्ही ज्याला 'पहिलें स्वातंत्र्ययुद्ध' म्हणतों – ब्रिटिशांचा प्रारंभीं सहज पराभव झाला. तथापि आमच्या अंतिम अपयशाला दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. या युद्धांत हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांनीं भाग घेतला नाहीं आणि त्यापेक्षांहि विशेष महत्वाची गोष्ट ही कीं, आमच्या सेनानींचें तांत्रिक युद्धकौशल्य शत्रूच्या सेनानींपेक्षां निकृष्ट प्रतीचें होतें. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत आधुनिक युद्धशास्त्रांत युरोपनें बरीच प्रगति केली आणि हिंदी लोकांनीं काळाबरोबर आपलें पाऊल पुढें टाकलें नाहीं हें सत्य आहे. अर्थात् ब्रिटिश सैन्याबरोबर जेव्हां अखेरचा मुकाबला करण्याचा प्रसंग आला तेव्हां आमचे सेनानी कसोटीला उतरूं शकले नाहींत. १८५७ सालच्या अपयशानें आम्ही हा धडा शिकलों कीं, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणि विशेषतः युद्धकलेंत इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें आपणहि भविष्यकाळीं प्रगति करणें आवश्यक आहे आणि त्यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे.

१८५७ सालच्या पराभवानंतर ब्रिटिशांनीं हिंदी प्रजेला निःशस्त्र केलें. स्वतःला निःशस्त्र करून घेण्यास हिंदी लोकांनीं त्या वेळीं तयार होऊन मोठीच घोडचूक केली. हिंदी लोक निःशस्त्र होऊन दुर्बल झाले नसते तर स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं पुनः एकदां चढाई करणें त्यांना अल्प काळांतच शक्य झालें असतें. तथापि हिंदी लोक निःशस्त्र झाल्यामुळें राजकीय दृष्ट्या ते हतबल

आणि हताश झाले आणि त्या अवस्थेंत जवळ जवळ तीस वर्षें गेलीं. शेवटीं १८८५ मध्यें हिंदी राष्ट्रीय सभेचा जन्म झाला आणि त्यामुळें राजकीय जागृति झाली. हिंदी राष्ट्रीय सभा अथवा कॉंग्रेस ही प्रारंभीं एक नेमस्त संस्था होती. ब्रिटिशांचें उच्चाटन होऊन संपूर्ण स्वातंत्र्य मिळावें अशी मागणी करण्यास कॉंग्रेसचे पुढारी प्रारंभीं कचरत होते. तथापि वीस वर्षांच्या अल्पावधींत कॉंग्रेसमध्यें नवचैतन्य निर्माण झालें. अरविंद घोष यांच्यासारखे पुढारी हिंदुस्थानसाठीं संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्याकरितां पुढें सरसावले आहेत हें दृश्य १९०५ सालपासून आपल्याला दिसून येऊं लागलें. स्वातंत्र्याच्या मागणीबरोबरच स्वातंत्र्य संपादनासाठीं अधिक विशेष जहाल उपाय योजण्यांत येऊं लागले. बंगालच्या फाळणीची प्रतिक्रिया म्हणून त्या प्रांतांत ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचा उपक्रम अमलांत आणण्यांत आला आणि बहिष्काराचा हा प्रयोग आस्ते आस्ते सर्व हिंदुस्थानभर सुरू झाला. या आर्थिक बहिष्कारानें समाधान न झाल्यामुळें हिंदी तरुणांनीं नंतर बॉंब आणि रिव्हॉल्व्हर्सचा पंथ स्वीकारला. क्रांतिकारक घातपाताचें शिक्षण संपादन करण्यासाठीं पॅरिसला व युरोपमधील इतर केंद्रस्थानीं बऱ्याच तरुणांना पाठवून देण्यांत आलें आणि इतर सर्वसाधारण हिंदी तरुणांनीं जगांतील इतर देशांमध्यें, विशेषतः रशिया आणि आयर्लंड या देशांत अवलंब करण्यांत आलेल्या क्रांतिकारक उपायांचा अभ्यास सुरू केला.

पहिल्या जागतिक महायुद्धांत कुटिल ब्रिटिश मुत्सद्यांनीं दिलेल्या खोट्या अभिवचनांनीं हिंदी पुढारी फसले आणि त्यामुळें हिंदुस्थानचें रक्त आणि पैसा ब्रिटिशांच्या कार्यासाठीं आणि हिंदुस्थानच्या पारतंत्र्याच्या शृंखला दृढ करण्याच्या कामीं खर्चीं पडला. तथापि धन्य ते हिंदी क्रांतिकारक ! ब्रिटन त्यांना फसवूं शकलें नाहीं. देशांत क्रांति घडवून आणण्यासाठीं त्यांनीं आपली शिकस्त केली, पण हिंदुस्थानच्या दुर्दैवानें त्यांना यश आलें नाहीं.

पहिलें महायुद्ध संपल्यावर जेव्हां स्वातंत्र्यदानाचें अभिवचन पुरें करण्याची मागणी हिंदी पुढारी करूं लागले तेव्हां त्यांना प्रथमच असा शोध लागला कीं, विश्वासघातकी आल्बियनेनें म्हणजे ब्रिटिश जनतेनें आणि तिच्या मुत्सद्द्यांनीं आपला विश्वासघात केला. त्यांच्या मागणीला १९१९ च्या रौलट ॲक्टच्या अथवा काळ्या कायद्याच्या रूपानें उत्तर देण्यांत आलें आणि जें थोडेंफार स्वातंत्र्य मिळालें होतें तेंहि या कायद्यानें हिरावून घेतलें. या काळ्या कायद्याचा जेव्हां त्यांनीं निषेध केला तेव्हां जालियनवाला बागेंतील कत्तल घडून आली. पहिल्या महायुद्धांत हिंदी जनतेनें केलेल्या सर्व प्रकारच्या त्यागाचें फळ म्हणून रौलट ॲक्ट आणि जालियनवाला बागेची कत्तल या दोन देणग्या हिंदुस्थानच्या पदरांत पडल्या.

१९१९ सालच्या या शोकजनक घटनांमुळें हिंदी लोक किंचित् काल सुन्न होऊन जागच्या जागीं खिळल्यासारखे झाले. स्वातंत्र्यसंपादनासाठीं करण्यांत आलेले सर्व प्रयत्न ब्रिटिशांनीं आणि त्यांच्या लष्करी सामर्थ्यानें निर्दयपणें दडपून टाकले, सनदशीर चळवळ, ब्रिटिश मालावर बहिष्कार, सशस्त्र क्रांति हे सर्वच उपाय स्वातंत्र्यसंपादनाच्या कामीं व्यर्थ ठरले. आशेचा एकादाहि किरण दिसेना आणि हिंदी जनता संतापानें जळत पिचत असली तरी चळवळीचें नवें साधन, नवें शस्त्र हुडकून काढण्यासाठीं ती काळोखांतच चांचपडत राहिली. याच मोक्याच्या क्षणीं महात्मा गांधी आपलें असहकाराचें, सत्याग्रहाचें, कायदेभंगाचें अभिनव शस्त्र घेऊन राजकीय क्षेत्रांत अवतीर्ण झाले. स्वातंत्र्याचा मार्ग दाखविण्यासाठीं जणू परमेश्वरानेंच त्यांना पाठवून दिलें असा भास झाला. सर्व राष्ट्र त्यांच्या झेंड्याखालीं येऊन तात्काळ आणि स्वयंस्फूर्तीनें उभें राहिलें. आशेनें आणि आत्मविश्वासानें प्रत्येक हिंदी इसमाचा चेहेरा फुलून निघाला. अंतिम यशाची पुनः एकदां खात्री पटली.

हिंदुस्थानच्या उद्धारासाठीं महात्मा गांधींनीं वीस वर्षांपेक्षां जास्त काल आपलें आयुष्य वेंचलें आहे आणि त्यांच्याबरोबर हिंदी जनताहि परिश्रम करीत आली आहे.

> १९२० मध्यें चळवळीचें आपलें नवें अस्त्र घेऊन जर ते पुढें सरसावले नसते तर हिंदुस्थान आजहि जमिनीला खिळून राहिला असतां असें म्हणण्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-प्रयत्नांत त्यांनीं बजावलेली कामगिरी अपूर्व आणि अतुलनीय आहे. प्राप्त परिस्थितींत कोणाहि एकस्या माणसाला उभ्या जन्मांत यापेक्षां जास्त कांहीं करतां आलें नसतें.

महात्मा गांधींबरोबर तुलना करण्याजोगें ऐतिहासिक उदाहरण म्हणून पहिल्या जागतिक महायुद्धांत तुर्कस्थानचा पराभव झाल्यानंतर तुर्कस्थानला वांचविणाऱ्या आणि तुर्कांनीं 'गाझी' म्हणून जयजयकार केलेल्या एकस्या मुस्ताफा केमालचेंच नांव घेतां येईल.

स्वातंत्र्यसंपादनाच्या पूर्वतयारीसाठीं अपरिहार्य असलेल्या अशा दोन गोष्टींचे धडे १९२० सालानंतर हिंदी जनतेनें महात्मा गांधींकडून घेतले. राष्ट्रीय स्वाभिमान आणि आत्मविश्वास हा त्यांपैकीं पहिला धडा होय. त्यामुळेंच क्रांतीची चेतना हिंदी लोकांच्या अंतःकरणांत आज स्फुरण पावत आहे. हिंदुस्थानांतील दूरच्या खेड्यांतूनहि जाऊन पोंचलेली एक देशव्यापी संघटना हा त्यांच्यापासून हिंदी जनतेला झालेला दुसरा लाभ होय. स्वातंत्र्याचा संदेश सर्व हिंदी जनतेच्या अंतःकरणाला जाऊन भिडलेला आहे आणि सर्व देशाची प्रतिनिधि अशी एक देशव्यापी राजकीय संघटना आज तिला लाभलेली आहे. अखेरच्या संग्रामासाठीं, अखेरच्या स्वातंत्र्युद्धासाठीं सर्व प्रकारची सिद्धता आतां झाली आहे.

आध्यात्मिक जागृतीनें स्वातंत्र्याच्या लढ्याची ललकारी दिली असें उदाहरण फक्त हिंदुस्थानांत दृष्टोत्पत्तीस पडतें असें नाहीं. इटलीमधल्या रिसॉरिजिमेंटो चळवळींत इटालियन जनतेला प्रथम मॅझिनीनेंच आध्यात्मिक प्रेरणा दिली. एक हजार सशस्त्र स्वयंसेवकांचें नेतृत्व पत्करून रोमवर मोर्चा नेणारा लढवय्या वीर गॅरिबाल्डी हा त्यांच्या मागून पुढें सरसावला. आधुनिक

आयर्लंडमध्यें सुद्धां १९०६ सालीं जेव्हां सिनफेन पक्षाचा जन्म झाला तेव्हां या पक्षानें आयरिश जनतेला जो कार्यक्रम दिला तो १९२० सालीं महात्मा गांधींनीं दिलेल्या असहकारच्या कार्यक्रमासारखाच जवळ जवळ होता. सिनफेन पक्षाच्या जन्मानंतर दहा वर्षांनीं म्हणजे १९१६ सालीं—आयर्लंडमध्यें पहिली सशस्त्र क्रांति झाली.

> स्वातंत्र्याच्या सरळ मार्गावर आमचे पाय महात्मा गांधींनीं घट्ट रोवून ठेविले आहेत. ते आणि इतर पुढारी आज तुरुंगाच्या गजाआड खितपत पडले आहेत.म्हणून महात्मा गांधींनीं जें कार्य सुरू केलें आहे तें त्यांच्या देशबांधवांनीं—देशांतल्या आणि परस्थ-पुरें करणें जरूर आहे.

अखेरच्या संग्रामासाठीं आवश्यक असें जें जें कांहीं आहे तें सर्व हिंदुस्थानांत वास्तव्य करणाऱ्या हिंदी लोकांना प्राप्त झालें आहे. फक्त एकाच गोष्टीची उणीव आहे, ती म्हणजे स्वातंत्र्यदात्या सेनेची. ही सेना बाहेरून आली पाहिजे आणि ती बाहेरूनच येणें शक्य आहे.

नागपूर येथें १९२० सालच्या डिसेंबरमध्यें कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन भरलें असतां असहकाराच्या आपल्या कार्यक्रमाची हिंदी राष्ट्राला शिफारस करतांना महात्मा गांधींनीं काढलेल्या उद्‌गारांची आठवण तुम्हांला मला करून द्यावीशी वाटते. ते म्हणाले, " हिंदुस्थानच्या हातीं जर आज तलवार असती तर ती तलवार हिंदुस्थाननें उपसली असती. " आणि आपला मुद्दा खुलासेवार मांडतांना ते पुढें असेंहि म्हणाले होते कीं, सशस्त्र क्रांतीचा प्रश्न ज्या अर्थी उद्भवत नाहीं त्या अर्थी असहकार अथवा सत्याग्रह हा दुसरा एकच इलाज देशाच्या हातीं आहे. त्यानंतर काळानें बराच बदल घडवून आणला आणि आज तलवार उपसणें हेंहि हिंदी लोकांना शक्य होत आहे. आम्हांला समाधान वाटतें आणि आम्हांला अभिमानहि वाटतो कीं, हिंदुस्थानची स्वातंत्र्यसेना आतां तयार होऊन राहिली आहे आणि ती क्रमशः वाढत जात आहे. या सेनेचें शिक्षण पुरें करून शक्यतों लौकर तिला रणक्षेत्रावर पाठवून देणें

हें एक कार्य आमच्या समोर आहे. त्याच्याच बरोबर रणांगणावरच्या सेनेला सतत कुमक पाठवितां यावी म्हणून दुसरी नवीन सेना तयार करणें हेंहि काम आम्हांला करावयाचें आहे. स्वातंत्र्याचा अखेरचा संग्राम दीर्घ काल चालणार आहे, तो बिकट आहे आणि हिंदुस्थानमधला अखेरचा ब्रिटिश इसम एकवार तुरुंगांत पडेपर्यंत अथवा देशांतून बाहेर हाकलला जाईपर्यंत आपल्याला लढत राहिलें पाहिजे. मला आपल्याला असा इषारा द्यावासा वाटतो कीं, आमच्या स्वातंत्र्यसेनेनें—आझाद हिंद फौजेनें अथवा हिंदी राष्ट्रीय सेनेनें—हिंदी भूमीवर पाऊल ठेवल्यानंतर ब्रिटिशांच्या जोखडापासून सर्व हिंदुस्थान मुक्त करण्यासाठीं तिला कमींत कमी बारा महिने तरी—कदाचित् जास्तीहि—लागतील. म्हणून दीर्घकाल चालणारा हा बिकट लढा लढण्याच्या तयारीला आपण कंबर कसून लागूं या.

## चालू महायुद्ध आणि त्याचें महत्त्व

ता. २४ जून १९४६ रोजीं टोकिओ येथून ध्वनिक्षेपित केलेलें भाषण.

२

देशबांधवांनो आणि मित्रांनो ! सांप्रतच्या महायुद्धाचा अर्थ काय आणि त्यामागें कोणतीं ऐतिहासिक सत्यें दडलेलीं आहेत याची चर्चा प्रथम मी करणार आहें. जगाची आजची घडी कायम राहावी असें वाटणाऱ्या शक्ति आणि ही घडी नष्ट करून नवी घडी प्रस्थापन करण्याचा निर्धार असलेल्या शक्ति यांच्यांतील संघर्ष म्हणजेच हें महायुद्ध होय. पहिल्यामध्यें स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या बुरख्यांत वावरणाऱ्या अँग्लो-अमेरिकन साम्राज्यशाह्यांचा समावेश झालेला आहे. ह्या साम्राज्यशाही शक्तींचा विजय होणें याचा अर्थ आमचें आणि इतर बऱ्याच दुर्दैवी राष्ट्रांचें दास्य यापुढेंहि तसेंच कायम राहाणें असा होतो.

माझ्या कांहीं देशबांधवांची अशी अपेक्षा होती कीं, आंतरराष्ट्रीय आपत्प्रसंगाच्या दडपणामुळें ब्रिटनसारख्या साम्राज्यशाही राष्ट्राला वळवितां येईल आणि हिंदुस्थानसारख्या गुलाम करण्यांत आलेल्या देशांच्या स्वातंत्र्याला त्यांच्याकडून मान्यता मिळवितां येईल, पण या सर्व अपेक्षा पूर्णपणें निष्फळ ठरल्या आहेत. त्याचप्रमाणें युद्ध टाळण्यासाठीं कांहीं तरी करून दोन पक्षां-मध्यें तडजोड करण्याचे कांहीं व्यक्तींनीं पूर्वीं केलेले प्रयत्नहि फोल ठरले. त्याचें पर्यवसान सांप्रतच्या महायुद्धांत झालें असून हें युद्ध अखेरचा निकाल लागेपर्यंत चालू रहाणार आहे आणि पहिल्या महायुद्धापेक्षांहि हा लढा अधिक कालपर्यंत लढला जाण्याचा भरपूर संभव आहे.

या प्रचंड संग्रामांत जुनी घडी उलथून पाडण्याचा कृतनिश्चय केलेल्या आणि आमचें स्वातंत्र्य-संपादन करण्याची आम्हांला संधि मिळूं देणाऱ्या तरुण आणि पौरुषयुक्त राष्ट्रांशीं सहकार्य करण्यांत आमचें राष्ट्रीय हित आहे हें उघड आहे.

आमच्या पिढीजात शत्रूबरोबर लढत राहून आणि त्यांचा जबरदस्त पाडाव करीत राहून त्रिपक्षीय राष्ट्रें आमच्या राष्ट्रीय संग्रामाला अप्रत्यक्षरीत्या फार मोठ्या प्रमाणांत साहाय्य करीत आहेत हें आपण पूर्णपणें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्या राष्ट्रांनीं आमच्या शत्रूला प्राणांतिक जखमा केल्या नसत्या तर स्वातंत्र्यसंपादनाचें आमचें कार्य आजच्यापेक्षां शतपटीनें जास्त बिकट झालें असतें. आम्हाला त्याबद्दल कृतज्ञता वाटते, तथापि आम्हाला अशी अप्रत्यक्ष मदत करून समाधान न मानतां आमच्या स्वातंत्र्यसंग्रामांत स्वतःचें सक्रिय सहाय्य देऊन आम्हांला प्रत्यक्ष मदत करण्याची जी तयारी त्रिपक्षीय राष्ट्रांनीं दाखविली आहे त्याबद्दल आम्हाला जास्त कृतज्ञता वाटते.

इंग्लिश संस्थांच्या वळणामध्यें वाढलेले आणि इंग्रजांच्या प्रचाराची छाप पडलेले असे माझे कांहीं देशबांधव आहेत आणि त्रिपक्षीय राष्ट्रांच्या हेतूबद्दल त्यांना संशय वाटत आहे हें मला माहीत आहे.

या माझ्या देशबांधवांना मी असें सांगतों कीं, माझ्यावर विश्वास ठेवा. कारण ज्या सामर्थ्यवान् ब्रिटिश सरकारनें माझा आयुष्यभर छळ केला आणि ज्यानें अकरा वेळां मला तुरुंगांत डांबलें त्या सरकारलाही मला आपला मिंधा बनविणें शक्य झालें नाहीं. पृथ्वीवरच्या कोणाही राष्ट्रानें तशी अशा करूं नये आणि हिकमती, लबाड आणि डोकेबाज ब्रिटिश मुत्सद्यांना जिथें माझी खुशामत करून मला वश करतां आलें नाहीं तिथें दुसऱ्या कोणालाहि ती गोष्ट शक्य होणार नाहीं.

अक्ष राष्ट्रांतील ज्या सर्व देशांना मीं भेटी दिल्या त्या देशांतील हिंदुस्थानविषयक लोकमताचा मीं अगदीं जवळून अभ्यास केला असें नाहीं तर त्या तिन्ही राष्ट्रांचा दृष्टिकोन आणि धोरण हेंहि समक्ष समजावून घेतलें.

मित्रहो, मुख्य प्रधान टोजो यांची आणि माझी ता. १४ जून रोजीं मुलाखत झाल्यानंतर ता. १६ जून १९४३ रोजीं इंपीरिएल डाएटमध्यें जी ताजी घोषणा केली ती अगदीं स्पष्ट आणि असंदिग्ध आहे. त्या प्रसंगीं हजर राहाण्याचा मान मला मिळाला होता. ही घोषणा इतिहासांत एक क्रांतिकारक घोषणा म्हणून चिरकाल कायम राहील. ही घोषणा करतांना केलेल्या निवेदनांत ते म्हणाले, " हिंदी जनतेचे शत्रु असलेल्या अँग्लो–सॅक्शन शक्तींचें हिंदुस्थानांतून उच्चाटन करून त्या नष्ट करण्यासाठीं आणि खऱ्या-खुऱ्या अर्थानें हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य संपादन करतां येण्यासाठीं सर्व प्रकारचें सहाय्य हिंदुस्थानला देण्याचा जपानचा कृतनिश्चय आहे. "

मित्रहो, हिंदुस्थानची स्वातंत्र्याची मागणी उचलून धरण्याएवढें औदार्य अक्ष राष्ट्रांनीं दाखवावें ह्या गोष्टीवर विश्वास बसत नाहीं असें भासवून कांहीं अक्षराष्ट्रविरोधी मंडळी हिंदी जनतेची फसवणूक करीत आहे हें मला माहीत आहे. तथापि माझ्या मतें अक्ष राष्ट्रांतील प्रत्येक राष्ट्राचें धोरण परंपरेच्या दृष्टीनें नैसर्गिक आहे आणि सहज आकलन होण्याजोगेंहि आहे. आज, अक्ष राष्ट्रें आणि हिंदुस्थान यांचा शत्रु एकच आहे. आणि म्हणून त्यांचे हितसंबंध आणि उद्दिष्ट हीं एकच आहेत.

अक्ष राष्ट्रांना स्वतांच्या हितासाठीं आणि भविष्य काळीं आपलें स्वतांचें स्वातंत्र्य आणि वैभव टिकून राहाण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्याचा पराभव करून तें उलथून टाकणें अवश्य आहे. हें उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं हिंदुस्थानांतून त्यांना ॲंग्लो–अमेरिकन सत्ता आणि हितसंबंध यांचें निर्मूलन करणें भाग आहे आणि ब्रिटिशांच्या जोखडाखालीं राहाण्याची हिंदी जनतेची जरी तयारी असली तरी देखील हें कार्य करणें त्यांना जरूरच आहे. तथापि हिंदी जनता आपल्या स्वातंत्र्यासाठीं झगडत आहे हें माहीत असल्यामुळें अक्ष राष्ट्रांना तिच्याबद्दल साहानुभूति वाटणें नैसर्गिकच आहे.

शिवाय ब्रिटिश साम्राज्यांतल्या हिंदुस्थानला जर आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करतां आलें तर अक्ष राष्ट्रांसह सर्व जगाचाच त्यामुळें फायदा होईल. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामाकडे अक्ष राष्ट्रें एवढ्या स्नेहभावानें कां पाहात आहेत हें अर्थात् कोणाच्याहि बुद्धीला आणि सारासार विचारशक्तीला सहज पटून येण्याजोगें आहे.

आपल्या अक्ष राष्ट्रविरोधी आणि जपानविरोधी प्रचाराचा पुरता बोजवारा उडाल्यामुळें ॲंग्लो–अमेरिकन साम्राज्यवाद्यांनीं आणि त्यांच्या हस्तकांनीं एक अखेरची हिकमत लढविली आहे.

मुख्य प्रधान टोजो यांच्या वरचेवर होणाऱ्या घोषणांचा निर्देश करून ते असें म्हणूं लागले आहेत कीं भोळसट आणि श्रद्धाळू लोकांना फसविण्यासाठीं या अशा थापा मारण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. '**आत्मवत्** मन्यते जगत्' हें जुनें संस्कृत सुभाषित आपल्या ऐकिवांत असेल. आपल्यावरून मनुष्य जगाची पारख करतो असा या सुभाषिताचा अर्थ आहे. स्वतः ढोंगी असल्यामुळें ह्या लोकांना असें वाटतें कीं इतरहि प्रत्येक इसम ढोंगीच आहे.

तथापि चालू वर्षअखेर ब्रह्मदेश आणि फिलिपाइन्स या उभयतांनाहि खरेंखुरें स्वातंत्र्य देण्यांत येईल असें जाहीर करून मुख्य प्रधान टोजो यांनीं

या दुष्ट प्रचाराला अत्यंत परिणामकारक आणि जबरदस्त टोला हाणला आहे. हें वर्ष संपल्यानंतर आपल्या अक्ष राष्ट्रविरोधी प्रचारासाठीं आमचे शत्रु कोणता नवा मुद्दा शोधून काढतात हें जाणण्याचेंच मला आतां कुतूहल लागून राहिलें आहे.

देशबांधवहो, १९४० सालच्या अखेर महात्मा गांधींनीं शेवटीं कायदेभंगाची चळवळ केल्याचें दिसून आल्यानंतर हिंदी जनतेचा मान आणि इज्जत राखण्यांत आली आणि हिंदुस्थानांतील क्रांति सफल होण्यासाठीं तिची योजना मोठ्या प्रमाणावर आणि परिणामकारक रीतीनें होणें अवश्य आहे असें मला वाटूं लागलें—हें आपल्याला माहीत आहे.

पण त्यासाठीं आंतरराष्ट्रीय परिस्थितीची माहिती मिळणें, अक्ष राष्ट्रांशीं संधान बांधणें आणि परदेशीं असलेल्या आमच्या देशबांधवांचें सक्रिय सहाय्य मिळविणें जरूर होतें.

हीं सर्व उद्दिष्टें पूर्णपणें सफळ झालीं आहेत असें आपल्याला मला आज जाहीर करतां येत आहे.

पहिली गोष्ट ही कीं आंतरराष्ट्रीय परिस्थितीची माहिती आम्हांला प्रत्यक्षच मिळत आहे आणि त्यामुळें आमच्या अंतिम यशाबद्दल आम्हाला खात्री वाटत आहे.

दुसरी गोष्ट ही कीं सर्वसामान्यतः सर्व अक्ष राष्ट्रें आणि विशेषतः जपान हें राष्ट्र हिंदी जनतेचा जिवलग स्नेही आणि दोस्त बनून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामांत आज त्याच्या पाठीशीं आहे, हें आम्हांला आमच्या प्रत्यक्ष निरीक्षणानें समजून आलें आहे.

तिसरी गोष्ट ही कीं, आमच्या शत्रूंच्या अंकित असलेल्या देशांत वास्तव्य करून राहाणाऱ्या हिंदी लोकांव्यातिरिक्त हिंदुस्थानबाहेर असलेले सर्व हिंदी प्रजाजन आज एकत्र झाले असून त्यांची एक सुसंघटित अशी संस्था निर्माण करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत घडणाऱ्या घडामोडींचें सूक्ष्म निरीक्षण

ते करीत असून आंतरराष्ट्रीय घटनांशींहि त्यांना निर्वेधपणें संघटन ठेवत येत आहे.

बंदिवास, छळ आणि अत्याचार यांना तोंड देऊनहि हिंदुस्थानांत आपण लढा चालू ठेवला आहे. योग्य समय येईल त्या वेळीं जास्तींत जास्त मदत घेऊन आपल्या सहाय्याला धांवून येण्यासाठीं शक्य ती तयारी त्यांनीं चालविली आहे.

मित्रहो, योग्य क्षण आला कीं मीं आणि माझ्याप्रमाणेंच इतर लोक आपल्याशीं खांद्याला खांदा लावून लढण्यासाठीं आणि लढाईंतील सुखदुःखांत भागीदार होण्याचें वैभव उपभोगतांना विजयानंदांतहि भागीदारी पत्करण्यासाठीं आपल्या शेजारीं येऊन दाखल होऊं असें आश्वासन मी यापूर्वीं अनेकदां आपल्याला दिलेलें आहे हें आपल्या स्मरणांत असेलच.

माझें अभिवचन पूर्ण करण्याची मला यत्किंचितहि इच्छा नाहीं असें मि. ब्रेनवुड या वक्त्याच्या द्वारें ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशननें म्हटलें आहे. या मंडळींना मला असें सांगावयाचें आहे कीं, मीं दिलेलें आभिवचन बी. बी. सी. ला दिलें नसून तें माझ्या देशबांधवांना दिलेलें आहे आणि तें मी यथाकाल पुरें करीन.

तिसरी पायरी मी आता चढत आहें आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीपासून मी कांहीं फार दूर नाहीं. १९४१ च्या जानेवारीपासून जगांतल्या कुठल्याहि शक्तीला माझ्या हालचालींवर प्रतिबंध घालणें शक्य झालेलें नाहीं आणि आमच्या राष्ट्रीय संग्रामांतील अखेरच्या लढाईत भाग घेण्याकरितां पुनः एकदां सरहद्द ओलांडून जातांना मला रोखून धरणेंहि जगांतल्या कुठल्याहि शक्तीला शक्य नाहीं.

देशबांधवांनो आणि मित्रांनो, तुरुंगांत आणि बंदिवासांत असलेल्या आमच्या सहकाऱ्यांना आपल्या द्वारां मी शेवटीं बंधुभावानें अभिवादन करतों. त्यांना म्हणावें उल्हसित राहा. आमच्या देशाचा मान आणि इज्जत त्यांनीं

राखली आहे. स्वतः भोगलेल्या क्लेशांनीं सर्व जगाला त्यांनीं असें घोषित केलें आहे कीं, गुलाम बनविलेल्या हिंदुस्थाननें ब्रिटनबरोबर युद्ध पुकारलें आहे.

मला आणि हिंदुस्थानबाहेर कार्य करीत राहिलेल्या इतर लोकांना त्यांचा अभिमान वाटतो. त्यांच्या उदात्त हौतात्म्याबद्दल आम्हीं नम्रभावानें त्यांना वंदन केलें नाहीं असा एकहि दिवस जात नाहीं. त्यांचे क्लेश व्यर्थ जाणार नाहींत असें पुनः एकदां मी त्यांना आश्वासन देतों.

हिंदुस्थान स्वतंत्र होणार—लौकरच स्वतंत्र होणार. आणि हिंदुस्थानच्या सुपुत्रांनीं तुरुंगाच्या अंधाऱ्या कोठडयांतून स्वातंत्र्य, आनंद आणि कृत-कृत्यता यांच्या प्रकाशांत बाहेर यावें म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानच त्यांच्या तुरुंगांचीं दारें उघडून टाकणार !

इन्किलाब झिंदाबाद
आझाद हिंद झिंदाबाद

## ब्रिटिश साम्राज्यशाही आणि हिंदुस्थान

टोकिओ येथें ता. १९ जून १९४३ रोजीं वृत्तपत्रकारांच्या प्रतिनिधींपुढें केलेलें निवेदन

३

सद्‌गृहस्थहो, प्रथम मी आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. आपलें स्वागत करतांना मला खरोखरच फार आनंद होत आहे. कारण माझ्या मातृभूमीमध्यें माझाही संबंध वृत्तपत्रसृष्टीशीं दीर्घकालपर्यंत आलेला होता.

आजच्या प्रसंगीं मी येथें कसा आणि कां आलों याचें आपल्याला कुतूहल वाटत असेल.

हिंदुस्थानांतील आणि ब्रह्मदेशांतील ब्रिटिशांचे तुरुंग हीं माझीं कैक वर्षें निवासस्थानें बनलीं होतीं. तथापि हिंदुस्थानांतल्या एकाद्या तुरुंगवजा घरांत कुजत पडण्याऐवजीं आज जपानच्या या गाभाऱ्यांत मी आपल्यासमोर उभा आहें. ही वस्तुस्थिति आहे आणि माझ्या मायभूमीवरून आज वाहात असलेल्या नव्या चळवळीची ती प्रतीक आहे.

माझ्या देशबांधवांच्या इच्छेला अनुसरून मीं गृहत्याग आणि देशत्याग केल्याला आज दोन वर्षांपेक्षां जास्त वर्षें झालीं आणि तेव्हांपासून मी जें जें कांहीं करीत आलों तेंही त्यांच्याच इच्छेला अनुसरून करीत आलों आहे.

पहिल्या महायुद्धांत कविराज ब्रिटिश मुत्सद्यांनीं आमच्या पुढाऱ्यांची फसवणूक केली त्यामुळेंच यापुढें पुनः केव्हांहि त्यांच्याकडून फसवणूक व्हावयाची पाळी येऊं देणार नाहीं अशी आम्हीं २० वर्षांपूर्वी प्रतिज्ञा केली.

२० वर्षांपेक्षां जास्त काळ माझ्या बरोबरची पिढी स्वातंत्र्यासाठीं धडपड करीत आहे आणि आज जो क्षण आलेला आहे त्या क्षणाची मी उत्सुकतेनें वाट पाहात होतों. आजचा हा क्षण ही हिंदी स्वातंत्र्याची प्रभात आहे.

आम्हांला हें पूर्णपणें माहीत आहे कीं अशी संधी आणखी एका शतका-पर्यंत तरी येण्याजोगी नाहीं आणि म्हणून या संधीचा भरपूर फायदा घ्यावें-याचा असा दृढनिश्चय आम्हीं केलेला आहे.

सद्गृहस्थहो, लोकशाहीच्या स्वातंत्र्यासाठीं युद्ध लढण्यांत येत आहे असें आपण सारखें ऐकत आलों आहों. पण स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या थापा मारून जगांतल्या एकपंचमांश मानवजातीला हें स्वातंत्र्य देण्यास विरोध करणाऱ्या राष्ट्रांबद्दल—स्वातंत्र्याच्या मागणीला दडपशाही, पाशवी अत्याचार आणि निःशस्त्र स्त्रीपुरुष आणि मुलांची कत्तल हें उत्तर देणाऱ्या राष्ट्रां-बद्दल—माझ्या देशबांधवांना काय वाटत असेल याची आपल्याला चांगलीच कल्पना असेल. ब्रिटिश साम्राज्यशाहीमुळें हिंदुस्थानचा नैतिक अधःपात झाला, सांस्कृतिक दृष्ट्या विनाश झाला, आर्थिक दृष्ट्या तो कंगाल झाला आणि राजकीय दृष्ट्या तो गुलाम झाला. हिंदुस्थानच्या बाबतींत ब्रिटिश साम्राज्य-शाहीचा अर्थ हाच होतो.

अर्थात् ब्रिटिशांच्या जोखडाखालून आपली मुक्तता करून घेण्याचा अखेर हिंदी जनतेनें निर्धार केला तर त्यांत खरोखर कांहीं आश्चर्य वाटण्या-जोगें आहे काय ? आजच्या जागतिक संघर्षाचा अर्थ हिंदी जनतेच्या

दृष्टीनें एकच होतो आणि त्याच दृष्टिकोनांतून ती या संघर्षाकडे पाहात आहे. जगांतील सत्तेचा तोल पूर्वीप्रमाणेंच असावा असें वाटणाऱ्या शक्ति आणि या परिस्थितीचें निर्मूलन व्हावें म्हणून निर्धार केलेल्या शक्तिं यांच्यांतील हा लढा आहे. हिंदी जनतेचा दृष्टिकोन हा आहे.

अशा या संघर्षामध्यें ज्या राष्ट्रांना जगाची नवी घडी बसवावयाची आहे, ज्यांना जुनी परिस्थिति नष्ट करून टाकावयाची आहे त्याच राष्ट्रांबद्दल आम्हाला सहानुभूति वाटली तर त्याबद्दल कोणी आम्हाला दोष देऊं शकेल काय ? अर्थात् या राष्ट्रांनीं स्वातंत्र्याच्या आमच्या मागणीला पाठिंबा दिल्यानंतर त्यांच्याबद्दल आम्हाला वाटणाऱ्या सहानुभूतीचें रूपांतर सहकाराच्या भावनेमध्यें व्हावें हेंही नैसर्गिकच आहे.

आमच्या पिढीजात शत्रूविरुद्ध युद्ध पुकारून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामाला त्रिपक्षीय राष्ट्रांनीं मोठ्यांतली मोठी मदत केली आहे आणि केवळ सहानुभूति दाखवूनच न थांबतां आमच्याशीं राष्ट्रीय सहकार्य करून त्यांनीं आम्हाला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. त्याबद्दल आम्ही चिरकाल कृतज्ञ राहूं.

तथापि, आमच्या स्वातंत्र्याची किंमत स्वतःचें रक्त सांडून देणें हें आमचें कर्तव्य आहे. आमचा त्याग आणि आमचे परिश्रम यांच्या बळावर जें स्वातंत्र्य आम्ही मिळवूं तेंच स्वातंत्र्य आम्हाला स्वतःच्या बळावर टिकावतां येईल.

म्हणून आमच्या सामान्य शत्रूबरोबर चाललेल्या या युद्धांत आम्ही प्रत्यक्ष भाग घेणें जरूर आहे असें आम्हाला निश्चितपणें वाटतें.

ज्या शत्रूनें तलवार उपसली आहे त्याच्या बरोबर तलवारीनेंच लढलें पाहिजे. निःशस्त्रप्रतिकाराचें रूपांतर सशस्त्र लढ्यांतच झालें पाहिजे आणि ज्या वेळीं हिंदी जनतेला मोठ्या प्रमाणांत रणदीक्षा मिळेल त्याच वेळीं ती स्वातंत्र्याला पात्र ठरेल.

## आमच्या पुढचा प्रश्न

टोकिओ येथून ता. २१ जून १९४३ रोजीं ध्वनिक्षेपित केलेलें भाषण.

# ४

माझ्या देशबांधवांनो आणि मित्रांनो, मीं आपल्याला उद्देशून यापूर्वी जें भाषण केलें त्यानंतर युद्धाच्या सर्वसाधारण परिस्थितीमध्यें महत्त्वाचा असा कोणताही फेरबदल घडून आलेला नाहीं. पश्चिम रणक्षेत्रावर अँग्लो-अमेरिकन सैन्यांना एक विजय मिळाला असून उत्तर आफ्रिकेमधील लढाई संपुष्टांत आली आहे. भूमध्य समुद्रांतील कांहीं बेटांचा त्यानंतर अँग्लो-अमेरिकन सैन्यांनीं ताबा घेतला.

तथापि ट्युनिस, टिंबक्टुमध्यें अथवा लँपेडुसा आणि अलास्का इथें काय घडत आहे, ही बाब आम्हां हिंदी लोकांच्या दृष्टीनें महत्त्वाची नसून खुद्द हिंदुस्थानांत आणि आमच्या सरहद्दीवर काय घडत आहे, हेंच आमच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें आहे.

ब्रह्मदेश पुनः जिंकून घेण्याचा खूप गाजावाजा करून केलेल्या जाहिरातीचा शेवट पळपुटी माघार घेऊन करण्यांत आला हें आमच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें आहे. जपानची सेना आमच्या पूर्व सरहद्दीवर खडी राहिली आहे, आणि मुख्य प्रधान जनरल टोजो यांच्या द्वारां हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला आपला संपूर्ण पाठिंबा आहे असें जपानच्या सरकारनें वेळोवेळीं जाहीर केलें आहे. हिंदुस्थानांतून अँग्लो-अमेरिकन सेना आणि अँग्लो-अमेरिकन हितसंबंध यांचें उच्चाटण करण्याचा या सरकारचा निर्धार आहे, आणि हिंदी क्रांतिकारकांना आपलें संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवतां यावें म्हणून त्यांना सक्रिय सहाय्य करण्याचें आश्वासन जपानच्या मुख्य प्रधानानें दिलें आहे.

त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या दृष्टीनें महत्त्वाची आणखी अशी दुसरी बाब ही आहे, कीं आमच्या देशांत ब्रिटिश साम्राज्यशाही आतां उन्मळून पाडली पाहिजे.

माझ्याप्रमाणेंच आपल्यालाही हें माहीत आहे कीं, ज्या वेळीं हें महायुद्ध सुरू झालें त्या वेळीं ब्रिटिश सरकार लौकरच मोठ्या अडचणींत सांपडेल आणि ब्रिटिश हिंदुस्थानमधल्या बहुसंख्य प्रांतांतील मंत्रिमंडळांवर हुकमत गाजविणाऱ्या पक्षाबरोबर त्याला समेट करणें भाग पडेल असें आमच्या कांहीं मित्रांना वाटूं लागलें होतें.

या मित्रांच्या म्हणण्याप्रमाणें ब्रिटिश सरकारचा नाइलाज होऊन तें स्वतः होऊन पुढें येईपर्यंत कॉंग्रेस दम धरून राहिली असती कीं, सारा कार्यभाग साधला असता.

त्यानंतर एक वर्ष निघून गेलें. पण जुलुमशहा ब्रिटिशांचा हृदयपालट झाल्याचा पुरावा कांहीं त्या अवधींत मिळाला नाहीं. त्यानंतर तडजोड घडवून आणण्यासाठीं ब्रिटिश सरकारवर सौम्य दडपण आणून पहावें असा या मित्रमंडळींनीं बेत केला आणि त्याप्रमाणें कांहीं हालचालसुद्धां करून पाहिली, पण त्याचा दृश्य असा परिणाम कोणताच दिसून आला नाहीं.

सिंगापूरचा पाडाव होऊन, मि. विन्स्टन चर्चिल आणि मि. रूझवेल्ट यांनीं म्हटल्याप्रमाणें ब्रिटिशांच्या लष्करी इतिहासांतली महान् आपत्ति ओढवली आणि त्यानंतर ब्रह्मदेशही पडला तरी सुद्धां कांहीं म्हणण्याजोगा फरक झाल्याचें दिसून आलें नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाही निश्चलच राहिली आहे. कोणी येवो, कोणी जावो, साम्राज्यें मिळालीं काय, गेलीं काय ब्रिटिश साम्राज्यशाही चिरकालीन आहे.—आमच्या राज्यकर्त्यांची भावना हीच आहे.

याला आपण मुत्सद्देगिरीचा अभाव, राजकीय दिवाळखोरी अथवा धादांत मूर्खपणा, काय वाटेल तें म्हणा, पण या मूर्खपणालाही एक वेगळा अर्थ आहे.

ब्रिटिश साम्राज्य हें हिंदुस्थानावर पोसलें आहे. कोणत्याही पक्षाचा छाप बसलेला असला तरी सर्व ब्रिटिशांना ह्याची जाणीव आहे कीं, हिंदुस्थानची सर्व साधनसामुग्री, आपणच लुटली पाहिजे. आज त्यांच्या दृष्टीनें साम्राज्याचा अर्थ फक्त हिंदुस्थान असाच होतो. म्हणून तें साम्राज्य टिकविण्यासाठीं ते आज अधिक त्वेषानें लढत आहेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याची किंमत देऊन त्यांना युद्ध जिंकतां येईल, पण साम्राज्याला मुकावें लागेल.

अर्थात् या महायुद्धांत दैवानें कोणतीही कलाटणी दिली तरी आपलें साम्राज्य टिकविण्यासाठीं म्हणजेच हिंदुस्थान हातीं राखण्यासाठीं इंग्रज अखेरपर्यंत धडपडत राहील.

म्हणूनच अगदीं स्पष्ट शब्दांत बोलावयाचें झाल्यास मी असेंच म्हणेन कीं, भयंकर आपत्ति ओढवली असतांही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याची ब्रिटिश मुत्सद्यांची तयारी नाहीं. हा त्यांचा मूर्खपणा होत नाहीं तर आपल्या साम्राज्यावर इंग्रज स्वखुषीनें पाणी सोडील अशी अपेक्षा करणें हाच खरोखर मूर्खपणा आमचा होत आहे.

ब्रिटिश साम्राज्यशाहीची आणखी एक आक्षेपार्ह बाजू आहे.

जर्मनीच्या परराष्ट्रमंत्र्यानें परवां बोलून दाखविल्याप्रमाणें चालू महा-युद्धांत ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग त्याचे शत्रू बळकावून घेत आहेत आणि दुसरा भाग त्याचे मित्र हस्तगत करीत आहेत. त्याहीपेक्षां विशेष हें कीं, आपलें हें साम्राज्य टिकविण्यासाठीं निकरावर येऊन धडपड करणारा जॉन बुल स्वतः तर रक्तशोष होऊन पांढरा फटफटीत पडला आहेच पण त्या-मुळें झालेल्या प्रचंड नुकसानीची भरपाई करण्यासाठीं हिंदुस्थानला युद्ध-सहकार्य करण्यास लावून तो हिंदुस्थानलाही जास्त निष्ठुरपणें पिळीत आहे.

तेव्हां साम्राज्यशाही तर्कशास्त्राप्रमाणें महायुद्धाची समाप्ती कशीही होवो हिंदुस्थानवरची आपली पकड तशीच कायम राखण्यासाठीं धडपड करावयाची हा बाणा ब्रिटिश कायमच ठेवणार हें निश्चित !

म्हणूनच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य त्याला परत देण्यासाठीं इंग्लंडचें मन वळवितां येईल या भ्रमांत कोणाही हिंदी इसमानें दंग होऊन राहूं नये.

तथापि याचा अर्थ असा नव्हे कीं, हिंदुस्थानाबरोबर तडजोड करण्याचा प्रयत्न ब्रिटिश मुत्सद्दी यापुढें केव्हांही करणार नाहींत.

तडजोडीचा तसा एकाददुसरा प्रयत्न केव्हांही होईल. लष्करी बाजू अंगावर उलटल्यामुळें तो होवो अथवा इंग्लंड आणि अमेरिकेमधल्या प्राग-तिक विचारसरणीच्या लोकांना संतुष्ट राखण्यासाठीं तो होवो; मला त्या-बाबत फक्त एवढेंच सुचवावयाचें आहे कीं, अशी तडजोड जरी ब्रिटिश मुत्स-द्यांनीं केली तरी तिच्या द्वारें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ते कधींही मान्य करणार नाहींत. हिंदी जनतेला फसवण्याचाच त्यांचा हा प्रयत्न असेल.

वाटाघाटी दीर्घ काळपर्यंत चालू ठेवण्याच्या मुळाशीं स्वातंत्र्याच्या लढ्याला बगल देऊन राष्ट्राची स्वातंत्र्यलालसा कमी करण्याचा हेतु असतो. डिसेंबर १९४१ ते एप्रिल १९४२ मधल्या काळांत ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं हेंच केलें.

गेल्या वर्षी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं हिंदुस्थानांत ज्या वाटाघाटी केल्या त्यामुळें ब्रिटिश सरकारचें कोणतेंच नुकसान झालें नाहीं. आमच्या स्वातंत्र्य-संग्रामांत मात्र त्यामुळें व्यत्यय आला.

म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीबरोबर तडजोड करण्याच्या कल्पनेला आपण कायमची मूठमाती दिली पाहिजे. आमच्या स्वातंत्र्याला तडजोड संमत नाहीं. ब्रिटिश आणि त्यांचे दोस्त जेव्हां हिंदुस्थान सोडून कायमचे निघून जातील तेव्हांच स्वातंत्र्य मिळालें असें म्हणतां येईल आणि ज्यांना खरोखरच स्वातंत्र्याची तहान लागली आहे त्यांनीं त्यासाठीं लढणेंच भाग आहे आणि त्याकरतां आपलें रक्त त्यांनीं सांडलें पाहिजे.

तेव्हां स्वातंत्र्याचा आमचा लढा आम्ही हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानाबाहेर असा दोन्ही ठिकाणीं चालू ठेवूं या आणि आमची सर्व शक्ति आणि सर्व जोम त्यासाठीं कारणीं लावूं या.

आमचे मित्र, आमचे दोस्त आणि आम्ही स्वतः अशा प्रकारें संघटित होऊन केलेल्या चढाईमुळें ॲंग्लो-अमेरिकन साम्राज्यशाही—ब्रिटिश साम्राज्य-नेस्तनाबूत होऊन जाईपर्यंत आणि त्या ठिकाणीं स्वतंत्र हिंदुस्थान पुनः एकदां अवतीर्ण होईपर्यंत हा लढा आपण दृढ निश्चयानें लढत राहूं या.

या लढ्यामध्यें मागें फिरण्याची बात नाहीं. लटपट चालणार नाहीं. विजय मिळवून स्वातंत्र्याचा लाभ होईपर्यंत आपण आगे कूच करीत राहिलें पाहिजे.

इन्किलाब झिंदाबाद

सिओनान येथें १९४३ सालीं भरलेल्या पूर्व आशिया प्रतिनिधी परिषदेमध्यें केलेलें अध्यक्षीय भाषण.

५

पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीचें नेतृत्व मला देऊन माझा जो आपण सन्मान केला आहे त्याबद्दल मी आपले अंतःकरणपूर्वक आभार मानतों. ह्या जबाबदारीचा मी अत्यंत नम्रभावानें स्वीकार करतों आणि त्याच वेळीं परमेश्वराची अशी प्रार्थना करतों कीं, देवा, हिंदुस्थानांतील माझे देशबांधव आणि परदेशांतील माझे देशबांधव या उभयतांचेंही समाधान होईल अशा प्रकारें माझें कर्तव्य पार पाडण्याचें मला सामर्थ्य दे.

चालू महायुद्ध सुरू झाल्यापासून मला जे जे अनुभव माझ्या मायभूमींत आणि परदेशीं आले त्यांची कहाणी जर आपण ऐकाल तर माझ्याचप्रमाणें आपल्यालाही असेंच वाटेल कीं, परमेश्वरानेंच आमच्यावर आपला वरदहस्त ठेवला होता व विजय आणि स्वातंत्र्य यांच्या मार्गानें चालू झालेल्या

आमच्या लढ्याचें मार्गदर्शन करून तोच आमचें संरक्षण करीत होता. त्यामुळें माझा आशीर्वाद आणि आत्मविश्वास शतपटीनें वाढला आहे.

मित्रहो, स्वातंत्र्यप्रेमी हिंदी जनांनीं कार्याला लागण्याचा समय आतां आला आहे. युद्धकाळांतील परिस्थितींत कार्य करतां येण्यासाठीं लष्करी शिस्तीची आणि अचल कार्यनिष्ठेची सर्वांत जास्त आवश्यकता असते. म्हणून पूर्व आशियांतील माझ्या सर्व देशबांधवांनीं एकजुटीनें आणि एका नेतृत्वाखालीं उभें राहून आमच्या पुढें ठाकलेल्या भीषण लढ्यासाठीं तयारी करावी असें माझें त्यांना सांगणें आहे. ते याप्रमाणें वागतील असा मला विश्वास वाटतो.

आज आपण जें महत्त्वाचें पाऊल टाकीत आलों त्यामुळें केवळ पूर्व आशियांतलेच नव्हेत, तर जगभर इतरत्र असलेले देशाभिमानी हिंदी लोकही सर्वसामान्य अशा एका कार्यरज्जूनें एकत्र बांधले जाऊं लागले आहेत हें आपणांस कळविण्यास मला आनंद वाटतो. परदेशस्थ अशा सर्व स्वातंत्र्यप्रेमी हिंदी जनांचा विश्वास आणि सहकार्य मीं आज संपादन केलें आहे आणि आपल्या मातृभूमीच्या उद्धारासाठीं ते सर्वजण प्रत्यक्ष कार्य करूं लागले आहेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांना प्रत्यक्ष कार्य करतां येणें शक्य नाहीं त्या शत्रूच्या प्रदेशांतील हिंदी जनांचा सुद्धां आमच्या कार्यांत आम्हाला नैतिक पाठिंबा आहे. एका ध्येयपूर्तीसाठीं परस्थ हिंदी बांधव एकाच संघटनेखालीं एकत्रित आणले जाण्याचा अलीकडच्या काळांतील हा पहिलाच प्रसंग आहे असें मला वाटतें.

त्यापेक्षांहि अधिक उल्लेखनीय गोष्ट ही कीं, परदेशांतले हे सर्व देशाभिमानी हिंदी बांधव स्वदेशांतील आपल्या बांधवांशीं पूर्णपणें समरस होऊन कार्य करूं लागले आहेत. १९४१ मध्यें गृहत्याग आणि देशत्याग करून मी जो एका महत्त्वाच्या कामगिरीसाठीं बाहेर पडलों तो माझ्या बहुसंख्य देशबांधवांच्या इच्छेला अनुसरूनच होय असें मीं पुष्कळदां जाहीरपणें सांगितलें आहे. त्या वेळेपासून सी. आय. डी. नें म्हणजे गुप्त पोलिसखात्यानें घातलेल्य

निर्बंधांना न जुमानतां मीं माझ्या देशांतल्या बांधवांशीं दळणवळण कायम ठेवलें आहे. त्याहीपेक्षां पुढें जाऊन मी आज आपणांस असें सांगूं इच्छितों कीं, गेल्या बारा महिन्यांत निरनिराळ्या ठिकाणाहून आमचे किती तरी प्रतिनिधी हिंदुस्थानांत पाठविण्यांत आले. त्यांतले कांहीं पकडले जाऊन त्यांना गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. योग्य वेळीं त्याचा आपण पुरा बदला घेऊंच. पण त्यांच्यापैकीं पुष्कळसे लोक गुंगारा देऊन निसटले आणि हातीं आलेल्या ताज्या माहितीप्रमाणें त्यांचें काम समाधानकारक रीतीनें चालू आहे. अशा प्रकारें देशांतल्या लढवय्या लोकांचे खरेखुरे विश्वस्त म्हणून परदेशांतले देशभक्त हिंदी लोक कार्य करीत आहेत. पुनः एकदां मी आपल्यांतील प्रत्येकाला असें आश्वासन देतों कीं, आपण आतांपर्यंत जें कांहीं केलें अथवा भविष्यकाळीं जें कांहीं करूं तें सर्व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठींच केलें आणि त्यासाठींच करूं. हिंदुस्थानच्या हिताविरुद्ध असेल अथवा आमच्या बांधवांना संमत होणार नाहीं असें कोणतेंच कृत्य आम्ही कदापि करणार नाहीं.

आमचें स्वातंत्र्य आम्हाला कसें मिळवितां येईल इकडे मी आतां वळतों. हिंदुस्थानांतील माझ्या कांहीं स्नेह्यांना एका काळीं अशी आशा वाटत होती कीं, आंतरराष्ट्रीय आपद्प्रसंगांचें दडपण पडून ब्रिटिश सरकार स्वतःच्याच फायद्यासाठीं हिंदुस्थानची स्वातंत्र्याची मागणी मान्य करील. या मित्रांचा आतां भ्रमनिरास होऊन चुकला असेल. कारण आतां ही गोष्ट अगदीं स्पष्ट झाली आहे कीं, सांप्रतच्या युद्धकालांत आणि त्यानंतरहि ब्रिटिश सरकार हिंदुस्थानची पूर्वीपेक्षां अधिक निष्ठुरपणें पिळणूक करीत राहाणार आहे. त्यासाठीं फील्ड मार्शल लॉर्ड वेव्हेल यांना हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून पाठवून देण्यांत आलें आहे. ह्या नेमणुकीमुळें स्वदेशांतले कांहीं गट कमालीचे असंतुष्ट झाले आहेत असें माझ्या निदर्शनास आलें आहे. लॉर्ड हॅलिफॅक्स यांच्यासारखा इसम

व्हाइसरॉय म्हणून कदाचित् त्यांनीं मान्य केला असता. पण त्यांचा दृष्टिकोन मला मान्य नाहीं. कारण माझ्या मतें फील्ड मार्शल लॉर्ड वेव्हेल यांची व्हाइसरॉय म्हणून झालेली ही नेमणूक भविष्यसूचक आहे. तें विधिलिखित आहे. सतत माघार घेणारा हा कमांडर इन चीफ हिंदुस्थानचा शेवटचा व्हाइसरॉय व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. विशेषतः ह्या व्हाइसरॉयकडून हिंदुस्थानच्या लष्करी, राजकीय आणि आर्थिक शोषणाला जो जोम चढणार आहे त्यामुळें हिंदी बहुजन समाजामध्यें अधिक कडवटपणा उत्पन्न होईल आणि क्रांतिकारक शक्तीला जास्त बळ चढेल.

पण नव्या व्हाइसरॉयच्या राजवटीखालीं जरी हिंदुस्थानांत लष्करी हुकूमशाहीचा कालखंड सुरू होत असला तरी माझी अशी कल्पना आहे कीं, हिंदुस्थानशीं तडजोड करण्याचा आणखी एक प्रयत्न भविष्यकाळीं करण्यांत येईल. हा प्रयत्न म्हणजे निव्वळ फसवणूक अथवा भुलावणीचा प्रकार असेल आणि सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनीं १९४२ च्या एप्रिल महिन्यांत दिलेल्या पोकळ आश्वासनांच्या वेळीं ज्याप्रमाणें त्यांचा फोलकटपणा हिंदुस्थानांतल्या माझ्या देशबांधवांनीं पारखला त्याचप्रमाणें या प्रसंगींही त्यांनीं तशीच तयारी आगाऊ करून ठेवावी. मि. विन्स्टन चर्चिल या ब्रिटिश जनतेच्या सर्वोच्च प्रतिनिधीनें आपल्या वृत्तीचा एक मासला अलीकडेच दाखविला. लंडनच्या लॉर्ड मेयरला उद्देशून केलेल्या भाषणांत त्यांनीं असें सांगितलें कीं, "ब्रिटिश कॉमनवेल्थ" हे शब्द आपल्याला रुचत नाहींत. "ब्रिटिश साम्राज्य" हाच शब्द प्रथम आपण मान्य करतों. इंग्लंडचा हा शेवटचा साम्राज्यशाहीप्रेमी मुख्य प्रधान हें साम्राज्य टिकविण्यासाठीं आपली शिकस्त करील याबद्दल शंका नाहीं; आणि हिंदी जनतेला तो जें कांहीं देऊं करील तें तिला फसविण्याच्या बुद्धीनेंच देऊं करील. तथापि पृथ्वीच्या पाठीवरून जें साम्राज्य आतां अंतर्धान पावणार आहे. त्याच्याशीं तडजोड करण्याच्या कल्पनेंतही कांहीं स्वारस्य नाहीं.

माझ्याप्रमाणेंच आपल्यापैकीं ज्यांनीं इतर देशांतील स्वातंत्र्यविषयक चळवळींच्या इतिहासाचा अभ्यास केला असेल त्यांच्या अवलोकनांत ही गोष्ट आलीच असेल कीं, स्वातंत्र्यसंपादनासाठीं दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत. अनुकूल अशी आंतरराष्ट्रीय परिस्थिति ही ह्यांपैकीं एक गोष्ट आहे आणि आवश्यक तो त्याग आणि परिश्रम करण्याची तयारी ही दुसरी गोष्ट आहे. त्यांपैकीं पहिली गोष्ट आधींच साधलेली आहे. ब्रिटिश साम्राज्याशीं एकाकी लढा देण्याचा प्रसंग हिंदुस्थानवर येता तर आमचें कार्य अत्यंत बिकट झालें असतें. तथापि त्रिपक्षीय राष्ट्रांनीं आमच्या शत्रूविरुद्ध लढाई सुरू करून आणि त्याच्यावर पराभवाचे जबरदस्त टोले हाणून आमचें ओझें किती तरी हलकें केलें आहे. शिवाय ॲंग्लो-अमेरिकन साम्राज्यशाही उलथून पडेपर्यंत युद्ध चालू ठेवण्याचा त्रिपक्षीय राष्ट्रांचा निर्धार असल्यामुळें तीही आमच्या फायद्याचीच एक जादा बाब आहे.

मित्रहो, युद्धपरिस्थितीचें प्रत्यक्ष अवलोकन करतां यावें म्हणून दोन वर्षांपेक्षां जास्त काळ मी सारखा प्रवास करीत आहें. त्यामुळें मी असें म्हणूं शकतों कीं सर्वसामान्य युद्धपरिस्थिति—विशेषतः लष्करी डांवपेचांची आंखणी–त्रिपक्षीय राष्ट्रांच्या दृष्टीनें विशेष अनुकूल आहे आणि जसजसे दिवस जातील तसतशी ॲंग्लो–अमेरिकन राष्ट्रांना लागोपाठ पराभव खात राहाण्याची पाळी आल्याचें आपल्यास दिसून येईल.

मित्रहो, ब्रिटिश साम्राज्य एवढें शक्तिमान् आणि सामर्थ्यशाली असूनहीं शक्य होईल तिथून मदत मागत आहे आणि मिळवीत आहे. अर्थात् आम्हीं सुद्धां शक्यता असेल तिथून सहानुभूति आणि मदत मिळवावी हें नैसर्गिकच आहे. इतिहासांत झालेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्यें यशःप्राप्ती-पूर्वी अशीच मदत कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें बाहेरून मिळवावी लागली आहे. त्रिपक्षीय राष्ट्रें प्राप्तपरिस्थितींत आमचीं निसर्गक्रमानेंच

दोस्त बनलीं आहेत आणि त्यांची सहानुभूति आणि अवश्य तर त्यांची मदत सुद्धां आम्हीं मिळविली तर त्यांत कांहींच गैर नाहीं.

ब्रिटिशांच्या प्रचारानें भारावलेल्या माझ्या कांहीं देशबांधवांना त्रिपक्षीय राष्ट्रांच्या हिंदुस्थानविषयक धोरणांतील प्रामाणिकपणाबद्दल संशय वाटतो हें मला माहीत आहे. तथापि ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शत्रूंनीं हिंदुस्थानची स्वातंत्र्याची मागणी उचलून धरावी ही अत्यंत नैसर्गिक अशीच गोष्ट आहे हें त्यांची तारतम्य बुद्धिच त्यांना सांगेल. शिवाय इंग्लंडचा अपवाद सोडला तर स्वतंत्र हिंदुस्थानपासून उभ्या जगाप्रमाणेंच त्रिपक्षीय राष्ट्रांचाही फायदाच होईल.

त्रिपक्षीय राष्ट्रांनीं हिंदुस्थानविषयक आपलें धोरण यापूर्वीच वेळोवेळीं स्पष्ट केलें आहे. त्याखेरीज आपले मान्यवंत मुख्य प्रधान जनरल टोजो यांच्या द्वारें जपानच्या सरकारनें फिलिपाइन्स, ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान यांच्या संबंधींचें आपलें धोरणही वेळोवेळीं घोषित केलें आहे. * ब्रिटिश मुत्सद्दी आणि प्रचारक हे स्वतःच ढोंगी असल्यामुळें जपानचें धोरण दिखाऊ आणि ढोंगी असल्याचें सांगत आहेत. तथापि ब्रह्मदेश आणि फिलिपाइन्स यांना युद्ध-समाप्तीनंतर नव्हे तर चालू वर्ष संपण्यापूर्वीच स्वातंत्र्य देण्यांत येईल अशी उभ्या जगासमोर धाडशी घोषणा करून मुख्य प्रधान जनरल टोजो यांनीं अँग्लो-अमेरिकन प्रचारावर मर्माघात केला आहे.

ब्रह्मदेश आणि फिलिपाइन्स यांच्या बाबतींतलें हें धोरण जपानची कळकळ आणि त्याची सदिच्छा याबद्दल अगदीं खात्री पटविणारा पुरावा म्हणून पुढें करतां येईल. तथापि ही गोष्ट लक्षांत घेतली नाहीं तरी एक सर्वसामान्य व्यक्ति या नात्यानें जपानच्या हेतूबद्दल संशय अथवा अविश्वास बाळगण्याचें मला कारण काय हेंच मला कळत नाहीं. परदेशीयांच्या चढाईला यशस्वीपणें तोंड दिलेलें जपान हें आशिया खंडांतलें पहिलेंच राष्ट्र आहे आणि जोंपर्यंत

* परिशिष्ट अ पहा.

आशियांतील गुलाम राष्ट्रं दास्यविमुक्त झालीं नाहींत तोंपर्यंत चढाईखोर प्रवृत्तीची झळ न लागतां आपण पूर्णपणें सुरक्षित राहूं असें कोणाहि आशिया खंडांतील राष्ट्रांस वाटत नाहीं ह्याची जाणीव इतरांपेक्षां जपानला अधिक चांगली आहे. त्याखेरीज जिला एशियाटिक जागृति असें म्हणतां येईल अशी भावना आज जपानमध्यें निर्माण झाली असून आशियांतील इतर राष्ट्रांना त्यांचें स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं मदत करण्याच्या इच्छेनें ती व्यक्त होऊं लागली आहे. ही एक अपूर्व घटना असून आशियांतील सर्व गुलाम राष्ट्रांना आपलें दास्य-विमोचन करून घेऊन स्वातंत्र्य, न्याय आणि नीति या पायांवर आपली नवी घडी प्रस्थापित करण्याची एक सुवर्णसंधी यामुळें मिळत आहे.

या मुद्यासंबंधानें जर अजूनही कोणाच्या मनांत कांहीं किंतु राहिला असेल तर त्याला मी असें सांगतों कीं, माझ्यावर विश्वास ठेव. मी हिंदुस्थानशीं एकनिष्ठ असून एकट्या हिंदुस्थानालाच माझी निष्ठा मीं वाहिलेली आहे. माझ्या देशाचा मी विश्वासघात करीन असें म्हणण्याचें औद्धत्य माझे शत्रु-सुद्धां दाखविणार नाहींत. कालपरवां टोकिओमध्यें मीं सांगितल्याप्रमाणें आयुष्यभर माझा छळ करूनही जिथें ब्रिटिश सरकारला मला वठणीवर आणतां आलें नाहीं तिथें इतर कोणालाही तें शक्य नाहीं. आणि जिथें महाधूर्त आणि कावेबाज अशा ब्रिटिश मुत्सद्यांना सुद्धां माझी खुशामत करून मला फसवितां आलें नाहीं तिथें दुसऱ्या कोणालाही तें साधणार नाहीं.

अँग्लो-अमेरिकन राष्ट्रांचा विजय म्हणजे हिंदुस्थानचें चिरंतन दास्य आणि अधिक निष्ठुर पिळणूक. म्हणून त्रिपक्षीय राष्ट्रांचा विजय हीच आमच्या स्वातंत्र्यसंपादनाची एकमेव आशा ठरते. तथापि आमचा लढा आम्हीं अशा प्रकारें चालविला पाहिजे कीं गट्टी राष्ट्रांना विजय मिळाला म्हणजे त्याच वेळीं आम्हालाहि आमचें स्वातंत्र्य प्राप्त झालें पाहिजे.

मित्रहो, आंतरराष्ट्रीय परिस्थिति आम्हांला आज अत्यंत अनुकूल आहे आणि घडून येणाऱ्या घटनांचा मेळही तेवढ्याच समाधानकारक रीतीनें

जमून आला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं फक्त आवश्यक तेवढे परिश्रम आणि त्याग याचीच उणीव आहे. या दिशेनें झालेलें आमचें कार्य मुळींच असमाधानकारक नाहीं. गेल्या वर्षीच्या मे महिन्यांत सर स्टॅफर्ड क्रिप्स हिंदुस्थानांतून निघून गेल्यानंतर म्हणजे आमचें पहिलें स्वातंत्र्ययुद्ध सुरू होऊन बरोबर ८५ वर्षे झाल्यानंतर मीं असें म्हटल्याचें आपल्याला आठवत असेल कीं, आमच्या राष्ट्रीय संग्रामाला आतां एक महत्त्वाची अवस्था प्राप्त होत आहे. त्यानंतर आम्हीं बरीच मजल मारली आणि त्यांतला अत्यंत महत्त्वाचा टप्पा कायदेभंगाची चळवळ तीव्र होऊन व महात्मा गांधींना अटक झाल्यानंतर घातपाताच्या चळवळीला प्रारंभ होऊन गांठण्यांत आला. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय संग्रामांत ऑगस्ट १९४२ ही एक अविस्मरणीय घटना होऊन राहील. अप्रत्यक्ष प्रतिकाराचें समयस्फूर्तीनें, प्रत्यक्ष प्रतिकारांत रूपांतर झाल्याचें ही घटना दर्शवीत आहे. कायदेभंगाच्या चळवळीनें संतुष्ट न राहातां आपल्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं इतर साधनांचाही अवलंब करण्याची हिंदी जनतेची आतां नैतिक तयारी झाली आहे.

अर्थात् आमच्या लढ्यांतील एक अवस्था संपवून दुसऱ्या अवस्थेला प्रारंभ करण्याचा समय आतां आलेला आहे. म्हणून हिंदुस्थानांत असणाऱ्या अथवा बाहेर असणाऱ्या सर्व संघटनांनीं आपली शिस्तबद्ध अशी एकच लढाऊ संघटना तयार करून एकाच नेत्याच्या हुकमतीखालीं वावरलें पाहिजे. योग्य समय येतांच आणि इषारा मिळतांच ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध हत्यार उपसणें हें एकच ध्येय आणि उद्दिष्ट या संघटनेचें राहील.

आमच्या सर्व शक्ति परिणामकारक रीतीनें संघटित करण्यासाठीं स्वतंत्र हिंदुस्थानचें एक तात्पुरतें सरकार स्थापन करण्याचा माझा हेतु आहे. हिंदुस्थानची क्रांति यशस्वी करण्यासाठीं हें तात्पुरतें सरकार तिचें नेतृत्व स्वीकारील. हा हेतु साधण्यासाठीं हिंदी जनतेला—हिंदुस्थानांतील आणि हिंदुस्थानाबाहेरील—सशस्त्र लढ्यासाठीं तयार करणें आणि १८८३ पासून सुरू झालेल्या

आपल्या राष्ट्रीय लढ्याची परिसमाप्ती करणें तात्पुरत्या सरकारास अवश्य आहे. ही क्रांति यशस्वी होऊन जेव्हां अँग्लो-अमेरिकन साम्राज्यशाहीचें हिंदुस्थानांतून उच्चाटन होईल तेव्हां या तात्पुरत्या सरकारचें कार्य समाप्त होईल. त्याच वेळीं हिंदुस्थानांत **हिंदी जनतेच्या इच्छेला अनुसरून** कायमचें सरकार अस्तित्वांत येण्यासाठीं हें सरकार आपलें विसर्जन करून घेईल.

अखेरच्या संग्रामाची आमची सर्व तयारी जेव्हां पुरी होईल तेव्हां त्रिपक्षीय राष्ट्रांच्या बरोबरीनें सर्वांना सामान्य असणाऱ्या अशा आमच्या एका शत्रुविरुद्ध लढ्यांत भाग घेणें आम्हांला शक्य होईल. या सर्वसामान्य लढ्यांत भागीदारी पत्करून आम्ही आमच्या स्वातंत्र्याला पात्र ठरूं. एका पवित्र कार्यासाठीं आमचें रक्त सांडून आम्ही आमच्या स्वातंत्र्याचें मोल देऊं आणि आमच्या राष्ट्रीय ऐक्याचा त्याच वेळीं टिकाऊ पाया घालूं. शेवटची पण तेवढ्याच महत्त्वाची गोष्ट ही कीं, आमच्या स्वतःच्या परिश्रमांनीं आणि त्यागानें आम्हीं आमचें स्वातंत्र्य मिळविलें तर तें स्वातंत्र्य सर्वकाल टिकविण्याचें सामर्थ्यही आम्ही त्यायोगें संपादन करूं.

मित्रहो, शेवटीं समारोप करतांना माझ्यावरचा जो विश्वास तुम्हीं व्यक्त केला आहे आणि कोणत्याही प्रकारें विचलित न होतां मदत करण्याचें जें आश्वासन तुम्हीं मला दिलें आहे त्याबद्दल पुनः एकदां मी आपले अंतःकरणपूर्वक आभार मानतों. तथापि मी तुम्हांला असा इषारा देतों कीं, अंतिम विजयाची जरी आपल्याला पूर्ण खात्री वाटत असली तरी शत्रूला कमी लेखून आम्हांला कधींही चालतां येणार नाहीं. आणि तात्पुरती हार खाण्याचीही आपली तयारी असली पाहिजे. आमचा पुढचा लढा भीषण आहे, कारण शत्रू सामर्थ्यवान्, पाताळयंत्री आणि निष्ठुर आहे. स्वातंत्र्याकडे ही अखेरची मजल मारतांना आपल्याला भूक, तहान, उपासमार, सक्तीची दौड आणि मृत्यु यांना तोंड द्यावें लागेल. ह्या कसोटीला जेव्हां आपण उतरूं तेव्हांच

स्वातंत्र्य आपल्या हातीं येईल. मला विश्वास वाटतो कीं, या कसोटींतून आपण पार पडाल आणि आपल्या गुलाम व कंगाल झालेल्या भूमीला त्यायोगें स्वातंत्र्य आणि सुबत्ता प्राप्त करून द्याल.

**इन्किलाब झिंदाबाद !**

**आझाद हिंद झिंदाबाद !**

## मी देशत्याग कां केला.

सिओनान येथें ता. ९ जुलै १९४३ रोजीं भरलेल्या जाहीर सभेंत केलेलें भाषण.

म.ग्रं.सं.ठाणे.

६

बंधुभगिनींनो, आज आपण माझें जें मोठया उत्साहानें आणि प्रेमानें स्वागत केलें त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतों. विशेषतः आपला देशाभिमान व्यक्त करण्यासाठीं एवढ्या प्रचंड संख्येनें इथें उपस्थित राहिल्या-बद्दल माझ्या भगिनींचा मी फार आभारी आहें. आज जें दृश्य मला दिसत आहे त्यामुळें मला असा विश्वास वाटतो कीं, सिओनान आणि मलायामधील माझे देशबांधव आगामी लढ्यांत पुढाकार घेऊन आपली कामगिरी बजा-वतील. एका काळीं ब्रिटिश साम्राज्यशाहीचा जो बालेकिल्ला होता तो आज हिंदी राष्ट्रीयत्वाचा बालेकिल्ला बनला आहे.

यानंतर मी गृहत्याग आणि देशत्याग कां केला आणि सर्व प्रकारच्या आपत्तींना तोंड देऊन परदेशपर्यटन कां केलें हें अगदीं मोकळ्या मनानें मी आपल्याला सांगणार आहें.

१९४१ सालीं विश्वविद्यालयाच्या पायऱ्या ओलांडून बाहेर पडल्यापासून स्वातंत्र्याच्या चळवळींत मी थेट आतांपर्यंत प्रामुख्यानें भाग घेत आलों आहें हें आपणांस माहीत आहेच. गेल्या वीस वर्षांत झालेल्या कायदे-भंगाच्या सर्व चळवळींत मीं भाग घेतला आहें. त्याखेरीज क्रांतिकारक गुप्त चळवळींशीं—अहिंसक अथवा अत्याचारी हा प्रश्न नाहीं—संबंध असल्याच्या संशयावरून मला चौकशी केल्याशिवाय अनेक वेळां तुरुंगांतहि टाकण्यांत आलें होतें. या काळांत मला जो वेगवेगळा अनुभव आला तसा बहुविध अनुभव असलेला दुसरा कोणताही राष्ट्रीय पुढारी हिंदुस्थानांत आपल्याला सांपडणार नाहीं असें मी बजावून सांगतों आणि तसें सांगण्यांत मी अति-शयोक्ति करीत आहें असें मला बिलकुल वाटत नाहीं. या अनुभवामुळें मीं असा निष्कर्ष काढला कीं, देशांतल्या देशांत आम्ही कितीही प्रयत्न केले तरी आमच्या देशांतून ब्रिटिशांना हांकून लावण्याच्या कामीं ते पुरे पडणार नाहींत. देशांतल्या चळवळीनें स्वातंत्र्य मिळतें तर हा एवढा त्रास आणि धोका पत्करण्याचा मूर्खपणा मीं निष्कारण केला नसता.

थोडक्यांत म्हणजे देशांत सुरू असलेल्या चळवळीला पोषक होईल अशी चळवळ बाहेरून करावी या उद्देशानेंच मी हिंदुस्थान सोडून बाहेर पडलों. बाहेरून अशी मदत मिळाल्याखेरीज हिंदुस्थान स्वतंत्र करणें कोणालाही शक्य नाहीं. शिवाय देशांतल्या राष्ट्रीय लढ्याला पोषक म्हणून ह्या ज्या बाहेरच्या मदतीची उणीव तीव्रतेनें भासत आहे तीही वस्तुतः अल्पच आहे. त्याचें कारण हें कीं, गट्टी राष्ट्रांनीं आधींच ब्रिटिशांना परा-भवाचे टोले हाणून ब्रिटिश सत्ता आणि ब्रिटिशांची इभ्रत एवढी खिळ-खिळी करून टाकली आहे कीं, त्यामुळें आमचें काम कितीतरी सोपें झालें आहे.

आमच्या देशांतल्या बांधवांना ज्या मदतीची आवश्यकता होती आणि आजही आहे ती मदत दोन प्रकारची आहे. नैतिक आणि व्यावहारिक अंतिम विजय आपला आहे ह्याबद्दल प्रथम त्यांची खात्री पटविली पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांना लष्करी कुमक बाहेरून पाठविली पाहिजे. पहिलें उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं आंतरराष्ट्रीय युद्धपरिस्थितीचें अवलोकन करून महायुद्धाचा शेवट कसा होणार आहे ह्याचा अंदाज घेतला पाहिजे. दुसरें उद्दिष्ट साधण्यासाठीं हिंदुस्थानबाहेर असलेल्या हिंदी बांधवांना स्वदेशांतील आपल्या बांधवांनीं मदत करण्यासाठीं काय करतां येईल हें पाहिलें पाहिजे आणि गरज भासली तर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शत्रूंचेंही सहाय्य शक्य तर मिळविलें पाहिजे. मित्रहो, दोन्ही उद्देश साध्य झाले आहेत असें आज मी आपल्याला सांगूं शकतों. परदेशीं प्रवास करून मीं प्रत्यक्ष निरीक्षण केलें आणि युध्यमान् राष्ट्रांच्या परिस्थितीचा अभ्यास केला. अँग्लो–अमेरिकन साम्राज्यशाहीचा पराभव निश्चित आहे अशी त्यामुळें माझी खात्री पटल्या-नंतर मीं ही माहिती माझ्या स्वदेशांतील देशबांधवांकडे रवाना केली. जगांतले माझे सर्व देशबांधव जागृत झाले आहेत आणि राष्ट्रीय लढ्यांत भाग घेण्यास ते उत्सुक आहेत हें त्यानंतर कळून मला आनंद झाला. त्याचप्रमाणें हिंदु-स्थान स्वतंत्र झालेला पाहाण्याची तळमळ गट्टी-राष्ट्रांना–विशेषतः जपानला–खरोखरच लागली असून हिंदी लोकांची इच्छा असेल तर शक्य ती सर्व प्रकारची मदत त्यांना करण्याची त्यांची तयारी आहे हें कळून मला धन्यता वाटली.

परदेशांतील हिंदवासीयांच्या धोरणाबद्दल बोलावयाचें झाल्यास मला असें वाटत नाहीं कीं, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य जिला नको आहे अथवा हिंदुस्थानच्या लढ्यांत भाग घेण्याची जिची तयारी नाहीं अशी एकादी व्यक्ति, स्त्री अथवा पुरुष असूं शकेल. गट्टी राष्ट्रें अथवा जपान यांच्या धोरणाबद्दल सांगावयाचें झाल्यास त्यांच्याबद्दल संशय वाटणाऱ्या कोणाही व्यक्तीची मी भरपूर पुराव्यानिशीं अशी खात्री पटवून देईन कीं, आमचे देशबांधव वगळले तर आज जगांत हेच लोक आमचे जिव्हाळ्याचे स्नेही आहेत. माझ्यावर विश्वास ठेवा असें देखील त्यांखेरीज मी आपणांस सांगतों. माझ्या देशाच्या हितसंबंधांना धोका

निर्माण होईल असें वर्तन माझ्या हातून घडेल असें सांगण्याचें औद्धत्य माझे शत्रूसुद्धां दाखविणार नाहींत आणि जियें ब्रिटिश सरकारला मला वठणीवर आणतां आलें नाहीं, फसवितां आलें नाहीं अथवा वश करून घेतां आलें नाहीं तियें जगांतल्या दुसऱ्या कोणत्याच राष्ट्राला ती गोष्ट शक्य नाहीं. म्हणून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध सुरू झालेल्या आपल्या लढ्यांत गरज भासली तर मट्टी राष्ट्रांचीही आपल्याला मदत करण्याची तयारी आहे असें मी ज्या वेळीं म्हणतों त्या वेळीं हाच विश्वास आपण बाळगून असा. तथापि आपल्याला अशी मदत पाहिजे कीं नको हें आपलें आपणच ठरविलें पाहिजे. त्यांची मदत घेतल्याशिवाय जर आपला कार्यभाग होत असेल तर हिंदुस्थानला तें हवेंच आहे, हें सांगण्याची गरज नाहीं. तथापि हेंही मला या वेळीं सांगणें इथें जरूर आहे कीं, जियें आज सर्वशक्तिमान् ब्रिटिश सरकारसुद्धां हातांत भिक्षापात्र घेऊन सर्व जगभर मदतीसाठीं वणवण फिरत आहे आणि हिंदुस्थानांतल्या गुलाम आणि दरिद्री लोकांपुढेंही हात पसरीत आहे तियें गरज पडल्यास आम्हींही इतरांकडून मदत स्वीकारली तर त्यांत कांहींच गैर नाहीं.

स्वातंत्र्यसंपादनाचें उद्दिष्ट आम्ही कसें गांठणार आहोंत याबद्दलची आमची योजना सर्व जगाला आणि आमच्या शत्रूंनाही जाहीरपणें सांगण्याची वेळ आतां आली आहे. हिंदुस्थानाबाहेर असलेले हिंदी लोक—विशेषतः पूर्व आशियांतील हिंदवासीय आपली एक लष्करी संघटना तयार करणार असून हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्यावर चालून जाण्याएवढी ती सामर्थ्यवान् असेल. तशी चढाई आम्हीं केली कीं, स्वदेशांत क्रांतीचा भडका उडेल. आणि ही क्रांति केवळ नागरिकांमध्येंच होणार नाहीं, तर ब्रिटिशांच्या निशाणाखालीं उभ्या राहिलेल्या हिंदी फौजेमध्येंसुद्धां घडून येईल. ब्रिटिश सरकारवर असा दुहेरी हल्ला चढविण्यांत आल्यावर— हिंदुस्थानांतून आणि बाहेरून— हें सरकार कोलमडून पडेल आणि हिंदी लोकांना आपलें स्वातंत्र्य पुनः मिळवितां येईल.

तेव्हां, माझ्या या योजनेप्रमाणें गट्टी राष्ट्रांचें धोरण हिंदुस्थानच्या बाबतींत काय आहे या विचारानेंही उगीच डोक्याला झीज देण्याची गरज नाहीं. हिंदुस्थानाबाहेर असलेले आणि देशांत असलेले हिंदी लोक जर फक्त आपल्या कर्तव्याला जागले तरी पुरें आहे. ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकून लावून आपल्या ३८ कोटी ८० लक्ष देशबांधवांना दास्यमुक्त करणें तेवढ्यानेंही शक्य होईल.

कांहीं घुबडें असा घूत्कार काढतील कीं, जिथें ३८ कोटी ८० लक्ष हिंदी वासियांना हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्ता नाहींशी करणें शक्य होत नाहीं तिथें बाहेरच्या या ३० लक्ष हिंदी लोकांना ही कामगिरी कशी काय पार पाडतां येईल ! पण मित्रहो, आपण आयर्लंडच्या इतिहासाकडे नजर टाका. ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं लष्करी कायदा पुकारण्यांत आलेल्या परिस्थितीसारख्या परिस्थितींत राहाणाऱ्या ३० लक्ष आयरिश लोकांना जर १९२१ सालीं पांच हजार सशस्त्र सिनफेन सैनिकांच्या मदतीनें ब्रिटिश सरकारवर लोटांगण घालण्याची पाळी आणतां आली तर स्वदेशांत चाललेल्या जोरदार लढ्याचा फायदा घेऊन आणि जपानसारख्या सामर्थ्यवान् राष्ट्रांची मदत वाटेल तेव्हां मिळण्याची शक्यता लक्षांत घेऊन ३० लक्ष हिंदी लोकांना हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना कां हांकून लावतां येऊं नये !

तथापि मला हें सांगणें अवश्य आहे कीं, परस्थ हिंदी लोकांनीं आणि विशेषतः पूर्व आशियांतील हिंदी लोकांनीं आपल्या प्रयत्नांची यापुढें शिकस्त केली पाहिजे. ही कामगिरी चोखपणें बजावतां यावी म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानचें एक तात्पुरतें सरकार स्थापन करण्याचा माझा उद्देश आहे. हिंदी लोकांचें सर्व सामर्थ्य संघटित करून हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश सैन्यावर चाल करून जाणें हें या सरकारचें कार्य आहे. ही मोहीम यशस्वी होऊन हिंदुस्थान स्वतंत्र झाला कीं, हिंदी जनतेच्या इच्छेला अनुसरून अधिकारावर येणाऱ्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या चिरस्थायी सरकारसाठीं हें सरकार आपलें आसन खालीं करील.

मित्रहो, आतां आपल्याला हें कळून चुकलें असेलच की, आपलें वित्त आणि आपलें संख्याबळ यांसह आपली सर्व साधनसामुग्री एकवटून पूर्व आशियांतील ३० लक्ष हिंदी जनांनीं संघटित होण्याचा समय आज प्राप्त झाला आहे. अर्धवट उपाययोजना अशा वेळीं चालणार नाहीं. मला सर्वस्वाची संघटना पाहिजे आहे. त्यापेक्षां कमी मिळेल तर तें मला नको. कारण आम्हांला असें वारंवार सांगण्यांत येत आहे, आमचे शत्रुसुद्धां असें सांगत आहेत कीं, महायुद्ध सर्वंकष आहे.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसेनेचा—आझाद हिंद फौजेचा अथवा हिंदी राष्ट्रीय सेनेचा—एक विभाग आज तयार होऊन आपल्यापुढें उभा असल्याचें आपल्याला दिसत आहे.

परवांच त्यांची टाऊन हॉलसमोर समारंभानें कवाईत झाली. त्यानंतर त्यांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं, आपल्या विजयदिनाची अशीच कवाईत दिल्लीच्या पुराणप्रसिद्ध लाल किल्ल्यासमोर होईपर्यंत आपण विश्रांति घेणार नाहीं. "चलो दिल्ली चलो दिल्ली" ही त्यांची घोषणा आहे. मित्रहो, पूर्व आशियांतील ३० लक्ष हिंदी लोकांचीही घोषणा "सर्वंकष युद्धासाठीं सर्वस्व संघटना" अशी असूं द्या.

या सर्वस्व संघटनेंतून कमींत कमी तीन लक्ष सैनिक आणि तीन कोटी डॉलर्स मला मिळावेत अशी माझी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणें १८५७ सालच्या हिंदुस्थानच्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामांत झांशीच्या शूर राणीप्रमाणें तलवार चालविणाऱ्या शूर हिंदी ललनांचें एक "मृत्युंजय पथक" मला तयार करावयाचें आहे.

मित्रहो, युरोपमध्यें दुसरी आघाडी सुरू होणार असें आपण बरेच दिवस ऐकत आहों. पण स्वदेशांतील आमच्या देशबांधवांवर विलक्षण ताण पडल्यामुळें तेच आज दुसऱ्या आघाडीची मागणी करीत आहेत.

पूर्व आशियामध्यें मला तुम्ही सर्वस्व संघटना द्या आणि मी तुम्हांला हिंदुस्थानच्या लढ्यांतली दुसरी आघाडी— खरोखरीची दुसरी आघाडी—सुरू करण्याचें अभिवचन देतों.

## चलो दिल्ली, चलो दिल्ली

ता. ५ जुलै १९४३ रोजीं
अझाद हिंद फौजेची लष्करी
पाहाणी करतांना केलेलें भाषण

७

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसेनेंतील सैनिकांनो, आजचा दिवस माझ्या आयुष्यांतील अत्यंत अभिमानाचा दिवस आहे. हिंदुस्थानची स्वातंत्र्यसेना तयार झाली असें सर्व जगाला जाहीर करण्याचें अपूर्व भाग्य परमेश्वरकृपेनें मला लाभत आहे. ब्रिटिश साम्राज्याचा बालेकिल्ला असलेल्या सिंगापूरच्या रणांगणावर लष्करी मांडणी करून ही सेना उभी राहात आहे. ब्रिटिशांच्या जोखडापासून हिंदुस्थानला मुक्त करण्यासाठींच केवळ ही सेना सिद्ध झालेली नसून स्वतंत्र हिंदुस्थानची भावी सेना तयार करण्याचीही कामगिरी तिला यापुढें करावयाची आहे. प्रत्येक हिंदी नागरिकाला अभिमान वाटण्याजोगी ही गोष्ट आहे कीं, ही सेना—आपली स्वतःची सेना—सर्वस्वीं हिंदी नेतृत्वाखालीं उभारण्यांत आली आहे आणि ज्या वेळीं तो ऐतिहासिक क्षण येईल, त्या वेळीं हिंदी सेनानींच्याच नेतृत्वाखालीं ती रणांगणावर चालून जाईल.

कांहीं मंडळींची अशी समजूत होती कीं, ज्या साम्राज्यावरील सूर्य कधीं मावळत नाहीं तें साम्राज्यही तसेंच चिरकालीन आहे. पण हा विचार मला कधींच शिवला नाहीं. प्रत्येक साम्राज्याचा ऱ्हास आणि नाश अपरिहार्यच आहे अशी इतिहासाची शिकवण आहे. त्याखेरीज प्राचीन साम्राज्यांचे एका काळीं बालेकिल्ले असलेले दुर्ग आणि शहरें त्याच साम्राज्यांचीं थडगीं बनलीं आहेत हें दृश्य मीं स्वतः माझ्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. तथापि ब्रिटिश साम्राज्याच्या या थडग्यावर उभें राहिल्यावर एकाद्या अर्भकाचीही आज अशी खात्री पटेल कीं, सर्व शक्तिमान् ब्रिटिश साम्राज्य हें आतां इतिहासजमा झालेलेंच साम्राज्य आहे.

१९३९ मध्यें फ्रान्सनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्यानंतर जी मोहीम सुरू झाली तींत प्रत्येक जर्मन सैनिकाच्या तोंडून एकच गर्जना बाहेर पडली –"पॅरिसवर चला, पॅरिसवर चला." १९४१ च्या डिसेंबरमध्यें जपानच्या शूर सैनिकांनीं आपली चढाई सुरू करतांच त्यांनीं एकच रणघोष केला "सिंगापूरवर चला, सिंगापूरवर चला." दोस्तांनो, माझ्या सैनिकांनो, तुमची रणगर्जना "चलो दिल्ली, चलो दिल्ली" ही असूं द्या. या स्वातंत्र्ययुद्धांत आपल्यापैकीं कितीजण व्यक्तिशः निभावून बाहेर पडतील हें मला सांगतां येत नाहीं. तथापि एक गोष्ट मला माहीत आहे आणि ती ही कीं, अखेर विजय आमचाच आहे आणि आमचें धारतीर्थी पतन पावलेले वीर ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या एका थडग्यावर उभे राहून—दिल्लीच्या पुराणप्रसिद्ध लाल किल्ल्यासमोर उभे राहून आपली विजयदिनाची कवाईत करीपर्यंत आमची कामगिरी पुरी होणार नाहीं.

मला सर्व आयुष्यभर असें वाटत आलें आहे कीं, इतर सर्व क्षेत्रांत तरी हिंदुस्थान स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं तयार होऊन राहिला असला तरी एका गोष्टीची त्याला उणीव आहे. ती गोष्ट म्हणजे स्वातंत्र्यसेना. अमेरिकेच्या जॉर्ज वॉशिंग्टनला लढाई करून आपलें स्वातंत्र्य संपादन करतां आलें याचें कारण हेंच

कीं त्याची सेना त्याच्याजवळ तयार होती. गॅरिबाल्डीला इटली स्वतंत्र करतां आला याचें कारण हेंच कीं, सशस्त्र सेवक त्याच्या पाठीशीं उभे होते. हिंदुस्थानची राष्ट्रीय सेना प्रथम तयार करण्याचें तें भाग्य तुम्हालाही लाभत आहे. ही कामगिरी बजावून स्वातंत्र्याच्या मार्गावरची शेवटची धोंड तुम्हीं दूर केली आहे. ज्या उदात्त कार्याचा प्रारंभ तुमच्या हातून झाला, त्या कार्याचे तुम्ही अग्रदूत आहांत याबद्दल समाधान बाळगा, अभिमान बाळगा.

तुमची कामगिरी दुहेरी आहे याचें मी तुम्हाला स्मरण करून देतों. शस्त्रबळाच्या जोरावर आणि शरीरांतलें रक्त सांडून तुम्हाला स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. त्यानंतर हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर हिंदुस्थानची कायमची सेना तुम्हाला तयार केली पाहिजे. आमचें स्वातंत्र्य सर्वकाल टिकविण्याची जबाबदारी या सेनेवर पडणार. आमच्या राष्ट्रीय संरक्षणाचा पाया आपण एवढा भक्कम घातला पाहिजे कीं, आमचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें जाण्याची पाळी यानंतर आमच्या इतिहासांत कधींही येतां कामा नये.

सैनिक या नात्यानें निष्ठा, कर्तव्यपालन आणि त्याग ह्या तीन गुणांचे आदर्श समोर ठेवून त्याप्रमाणें आपल्याला सतत वागलें पाहिजे. जे सैनिक आपल्या राष्ट्राशीं एकनिष्ठ राहातात, ज्यांच्या कर्तव्यपालनांत कोणत्याही परिस्थितींत कसूर होत नाहीं आणि आत्माहुति देण्याची ज्यांची नेहमींच तयारी असते असे सैनिक अजिंक्य असतात. तुम्हांलाही तें अजिंक्यपद मिळवावयाचें असेल तर हे तीन गुण हृदयांत कोरून ठेवा.

खऱ्या सैनिकाला लष्करी आणि मानसिक अशा दोन्ही शिक्षणांची जरुरी असते. तुम्हां सर्वांनीं स्वतःला आणि आपल्या सैनिक बांधवांना असें शिक्षण दिलें पाहिजे कीं, त्यामुळें प्रत्येक सैनिकाला स्वतःबद्दल पूर्ण आत्मविश्वास वाटेल. शत्रूपेक्षां आपण किती तरी पटीनें श्रेष्ठ आहोंत ही जाणीव प्रत्येकाच्या मनांत सतत तेवत राहील. मृत्यूचें भय कोणालाही वाटणार नाहीं आणि गरज पडली तर आणीबाणीच्या प्रसंगीं प्रत्येकाला स्वयंस्फूर्तीनें वागतां येईल. शास्त्रीय

शिक्षणाला शौर्य, निधडेपणा आणि धडाडी यांची जोड मिळाली तर कोणते चमत्कार करून दाखवितां येतील हें या वर्षी तुम्हीं स्वतःच आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. या उदाहरणांवरून जें कांहीं शिकतां येईल तें तें सर्व शिकून घ्या आणि भारतमातेच्या सेवेसाठीं एक अव्वल दर्जाची आधुनिक सेना तयार करा.

तुमच्यापैकीं जे अधिकारी आहेत त्यांना मला असें सांगावयाचें आहे कीं, त्यांची जबाबदारी मोठी आहे. जगांतल्या कोठल्याही सैन्यामधल्या अधिकाऱ्याची जबाबदारी नेहमींच मोठी असते हें खरें असलें, तरी तुमची जबाबदारी त्यांच्यापेक्षांही जास्त आहे. कारण आमच्या राजकीय गुलामगिरीमुळें आम्हांला स्फूर्ति देणारी अशी मुकडेन, फोर्ट ऑर्थर अथवा सीडन यांच्यासारखी कोणतीच परंपरा नाहीं. ब्रिटिशांनीं आम्हांला जें शिकविलें त्यांपैकीं कांहीं आम्हांला विसरलें पाहिजे आणि त्यांनीं जें शिकविलें नाहीं असें बरेंचसें आम्हांला शिकलें पाहिजे. तथापि तें कांहींही असलें तरी मला असा विश्वास वाटतो कीं, प्राप्त प्रसंगाच्या कसोटीला तुम्ही चांगल्याप्रकारें उतराल आणि आपल्या देशबांधवांनीं जी कामगिरी तुमच्या शौर्यावर सोंपविलेली आहे ती पूर्ण कराल. नेहमीं हें लक्षांत ठेवा कीं, कोणत्याही सेनेचा खरा भार अधिकाऱ्यांवरच असतो आणि त्यांच्यामुळेंच तिची प्रतिष्ठा वाढते अथवा कमी होते. त्याचप्रमाणें हेंही लक्षांत बाळगा कीं, ब्रिटिशांना अनेक आघाड्यांवर जे पराभव खावे लागले, ते नालायक अधिकाऱ्यांमुळेंच खावे लागले आणि शेवटीं ही जाणीव बाळगून राहा कीं, स्वतंत्र हिंदुस्थानच्या सेनेचा भावी जनरल स्टाफ तुमच्यामधूनच जन्माला येणार आहे.

तुम्हां सर्वांना मला हें सांगितलें पाहिजे कीं, या युद्धांत जो अनुभव तुम्ही मिळवाल आणि जे विजय संपादन कराल त्यांतूनच आमच्या भावी सेनेची राष्ट्रीय परंपरा निर्माण होईल. ज्या सेनेला शौर्य, निर्भयता अथवा अजिंक्यपणा यांची परंपरा नाहीं ती सेना सामर्थ्यवान् शत्रूबरोबर टिकाव धरूं शकत नाहीं.

दोस्तांनो, मनाला परम उदात्त वाटणारें असें कार्य तुम्ही स्वखुषीनें पत्करलें आहे. या कार्याच्या सांगतेसाठीं कोणताही त्याग—आत्मत्यागसुद्धां जास्त नाहीं. हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रतिष्ठेचे तुम्ही आज रखवालदार आहांत आणि हिंदुस्थानच्या आशाआकांक्षा तुमच्या रूपानें आज साकार झाल्या आहेत. तेव्हां तुमच्या देशबांधवांचा तुम्हाला आशिर्वाद मिळेल आणि कांहीं पिढ्यांना तुमचा अभिमान वाटेल असेंच तुम्ही वर्तन ठेवा.

आजचा दिवस माझ्या आयुष्यांतील अत्यंत अभिमानाचा दिवस आहे असें मीं म्हटलें आहे. स्वातंत्र्यसेनेला पहिला सैनिक होणें यापेक्षां जास्त अभिमानाची, जास्त मानाची वाटणारी अशी दुसरी कोणतीच बाब गुलाम प्रजेला नाहीं. तथापि ह्या मानाबरोबरच तशी जबाबदारीही स्वीकारावी लागते आणि तिची मला पूर्ण जाणीव आहे. मी तुम्हांला असें आश्वासन देतों कीं, अंधार असो, प्रकाश असो; आपत्ती असो, आनंद असो; क्लेश असोत, विजय असो कोणत्याही परिस्थितींत मी तुमच्याबरोबरच राहीन. तथापि जिवंतपणीं अथवा मरणोत्तरही माझ्या मागून जर आपण येणार असाल—आपण याल याबद्दल मला विश्वास वाटतो—तर मीं आपल्याला नक्की विजय प्राप्त करून देईन; स्वातंत्र्याकडे घेऊन जाईन. हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहण्यास आमच्यापैकीं कोण जिवंत राहतील हा महत्त्वाचा प्रश्न नाहीं, हिंदुस्थान स्वतंत्र होत आहे आणि त्याला स्वतंत्र करण्यासाठीं आम्ही आमचें सर्वस्व अर्पण करीत आहों हेंच पुरें आहे. परमेश्वर आमच्या सेनेला आशिर्वाद देवो आणि आगामी लढयांत आम्हाला विजय प्राप्त करून देवो !

**इन्किलाब झिंदाबाद**

**आझाद हिंद झिंदाबाद**

## सुस्वागत

जपानचे मुख्य प्रधान जनरल हिडेकी टोजो यांच्या सन्मानार्थ हिंदी राष्ट्रीय फौजेनें ता. ६ जुलै १९४३ रोजीं लष्करी सलामी दिली असतां केलेलें भाषण.

८

युवर एक्सेलन्सी, हिंदी राष्ट्रीय सेनेतर्फे आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतांना आज मला फार समाधान वाटत आहे. आमच्या सेनेची पहाणी करण्यासाठीं आपला अमूल्य वेळ खर्च करून येथें येण्यांत आपण जो आमचा बहुमान केलात त्याबद्दल मी आपला फार फार आभारी आहें. स्वतंत्र हिंदुस्थानच्या नव्यानें उभारण्यांत आलेल्या या सेनेच्या इतिहासांत आजचा दिवस एक उत्सवदिन म्हणून चिरस्मरणीय राहील. हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या कालच्या परिषदेला एक स्फूर्तिदायक संदेश * पाठवून दिल्यावर ताबडतोब आज आमच्या सैनिकांमध्यें येऊन आपण उपस्थित राहिल्यामुळें आमच्या क्रांतिकारक लढ्याला जोराची चालना मिळालेली आहे.

---

* परिशिष्ट ब पहा.

आज आपल्यासमोर जी सेना खडी आहे तिला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्याला लढावयाचें आहे हें माहीत आहे. विजय आणि स्वातंत्र्य यांच्या मार्गावर अजूनही ज्या अनेक अडचणी उभ्या आहेत त्यांचीही तिला जाणीव आहे. तथापि वाटेल तो त्याग करून हिंदुस्थानचें स्वातंत्र्यसंपादन करावयाचें असा या सेनेचा निर्धार आहे. या कामीं पूर्व आशियांतील सर्व हिंदी जनांचा तिला सक्रीय पाठिंबा असून त्यांच्या उत्साहाला सीमा राहिलेली नाहीं.

शेवटीं मी आपणास असें आश्वासन देण्याची परवानगी घेतों कीं, कोण-तीही परिस्थिति ओढवली तरी उत्सवप्रसंगाप्रमाणेंच विपत्प्रसंगींही आपल्या खांद्याला खांदा लावून लढण्याचा आमचा कृतनिश्चय असून संपूर्ण विजय प्राप्त होईपर्यंत, **हिंदुस्थानला आपलें स्वातंत्र्य पुनः मिळेपर्यंत** आमचा हा लढा चालू राहाणार आहे.

एका दिवसांत निर्माण झालेलें साम्राज्य एका रात्रींत विलयाला जाईल.

हिंदी स्वातंत्र्य संघाच्या स्त्री शाखेच्या विद्यमानें ता. १२ जुलै १९४३ रोजीं सिओनान येथें भरलेल्या हिंदी स्त्रियांच्या सभेंत केलेलें भाषण.

१

भगिनींनो, आज आपण माझें जें थाटाचें स्वागत केलें त्याबद्दल प्रथम मी आपले अंतःकरणपूर्वक आभार मानतों. थाटाचें स्वागत असें मी मुद्दामच म्हणत आहें. कारण आजच्यापेक्षां माझें अधिक थाटानें स्वागत होऊं शकेल असें मला तरी वाटत नाहीं. परवां पादांग येथील म्युनिसिपल कचेरीसमोर आमची कवाईत झाली असतां आपण तिथें जो अपूर्व उत्साह दाखविलात त्याबद्दलही मी आपले याच वेळीं आभार मानतों. पाऊस पडत होता, हवाही खराब होती तरी देखील अखेरपर्यंत आपण आपल्या जागीं निश्चल राहिला. त्या प्रसंगींच्या आपल्या धीरगंभीर वृत्तीमुळें केवळ मीच नाहीं तर व्यासपीठावर उपस्थित असलेले आमचे इतर स्नेही व पाहुणेदेखील फार खूष

झाले. आपल्यापैकीं कांहींनीं आपलीं तान्हीं मुलेंसुद्धां बरोबर आणलीं होतीं. त्या प्रसंगाची आपली धीरगंभीर वृत्ति आणि आपला अपूर्व उत्साह यांचा आम्हां सर्वांच्याच मनावर फार परिणाम झाला. प्रारंभ फार छान झाला आहे आणि यापुढेंही आपलें कार्य असेंच समाधानकारक रीतीनें चालू राहील याबद्दल मला संशय नाहीं.

स्वदेशांतील स्वातंत्र्याच्या चळवळींत हिंदी महिलांनीं केलेली कामगिरी, विशेषतः गेल्या बावीस वर्षांत त्यांनीं केलेली कामगिरी माझ्याप्रमाणेंच आपल्याही सर्वांच्या परिचयाची आहे. हिंदुस्थानांत नवजागृतीला प्रारंभ झाल्यापासूनच सार्वजनिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आमच्या महिलांनीं महत्त्वाचा भाग घेतला आहे. तथापि १९२१ पासून म्हणजे महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं काँग्रेसचा पुनर्जन्म झाल्यापासून ह्याचा प्रत्यय विशेषें करून येऊं लागला. परंतु केवळ काँग्रेसच्या चळवळींत अथवा कायदेभंगासारख्या मोहिमांतच आमच्या महिलांनीं आपली कामगिरी बजाविली असें नाहीं, तर क्रांतिकारकांच्या गुप्त चळवळींत सुद्धां त्यांनीं तशीच संस्मरणीय कामगिरी बजावली आहे.

खरें सांगावयाचें म्हणजे सार्वजनिक चळवळींतलें असें कोणतेंही क्षेत्र नाहीं, राष्ट्रकार्यांतली अशी कोणतीही बाजू नाहीं कीं, ज्यांत हिंदी महिलांनीं आपला महत्त्वाचा वांटा उचलला नाहीं. मी करीत असलेल्या या विधानांत बिलकुल अतिशयोक्ति नाहीं. त्यापेक्षांही जास्त उल्लेखनीय बाब ही कीं, कैक वर्षें चालू असलेल्या आमच्या राष्ट्रीय लढ्यामध्यें आमच्या महिलांनीं पुरुषांच्या बरोबरीनें सर्व प्रकारचे कष्ट आणि क्लेश मोठ्या आनंदानें आणि तेवढ्याच धैर्यानें सहन केले आहेत.

भूकतहान विसरून खेड्यापाड्यांतून दौरे काढण्याचें काम असो, सभांतून व्याख्यानें देण्याची बाब असो, स्वातंत्र्याचा संदेश घरोघर पोंचविण्यासाठीं उंबरठे झिजविणें असो, सरकारी हुकूम न जुमानतां रस्त्यांतून मिरवणूक

काढून अमानुष ब्रिटिश पोलिसांच्या लाठ्यांपुढें उभें राहाणें असो, निवडणुकांच्ची मोहीम असो अथवा कैद, छळ, अपमान आणि सर्व प्रकारची विटंबना यांना धैर्यानें तोंड देणें असो; यांपैकीं कोणत्याही प्रसंगीं आमच्या महिला कसोटीला उतरल्याखेरीज राहिल्या नाहींत आणि शेवटची पण तेवढीच महत्त्वाची गोष्ट ही कीं, आमच्या भगिनींनीं, आमच्या शूर भगिनींनीं क्रांतिकारकांच्या गुप्त चळवळींतही तेवढीच कामगिरी बजावली आहे. प्रसंग पडला तर आपल्या बंधूंप्रमाणेंच आपणही अचूक नेम धरून गोळी झाडूं शकतों हें त्यांनीं दाखवून दिलें आहे.

आपल्यावर माझा पूर्ण विश्वास आहे, आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याच्या आणि कष्ट सोसण्याच्या आपल्या सामर्थ्यावर माझा विश्वास आहे असें मी जें म्हणत आहें त्याचें कारण आपली पोकळ खुषामत करून आपल्या उत्साहाला भरती आणावी हें नाहीं. माझा स्वानुभव तसा आहें. आमच्या महिला काय करूं शकतील हें मला माहीत आहे, म्हणूनच यत्किंचितही अतिशयोक्ति न करतां मी असें म्हणतों कीं, असें कोणतेंही कार्य नाहीं, असा कोणताही त्याग नाहीं, असे कोणतेही कष्ट नाहींत कीं, जे आमच्या भगिनींना पेलणार नाहींत.

आमच्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं अखेरचा प्रयत्न करण्याचा समय आतां आला आहे. कोणाही राष्ट्राच्या जीवनांत अशी संधि क्वचितच येते. आमच्या आयुष्यांत तरी अशी संधि पुनः येणार नाहीं. आणि पुढील शंभर वर्षांतही ती येईल कीं नाहीं, हें सांगवत नाहीं. परमेश्वराचीच कृपा म्हणून ही संधि अशी अचानक आली आहे असें मी म्हणतों. ही संधि आपण साधली आणि सर्व प्रकारच्या त्यागाला तोंड देण्याची तयारी केली तर राष्ट्रीय दास्यविमोचनाचें आमचें कार्य आपणास एकाच वेळीं आणि पुरेतेपणीं पार पाडतां येईल.

ब्रिटिश साम्राज्य हें चिरकाल टिकणारें साम्राज्य आहे असें आम्हांपैकीं कांहीं लोकांना एका काळीं वाटत होतें. ब्रिटिश साम्राज्य कधीं काळीं नष्ट होईल ही कल्पनाच त्यांना करवत नसे. तथापि इतिहास कांहीं वेगळेंच सांगत आहे. इतिहास असें सांगतो कीं, प्रत्येक साम्राज्याला उदय आहे आणि अस्तही आहे आणि ब्रिटिश साम्राज्याचा अस्त होण्याचा समय आज आला आहे. भगिनींनो, पादांग येथें कालपरवां मीं असें सांगितल्याचें आपणांस आठवत असेल कीं, सिंगापूरच्या रणांगणावर उभ्या राहाणाऱ्या आमच्यासारख्या लोकांची तरी निदान खात्री पटण्यास हरकत नाहीं कीं, ब्रिटिश साम्राज्य हें आतां इतिहासजमा झालें आहे. जगाच्या ह्या भागांतून हें साम्राज्य कसें नष्ट झालें तें आम्हीं आमच्या डोळ्यांनींच पाहिलें आहे; आणि इतर ठिकाणीं त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतूनही तें कसें अंतर्धान पावत आहे हेंही आम्हाला आतां दिसून येईल.

मेरिडिथ कॉनरेड या नांवाच्या एका इंग्लिश लेखकानें लिहिलेलें एक पुस्तक कांहीं वर्षांपूर्वी माझ्या वाचनांत आलें होतें. या पुस्तकांत हिंदुस्थान-बद्दल लिहितांना त्यानें असे उद्गार काढले होते कीं, हिंदी लोकांची जर एकजूट झाली तर हिंदुस्थानवर आपलें वर्चस्व कायम ठेवणें ब्रिटिशांना अशक्य होईल आणि याच विषयावर पुढें लिहितांना तो असेंही म्हणाला होता कीं, जें साम्राज्य एका दिवसांत निर्माण झालें तें साम्राज्य एका रात्रींत विलयाला जाईल.

रेडिओवर केलेल्या माझ्या एका अलीकडच्या भाषणांत मी असें म्हणालों होतों कीं, सिंगापूरचा तळ उभा करण्यास सतत २० वर्षें खपावें लागलें होतें. पण तो खाली करण्यांत आला मात्र अवघ्या सात दिवसांत. अर्थात् मी असें म्हणत नाहीं कीं, अवघ्या एक आठवड्याच्या आंत आम्हांला ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकून लावतां येईल; पण अखेरची मोहीम सुरू झाल्यानंतर जर आपण गणितच करायला लागलों तर ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकून लावण्यास किती आठवडे लागतील हें आम्हांला नक्की सांगतां येईल.

भगिनींनो, आपल्या दास्यविमोचनासाठीं अखेरचा संग्राम करण्याचा समय आतां आला आहे. याबद्दल आपल्यापैकीं प्रत्येकीची खातरजमा होऊन चुकली असेल असा मला भरंवसा वाटतो. त्याचप्रमाणें या महायुद्धाचें अंतिम पर्यवसान अँग्लो–अमेरिकन साम्राज्यशाहीच्या पराभवांत आणि उच्चाटनांत होणें अपरिहार्य असून अँग्लो-अमेरिकन साम्राज्यशाहीचा पराभव झाला तरच हिंदुस्थानला आपलें स्वातंत्र्य मिळविण्याची आशा आहे हेंहि आपल्याला पटून चुकलें असेल असा माझा समज आहे. म्हणूनच गट्टी राष्ट्रांचा अंतिम विजय आणि हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ह्या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत असें मी बजावून सांगत आलों आहें. आज हिंदुस्थान आणि गट्टी राष्ट्रें या उभयतांचाही शत्रु एकच आहे आणि म्हणून आम्हां उभयतांचें उद्दिष्टही समान आहे. या सर्वसमान शत्रूबरोबर वाटेल त्या प्रकारचा त्याग करावा लागला तरी तो करून, आपल्याला लढावयाचें आहे आणि आम्हां सर्वांचे समान कष्ट आणि समान त्याग यांच्या जोरावर आम्हाला आमचें स्वातंत्र्य जिंकून घ्यावयाचें आहे.

क्लेश भोगल्याशिवाय, त्याग केल्याशिवाय अथवा लढा दिल्याशिवाय जरी समजा, आम्हालीं स्वातंत्र्य मिळणें शक्य झालें तरी मला नाहीं वाटत कीं, हें स्वातंत्र्य आपल्या कामीं येईल म्हणून. कारण त्याग न करतां, लढा न करतां जें स्वातंत्र्य मिळतें तें स्वातंत्र्य, आपण स्वतंत्र झालों तरी टिकविणें कठीण असतें. म्हणून ब्रिटिशांच्या जोखडाखालून जर आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें असेल आणि त्यानंतर जर आपल्याला आपलें स्वातंत्र्य कायम टिकवायचें असेल; एवढेंच नव्हे तर आपलें स्वातंत्र्य गमावण्याची पाळी भावी इतिहासांत पुनः कधींही येतां कामा नये असें जर आपल्याला वाटत असेल तर आमच्या या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांतच असें सामर्थ्य आम्हीं संपादन करणें अवश्य आहे कीं, ज्याच्यायोगें आम्हाला आमचें स्वातंत्र्यही जिंकून घेतां येईल आणि तें सर्व काल टिकवून ठेवणेंही शक्य होईल. अर्थात् स्वातं-

त्याचें मोल आपल्याला देणें भागच आहे आणि स्वातंत्र्याचें मोल म्हणजे क्लेश, त्याग आणि लढा. जरूर तो त्याग आपल्याला करतां येईल, लढ्याचा प्रसंग आला तर तोही आपल्याला देतां येईल, आणि जे क्लेश, कष्ट आपल्याला सहन करावे लागतील तेही आपण मोठ्या आनंदानें सहन करूं याबद्दल मला मुळींच संशय वाटत नाहीं. त्यामुळें ब्रिटिशांचें वर्चस्व झुगारून देऊन आपणांला स्वातंत्र्य मिळवितां येईल असेंच केवळ नाहीं तर तें स्वातंत्र्य सुद्धां आम्हाला चिरकाल टिकवितां येईल.

भगिनींनो, अखेरच्या संग्रामासाठीं अखेरची तयारी करण्याच्या तळमळीनें कार्यप्रवण होण्याचा समय आतां आला आहे. वेळ वायां दवडून आपल्याला चालणार नाहीं. हांक केव्हां ऐकूं येईल, आगे कूच केव्हां सुरू करावें लागेल हें आतां कांहींच सांगतां येत नाहीं. म्हणून आपण अशा तयारीनें राहिलें पाहिजे कीं, हांक केव्हांही ऐकूं येवो त्या क्षणीं आपल्याला आपलें आगे कूच सुरू करतां येईल. परवां मीं म्हटल्याप्रमाणें आतां एकच विचार आमच्या मनांत सुरू आहे, एकच गर्जना आमच्या ओठांतून बाहेर पडत आहे— “ **चलो दिल्ली, चलो दिल्ली.** ” ब्रिटिश साम्राज्याचें थडगें बनलेल्या या सिओनानमध्यें जी मोहीम सुरू होत आहे ती मोहीम ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हांकून लावून आमची राजधानी आम्हीं हस्तगत करून घेतल्यानंतरच संपविण्यांत येईल आणि त्यानंतर दिल्लीच्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यासमोर आम्ही आमची विजयदिनाची कवाईत करूं.

भगिनींनो, आमच्यांतली कांहीं सनातनी मंडळी एका काळीं असें म्हणत होती कीं, राष्ट्रीय चळवळ हें स्त्रियांचें काम नाहीं. फक्त पुरुषच तें करूं जाणत. आज असें म्हणणारे लोक आमच्यांत राहिलेले नाहींत. उलट माझी तर अशी खात्रीच झाली आहे कीं, जोंपर्यंत हिंदी महिला राष्ट्रकार्यांतला आपला वांटा उचलणार नाहींत तोंपर्यंत हिंदुस्थानला स्वतंत्र होण्याची आशाच करायला नको. आणि आमचें दास्यविमोचन त्वरित होईल अशी आज जी

मला एवढी आशा वाटत आहे त्याचें तरी कारण हेंच कीं, आमच्या आगामी लढ्यांत हिंदी महिला आपली कामगिरी चांगल्या प्रकारें बजावतील अशी मला तेवढीच आशा वाटत आहे.

आगामी लढ्यांत आपण आपली कामगिरी बजावाल असें मी म्हणत आहें खरा, पण त्याच वेळीं आमच्या भगिनी स्वदेशांत चाललेल्या लढ्यामध्यें जें कार्य करीत आहेत तेंही मी विसरूं शकत नाहीं. आज आमच्या शेंकडों, नव्हे हजारों भगिनी ब्रिटिशांच्या तुरुंगांत खितपत पडल्या आहेत आणि त्यांचे क्लेश, त्यांचा त्याग आमच्या देशांतील सर्व युवकांना प्रेरणा देत आहे हें मी कदापि विसरणें शक्य नाहीं. स्वदेशांतील आमची मित्रमंडळी, स्त्री-पुरुष, बालबालिका आपलें कार्य चालू ठेवतील यबद्दल मला संशय नाहीं. पण आमचें स्वातंत्र्य हस्तगत करण्याच्या कामीं हें कार्य पुरें पडेल असें आम्हांला वाटत नाहीं. त्यांनीं कितीही परिश्रम केले तरी हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना हांकून लावण्याच्या कामीं ते अपुरेच पडतील. म्हणून आपलेंही कर्तव्य आपण बजावलें पाहिजे; आणि तें कर्तव्य हें कीं, हिंदुस्थानच्या मदतीसाठीं आपण बाहेरून कुमक पाठविली पाहिजे.

पूर्व आशियामध्यें आम्हां हिंदी लोकांची संख्या उणीपुरी ३० लाख आहे. तेव्हां मनुष्यबळ, पैसा आणि इतर साधनसामुग्री एकवटून आम्हीं जर आमची सर्वस्व संघटना उभारली तर मला अशी खात्री वाटते कीं, हिंदुस्थानला आपल्याला जरूर ती मदत पाठवितां येईल आणि तिच्यायोगें ब्रिटिश जोखड झुगारून देण्याचें कार्य स्वदेशांतील आमच्या देशबांधवांना पार पाडतां येईल.

## स्वतंत्र ब्रह्मदेश

ब्रह्मदेशाच्या प्राप्तीनिमित्त वृत्त पत्रांसाठीं केलेलें निवेदन.

म.ग्रं.सं.ठाणे.

१०

१९२५ ते १९२७ या कालांत, मंडालेच्या तुरुंगांतील माझ्या कोठडी-समोर असलेल्या व्हरांड्यांत बसून ब्रह्मदेशाच्या शेवटच्या स्वतंत्र राजाच्या राजवाड्याकडे मी सारखा टक लावून पाहात असें. ब्रह्मदेश पुनः केव्हां स्वतंत्र होईल हे विचार त्या वेळीं माझ्या मनांत येत असत. आज ब्रह्मदेश हें एक स्वतंत्र राष्ट्र झालें आहे आणि या स्वतंत्र देशाच्या हवेंत मी श्वासोच्छ्वास करीत आहें.

जागतिक महायुद्धाच्या या धुमश्चक्रींत एका स्वतंत्र राष्ट्राचा आशियांत जन्म होत आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या राखेंतून आणि पळपुट्या ब्रिटिशांनीं मागें ठेवलेल्या धूम्राच्छादित ढिगाऱ्यांतून हें राष्ट्र उगम पावलें आहे.

१९४१ च्या नोव्हेंबरमध्यें ब्रह्मदेशाचे त्या वेळचे मुख्य प्रधान इंग्लंडमध्यें होते आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं आपल्याला थोडें स्वराज्य देऊन टाकावें म्हणून त्यांच्या विनवण्या त्या वेळीं चालू होत्या. पण त्यांच्या अर्जविनंत्या तुच्छ लेखण्यांत येऊन त्यांची हेटाळणी करण्यांत आली. त्यामुळें ब्रह्मी प्रजेनें ब्रिटिशांविरुद्ध हत्यार उपसलें; जपानच्या लष्कराबरोबर सहकार्य केलें आणि ब्रह्मदेशांतून ब्रिटिशांची लांडगेतोड करून त्यांना हांकून लावलें. ब्रह्मी प्रजा- जनांच्या कष्टाचें आणि त्यागाचें फळ आज त्यांना मिळालेलें आहे.

ब्रह्मदेशावर हल्ला चढवून त्याला गुलाम बनविण्यासाठीं हिंदुस्थानचा उप- योग ब्रिटिशांच्या लष्कराला १९ व्या शतकांत करून घेतां आला. हिंदु- स्थानच्या गुलामगिरीमुळेंच अशी उडी हिंदुस्थानांतून त्यांना मारतां आली. ब्रिटिशांना हांकून लावून आणि ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील सैन्यावर हिन्दी राष्ट्रीय सेनेला हल्ला करतां यावा म्हणून आपल्या स्वतंत्र भूमीचा उपयोग करूं देऊन ब्रह्मदेश आतां पूर्वीचें उट्टें काढीत आहे.

जपानचे सन्माननीय मुख्य प्रधान जनरल टोजो यांनीं दिलेलें अभिवचन आतां पुरें झालें आहे. युद्धसमाप्तीनंतर वसाहतीचें स्वराज्य आणि पाकिस्तान देऊं अशीं आश्वासनें सर स्टॅफर्ड क्रिप्स हे देत असतां—आणि दिल्लींत बसून ब्रह्मदेशाचा कारभार चालविण्याची भाषा सर डॉर्मन स्मिथ हे स्वतःच्या टाइपरायटरच्या जोरावर करीत असतां— आपल्या दोस्तांच्या मदतीनें, जपा- नच्या मदतीनें, ब्रिटिशांची हकालपट्टी करून आपलें स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं ब्रह्मदेश यशस्वी झाला आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें, आशियाच्या दृष्टीनें, सर्व जगाच्या दृष्टीनें ही घटना फार महत्त्वाची आहे.

हिंदुस्थानचा शेजारी स्वतंत्र झाला, ब्रह्मदेश स्वतंत्र झाला, ह्या वार्तेमुळें नव्या दिल्लींतील आमच्या राज्यकर्त्यांना फेंफऱ्याचे झटके येऊं लागले आहेत. ब्रह्मदेशाच्या उदाहरणामुळें आपल्या परक्या जुलूमशाहीविरुद्ध हत्यार उपसून उठावणी करण्याची प्रेरणा हिंदी जनतेला होईल या भीतीनें त्यांच्या काळ-

जाचा ठाव सुटला आहे आणि राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्यासाठीं अधिक निष्ठुर उपाय कोणते योजावेत हें शोधण्यांत ते गुंग झाले आहेत. तथापि यापुढें हिंदुस्थानला गुलामगिरींत डांबून ठेवणें जगांत कोणालाहि शक्य होणार नाहीं आणि रंगूनच्या गव्हर्न्मेंट हाऊसवर जसें आज मयूरांकित निशाण फडकूं लागलें आहे तसाच दिल्लीच्या लाल किल्ल्यावरही लौकरच तिरंगी झेंडा फडकणार आहे.

स्वतंत्र ब्रह्मदेश

( २ )

रेडिओवर केलेलें भाषण

११

देशबांधवांनो आणि मित्रांनो, आज ऑगस्ट १९४३ ची पहिली तारीख आहे. अत्यंत महत्त्वाची अशी एक ऐतिहासिक घटना आज घडून आली आहे. जागतिक महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत एक स्वतंत्र राष्ट्र जन्माला आलें आहे. आमचा शेजारी ब्रह्मदेश आज स्वतंत्र झाला असून त्याचें स्वतंत्र राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आलें आहे. ब्रह्मदेश चिरायु होवो !

आपल्याला हें माहीत आहे कीं, १९४१ च्या डिसेंबरांत पूर्व आशिया-मध्यें महायुद्धाची ठिणगी पडल्यानंतर, आपलें नष्टस्वातंत्र्य हस्तगत करून घेण्यासाठीं ह्या संधीचा फायदा करून घेण्याचें ब्रह्मी प्रजेनें ठरविलें. ब्रिटिश सरकारबरोबर सहकार्य करीत राहाण्याऐवजीं आपल्या देशांतून ब्रिटिशांना

ह्यांकून लावण्याच्या बाबतींत बहुसंख्य ब्रह्मी प्रजाजनांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, आणि त्याचें पर्यवसान असें झालें आहे कीं, केवळ ब्रिटिशांच्या पारतंत्र्यांतूनच ब्रह्मदेश मुक्त झाला आहे असें नाहीं, तर स्वातंत्र्यप्राप्तीचें त्याचें चिरवांछित उद्दिष्टही आज सफळ झालें आहे.

जगाच्या इतिहासांतील आजच्या आणीबाणीच्या परिस्थितींत ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य ही आमच्या दृष्टीनें दुहेरी महत्त्वाची अशी सूचक बाब आहे. इतिहासानें प्राप्त करून दिलेल्या संधीचा कसा उपयोग करून घ्यावा हें एकाद्या राष्ट्राला ओळखतां आलें तर त्याला कोणता लाभ होतो ह्याचा आविष्कार ह्या घटनेमुळें एकीकडे होत आहे, तर दुसरीकडे हिंदुस्थान जिंकून घेतल्याचा फायदा ब्रह्मदेशावर हल्ला चढविण्यासाठीं ब्रिटिशांना १९ व्या शतकांत चढाईचा तळ म्हणून कसा करून घेतां आला आणि ब्रह्मदेशाच्या दास्यविमोचनामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश फौजेवर हल्ला चढविण्यासाठीं पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्यसंघटनेला आज विसाव्या शतकांत ब्रह्मदेशाचा कसा उपयोग करून घेतां येईल ह्याचें दिग्दर्शन होत आहे.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं ब्रह्मदेशाचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत आलें. तथापि आमच्यापुढें आघाडी मारून ब्रह्मदेशानें आपलें स्वातंत्र्य मिळविलें आहे आणि आम्ही मात्र अजूनही क्रांतीचेच चटके सहन करीत बसलों आहोंत. ब्रह्मी जनतेनें संपादन केलेल्या सुयशाबद्दल माझ्या आणि हिंदी जनतेच्या वतीनें मी तिचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. आणि भविष्यकाळीं तिची उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगति व भरभराट होत जावो असें अंतःकरणपूर्वक इच्छितों. स्वतंत्र ब्रह्मी राष्ट्राचे, नव ब्रह्मदेशाचे प्रमुख हिज एक्सेलन्सी डॉ. बा मॉ यांनाही मी धन्यवाद देतों आणि स्वतःच्या शिरावर पडलेल्या अनेक जबाबदाऱ्या त्यांना यशस्वीपणें पार पाडतां याव्यात म्हणून त्यांना सुयश चिंतितों. जुलैच्या पहिल्या आठवड्यांत डॉ. बा मॉ यांची आणि माझी सिओनान इथें भेट झाली होती. त्यानंतर

एवढ्या अल्पावधींतच स्वतंत्र ब्रह्मदेशाचे प्रमुख म्हणून त्यांचें अभिनंदन करण्याचा मला योग यावा याबद्दल मला अत्यंत समाधान आणि धन्यता वाटत आहे.

मित्रहो, हिंदुस्थानांत आपली राजवट सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकारनें हिन्दी जनतेला जीं अनेक अभिवचनें दिलीं तीं आपल्याला माहीत आहेतच. हीं अभिवचनें म्हणजे निव्वळ कागदी चिठोरींच ठरत आलीं आहेत. चालू महायुद्ध सुरू होतांच ह्या अभिवचनांच्या सारख्या आवृत्त्या निघूं लागल्या आणि ब्रिटिशांच्या हातून हिन्दी लोकांच्या हातीं सत्तासंक्रमण होणें युद्धकालांत अशक्य आहे हें दाखविण्यासाठीं अनेक प्रकारच्या आचरट सबबीही पुढें करण्यांत आल्या, ह्यांचीही जाणीव आपल्यास असेलच. हें चित्र पहात असतांनाच जपानचे मुख्य प्रधान टोजो यांनीं आपल्या सरकारच्या आणि राष्ट्राच्या वतीनें ब्रह्मदेशाला दिलेलें स्वातंत्र्याचें अभिवचन युद्धकालांतच पुरें केलें आहे हें दुसरें चित्रहि आपल्याला पाहावयास सांपडत आहे. जिथें इच्छा आहे तिथें मार्गही सांपडतो. अर्थात् ब्रह्मदेशाच्या बाबतींत जपाननें दाखविलेली ही मुत्सद्देगिरी आणि उदार दृष्टिकोन जपानच्या राजकीय धोरणाचें सत्य स्वरूप जसें प्रकट करीत आहेत तसाच ब्रिटिश मुत्सद्यांचा ढोंगीपणाही ती उठावदारपणें चव्हाट्यावर मांडीत आहेत.

ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यामागोमाग फिलिफाइन्सचें स्वातंत्र्यही वाट चालूं लागेल अशी माझी खात्री आहे. आशियाच्या इतिहासांत आतां एक नवें युग सुरू होत आहे. आशियांतील सर्व दलित राष्ट्रांना उठाव करून दास्यमुक्त होण्याची ही एक अपूर्व संधि आज प्राप्त झालेली आहे. विशेषतः आजच्या या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन आपल्या चिरवांच्छित आकांक्षा सफल करून घेणें हें हिंदी जनतेचें पवित्र कर्तव्यच आहे.

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय आशियाचें दास्यविमोचन पूर्ण होणार नाहीं. म्हणून हिंदी जनतेनें उठाव करून स्वतःचें स्वातंत्र्य मिळविणें आणि

त्यायोगें आशियांतील इतर राष्ट्रांच्या दास्यविमोचनकार्याला हातभार लावणें क्रमप्राप्तच आहे. त्यापेक्षांही महत्त्वाची बाब ही कीं, जपाननें हिंदुस्थानपुढें आणि आशियांतील इतर दलित राष्ट्रांपुढें केलेला मित्रत्वाचा हात हिंदुस्थाननें आपल्या हातीं घेणें जरूर आहे. एका समान शत्रूशीं गांठ असल्यामुळें या शत्रूचा निःपात होईपर्यंत आणि हिंदुस्थानचें नष्ट स्वातंत्र्य त्याला पुनः प्राप्त होईपर्यंत हिंदी जनतेनें शूर जपानी राष्ट्राच्या खांद्याला खांदा भिडवूनच आपलें आगे कूच चालू ठेवलें पाहिजे.

इन्किलाब झिंदाबाद !

आझाद हिंद झिंदाबाद !

## स्वतंत्र ब्रह्मदेश

( ३ )

ता. १५ ऑगस्ट १९४३
रोजीं सिओनानमधील फॅरर
पार्कमध्यें केलेलें भाषण

१२

पूर्व आशियांतील सर्व ठिकाणचे हिंदवासीय आज प्रचंड संख्येनें एकत्र आले असून त्यांच्यासमोर दोन उद्देश आहेत. पहिला उद्देश हा कीं, ब्रह्मदेशाचा स्वातंत्र्य-दिन त्यांना आज साजरा करावयाचा आहे. त्याचप्रमाणें ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून चालतें व्हावें ह्या मागणीचाही त्यांना पुनरुच्चार करावयाचा आहे. हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होईपर्यंत आपला लढा चालू ठेवण्याचा आपला कृतनिश्चय ते पुनः एकदां जाहीर करीत आहेत.

ता. १ ऑगस्ट रोजीं ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची घोषणा होऊन, ब्रह्मदेशाचें स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वांत आलें. आणि स्वतंत्र ब्रह्मदेशाचें पहिलें मंत्रिमंडळही स्थापन करण्यांत आलें. या प्रसंगीं तिथें हजर रहाण्याचें भाग्य मला लाभलें

होतें हें आपल्याला माहीत असेलच. हा सर्व समारंभ अत्यंत गंभीर आणि परिणामकारक होता आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीजवळच एका नव्या आणि स्वतंत्र राष्ट्राचा जन्म होत असल्याचें दृश्य मला प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीं पाहातां आलें ही खरोखर परमेश्वराचीच कृपा असें मी समजतों. ब्रह्मदेशांतील ब्रिटिशांच्या सत्तेचें आणि अधिकाराचें अधिष्ठान म्हणून जें स्थळ समजण्यांत येत होतें त्याच ठिकाणीं ब्रह्मदेशाचें स्वतंत्र राष्ट्र स्थापन झालें, हें या प्रसंगीं दिसून आलेलें विलक्षण इतिहासविलसित होय.

तो ऐतिहासिक समारंभ मी अवलोकन करीत असतांनाच, नव्या दिल्लींतील व्हाइसरॉयज हाऊसवर आमचा राष्ट्रीय झेंडा चढविण्याचा होत असलेला समारंभ आणि ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून कायमचे हांकून लावण्यांत आल्यानंतर आझाद हिंद फौजेचा ( हिंदी राष्ट्रीय सेनेचा ) दिल्लीच्या पुराणप्रसिद्ध लाल किल्ल्यामध्यें विजयदिनानिमित्त व्हावयाचा कवाइतीचा समारंभ अशा दोन समारंभांचीं दृश्यें माझ्या मनश्चक्षूंसमोर ठळकपणें नाचूं लागलीं.

मित्रहो, ब्रह्मदेश कांहीं मला नवा नाहीं. ब्रिटिशांच्या ताब्यांत हा देश असतांना ब्रह्मदेशांतल्या तुरुंगात मीं अडीच वर्षें काढलीं आहेत हें आपल्या आठवणींत असेलच. पण या प्रसंगीं मीं ज्या ब्रह्मदेशाला भेट दिली तो ब्रह्मदेश नवब्रह्मदेश होता, स्वतंत्र ब्रह्मदेश हा होता. या स्वतंत्र ब्रह्मदेशांत जपानचा लष्करी कारभार पूर्णपणें नष्ट झालेला आहे. या नव्या राष्ट्राचे प्रमुख म्हणून डॉ. बा मॉ यांची योजना झालेली असून तेच त्याचे मुख्य प्रधान व सरसेनापति आहेत. स्वतःचें मंत्रिमंडळ त्यांनीं तयार केलें असून प्रिव्ही कौन्सिलच्या सल्लामसलतीनें ते कारभार चालविणार आहेत. ब्रह्मदेश पुनः जिंकून त्याला पुनः गुलाम करण्याचीं स्वप्नें ठेवणाऱ्या ब्रिटन व अमेरिकेबरोबर स्वतंत्र ब्रह्मदेशानें युद्ध पुकारलें आहे.

ब्रह्मदेशानें जपानबरोबर मैत्रीचा करार केला आहे. जपानचा वकील ब्रह्मदेशाच्या दरबारीं यापूर्वींच येऊन दाखला झाला आहे. इतर देशांचे वकीलही लौकरच रंगूनमध्यें येऊन दाखल होतील. इतर राष्ट्रांच्या दरबारीं ब्रह्मदेशाचे वकील नेमण्यांत आलेले आहेत. ब्रह्मदेशांतील अँग्लो–अमेरिकन शत्रूंची सर्व मालमत्ता नव्या ब्रह्मी राष्ट्राच्या हवालीं करण्याचें जपाननें ठरविलें आहे. निरनिराळे कारखाने, बंदरें, रेल्वे, टेलिग्राफ्स आणि टेलिफोन्स इत्यादींचा या मालमत्तेमध्यें समावेश झालेला आहे. अशा रीतीनें ब्रह्मी मंत्री ब्रह्मी जनतेच्या इच्छेनुसार देशाचा कारभार हांकणार आहेत. ब्रह्मदेशाची सेनाही संपूर्ण ब्रह्मी सैनिकांची असून त्यांतील अधिकारीही ब्रह्मीच आहेत. शेवटची पण तेवढीच महत्त्वाची गोष्ट ही कीं, आज ब्रह्मदेशाचें राष्ट्रीय निशाण–युनियन जॅक नव्हे तर–ब्रह्मदेशाचा मयूरध्वज, ब्रह्मी राष्ट्राचे प्रमुख असलेले अधिपति डॉ. बा मॉ यांच्या कचेरीवर आणि निवासस्थानावर फडकूं लागला आहे !

ब्रह्मदेशांतील कालपरवांच्या स्मृतींनीं माझें अंतःकरण आज भरून गेलें असून तिथें मीं काय पाहिलें आणि काय ऐकलें या सर्वांचें निवेदन जर मीं करूं लागलों तर त्यासाठीं कित्येक तासही पुरणार नाहींत. म्हणून थोड्याच गोष्टींचा परामर्ष घेऊन मी हा विषय आटोपता घेणार आहें. पहिली गोष्ट म्हणजे रंगूनचा तुरुंग. १९२७ मध्यें रंगूनमध्यें तुरुंगांत माझें बरेच महिने वास्तव्य झालेलें असल्यामुळें या तुरुंगाला पुनः एकदां भेट देण्याची माझी इच्छा होती. पण हिंदी कैद्यांसाठीं या तुरुंगाचा उपयोग आतां होणार नसल्यामुळें मला हा तुरुंग पाहूं देण्यांत आला नाहीं. फक्त ब्रिटिश युद्धकैद्यांसाठीं ह्या तुरुंगाचा आतां उपयोग होत आहे.

मित्रहो, हिंदुस्थानांतील सर्व तुरुंगांचें रूपांतर ब्रिटिश युद्धकैद्यांच्य छावण्यांमध्यें करून, आमच्या हजारों हिंदी देशभक्तांना बंदिवासांत डांबून ठेवल्याचा सूड आम्हांला ज्या दिवशीं उगवितां येईल त्या दिवशीं आठवण ठेवा. तो भाग्यशाली दिवस उगविण्यासाठीं आजपासूनच तयारीला लागा.

डॉ. बा मॉ आणि त्यांचे मंत्री यांच्याशीं दीर्घकाल वाटाघाटी करण्याचा मान मला मिळाला आणि आपणांस कळविण्यास मला आनंद वाटतो कीं, आम्हांला सर्वसामान्य असणाऱ्या सर्व प्रश्नांबाबत आमचें पूर्ण एकमतही झालें. ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान हे दोघेही आतां खांद्याला खांदा लावून आपल्या समान शत्रूवर चाल करून जाणार आहेत. ह्या शत्रूचा निःपात होऊन शांतता प्रस्थापित झाल्यानंतर आम्ही दोघेही शेजारधर्माला जागून पूर्ण एकोप्यानें आणि एकदिलानें राहूं.

मित्रहो, आमच्या हिंदी स्वातंत्र्यसंघटनेतर्फे अधिपति डॉ. बा मॉ व त्यांच्या नव्या मंत्रिमंडळांतील मंत्री आणि स्वतंत्र ब्रह्मदेशाचे प्रजानन या सर्वांचें, त्यांनीं संपादन करून घेतलेल्या स्वातंत्र्याबद्दल मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. हें स्वातंत्र्य चिरकाल टिको आणि ब्रह्मदेशाची भरभराट होवो अशीही सदिच्छा मी अंतःकरणपूर्वक व्यक्त करतों.

अलीकडेच टोकिओला भेट देऊन आलेल्या ब्रह्मी शिष्टमंडळाचे सभासद आज सुदैवानें येथें उपस्थित आहेत. हिज एक्सलन्सी यु बा स्विन हे या शिष्टमंडळाचे नेते आहेत. हिज एक्सलन्सी यु बा स्विन आणि त्यांच्या सहकाऱ्यांचें मी माझ्या आणि आपल्या सर्वांच्या वतीनें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों आणि रंगूनला जाऊन पोहोंचल्यानंतर आमची शुभेच्छा त्यांनीं ब्रह्मी प्रजाजनांना व्यक्तिशः नेऊन पोंचवावी अशी मी त्यांना विनंति करतों.

मित्रहो, ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यामुळें आमच्यावर नव्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. ब्रह्मदेशांतून ब्रिटिशांची हकालपट्टी झाल्यामुळें हिंदुस्थानकडे जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे आणि या मार्गावरूनच आम्हांला चाल करून पुढें जावयाचें आहे. हिंदुस्थानांतून ब्रिटिशांचें उच्चाटन होईपर्यंत ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची शाश्वति नाहीं. अर्थातच हिंदुस्थान स्वतंत्र होणें ही गोष्ट केवळ हिंदी प्रजाजनांच्याच दृष्टीनें नव्हे तर ब्रह्मदेशाच्या दृष्टीनेंही आवश्यक आहे.

हिंदुस्थानांतून ब्रिटिशांनीं चालतें व्हावें अशी मागणी केल्याच्या गुन्ह्यामुळें महात्मा गांधींना तुरुंगांत टाकण्यांत आलें. त्या गोष्टीला आतां एक वर्ष होऊन गेलें आहे. त्या वेळेपासून कायदेभंगाची चळवळ आणि घातपाताचीं कृत्यें यांना विलक्षण जोर चढला. पण आम्हांला स्वातंत्र्य मिळवितां आलेलें नाहीं आणि हिंदी ब्रह्मी सरहद्दीवर आम्हीं दुसरी आघाडी उघडून ब्रिटिश आणि हिंदुस्थानांतले त्यांचे दोस्त यांच्याविरुद्ध उठाव करून हत्यार उपसण्याची हांक हिंदी प्रजेला आणि ब्रिटिश हिंदी लष्कराला आम्हीं देईपर्यंत हें स्वातंत्र्य मिळविणेंही आम्हांला शक्य नाहीं.

हिंदी जनता ज्या दुसऱ्या आघाडीची मागणी करीत आहे ती मागणी पूर्व आशियांतल्या हिंदी लोकांनीं पुरी केली पाहिजे असा ईश्वरी संकल्प दिसतो. त्यासाठीं पूर्व आशियांतील आम्हां हिंदी जनांचें मनुष्यबळ आणि साधनसामुग्री यांची सर्वस्व संघटना झाली पाहिजे. आझाद हिंद फौजेसाठीं ( हिंदी राष्ट्रीय सेनेसाठीं ) झांशीच्या राणीचें पथक धरून मला तीन लक्ष स्त्रीपुरुष सैनिकांची जरुरी आहे. सिओनान आणि मलायामधील तरुण प्रचंड संख्येनें या सेनेंत दाखल झाले आहेत याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. पण सिओनानमधून जें द्रव्यसहाय्य होत आहे तें पुरेसें नाहीं. आमच्या राष्ट्रीय संग्रामासाठीं सिओनानमधून निदान ५ कोटी डॉलर्स तरी आम्हांला मिळाले पाहिजेत, आणि हा संकल्प पुरा करणें आपल्याला अवघड होईल असें मला वाटत नाहीं.

स्वतंत्र हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारची आमच्याकडून स्थापना होण्याचा दिवस आतां कांहीं फार दूर नाहीं. हें सरकार स्थापन झाल्यावर आमच्या या स्वतःच्या सरकारच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानवर आम्ही चाल करून जाऊं. हिंदी राष्ट्रीय सेनेची हालचाल आतां सुरू झाली आहे हें लष्करांतल्या आणि लष्कराबाहेरच्या माझ्या नागरिक बांधवांना मला आतां सांगितलें पाहिजे. सिओनानपासून दिल्ली ही मजल मोठी आहे. तेव्हां शक्य

तेवढ्या लवकरच आम्हांला कूच सुरू केलें पाहिजे. प्रत्यक्ष चढाईची ज्यांची तयारी आणि ताकद असेल त्यांनीं आतां आपलें सामानसुमान बांधण्याच्या तयारीला लागलें पाहिजे.

या पुढच्या दोन महिन्यांत आमच्या सैन्याचा बराच मोठा भाग हिंदु-स्थानच्या वाटेवर असेल आणि या सैन्याबरोबरच स्वातंत्र्यसंघाची मुख्य कचेरीसुद्धां हिंदुस्थानच्या अगदीं लगतच आपलें ठाणें देईल. हिंदी-ब्रह्मी सरहद्दीवर आमची मुख्य कचेरी हालविण्याचा दिवस केव्हां उगवेल त्याची मी वाट पाहात आहें.

आमच्या या मेळाव्यांत आज माझे एवढे मुस्लिम देशबांधव उपस्थित असल्याचें पाहून मला अत्यंत समाधान होत आहे. त्यांनीं माझें जें स्वागत केलें आणि हिंदी स्वातंत्र्यसंघटनेसाठीं जी वजनदार थैली अर्पण केली त्याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. या निमित्तानें सर्व जगाला आणि त्याचप्रमाणें आमच्या शत्रूंनाही हें कळून येऊं द्या कीं, धर्म, जाती, इत्यादि सर्व भेदाभेद विसरून पूर्व आशियांतील समस्त हिंदी जन आज एकजूट करून उभे राहिले आहेत आणि आपल्या एकाच मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा त्यांचा कृत निश्चय झालेला आहे.

## खास लष्करी संदेश

आझाद हिंद फौजेचें अधिपत्य स्वतःकडे घेण्याच्या प्रसंगीं हा संदेश प्रसिद्ध करण्यांत आला होता.

# १३

हिंदी स्वातंत्र्यसंघटना आणि आझाद हिंद फौज या उभयतांच्या हित-संरक्षणासाठीं आमच्या फौजेचें आधिपत्य मी आजपासून स्वतःकडे घेत आहें.

मला स्वतःला आनंद आणि अभिमान वाटावा अशीच ही गोष्ट आहे, कारण हिंदुस्थानला स्वतंत्र करूं पाहणाऱ्या सेनेचा सेनापति होणें यापेक्षां अधिक मोठा मान असूं शकेल असें निदान हिंदी कोणाही इसमाला तरी वाटणार नाहीं. तथापि जें कार्य मीं अंगिकारलें आहे तें केवढें मोठें आहे याची मला जाणीव आहे आणि त्या जबाबदारीच्या ओझ्यामुळेंच मला भारावून गेल्यासारखें वाटत आहे. परिस्थिति कशीही असो; ती कितीही बिकट अथवा तापदायक असो, त्या सर्व परिस्थितींत हिंदुस्थानच्या बाबतींत

असलेलें माझें कर्तव्य मला बजावतां यावें म्हणून आवश्यक तें सामर्थ्य मला दे अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

वेगवेगळया धर्मांचे अनुयायी असलेल्या अशा माझ्या ३८ कोटी देशबांधवांचा मी स्वतःला सेवक समजतों. या ३८ कोटी देशबांधवांचे हितसंबंध माझ्या हातीं सुरक्षित राहावे आणि प्रत्येक हिंदी प्रजाजनाला माझ्यावर पूर्ण विश्वास टाकून राहातां यावें अशाच रीतीनें माझें कर्तव्य पार पाडण्याचा निर्धार मीं केला आहे. निर्भेळ राष्ट्रवाद, आणि न्याय व निःपक्षपाताचें निरपवाद धोरण या पायावरच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसेनेची उभारणी होऊं शकते.

आगामी लढ्यांत आझाद हिंद फौजेला फार मोठी आणि महत्त्वाची कामगिरी पार पाडावयाची आहे. मातृभूमीला दास्यमुक्त करणें, ३८ कोटी हिंदवासीयांच्या सदिच्छेवर आधारलेलें स्वतंत्र हिंदुस्थानचें सरकार स्थापन करणें आणि हिंदुस्थानचें स्वातंत्र्य चिरकाल टिकेल अशी खात्री वाटूं देणारी एक सामर्थ्यवान् सेना कायम लष्कर म्हणून निर्माण करणें ही या फौजेची कामगिरी आहे. ही कामगिरी पार पाडतां येण्यासाठीं आम्हीं आमची सेना अशी घडविली पाहिजे कीं, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हें एकच ध्येय तिच्यापुढें राहील आणि या स्वातंत्र्यासाठीं मरूं किंवा मारूं ह्या एकाच निर्धारानें ती प्रेरित होईल. आमची सेना खडी असली कीं, अभेद्य अशी दगडी भिंतच आझाद हिंद फौजेच्या रूपानें समोर उभी आहे असें वाटलें पाहिजे. ही सेना चालून जाऊं लागली कीं जणूं लोखंडी रूळच चालून जात आहे असें दिसलें पाहिजे.

आमचें कार्य सोपें नाहीं; कणखरपणें आणि दीर्घ काळ आम्हाला लढत राहावें लागणार आहे. तथापि आमचा संकल्प, आमचें उद्दिष्ट न्याय्य आहे, अजिंक्य आहे, याबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. ३८ कोटी मानवांना, जगाच्या मानवसंख्येपैकीं एक पंचमांश लोकांना, स्वतंत्र असण्याचा अधि-

कारच आहे आणि त्या स्वातंत्र्याचें मोल देण्याची आज तयारी आहे. स्वातंत्र्याचा आमचा जन्मसिद्ध हक्क यापुढें आमच्यापासून हिरावून घेऊं शकेल अशी कोणतीही शक्ति जगांत नाहीं.

दोस्तहो, अधिकारी आणि सैनिकहो, आपल्या भरभक्कम पाठिंब्यामुळें आणि अविचलित निष्ठेमुळें आझाद हिंद फौज हें हिन्दी स्वातंत्र्यसंपादनाचें साधन ठरेल. अंतिम विजय निःसंशय आपला आहे अशी आज मी तुम्हाला ग्वाही देतों.

आमचें कार्य सुरू झालेलें आहे. 'चलो दिल्ली' ही गर्जना करीत आपण आपलें कार्य आणि लढा चालू ठेवूं या. नव्या दिल्लींतील व्हाइसरॉय हाऊसवर आमचें राष्ट्रीय निशाण फडकेपर्यंत आणि हिंदुस्थानच्या राजधानींतल्या पुराणप्रसिद्ध लाल किल्ल्यामध्यें आझाद हिंद फौजेची विजयदिनाची कवाईत होईपर्यंत आमचें हें कार्य चालू राहणार आहे.

मुख्य कचेरी, सिपाह–सालर
( सर सेनापतीचें मुख्य ठाणें )
आझाद हिंद फौज
( हिन्दी राष्ट्रीय सेना )
२५ ऑगस्ट १९४३

सुभाषचंद्र बोस
सिपाह–सालर
( सर सेनापति )

हिंदी राष्ट्रीय सेनेच्या अधि-
काऱ्यांस

# १४

अधिकारी बंधूनो, आपल्या सर्वांचा परस्पर परिचय होऊन चांगली जान-पछान व्हावी अशी माझी इच्छा आहे. आपलें उद्दिष्ट काय आहे, आमचें कर्तव्य कोणतें, आमच्यावरच्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत आणि त्या आम्हाला समाधानकारक रीतीनें कशा पार पाडतां येतील हेंही त्यामुळें आपल्याला कळून येईल असें मला वाटतें.

प्रथम मी माझ्या स्वतःबद्दल आपल्याला थोडी माहिती सांगणार आहें. आपल्याला यापुढें एकत्र काम करावें लागणार असल्यामुळें आणि एकाच मार्गावरून जाणें आपल्याला भाग असल्यामुळें माझें व्यक्तित्व आणि माझें वैयक्तिक जीवन आपल्याला परिचित असावें असें मला वाटतें.

विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रम संपतांच मी राजकारणाच्या जगांत प्रवेश केला. त्या वेळीं समोर असलेला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असा होता. गेल्या महायुद्धांत हिंदी लोकांनीं काय केलें, त्याचा परिणाम काय झाला आणि भविष्य काळीं उपयोगी पडण्याजोगे असे अनुभवाचे कोणते धडे आम्ही शिकलों ? हिंदुस्थानांत आणि इंग्लंडमध्यें आम्हाला हा अनुभव येऊन चुकला कीं, आमच्या पुढाऱ्यांचें धोरण सपशेल चुकलें. आमचे पुढारी चळवळ करूं लागतील हा भरंवसा आम्हांला होता हें खरें; पण आम्हां तरुण मंडळींची आणि विद्यार्थीजनांची पुरी निराशा झाली ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. त्या वेळीं आमच्या मनांत एकच विचार घोळत असे तो हा कीं, गेल्या महायुद्धांत आमच्या पुढाऱ्यांनीं जी चूक केली ती पुनः होऊं द्यावयाची नाहीं. भविष्यकाळीं जर संधि मिळाली तर अशा चुका आपण करीत बसणार नाहीं असें आम्हाला वाटत होतें.

दुसराही एक मोठा प्रश्न आमच्या समोर उभा होता. महायुद्धानंतर १९१८ ते १९१९ या काळांत युरोपमध्यें अनेक फेरफार घडून आले. महायुद्धापूर्वीं जीं सरकारें अस्तित्वांत नव्हतीं अशीं नवीं सरकारें निर्माण होऊं लागलीं होतीं. झेक लोक ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्यापासून विभक्त झाले. त्यांच्याच प्रमाणें वेगळ्या वंशाचे असलेल्या पोल्स लोकांनीं आपलें स्वतःचें सरकार स्थापन केलें. मी युरोपमध्यें गेलों असतां तिथें असलेल्या दोघांतिघां हिंदी पुढाऱ्यांशीं माझी मुलाखत झाली. त्या सर्वांनीं मला असेंच सांगितलें कीं, जर आपल्या मातृभूमीसाठीं आपल्याला कांहीं करावयाचें असेल तर महायुद्धाचा सर्व इतिहास प्रथम आपण अवलोकन केला पाहिजे आणि त्यापासून आपण काय शिकलों हें पाहून जो अनुभव आपल्याला मिळाला आहे, तो ब्रिटनविरुद्ध चालणाऱ्या लढ्यांत कारणीं लागला पाहिजे. परिस्थितीचें ज्ञान व आकलन नंतर आम्हाला होऊं लागलें. झेकांचे कांहीं पुढारी स्वदेश सोडून प्रचारकार्यासाठीं आणि ऑस्ट्रिया व हंगेरीच्या शत्रूंकडून

मदत मिळविण्यासाठीं परदेशीं गेले होते हें आम्हाला समजून आलें. ह्या पुढाऱ्यांनीं ब्रिटन व फ्रान्सबरोबर सख्य जोडलें आणि या दोन्ही देशांच्या सरकारांनीं त्यांना मदत करून युद्धसमाप्तीनंतर आपलें स्वतंत्र सरकार स्थापन करण्याचा त्यांचा हक्क आहे ह्या गोष्टीलाही मान्यता दिली. या कामीं लागेल ती सर्व प्रकारची मदत व सहकार्य देण्याचें आश्वासन ब्रिटन व फ्रान्स यांनीं त्यांना दिलें होतें. आपलें कार्य त्यांनीं जोरांत सुरू केलें. देशाबाहेर असलेल्या सर्व झेक लोकांची त्यांनीं लष्करभरती सुरू केली आणि २० हजार झेक जवानांच्या या राष्ट्रीय लष्करांत ऑस्ट्रो–हंगेरियन फौजेंतले जे झेक सैनिक शत्रूच्या हातीं सांपडले तेही पुढें सामील झाले. ब्रिटन आणि फ्रान्सच्या खांद्याला खांदा भिडवून ह्या सैन्यानें ऑस्ट्रिया, हंगेरी आणि जर्मनी यांच्याशीं लढाई दिली.

पोलिश लोकांनीं सुद्धां ३० हजार सैनिकांचें लष्कर उभारून युद्धांत भाग घेतला. त्यांच्या सुदैवानें जर्मनीचा आणि त्याच्या दोस्तांच्या युद्धांत पराभव झाला आणि त्यामुळें आपलें स्वतःचें सरकार त्यांना स्थापन करतां आलें.

हाच मार्ग स्वीकारून आम्हीं सुद्धां आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा फायदा कां घेऊं नये आणि आमचें संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं ब्रिटनच्या शत्रूंच्या खांद्याला खांदा भिडवून कां लढूं नये हें मला कळत नाहीं.

आयरिश जनतेनें सुद्धां गेल्या महायुद्धाचा फायदा पदरांत पाडून घेतला. सिनफेन पक्षाच्या नेतृत्वाखालीं आयरिश लोकांनीं ब्रिटिशांविरुद्ध उघडपणें बंड पुकारलें. डब्लिन शहरांत असलेली सिनफेन पक्षाची सेना फक्त ३ हजार सैनिकांचीच होती. देशांत इतरत्र मिळून आणखी १० हजार सैनिक या पक्षाजवळ होते. आंखीव योजनेंत कुठें तरी घोंटाळा झाल्यामुळें डब्लिनमध्यें ज्या बंडाची उठावणी झाली त्याचा फैलाव देशांत इतरत्र झाला नाहीं. तथापि आठ दिवस या सैनिकांनीं डब्लिन शहर आपल्या ताब्यांत ठेवलें होतें. ही क्रांति ईस्टरमध्यें झाली आणि म्हणून ईस्टरची क्रांति अशी संज्ञा तिला मिळा-

लेली आहे. १९१६ मध्यें जरी हें बंड यशस्वी होऊं शकलें नाहीं तरी पुनः १९१९ मध्यें म्हणजे युद्धसमाप्तीनंतर लगेच पुनः त्याचा भडका उडाला. बंडखोर सैनिक अवघे ५ हजार होते. या वेळची परिस्थितीही वेगळी होती. महायुद्ध संपलें होतें. बंड मोडून काढण्यासाठीं इंग्लंडमधून लष्कर आणणें शक्य होतें. पण असें असूनही ५ हजार सैनिकांच्या या सैन्यानें आपली लढाई चालू ठेवली आणि शेवटीं त्याच्यापुढें ब्रिटिशांना लोटांगण घालणें भाग पडलें.

गेल्या महायुद्धाच्या इतिहासाचे धडे नीट लक्षांत ठेवून १९२१ सालीं आम्ही हिंदुस्थानांत आमच्या कार्याला प्रारंभ केला. त्या वेळीं महात्मा गांधींनीं असहकाराची चळवळ सुरू केली होती हें आपल्याला माहीत असेलच. खिलाफत कमिटीसुद्धां कॉंग्रेसबरोबरच कार्य करूं लागली होती. असहकारितेच्या चळवळींत आम्हीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला; पण त्या वेळीं ही कल्पना मात्र निश्चितपणें आमच्या मनांत घोळत होती कीं, ज्या वेळीं संधि येईल त्या वेळीं ब्रिटिशांविरुद्ध आम्हांला शस्त्र उपसणें भाग आहे. पराभवाचा सूड घेण्यासाठीं पुढेंमागें जर्मनी फिरून उचल करील आणि त्याच वेळीं आम्हांलाही योग्य ती संधि मिळेल हें आम्हाला कळत होतें.

१९२१ मध्यें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं आम्ही कॉंग्रेसला जाऊन मिळालों. आमचा लढा चालू ठेवून, ब्रिटिशांच्या निर्घृण दडपशाहीला तोंड देत राष्ट्राची इज्जत कायम ठेवण्याचा त्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. हिंदु आणि मुस्लीम यांची एकजूट झाली होती; तथापि आम्हांला असें निश्चित वाटत होतें कीं, कायदेभंगासारख्या मोहिमांनीं हिंदुस्थान केव्हांही पूर्णपणें स्वतंत्र होऊं शकणार नाहीं. या चळवळीमुळें जनतेंत राजकीय जागृति झाली हें निर्विवाद आहे आणि त्यामुळेंच सशस्त्र संग्रामालाही सिद्ध होण्याची जनतेची तयारी झाली. १९२१ पासून सशस्त्र संग्रामाची संधि कधीं निर्माण होते याची आम्ही वाट पहात राहिलों होतों आणि युरोपमध्यें युद्ध सुरू होणें हीच ती संधि होती.

हा दृष्टिकोन माझा एकट्याचा वैयक्तिक दृष्टिकोन आहे असें नाहीं, तर १९२१ मध्यें महात्मा गांधींभोंवतीं जे तरुण गोळा झाले त्यांपैकीं पुष्कळांचा दृष्टिकोन असाच होता. या मंडळींत अहिंसेवर श्रद्धा असणारे कांहीं तरुण आहेत हें खरें; पण पुष्कळजण हिंसेचेच कडवे पुरस्कर्ते आहेत आणि टोला हाणण्याची योग्य वेळ कधीं येते याचीच ते वाट पहात आहेत.

१९३३ सालीं मी युरोपमध्यें गेलों आणि १९३६ सालपर्यंत तिथेंच वास्तव्य करून राहिलों. परिस्थिति कशी काय पालटत आहे आणि पुढें काय घडणार आहे याचा अभ्यास करण्यासाठींच मीं युरोपमध्यें वास्तव्य केलें. या कालांत मीं बर्लिनला भेट दिली आणि कांहीं सरकारी अधिकाऱ्यांशीं परिचय करून घेऊन फ्युरेर हिटलर यांनाही भेटलों. ब्रिटनवर तुम्ही केव्हां हल्ला चढविणार आहांत हें आम्हाला सांगा म्हणजे त्याच वेळीं आम्हांलाही ब्रिटिशांविरुद्ध हत्यार उपसण्याची तयारी ठेवतां येईल असें मीं त्यांना स्पष्टपणें सांगून टाकलें. ब्रिटनबरोबर लढाई करण्याचा प्रसंग कधीं निर्माण होईल असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं आणि आमच्या सर्व मागण्या ब्रिटन आमच्या पदरांत टाकील अशी आम्हांला आशा वाटते, असें त्यांनीं उत्तर दिलें. ब्रिटनबरोबर समेट करावा असें त्यांचें धोरण होतें; तथापि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल त्यांनीं आपली सहानुभूति व्यक्त केली. ब्रिटिशांच्या ढोंगीपणाचा आणि त्यांच्या कावेबाज धोरणाचा हिंदी लोकांना जो भरपूर अनुभव येऊन चुकला आहे तो निवेदन करून मीं त्यांना असा इशारा दिला कीं, "जर्मन राष्ट्राचें सामर्थ्य वाढत आहे ह्याची ब्रिटनला जाणीव होऊं लागली कीं, जर्मनीविरुद्ध तें उघडपणें दंड थोपटून उभें राहील. सरते शेवटीं मी त्यांना म्हणालों, ब्रिटन हा आमचा परंपरागत शत्रु आहे. तुम्ही आम्हांला मदत करा अथवा करूं नका पण आम्हांला ब्रिटनविरुद्ध लढणें क्रमप्राप्तच आहे." तथापि लौकरच युरोपमध्यें युद्धाला तोंड लागेल याबद्दल मला मुळींच संशय नव्हता. जर्मनीमध्यें सुरु झालेल्या तयारीवरून ही गोष्ट कोणाच्याही लक्षांत

येण्याजोगी होती. अलीकडे त्यानंतर मी जेव्हां पुनः युरोपमध्यें गेलों त्या वेळीं १९३६ सालीं मी काय म्हणालों होतों याची मीं त्यांना आठवण करून दिली.

भविष्यकाळीं काय घडणार आहे याची कल्पना करून घेऊनच मी युरोप-मधून परतलों हें आपणांस सांगण्यासाठीं मीं हा पाल्हाळ लावला. जर्मनी-मध्यें जो नवा पक्ष अधिकारारूढ झाला होता तो लढाईला उत्सुक होता. मला हें स्पष्टपणें समजून चुकलें होतें कीं, जर्मनीच्या मागण्या ब्रिटन कांहीं मान्य करणार नाहीं आणि जर्मन्स थोडेसे वरचढ होत आहेत हें ब्रिटिशांना दिसून आलें तर नाझींबरोबर लढाई केल्यावांचूनसुद्धां ते रहाणार नाहींत. १९३८ मध्यें मी युरोपमध्येंच गेलों असतां तिथें घडून आलेले फेरफार माझ्या दृष्टोत्पत्तीस आले. आपल्या मागण्या ब्रिटनकडून पूर्णांशानें मान्य केल्या जाणार नाहींत ही जाणीव जर्मनांना होऊं लागली होती. १९३८ च्या सप्टें-बरमध्यें सुडेटन जर्मनांचा प्रश्न जर्मनांनीं उपस्थित केल्यामुळें हेर हिटलर यांच्याबरोबर तडजोड घडवून आणण्यासाठीं मि. चेंबर्लेन म्युनिचला धांवत गेले. एक काळ असा होता कीं, आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या अशा कोणत्याही वाटा-घाटी असल्या तर त्या सामान्यतः लंडनमध्येंच व्हाव्यात असा संकेत असे. पण ब्रिटिशांचे मुख्य प्रधान मि. चेंबर्लेन हे स्वदेश सोडून जर्मनीकडे धांवत गेल्याचें आणि जर्मनांच्या मागण्या त्यांनीं मान्य केल्याचें दृश्य जेव्हां मला पहावयास सांपडलें तेव्हां त्यामागचें रहस्य काय याचा मला उलगडा झाला. ब्रिटनचें सामर्थ्य कमी होऊं लागलें होतें, जर्मनीचें बळ वाढूं लागलें होतें. दुसऱ्या राष्ट्राच्या मागण्या मान्य करण्यासाठीं इंग्लंडच्या मुख्य प्रधानानें नेहमींचा शिरस्ता सोडून परदेशीं प्रयाण करावें हा प्रसंग ब्रिटिशांच्या इति-हासांत पहिलाच होता.

त्यानंतर हिंदुस्थानांत मीं असा प्रचार सुरू केला कीं, युरोपमध्यें युद्ध सुरू होणें आतां अपरिहार्य आहे; तेव्हां आपल्याला सावध राहिलें पाहिजे. आमच्या मागण्या मान्य करण्याची ब्रिटिशांवर आम्हीं सक्ति केली पाहिजे

आणि जर त्यांनीं नकार दिला तर त्यांच्याविरुद्ध लढाई आपल्याला करण्यासाठीं तयार झालें पाहिजे. माझ्या या प्रचाराची प्रतिक्रिया जनतेवर कोणत्या प्रकारें होत आहे हें मी पाहूं लागलों आणि माझी अशी खात्री होऊन चुकली कीं, सर्वसामान्य जनतेचा मला पूर्णपणें पाठिंबा आहे. तथापि आमचे पुढारी, विशेषतः महात्मा गांधी वेगळाच विचार करूं लागले होते. जें कांहीं घडणार आहे तें स्वस्थ राहून पाहावयाचें हें महात्मा गांधींचें धोरण होतें. तथापि या धोरणामुळें आम्ही तरुण लोक नाउमेद झालों नाहीं. आमचा प्रचार आम्हीं अधिक जोमानें सुरू केला. नजीकच्या भविष्यकाळीं जी सुवर्णसंधि निर्माण होणार आहे तिचा फायदा करून घ्या असें आम्ही हिंदी जनतेला सांगत राहिलों.

त्रिपुरी येथें १९३९ च्या मार्चमध्यें भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनांत, सहा महिन्यांच्या आंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यांत यावें अशी मागणी करणारा आणि ती निर्वाणीची मागणी सरकारकडे पाठविण्यांत यावी अशी शिफारस करणारा एक ठराव मीं मांडला. ही मागणी त्या अवधींत मान्य झाली नाहीं तर आमची असेल नसेल ती शक्ति खर्च करून ब्रिटनविरुद्ध लढा देण्यासाठीं लोकांना तयार करावयाचें हा आमचा संकल्प होता. निर्वाणीची मागणी असेंच या ठरावाचें स्वरूप होतें. आणि क्षुब्ध झालेली आंतरराष्ट्रीय परिस्थिति लक्षांत घेऊन व सहा महिन्यांच्या आंतच युरोपमध्यें युद्धाचा भडका उडेल याची पूर्ण जाणीव ठेवूनच हा ठराव मांडण्यांत आला होता.

१९३९ च्या सप्टेंबरमध्यें जेव्हां युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागलें, तेव्हां मार्चमध्यें मीं केलेलें भाकित बरोबर होतें, हें जनतेला समजून आलें. सर्व राष्ट्रीय शक्ति संघटित करून, आमच्या मागण्या पदरांत टाकण्यासाठीं ब्रिटिश सरकारवर दडपण आणणें आणि त्यांत अपयश आलें तर त्यासाठीं लढा देणें त्यावेळीं आमचें कर्तव्य होतें. तथापि आमच्या पुढाऱ्यांचे विचार आणि आचार

वेगळेच होते. युद्धकालांत ब्रिटन क्षीण होईल आणि हिंदुस्थानची मदत मिळावी म्हणून काँग्रेसबरोबर सन्मान्य तडजोड करण्यास तें तयार होईल असा या पुढाऱ्यांचा समज होता. असा समज करून घेणें हा मूर्खपणा आहे हें त्यांच्या नजरेस आणून देण्याचे मीं प्रयत्न केले आणि त्यांना असें सांगितलें कीं, युद्धकालांत ब्रिटन जरी कितीही कमकुवत झालें तरी हिंदुस्थानांतली सत्ता सोडून देण्यास ब्रिटिश लोक कदापि तयार होणार नाहींत. ब्रिटिशांचा ज्या प्रमाणांत शक्तिक्षय होऊं लागेल त्या प्रमाणांत हिंदुस्थानवरची त्यांची पकड अधिकाधिक दृढ होत जाईल. हिंदुस्थान हातीं असल्याखेरीज युद्धाची परिसमाप्ति यशस्वीपणें करणें त्यांना शक्य होणार नाहीं. जसजसे ते कमताकद होत जातील तसतशी हिंदुस्थानच्या साधनसंपत्तीची ते मोठ्या प्रमाणांत लूट करूं लागतील.

१९४० च्या मार्च महिन्यांत काँग्रेसचें अधिवेशन सुरू होतांच आपल्याला आतां पुढें पाऊल टाकतां येईल अशी आमची अपेक्षा होती. पण गांधीजींनीं आपला कार्यभाग साधून घेतला. स्वस्थ राहून होईल तें पहावें हें त्यांचें धोरण होतें. आमच्या मनावरचा ताबा सुटत चालला. काय होईल तें होवो, स्वतःची चळवळ सुरू करावयाचीच असा आम्हीं संकल्प केला. सर्व देशभर एक युद्धविरोधी चळवळ सुरू करण्यांत आली. तिला गंभीर स्वरूप प्राप्त होऊं लागलें. बऱ्याच लोकांनीं तुरुंगवास पत्करला. मध्यंतरीं मला अशी बातमी लागली कीं, सरकार कांहींच करीत नाहीं हें दिसून येऊं लागल्यामुळें नोव्हेंबरमध्यें स्वतःच एक कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा बेत गांधीजींनीं केला आहे. गांधीजींनीं चळवळ सुरू केली तर तिचे पडसाद जगभर उठतील, या विचारानें मीं सुटकेचा श्वास टाकला. हिन्दी लोक स्वातंत्र्यासाठीं लढूं लागले आहेत हें सर्व जगाला कळून चुकेल. हिन्दी लोक स्वातंत्र्याला पात्र आहेत असें सर्व राष्ट्रांना वाटूं लागेल. आमची इज्जत राखण्याच्या बाबतींत जगाची सहानुभूति आम्हांला निःसंशय मिळेल.

तथापि फक्त कायदेभंगाच्या एकाच साधनानें आम्हाला स्वातंत्र्य प्राप्त

करून घेतां येणार नाहीं असें मला वाटूं लागलें. या चळवळीमुळें सरकारवर दडपण आणतां येईल आणि त्याच्या युद्धप्रयत्नांत व्यत्यय निर्माण करतां येईल हें खरें; पण आमच्या मागण्यांचा विचार करण्यास तेवढयानें कांहीं सरकार तयार होणार नाहीं ही माझी कल्पना होती. काय करावें, कोणती नवी शक्कल हुडकून काढावी याचा विचार आम्हीं चालविला होता. बॉंब आणि रिव्हॉल्व्हर्स या साधनांनीं तरुण मंडळींनीं आपलें अल्पस्वल्प कार्य चालू ठेवलें होतें. ह्या तरुण क्रांतिकारकांशीं आम्हीं संधान बांधलें. त्यांची शक्ति किती आहे याची मला कल्पना होती. ते खरेखुरे क्रांतिकारक होते आणि त्यांचा उत्साहही दांडगा होता. तथापि त्यांचें बळ आणि त्यांचा त्याग आमच्या मातृभूमीचें स्वातंत्र्य संपादन करण्यास पुरा पडणारा नव्हता.

त्याच वेळीं इतिहासाचीं पानें आम्ही चाळूं लागलों आणि त्यांत बरेच दाखले आणि धडे आम्हांला मिळाले. अमेरिकेचें उदाहरण आमच्या समोर होतें. मला ही गोष्ट उमगून येऊं लागली आणि मीं असा निष्कर्षही काढला कीं, बाहेरून मदत मिळाल्याखेरीज हिंदी क्रांति यशस्वी होणार नाहीं. अमेरिकेला फ्रान्सनें किती तरी मदत केली होती. स्वतःच्या देशाचें स्वातंत्र्य जिंकून घेण्यासाठीं दुसऱ्या राष्ट्रांची मदत मिळविणें ही गोष्ट जगाच्या इतिहासांत नवी नाहीं.

हिंदुस्थानांत येणाऱ्या बातम्या अर्धवट असत आणि त्यांत प्रचारच जास्त असे. ब्रिटननें हें धोरण स्वीकारावें हें नैसर्गिकच होतें. तथापि हिंदुस्थानांत राहून जगाच्या परिस्थितीचें सत्य स्वरूप समजून घेणें शक्य नव्हतें. युद्धाचा परिणाम काय होईल, त्याची समाप्ति कशी होईल, शेवटीं विजय कोणाचा होईल, बाहेर असलेल्या हिंदी लोकांचे विचार कोणते असतील, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या संग्रामाबद्दल त्यांना काय वाटत असेल, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संपादनासाठीं त्यांची मदत कशी मिळवितां येईल आणि ब्रिटनच्या शत्रूकडून प्रत्यक्ष मदत मिळणें शक्य होईल कीं नाहीं हे आणि अशाच प्रकारचे

विचार आमच्या मनांत घोळूं लागले. हिंदुस्थानबाहेर कोणाला तरी पाठविलें पाहिजे असें त्यामुळें आम्हांला वाटूं लागलें. परदेशीं कांहीं इसमांना पाठवून द्यावें असा विचार माझ्या मनांत आला. हें काम अत्यंत अवघड होतें आणि आमच्या हालचालींप्रमाणेंच अनेक निर्बंधांनीं तें जखडलें होतें. परदेशीं जाणारा इसम ब्रिटिशांना खरीखुरी 'ओळख पटलेला' आणि हिंदी लोकांना विश्वासास पात्र वाटणारा असाच असला पाहिजे असेंहि मीं ठरविलें होतें. शेवटीं आपण स्वतःच हिंदुस्थान सोडून बाहेर पडावें असा मीं संकल्प केला.

त्या वेळीं मी तुरुंगांत होतों. तुरुंगांतून बाहेर कसें पडावें हा प्रश्न अवघड होता. तुरुंगांतून मी निसटलों असतों तर ब्रिटिश सी. आय. डी. च्या हातावर तुरी देऊन देशाबाहेर पाऊल टाकणें मला जास्तच अवघड झालें असतें. शेवटीं अन्नसत्याग्रह करायचा असें मीं ठरविलें. दगडाचें अंतःकरण करूनच हा निर्णय मीं घेतला. कारण माझा असा निर्धार होता कीं, एक तर आपण मरून तरी जावें अथवा तुरुंगांतून बाहेर तरी पडावें. माझा हा निश्चय सरकारला समजल्यावर अधिकारी गोटांत एकच खळबळ उडाली. कारण तुरुंगांत मीं मरून जावें असें त्यांना वाटत नव्हतें. तुरुंगाचा सुपरिंटेंडेंट माझ्याकडे आला आणि अन्नसत्याग्रह करूं नका म्हणून तो गयावयां करूं लागला. तुरुंगांतल्या सर्व कैद्यांनीं अन्नत्याग सुरू केला तर बादशाहाचें सरकार बंद पडेल असा युक्तिवाद करून त्यानें मला असा इषारा दिला कीं, जर मी तुरुंगांत मरण पावलों तर त्याची जबाबदारी सर्वस्वीं माझ्यावरच राहील. माझा अन्नसत्याग्रह सहा दिवस चालू राहिला. मला सक्तीनें अन्न घालण्याचे प्रयत्न अधिकाऱ्यांनीं केले, पण जितेंद्रनाथ दास यांच्याप्रमाणेंच आपणही मरून जावयाचें हा माझा निर्धार होता. सात दिवसांनीं गव्हर्नमेंट हाऊसवर एक गुप्त बैठक भरविण्यांत आली. माझ्याबद्दल सादर केलेला डॉक्टरी रिपोर्ट चिंताजनक होता. त्यामुळें कांहीं तरी करणें त्यांना भागच होतें. शेवटीं मला मुक्त करण्यांत

आलें. त्याच्या मुळाशीं हेतु हा कीं, पुनः एका महिन्यानें मला अटक करण्यांत यावी. ही बातमी मला योग्य वेळीं मिळाली. मध्यंतरीं हिंदुस्थानांतून मला बाहेर पडतां यावें म्हणून आवश्यक ती व्यवस्था करण्यांत आली आणि देश-त्याग करून मी अखेर बाहेर पडलों.

स्वदेश सोडल्यानंतर मला नाना प्रकारचे अनुभव आले. दोन्ही रेडिओ मी ऐकूं लागलों. शत्रूचा रेडिओ व प्रचार ऐकण्याची सवलत मला जर्मन अधिकाऱ्यांनीं दिली. सर्व युरोपमध्यें करण्यांत आलेली तटबंदी आणि संरक्ष-णाच्या जागा प्रत्यक्ष पाहाण्याची मला संधि मिळाली. हा अनुभव प्रत्यक्ष घेतल्यामुळें या युद्धाचा शेवट कसा होईल याबद्दल मला मुळींच संशय राहिला नाहीं. परवां तुमच्या कवाइतीच्या वेळीं मीं म्हटल्याप्रमाणें हें युद्ध दीर्घ काल चालू राहील; पण त्याचें पर्यवसान माल ब्रिटन व त्याचें साम्राज्य कोसळून पडण्यांतच होईल हें निश्चित.

आतां आपल्यापुढील प्रश्न असा आहे कीं, या परिस्थितींत हिंदुस्थानचें काय होणार आहे ? ब्रिटिश साम्राज्याचा चक्काचूर होणार हें निर्विवाद आहे आणि जगाचा सर्व नकाशाही आतां बदलून जाणार आहे. या नव्या नका-शावर हिंदुस्थानचें स्थान कोणतें असेल ? हिंदुस्थानांतून ब्रिटिशांची हकाल-पट्टी होणार आहे. मग ब्रिटिश निघून गेल्यानंतर आमची परिस्थिति कोणती राहील ? आपण याचा विचार केला पाहिजे. या बाबतींत तीन पर्याय आपल्यापुढें आहेत.

युद्धाशीं संबंध न ठेवतां तटस्थ राहाणें हा एक पर्याय.

दुसरा पर्याय म्हणजे हिंदुस्थानवर स्वारी करणाऱ्या नव्या आक्रमक सत्ता-धाऱ्यांपाशीं जाऊन आम्हांला स्वातंत्र्य द्या अशी याचना करणें.

आणि तिसरा पर्याय ब्रिटनच्या शत्रूबरोबर युद्धांत भाग घेऊन स्वातंत्र्या-साठीं स्वतःला पात्र करून घेणें हा.

कोणता पर्याय आपण मान्य कराल हें मला माहीत आहे. ब्रिटनच्या शत्रूबरोबर खांद्याला खांदा लावून लढणें आणि ब्रिटिश साम्राज्य नष्ट करण्याच्या कार्यातला आपला वांटा उचलणें हा एकच मार्ग आपल्याला पटण्याजोगा आहे.

हिंदुस्थानांतील अंतस्थ परिस्थिति अत्यंत गंभीर आहे. ब्रिटनविरुद्ध झगडत राहण्याचें कार्य हिंदुस्थानांत ज्या शक्तींनीं आपल्या मगदुराप्रमाणें चालू ठेवलें आहे त्यांना उत्तेजन व पाठिंबा देणें हें आपलें कर्तव्य आहे. हिंदुस्थानांतली अंतस्थ परिस्थिति आज काय.आहे ? सर्व जनता ब्रिटिश सरकारविरुद्ध उठलेली आहे.

हातीं शस्त्र नसतांही जनतेनें आपला लढा सुरू ठेवला आहे. सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशी हजारांची लहानशी सेना लाखों निःशस्त्र लोकांना दडपून टाकण्यास पुरेशी आहे. हेर हिटलर यांच्याशीं भेट होण्याचा योग आला असतां मीं हिंदुस्थानचा प्रश्न त्यांच्यापुढें ठेवला आणि आम्हीं कोणता मार्ग चोखाळावा याबाबत त्यांना सल्ला विचारला. स्वतः क्रांतिकार्यांचा अनुभव घेतलेले जर्मनीचे हे चॅन्सेलर स्वतःचा अभिप्राय व्यक्त करतांना असें म्हणाले कीं, निःशस्त्र क्रांतिकारक जरी लाखों असले तरी कांहीं हजारांची सुसज्ज सेना त्यांच्यावर नियंत्रण ठेवूं शकेल हें निर्विवाद आहे. ते पुढें असेंही म्हणाले कीं, जोंपर्यंत बाहेरचें दुसरें राष्ट्र सरहद्दीवर येऊन ठोठावूं लागलें नाहीं, तोंपर्यंत अंतस्थ परिस्थितीमध्यें कोणताही फरक घडून येईल अशी अपेक्षाच करतां येणार नाहीं. बाहेरच्या या राष्ट्रांच्या भूमिकेंत आपल्याला आतां सामील झालें पाहिजे. अलीकडे दुसऱ्या आघाडीच्या बऱ्याचशा बातम्या आपल्याला ऐकूं येऊं लागल्या आहेत. पण ही दुसरी आघाडी आपल्याला हिंदुस्थानांत उघडावयाची आहे. गट्टी राष्ट्रांनीं जर आमच्या शत्रूंना लुळें-पांगळें बनवून टाकलें नसतें तर दोन्ही आघाड्यांवर त्यांना आमच्याशीं मुकाबला करतां आला असता. गट्टी राष्ट्रांनीं आमचें काम सोपें केलें आहे त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों. पण आमच्या मातृभूमीसाठीं आमचें

कर्तव्य आपण बजावलें पाहिजे हें सुद्धां तेवढेंच खरें आहे. या कार्यासाठीं ५० हजार सैनिकांची सेना पुरेशी आहे. तथापि ३ लक्ष सैनिकांची सेना उभारण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे.

यापुढील प्रश्न हा कीं, ह्या सैन्याचीं कर्तव्यें कोणतीं ? ह्या सैन्याला दोन प्रकारचीं कर्तव्यें पार पाडावयाचीं आहेत. पहिलें आणि महत्त्वाचें कर्तव्य अर्थातच शत्रूशीं लढाई देऊन आमची मातृभूमि स्वतंत्र करणें हें आहे. पण दुसरें कर्तव्यहि कांहीं कमी महत्त्वाचें नाहीं. शत्रूचा पराभव झाल्यानंतर हिंदुस्थानांत आपल्याला केवढें तरी कार्य करावयाचें आहे. हिंदुस्थान स्वतंत्र केल्यानें आमचें कार्य समाप्त होत नाहीं. आमची–सेना क्रांतिकारक सेना–आहे आणि क्रांतिकारक या नात्यानें आम्हांला दोन कार्यें पार पाडावयाचीं आहेत. पहिलें कार्य मीं आतां म्हटल्याप्रमाणें शत्रूला हिंदुस्थानांतून हांकून लावणें हें आहे आणि दुसरें कार्य हिंदुस्थानासाठीं एक बलाढ्य सेना उभारणें हें आहे. हिंदुस्थानची ही सेना एवढी सामर्थ्यवान् पाहिजे कीं, कोणत्याही एका अथवा एकत्रित होऊन आलेल्या अनेक राष्ट्रांना तोंड देण्याचें आणि परकी आक्रमणापासून हिंदुस्थानचें कायमचें रक्षण करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं असलें पाहिजे.

मित्रहो, आपणां सर्वांची ही भावना असली पाहिजे कीं, आम्ही गुलाम म्हणून कदापि राहाणार नाहीं. या गुलामगिरीची चांगलीच चव आपण चाखली आहे. कोणत्याही परक्या आक्रमक राष्ट्रापासून आपल्या मातृभूमीचें संरक्षण करतां येण्यासाठीं जगांतील जास्तींत जास्त सामर्थ्यवान् अशी सेना तयार करणें तुम्हां सर्वांचें कर्तव्य आहे. कर्तृत्व आणि कार्यक्षमता यांचाच विचार केला, तर मी तुम्हाला असें सांगतों कीं, तुमची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं. योग्य शिक्षण आणि संधि आपल्याला मिळत नसे. पण ज्या ज्या वेळीं असें शिक्षण व संधि हिंदी लोकांना मिळाली त्या त्या वेळीं त्यांनीं आपलें तेज प्रकट केलें आहे. लष्करी क्षेत्रांतच नव्हे, तर राजकारण,

अर्थकारण, शास्त्र, खेळ इत्यादि कोणत्याही क्षेत्रांत आम्ही हिंदी लोक मुळींच मागासलेले नाहीं. हिंदी लोक कार्यक्षम आहेत, कर्तबगार आहेत. परमेश्वरानेंच तसें वरदान त्यांना दिलें आहे.

जगापासून आपल्याला बरेंच शिकायचें आहे हें खरें; पण त्याला आपली नेहमींच तयारी आहे. अशा प्रकारचें शिक्षण, त्याच्या.जोडीला आपली नैसर्गिक कार्यक्षमता व कर्तृत्व आणि पूर्ण आत्मविश्वास या गुणत्रयीच्या जोरावर आमची ही सेना तयार होत आहे.

केवळ लष्करी शिक्षणावरच कोणत्याही सेनेचें यश अवलंबून नसतें. फ्रान्सचेंच उदाहरण घ्या. १९३९ पर्यंत फ्रान्सची सेना ही जगांतली सर्वोत्कृष्ट सेना असें समजण्यांत येत असे. वस्तुस्थिति खरोखर तशीच होती. भरपूर साधनसामुग्री, विमानें, तोफा, इत्यादींनीं ही सेना परिपूर्ण होती. त्याच्या जोडीला या सेनेचें रक्षण करणारी मॅजिनो लाइन ही ' अभेद्य ' तटबंदीही होती. मग अगदीं अल्पावधींत फ्रान्स कां पडलें ? त्याचें कारण हेंच कीं, या सेनेंत जोर नव्हता. गेल्या महायुद्धानंतर फ्रान्समध्यें अशी एक भावना निर्माण झाली कीं शत्रूचा आतां कायमचा निःपात झाल्यामुळें 'सुखं च मे शयनं च मे ' अशा रीतीनें राहायला कांहीं प्रत्यवाय नाहीं. पण अशी परिस्थिति जर्मनींत नव्हती. ' सूड सूड ' ही गर्जना तिथें ऐकूं येत होती. सूड घेतला पाहिजे, आत्मत्यागाची तयारी ठेवली पाहिजे ही एक राष्ट्राची भावना होती. फ्रेंच लोकांचा असा जबरदस्त पराभव होण्याचें कारण हेंच होतें. फ्रेंच जनतेचें तेज लुप्त झालें होतें आणि जर्मन लोक तेजानें तळपूं लागले होते.

आझाद हिंद फौजेच्या कवाइतीनंतर मुख्य प्रधान टोजो यांच्याशीं माझें थोडें बोलणें झालें. कवाईत मोठ्या थाटानें पार पडल्याबद्दल त्यांनीं माझें अभिनंदन केलें. त्या वेळीं ते मला असें म्हणाले कीं, कोणतीही सेना यशस्वी होण्यास त्या सेनेंतल्या त्या सैनिकांना मुख्यतः मानसिक शिक्षण मिळणें जरूर आहे. मनाची तयारी ही बाब महत्त्वाची आहे. या बाबीकडे अगदीं कटा-

क्षानें लक्ष देण्यांत येईल असें मी त्यांना आश्वासन दिलें. ह्या 'तेजस्वीपणा'ला जपानी लोक फार महत्त्व देतात. अट्टु बोट लढविणाऱ्या सैनिकांचा तेजस्वी बाणा उदाहरणार्थ आपण लक्षांत घ्या. संख्येनें प्रचंड असणाऱ्या सैन्याविरुद्ध आपला निभाव लागणार नाहीं हें या सैनिकांना माहीत होतें. त्यांना केव्हांही शरण जातां आलें असतें. पण ही शरणागति त्यांनीं पत्करली नाहीं. मातृ-भूमीची इज्जत आणि लौकिक यांना त्यामुळें काळिमा लागला असता. अर्थात् २ हजार सैनिकांची सबंध तुकडी शत्रूबरोबर लढत राहिली आणि आपल्या प्राणांची त्यांनीं आहुति दिली.

स्टालिनग्राडचा बचाव करणाऱ्या शूर सैनिकांचाही मला इथें उल्लेख केला पाहिजे. शत्रूनें एका वेळीं तर त्यांना अगदीं पूर्णपणें घेरून टाकलें होतें, आणि शरण येण्याचा निर्वाणीचा संदेशही जर्मनांनीं त्यांना पाठविला होता. पण ते शरण गेले नाहींत. शत्रु-सैनिकांची संख्या २ लक्ष होती आणि त्यांनीं चारी बाजूंनीं वेढा दिला होता; असें असूनही त्यांनीं लढाई चालूच ठेवली. स्टालिनग्राड लढविणाऱ्या शूर सैनिकांनीं असें तेज प्रकट केलें.

आमच्या सैनिकांमध्येंही असें तेज आपण निर्माण केलें पाहिजे. अधि-काऱ्यांवरची जबाबदारी मोठी आहे. रणांगण सोडून एखाद्या शिपायाला निघून जातां येईल, पण अधिकाऱ्याना तसें करतां येणार नाहीं. अधिकारी हा जबाबदार इसम असतो आणि अशा जबाबदार अधिकाऱ्याच्या नेतृत्वा-खालीं जें सैन्य लढतें त्यालाच अखेर यश मिळतें. अर्थात् तुमचें कार्य प्रचंड आहे. तुम्हीं जें कार्य अंगीकारलें आहे त्याच्यापेक्षां अधिक मोठें, अधिक उदात्त असें दुसरें कोणतेंहि कार्य नाहीं. हिंदुस्थानांतल्या आपल्या बंधुभगिनी आपल्यापेक्षांही मोठ्या संकटांना हंसतमुखानें आणि उत्साहानें तोंड देत राहिल्या आहेत. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आणि हिंदुस्थानचें कल्याण यांच्या-साठीं जें कार्य तुम्हीं अंगावर घेतलें आहे त्यापेक्षां मोठें कार्य दुसरें कोणतें नाहीं.

मी युरोपमध्यें असतांना एक चिमुकली राष्ट्रीय सेना उभारण्याचा प्रयत्न केला होता आणि तो यशस्वी झाला होता. ह्या सेनेचे फोटो मी आपल्या-बरोबर आणले आहेत. तुम्ही इथें ज्या विचारानें प्रेरित झाला आहांत, आणि जें कार्य करीत आहांत तेंच कार्य, तोच विचार बर्लिन आणि रोममध्यें असलेल्या हिन्दी लोकांनीं चालू केला आहे. जगांत जिथें जिथें हिन्दी लोक आहेत तिथें तिथें हिंदी जनतेंत एक नवें तेज, एक नव जागृति निर्माण झाली आहे.

एक जलासुर

ता. ५ सप्टेंबर १९४६ रोजीं
कुवालालंपूर येथें केलेलें
भाषण.

# १५

मित्रहो, आज आपण मला एक थैली अर्पण केली आहे आणि मीं त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार मानतों. आपण दिलेली थैली भक्कम आहे पण ही थैली जर आपल्या देणगीचा पहिला हप्ता असेल तरच मी तिला भक्कम हें विशेषण लावीन. इतर शहरांतून अल्पावधींत जी रक्कम मिळूं लागली आहे, इपोहमधून पहिला हप्ता म्हणून जी थैली मिळाली आहे, ती पाहिल्यावर आपली रक्कम निदान आज दिली त्याच्या पांच पट तरी पाहिजे अशी तळमळ कुआलालंपूरमधल्या हिंदी लोकांना लागल्यावांचून राहाणार नाहीं याची मला खात्री आहे. आणि जर ही गोष्ट आपल्याला शक्य होत नसेल तर मला असें म्हणावें लागेल कीं, आपल्या मातृभूमीच्या सेवेंत आपण

मोठीच कसूर करीत आहांत. तुमच्या शहराचा तुम्हाला मोठा अभिमान वाटतो. हा अभिमान अस्थानीं नाहीं. जगाच्या या भागांत तुमचें शहर दुसऱ्या अनुक्रमाचें शहर आहे. पण जर हा मान तुम्हाला मिरवायचा असेल तर हा मान आणि अभिमान यांच्याशीं संलग्न असलेली जबाबदारीही तुम्ही पार पाडणें जरूर आहे.

मला आपल्याला आतां हें सांगितलें पाहिजे कीं, आमच्या एकंदर गरजांपैकीं द्रव्याच्या रूपानें मिळणारी मदत हा एक भाग आहे. आमच्या मातृभूमीच्या कार्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याचा समय आज आला आहे. कमींत कमी त्याग करण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. स्त्री असो, पुरुष असो, आपल्याला जास्तींत जास्त त्याग किती करतां येईल याचा त्यांपैकीं प्रत्येकानें विचार करण्याची ही वेळ आहे, आणि हा त्यागसुद्धां स्वतःच्या जीविताचा, स्वतःच्या वित्ताचा आणि स्वतःजवळच्या इतर साधनसामुग्रीचा असला पाहिजे. आधुनिक अशी एक सुसज्ज सेना तयार होऊन तिचें आगेकूच सुरू होण्यास जीं साधनें अवश्य आहेत त्यांसाठीं हा त्याग आहे. त्या दृष्टीनें आपण विचार करूं. कुआलालंपूरचे आणि सेलांगार संस्थानांतले आपण नागरिक, आपलें कर्तव्य सर्व प्रकारें बजावण्यास उत्सुक आहांत हें पाहून मला आनंद होतो. मला फक्त आपल्याला एवढीच विनंति करावयाची आहे कीं, शक्य तेवढ्या लौकर आतां पैसा गोळा करण्याची त्वरा करा. कारण त्यामुळें आमची सेना आम्हांला लौकर सुसज्ज बनवितां येईल; इतरांची कल्पना आहे त्यापेक्षांही हें काम जलद करून घेतां येईल आणि रणांगणावर जाण्यास ही सेना लौकर तयार होईल.

माझ्या स्वतःच्या अनुभवावरून माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, जोंपर्यंत हिंदी लोक निःशस्त्र राहातील, जोंपर्यंत ब्रिटिश सरकारच्या हुकमतीखालीं वावरणारी अद्यावत् सेना हिंदुस्थानांत असेल आणि जोंपर्यंत आमच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही हत्यार उपसून पुढें सरसावणार नाहीं तोंपर्यंत

हिंदुस्थान आपल्याला स्वतंत्र करतां येणार नाहीं. मानवी इतिहासांत मला असें एकही उदाहरण माहीत नाहीं कीं जिथें शस्त्रसंग्राम केल्याखेरीज एकाद्या राष्ट्राला आपलें संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करतां आलें आहे. तथापि इतिहासाचा. विचार केला नाहीं तरी गेल्या कैक तपांच्या आमच्या स्वतःच्या अनुभवांवरून सुद्धां आम्हांला ही गोष्ट पटलेली आहे कीं, जर आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्य पाहिजे असेल, कसलेंही पानचट स्वातंत्र्य नको असेल, तर आमच्या राष्ट्रीय लढ्यांतल्या अखेरच्या अवस्थेंत आपल्याला शस्त्रच उपसणें भाग आहे. सर्व जगांत शांतता नांदत असतां, शस्त्रें मिळविणें आणि शस्त्रांनीं लढाई देणें हिंदवासीयांना जवळजवळ अशक्यच होतें. हिंदुस्थानांतल्या जनतेला ही गोष्ट शक्य नव्हती. हिंदुस्थानाबाहेर असलेल्या हिंदी लोकांनाही तें शक्य नव्हतें. पण या महायुद्धानें मोठे उपकार केले आहेत. चारपांच वर्षांपूर्वी जी गोष्ट अशक्य होती ती आज शक्य झाली आहे. तुम्हाला जर शस्त्रें पाहिजे आहेत तर तीं हिंदुस्थानांत नाहींत; तरी हिंदुस्थानबाहेर आतां तुम्हांला तीं मिळूं शकतात. आधुनिक पद्धतीची, आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशी सेना तुम्हाला तयार करावयाची असेल तर ती गोष्ट आज तुम्हाला शक्य होत आहे. पांच वर्षांपूर्वी इच्छा असती तरी ही गोष्ट शक्य झाली नसती. म्हणूनच मी असें म्हणतों कीं, हें महायुद्ध ही देवदयेनें आम्हाला मिळालेली संधि आहे. वसाहतीचें स्वराज्य नव्हे, साम्राज्यांतर्गत स्वराज्य नव्हे, तर अगदीं बावन कशी असें पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणारी ही अपूर्व संधि आम्हाला लाभलेली आहे.

तेव्हां हिन्दी जन या नात्यानें मला तुम्हांला एकच प्रश्न विचारावयाचा आहे, कीं पूर्ण स्वातंत्र्य तुम्हाला खरोखर पाहिजे आहे कीं नाहीं ? हें स्वातंत्र्य पाहिजे असेल तर त्याचें मोल तुम्हीं दिलें पाहिजे. आधुनिक अशी सुसज्ज सेना तुम्हाला तयार केली पाहिजे आणि तिच्याबरोबर कूच करीत तुम्हाला हिंदुस्थानांत आलें पाहिजे.

आज ब्रिटिशांपुढें एकच आघाडी आहे. ही आघाडी हिंदुस्थानांत आहे. तिला वाटल्यास तुम्ही हिन्दी राष्ट्रीय आघाडी असें नांव द्या. आपल्या सैन्याच्या जोरावर ह्या राष्ट्रीय आघाडीला तोंड देणें ब्रिटिशांना सोपें जात आहे. पण दुसरी आघाडी —लुटुपुटूची नव्हे तर खरीखुरी दुसरी आघाडी—उघडणें जर तुम्हाला शक्य झालें तर हिंदुस्थानांत ब्रिटिशांना टिकाव धरून राहणें अशक्य होईल. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जेव्हां हिंदी राष्ट्रीय सेना उभी राहील तेव्हां माझी अशी खात्री आहे कीं, या सेनेच्या नुसत्या आगमना-मुळेंच क्रांतीच्या झेंड्याखालीं जाऊन उभें राहाण्याची नौबद हिंदी लोकांना आणि हिंदुस्थानांतील हिंदी सैनिकांना ऐकूं येईल ! हें माझें शेख महंमदी मनोराज्य नाहीं. पूर्व आशियांतील आमच्या कार्याची हिंदुस्थानांतल्या आमच्या लोकांना आणि ब्रिटिशांनासुद्धां पूर्ण जाणीव आहे हें मला माहीत आहे. पण त्याची फिकीर आम्ही करीत नाहीं. आम्ही काय काय करीत होतों, आतां कार्य करीत आहों आणि भविष्यकाळीं काय करणार आहोंत हें साऱ्या जगाला उघडपणें जाहीर करण्याची वेळ आतां आली आहे. यूनियन जॅकखालीं आज उभे असलेले हिंदी सैन्यांतले आमचे बांधव हिंदी राष्ट्रीय सेनेचें पाऊल हिंदुस्थानांत कधीं पडतें याची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात आहेत. घरची परिस्थिति ही अशी आहे; तींत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. तेव्हां हातीं घेतलेलें कार्य त्वरेनें पुरें करून आमच्या राष्ट्रीय सेनेला हिंदुस्थानच्या मदती-साठीं शक्य तेवढ्या लौकर पाठवून देणें हें आतां आमचें कर्तव्य आहे.

हिंदी राष्ट्रीय सेनेचें अस्तित्व आणि दिल्लीवर चाल करून जाण्याचा तिचा संकल्प जगाला जाहीर होऊन चुकल्यावर त्याच क्षणापासून ब्रिटिशांच्या प्रचा-राचें तंत्र एकदम बदलून गेलें, हें कळून तुम्हाला आश्चर्य वाटेल. कालपरवां-पर्यंत ब्रिटिशांचे प्रचारक असें म्हणत असत कीं, जपान हा हिंदुस्थानचा शत्रु आहे आणि हिंदुस्थानवर चाल करून जाण्याचा जपानचा बेत आहे. पण हिन्दी राष्ट्रीय सेना निर्माण होऊन हिंदुस्थानवर स्वारी करण्याच्या तयारीला

ती लागली आहे हें कळून येतांच ब्रिटिश प्रचारकांच्या या जुन्या धोरणांत आणि त्यांच्या जुन्या तंत्रांत एकदम फरक घडून आला आणि या हिंदी राष्ट्रीय सेनेविरुद्ध हिन्दी लोकांनीं उभें राहावें म्हणून आतां ते त्यांना चिथावण्या देऊं लागले आहेत. आमची सेना हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येऊन उभी राहिली म्हणजे हिन्दी जनता आणि लष्करांतील हिन्दी सैनिक कोणतें धोरण स्वीकारतील हें आमच्याप्रमाणेंच ब्रिटिश सरकारलाही माहीत आहे. म्हणूनच हिंदी जनतेला चुचकारून तिला आपल्या बाजूला वळविण्याची तळमळ त्यांना लागलेली आहे. तसें करतां आलें कीं हिन्दी राष्ट्रीय सेनेला तोंड देणें त्यांना सोपें जाईल.

पण बाहेरून चालून येणाऱ्या आपल्या देशबांधवांबरोबर लढा देण्यासाठीं तयार राहा, अशी विनंति हिंदूंच्या एका उत्सवप्रसंगीं ब्रिटिश प्रचारकांनीं हिंदुस्थानच्या हिंदूंना उद्देशून केली. हें समजून मला आश्चर्याचा मोठाच धक्का बसला. सर्व कांहीं आबादी आबाद असून जुने दिवस आतां फिरून आले आहेत असें सांगण्यापर्यंत देखील या ब्रिटिश प्रचाराची मजल गेली आहे.

मित्रहो, अँग्लो-अमेरिकनांना आतां एक नवा नेपोलियन सांपडला आहे. लॉर्ड लुई माऊंट बॅटन हें त्याचें नांव. अँग्लो–अमेरिकनांच्या मतें लॉर्ड लुई माऊंट बॅटन हे जलसंचारी आहेत. खुष्कीवरच्या आणि समुद्रांतल्या रण-विद्येंत ते प्रवीण आहेत. ठीक आहे. पण ह्या जलासुरानें अशी तलवार तरी कोणती मारली ? डिएप्पचे ते वीर आहेत. डिएप्पची ही घटना म्हणजे फ्रान्स-मध्यें त्या ठिकाणीं उतरून त्या भागांतील जर्मनांना हांकून लावण्याच्या इरा-द्यानें ब्रिटिश सैन्यानें केलेली चढाई. पण २४ तासांच्या आंतच या चढाऊ सैनिकांची धूळधाण उडविण्यांत आली आणि लॉर्ड लुई माऊंट बॅटन यांच्या सर्व शौर्यकथांना तिथेंच विराम मिळाला. डिएप्प येथें बजावलेल्या काम-गिरीमुळें आग्नेय आशिया सेना–विभागाचे त्यांना सरसेनापति नेमण्यांत आलें. माझें तुम्हाला असें आव्हान आहे कीं, जगांतला असा दुसरा कोणताही देश

तुम्हीं मला दाखवून द्या कीं, जिथें जय मिळाल्याबद्दल नाहीं, यश संपादन केल्याबद्दल नाहीं तर फक्त पराभव पावल्याबद्दलच एकाद्याला बढती मिळालेली आहे. तें अपूर्व श्रेय या युद्धांत ब्रिटिश सैन्यानें आणि ब्रिटिश सरकारनें संपादन केलें आहे. लॉर्ड लुई माऊंट बॅटन यांना मी असें आश्वासन देतों कीं, पूर्व आशियांत पूर्वीपेक्षां मोठी डिएप्प तुमची वाट पाहात आहे.

पूर्व आशियांत आणि मलायामध्यें सुद्धां असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांना ब्रिटिश परत येतील अशीं अजूनही स्वप्नें पडत आहेत. या मंडळींची गुणगुण आम्हाला लागली आहे. सिओनानमध्यें सुद्धां अशी कांहीं मंडळी आहे. मी त्यांची फक्त कींवच करतों. सिओनांन, पूर्वीं काय होतें आणि आज काय आहे हें आपल्याला माहीत आहेच. पुनरुक्तीचा दोष पत्करून मी असें म्हणतों कीं, सिंगापूरची तटबंदी करण्यास ब्रिटिशांना वीस वर्षें लागलीं पण बाहेर पडण्यास किती दिवस लागले ? सात दिवस. केवढी ही बहादुरी ! पण अजूनही कांहीं लोकांची समजूत आहे कीं, ब्रिटिश परत येतील ? ब्रिटिश साम्राज्याचा सर्वांत मोठा बालेकिल्ला त्या साम्राज्याची आज सर्वांत मोठी स्मशानभूमि झाली आहे आणि ही स्मशानभूमीच राहील. ब्रिटिश साम्राज्याचे दिवस संपले. तुम्हांला थोडाफार संशय वाटत असेल तर इतिहास काय म्हणतो तें पहा. प्रत्येक साम्राज्याचा माध्यान्हकाल असतो आणि त्याचा अस्तही होतो. गेल्या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्याचें वैभव कळसाला पोंचलें होतें. पण त्यानंतर त्याचा झपाट्यानें ऱ्हास होण्यास सुरुवात झाली आणि ह्या ऱ्हासकालाची अखेरची अवस्था आम्हीं प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांनीं पाहिली आहे.

गेल्या महायुद्धांत दोन साम्राज्यें अंतर्धान पावलीं असें मी म्हणत आलों आहें. तुर्कीचें ऑटोमन साम्राज्य हें त्यांतलें एक साम्राज्य आणि ऑस्ट्रो हंगेरीचें साम्राज्य, हें दुसरें साम्राज्य. सांप्रतेचें महायुद्ध ब्रिटिश साम्राज्याचा अंतकाळ

पाहील आणि ह्या साम्राज्याच्या राखेतूनच स्वतंत्र हिंदुस्थान उदयाला येईल. ब्रिटिश साम्राज्याचा पराभव होऊन तें छिन्नविछिन्न होणें आणि स्वतंत्र हिंदुस्थानचा जन्म होणें ह्या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत. हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा असें जर तुम्हांला वाटत असेल, तर ब्रिटिश साम्राज्याचा उच्छेद करण्यासाठीं, तें छिन्नविछिन्न करण्यासाठीं तुम्हीं झटलें पाहिजे, त्यासाठीं लढलें पाहिजे.

ब्रिटिश प्रचारकानें अलीकडे नवे डाव टाकण्यास सुरुवात केली आहे आणि आफ्रिकेंत व सिसिलीमध्यें जे लहानसहान जय ब्रिटिशांनीं मिळविले आहेत त्यांचा त्यासाठीं भरपूर उपयोग करून घेण्यांत येत आहे. ब्रिटिशांच्या हस्तकांनीं जगभर जो प्रचार सुरू केला आहे, तो आपण ऐकलांत तर आपल्याला असें वाटेल कीं, सिसिलीवर ताबा मिळवून ब्रिटिशांनीं आतां जणूं युद्धाचा निकालच लावला आहे. युद्ध जिंकण्याचें आतां कांहीं बाकी राहिलेलें नाहीं. युरोपची, म्हणजे फक्त शांततेच्या काळांतल्या नव्हे तर युद्धकाळांतल्या युरोपाचीसुद्धां, मला थोडीशी माहिती आहे आणि जिथें जिथें लढाया झाल्या तीं तीं सर्व ठिकाणें मला परिचित आहेत. युरोपमधल्या गट्टी राष्ट्रांचें सामर्थ्य आणि त्यांचा कमकुवतपणा यांचेंही मला ज्ञान आहे आणि जो अनुभव मला मिळाला आहे, त्याच्या जोरावर मी आपल्याला असें सांगूं शकतों कीं, युरोपमध्यें कांहीं झालें तरी हिंदुस्थानच्या अथवा पूर्व आशियामधल्या परिस्थितीशीं त्याचा कोणताही संबंध पोंचत नाहीं. युरोपमध्यें कांहीही घडो, आपण आवश्यक तेवढे परिश्रम केले तर हिन्दी लोक तयार होतील. म्हणून शत्रूकडून आजउद्यां होणाऱ्या प्रचारामुळें एक क्षणभरही बिचकूं नका. हिंदी लोकांना स्वातंत्र्य संपादन करणें आतां शक्य झालें आहे, ही आपली श्रद्धा, हा आपला विश्वास अचल ठेवा.

२ ते ३ लक्ष सैनिकांची फौज आम्हाला हिंदुस्थानांत घेऊन गेलें पाहिजे, पण हें कार्य काय एवढें अचाट आहे ? जगाच्या वेगवेगळ्या भागांत सर्व

आघाड्यांवर जे लक्षावधि लोक लढत राहिले आहेत त्यांच्याकडे नजर फेका. ३८ कोटी लोकांच्या मुक्ततेसाठीं ३ लक्ष अथवा ४ लक्ष सैनिकांची सेना सुद्धां त्या मानानें कांहींच नव्हे आणि पूर्व आशियांतल्या लोकांना या सैन्या-साठीं आवश्यक तेवढें मनुष्यबळ पुरविणें केव्हांही शक्य आहे. ही सेना शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज करण्यासाठीं जो पैसा आणि इतर सर्व प्रकारची साधन-सामुग्री लागेल ती पुरविणें सुद्धां पूर्व आशियांतल्या लोकांना शक्य आहे. म्हणून ही सेना उभारून शक्यतों लौकर ती सुसज्ज व परिपूर्ण करण्याच्या एकाच कार्यावर आपण आपलें सर्व लक्ष, सर्व उत्साह केंद्रित करूं या.

मित्रहो, आमचें चालू घटकेचें कार्य आम्ही उभारलेल्या चालू सैन्याला शक्यतों लौकर सर्वांगपरिपूर्ण करणें हें आहे आणि त्याच्याच बरोबरीनें आमच्या या सैन्याचा विस्तार करण्याचें कार्यही आम्हाला करीत रहावयाचें आहे. कारण हें युद्ध दीर्घकाल चालू राहाणार आहे आणि मामला मोठा बिकट आहे. अधिकाधिक तरुण सैन्यांत दाखल होऊन शिक्षण घेण्यासाठीं पुढें आले पाहिजेत. आपल्या या कुआलालंपूरच्या अगदीं गाभ्यांत आमच्या छावण्यांपैकीं एक छावणी आहे आणि आगामी स्वातंत्र्याच्या संग्रामाचें शिक्षण तिथें तरुण लोक घेत आहेत याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. पण फक्त सिओनान अथवा कुआलालंपूर इथेंच हें शिक्षण देण्यांत येत आहे असें नाहीं. मलायामध्यें अशा छावण्यांचे ठिपके सर्वत्र पडलेले आहेत आणि यांपैकीं बऱ्याच छावण्या पूर्वीं ब्रिटिश सैनिकांच्याच होत्या. आमच्या उपयोगासाठीं त्या आमच्या स्वाधीन करण्यांत आल्या आहेत. आम्ही ज्या वेळीं हिंदुस्थानांत जाऊं त्यावेळीं आमच्या राष्ट्रीय सेनेसाठीं तिथें आम्हांला तयार बराकी मिळतील असें यावरून मला म्हणावेसें वाटतें. नव्या बराकी आम्हांला बांधाव्या लागणार नाहींत. कलकत्त्यापासून मुंबईपर्यंत आणि रावळपिंडी पासून मद्रास पर्यंत सुंदर सुंदर बराकी, हिंदी सैनिकांसाठीं नव्हे तर ब्रिटिश टॉमीसाठीं बांधण्यांत आलेल्या आहेत. पण या सुंदर बराकी

आमच्या हिंदी राष्ट्रीय सेनेकरितां आम्हीं आमच्या ताब्यांत घेणार आहोंत. त्यांच्या मोबदल्यांत देशांतले सर्व तुरुंग ब्रिटिशांना देण्यांत येतील असें मी त्यांना अभिवचन देतों. तिथें त्यांनीं वास्तव्य करावें.

मित्रहो, ब्रिटिशांचा पराभव करण्यासाठीं बाहेरची मदत आम्हांला मिळवावी लागेल. शत्रु सर्व जगभर मदतीसाठीं फिरत आहे. सर्व शक्तिमान् असें ब्रिटिश साम्राज्य, ज्या साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं असें बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य, हातांत भिक्षापात्र घेऊन जगभर भटकूं लागलें आहे. मदतीसाठीं फक्त वॉशिंग्टनचेंच दार ब्रिटिश लोक ठोठावीत आहेत असें नाहीं तर सर्व जगापुढें त्यांनीं हात पसरला आहे. कंगाल हिंदी लोकांना, गुलाम हिंदी लोकांनासुद्धां त्यांनीं शिल्लक ठेवलें नाहीं. मनुष्यबळ, पैसा, दारुगोळा आणि इतर युद्धसामुग्री यांच्यांतला वांटा हिंदी लोकांनासुद्धां उचलावा लागत आहे. या कठीण प्रसंगीं मदत करा म्हणून हिंदी लोकांकडेही ते भीक मागत आहेत. आज आपल्याला एकट्या ब्रिटनच्या सामर्थ्याबरोबरच झुंडी द्यावी लागणार आहे असें नाहीं, तर ब्रिटन आणि त्यांचे दोस्त यांच्या संघटित सामर्थ्याबरोबर आपल्याला लढाई देणें जरूर आहे. हें संघटित सामर्थ्य प्रचंड आहे. अशा परिस्थितींत लढाई देऊन आपल्याला विजय मिळवावयाचा असेल तर आम्हांला मदतीची जरुरी भासणारच आणि प्रसंग पडला तर तशी मदत आम्ही घेऊंही. पण आमचें कर्तव्य प्रथम आपण पार पाडल्यानंतर जर अशी मदत आम्हांला मागावी लागली अथवा स्वीकारावी लागली तर त्यांत कोणताच कमीपणा नाहीं.

या प्रसंगीं जास्तींत जास्त परिश्रम करणें हें पूर्व आशियांतील जनतेचें कर्तव्य आहे. जगांतल्या इतर भागांत असलेल्या तुमच्या देशबांधवांना जें करणें शक्य होत नाहीं तें करून दाखविण्याची संधि तुम्हांला मिळालेली आहे हें लक्षांत ठेवा. युरोप, आफ्रिका, अमेरिका अथवा इंग्लंडमध्यें असलेल्या हिंदी लोकांना सुद्धां काय करतां येणें शक्य आहे ? ते अगतिक झाले आहेत.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढावें, कांहीं कार्य करावें यासाठीं त्यांच्या- पैकीं पुष्कळ लोकांची धडपड चालू आहे हें मला माहीत आहे. पण आपला विचार त्यांना कृतींत आणणें शक्य नाहीं. एकादी सेना उभारणें अथवा राष्ट्रीय सेनेंत येऊन दाखल होणें त्यांना अशक्य आहे. पण हें आपलेंच धर्मकार्य आहे असें आपण समजून चालाल तर सर्व कांहीं करणें आपल्या आटोक्यांत आहे. राष्ट्रीय सेनेंत आपल्याला दाखल होता येईल, आणि तिची कामागिरी यशस्वीपणें पार पडावी म्हणून आपल्याला प्रयत्नही करतां येतील. म्हणून जेव्हां त्यागाची हांक आपल्या कानीं पडेल तेव्हां माघार घेऊं नका. आपल्या देशाची सेवा बजावण्याची, आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची जी अपूर्व संधि जगांतल्या इतर कोणाही हिंदी लोकांना न देतां देवानें तुम्हांलाच दिली आहे ती दिल्याबद्दल तुम्ही परमेश्वराचे आभार माना.

फिलिपाइन्सच्या इतिहासांतला, आजचा दिवस हा एक उत्सवदिन आहे. आज १ कोटी ८० लक्ष फिलिपिनोंना त्यांच्या प्रजासत्ताक राज्याचें संपूर्ण स्वातंत्र्य लाभत आहे. ४२ वर्षांपूर्वी हें त्यांचें स्वातंत्र्य अमेरिकेनें हिरावून घेतलें होतें. ब्रह्मदेशाच्या स्वतंत्र राष्ट्राचा पुनर्जन्म झाल्यानंतर अडीच महि- न्याच्या आंत फिलिपाइन्सच्या प्रजासत्ताक राष्ट्राचा पुनर्जन्म व्हावा हा योग आशियांतल्या सर्व राष्ट्रांना आणि विशेषतः जीं राष्ट्रें अजून आपल्या स्वातं- त्र्यासाठीं लढत आहेत त्या राष्ट्रांना आनंदोत्सवाचा आहे. फिलिपाइन्सच्या प्रजासत्ताक राष्ट्राच्या स्वातंत्र्याची आज झालेली घोषणा हिंदुस्थानच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. कारण ब्रिटिशाबरोबर स्वातंत्र्यासाठीं झगडत राहिलेल्या माझ्या ३८ कोटी ८० लक्ष बांधवांना त्या घोषणेमुळें आशेचा शुभसंदेश मिळालेला आहे. पूर्व आशियांतल्या सर्व कोनाकोपऱ्यांतून जपानी सैन्यानें कायमचें हुसकावून लावल्यामुळें अँग्लो-अमेरिकनांनीं आतां हिंदुस्थानला आपला आशियांतला शेवटचा किल्ला बनविलें आहे. पण अँग्लो-अमेरिकनांना हिंदुस्थानसुद्धां हांकून लावील आणि आपलें स्वातंत्र्य संपादन करील. तो

दिवस कांहीं आतां दूर नाहीं. चाळीस वर्षांपेक्षां अधिक काळ अमेरिकनांच्या वर्चस्वाखालीं राहिल्यानंतर स्वातंत्र्यसंपादनाचें आपलें चिरवांछित उद्दिष्ट माझ्या फिलिपिनो बांधवांना गांठतां आलें म्हणून मी त्यांना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतों.

ज्या कार्यासाठीं अमेरिकनांबरोबर चाळीस वर्षांपूर्वी लढा पुकारला त्या आपल्या कार्याचा आज विजय झाला आहे हें पाहाण्याचें भाग्य लाभल्याबद्दल क्रांति-कारकांचे तपोवृद्ध पुढारी जनरल एमिलिओ आगुनाल्डो यांचें मी अंतःकरण-पूर्वक अभिनंदन करतों. फिलिपाइन्सच्या प्रजासत्ताक राष्ट्राचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ. जोस लॉरेल यांचें आणि बृहत् पूर्व आशियाचें युद्ध सुरू झाल्यानंतर अहोरात्र परिश्रम करून ज्यांनीं आपलें ध्येय प्राप्त करून घेतलें त्या मि. जॉर्ज व्हर्गास यांचेंही मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## बहादुरशहाच्या कबरीपाशीं

स्वतंत्र हिंदुस्थानचा शेवटचा बादशहा बहादुरशहा याच्या कबरीजवळ रविवार ता. २६ सप्टेंबर १९४३ रोजीं एक संस्मरणीय समारंभ पार पाडण्यांत आला. ब्रिटिशांची सत्ता उलथून पाडण्यासाठीं लढणाऱ्या बहादुरशहाला नेताजींनीं या प्रसंगीं गौरवांजलि वाहिली. या समारंभाला हिज एक्सलन्सी डॅा. बा मॉ * व त्यांचे सहकारी इतर नागरिकांबरोबर हजर राहिले होते.

१६

युवर एक्सलन्सी आणि मित्रहो, स्वतंत्र हिंदुस्थानचा शेवटचा बादशहा बहादुरशाहा यांच्या कबरीजवळ आज आपण गोळा झालों आहोंत. हिंदुस्थानच्या शेवटच्या बादशहाची कबर ब्रह्मदेशाच्या भूमीवर असावी आणि स्वतंत्र ब्रह्मदेशाच्या शेवटच्या राजाचें चिर निद्रास्थान हिंदुस्थानची भूमि हें असावें हा ऐतिहासिक योगायोग जेवढा विलक्षण तेवढाच तो मला भाग्यशालीही वाटतो.

---

* डॉ बा. मॉ यांच्या भाषणासाठीं परिशिष्ट क पहा.

हिंदुस्थानांतील आम्ही हिंदी लोक आणि ब्रह्मदेशांतील आपण ब्रह्मी लोक इतिहासाच्या अनेक अदृश्य बंधनांनीं परस्परांशीं संलग्न झालों आहोंत, आणि आपलें राष्ट्र व आमचें राष्ट्र यांच्यांतील आजचे परस्पर स्नेहसंबंध हा या ऐतिहासिक योगायोगाचाच एक सबळ पुरावा आहे.

आपण व आपलीं राष्ट्रें सध्यां एकाच शत्रूविरुद्ध लढत आहोंत. अर्थात् आमच्या शेवटच्या बादशहाच्या या मर्त्य अवशेषाजवळ येऊन आम्हीं एक लहानसा समारंभ साजरा करावा हें प्रसंगोचितच आहे असें मला वाटतें. कारण आमच्या अंतःकरणांत जी आग धगधगत आहे ती आम्हांला या निमित्तानें प्रज्वलित करतां येईल आणि ज्या स्नेहबंधनांनीं ब्रह्मदेश व हिंदुस्थान संलग्न झाले आहेत तीं स्नेहबंधनेंही या निमित्तानें आपल्याला घट्ट करतां येतील. तीं चिरकाल टिकविण्याची संधि घेतां येईल.

युवर एक्सलन्सी, आपण आणि आपल्या सरकारच्या सन्मान्य सभासदांनीं इथें हजर राहून आमचा जो बहुमान केला आहे त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत ऋणी आहों. आजचा हा प्रसंग ऐतिहासिक महत्त्वाचा आहे आणि भविष्यकालांतील अनेक महत्त्वाच्या घटना त्याच्याशीं निगडित होत आहेत असें मला वाटत आहे.

आमच्या ब्रह्मी दोस्तांच्या खांद्याला खांदा लावून लढत राहाण्याचा आमचा कृतनिश्चय मीं यापूर्वी अनेक प्रसंगीं जाहीर केला आहे, त्याचाच मी आज येथें पुनरुच्चार करतों. जपानची निर्हेतुक मदत आणि पाठिंबा आपल्या सहाय्यासाठीं सज्ज आहे. त्याच्या बळावर आपल्याला ब्रिटिश साम्राज्यशाहीचें कायमचें उच्चाटन करतां येईल, आणि हिंदुस्थानचें गत स्वातंत्र्य पुनः संपादन करतां येऊन ब्रह्मदेशाची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य यांना पछाडीत राहाणारा धोकाही कायमचा नष्ट करून टाकतां येईल.

आमच्या या कृतनिश्चयाचा उच्चार आज आम्ही एका पवित्र स्मारकासमोर उभे राहून करीत आहों. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यानें लढा दिला

त्या अखेरच्या लढवय्यांचें पार्थिव अवशेष असलेलें हें स्मारक आहे. हा लढवय्या मर्दांचा बादशहा होता आणि बादशहांमध्यें मर्द होता. बहादुरशहाची स्मृति आम्ही जागवित असतों. धर्मभेद, पंथभेद विसरून, आम्ही सर्व हिंदी जन त्याची स्मृति जागवित आहोंत. याचें कारण केवळ शत्रूबरोबर लढा पुकारण्याची हाक त्यानें दिली एवढें एकच नाहीं. त्याच्या झेंड्याखालीं सर्व प्रांतांतले, सर्व धर्मांचे, सर्व पंथाचे हिन्दी लोक एकत्र होऊन लढले. त्याच्या पवित्र झेंड्याखालीं हिंदु, मुस्लीम, शीख, स्वातंत्र्यप्रेमी असे सर्व हिंदु मुस्लीम-शीख गोळा होऊन खांद्याला खांदा भिडवून लढले. इंग्लिश इतिहासकार त्या संग्रामाला शिपायांचें बंड अशी संज्ञा देतात, पण आम्ही हिंदी लोक त्याला पहिलें स्वातंत्र्ययुद्ध म्हणतों. बहादुरशाहाची स्मृति आम्हीं जागविण्याचें खरें कारण हें आहे. आणि आतां आम्हीं हिंदुस्थानचें अखेरचें स्वातंत्र्ययुद्ध सुरू केलें आहे; तेव्हां हें युद्ध अखेरपर्यंत लढण्यासाठीं आमच्या कृतनिश्चयाला उजळा देणें आम्हांला क्रमप्राप्तच आहे. कोणतींही संकटें भोगावीं लागोत, कितीही त्याग करावा लागो, कोणत्याही अडचणी आमच्या मार्गांत उभ्या राहोत, कितीही कालावधि लागो हें युद्ध आम्ही अखेरपर्यंत लढत रहाणार; ब्रह्मदेश व हिंदुस्थान यांच्या समान शत्रूचा निःपात होईपर्यंत आणि फक्त स्वदेशांतलें स्वातंत्र्य मिळेपर्यंतच नव्हे तर मानवतेचें भवितव्य ठरविण्यासाठीं दोस्त या नात्यानें खांद्याला खांदा लावून कार्य करण्याचें स्वातंत्र्य आम्हांला मिळेपर्यंत आम्ही आमचें हें युद्ध चालू ठेवणार आहोंत.

युवर एक्सलन्सी, अशा या पूज्य स्थानांना भेट दिल्यानंतर तिथें कांहीं तरी दक्षिणा अथवा नजराणा अर्पण करावा अशी आमची वहिवाट आहे. आमच्या अंतःकरणांतील पूज्य भावाचें आणि श्रद्धेचें चिन्ह म्हणून हिंदुस्थानच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धांतला शेवटचा शूरवीर बादशहा बहादुरशहा यांच्या नांवानें २॥ लक्ष रुपयांची एक लहानशी रक्कम नजराण्यादाखल मी येथें अर्पण करीत आहें. ब्रह्मदेश आणि ब्रह्मदेशाची अस्मिता यांच्याबद्दल

आम्हांला वाटणाऱ्या प्रेमादराची एक अल्प खूण म्हणून ही लहानशी रक्कम मी आपल्या हवालीं करीत आहें आणि आपल्या इच्छेप्रमाणें तिचा आपण विनियोग करावा अशी माझी आपल्याला विनंति आहे.

आणि आतां समारोपादाखल खुद्द बादशहा बहादुरशहा यांनीं स्वतः रचलेल्या कवनांतील कांहीं ओळी मी येथें वाचून दाखवितों. या ओळींचें भाषांतर असें आहे कीं, "हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या वीरांच्या रक्तांत कार्यनिष्ठेचा अखेरचा बिंदु जोंपर्यंत शिल्लक आहे तोंपर्यंत हिंदूची तलवार लंडनचें काळीज भेदीत राहील."

म.ग्रं.सं.ठाणें.

आझाद सरकारची घोषणा *

त्यानिमित्त केलेलें निवेदन.

# १७

इतिहासाचा मी एक अभ्यासू विद्यार्थी आहें आणि माझ्या २२ वर्षांच्या सार्वजनिक जीवनक्रमांत जगांत ठिकाठिकाणीं घडून आलेल्या क्रांतींचा अभ्यास मीं विशेष सूक्ष्मपणें केलेला आहे. त्या अभ्यासामुळें मला असें सारखें वाटत आलेलें आहे कीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामांत दोन गोष्टींची उणीव तीव्रतेनें भासत आहे. त्या दोन गोष्टी म्हणजे हिंदुस्थानची राष्ट्रीय सेना आणि ह्या सेनेचें नेतृत्व स्वीकारून तिला रणांगणांत घेऊन जाणारें राष्ट्रीय सरकार. चालू महायुद्धांत जपानच्या लष्करानें दणदणीत विजय मिळविल्यानें पूर्व आशियांतील हिंदी लोकांना हिंदी स्वातंत्र्यसंघ आणि हिंदी राष्ट्रीय सेना यांची स्थापना करणें सुलभ झालें.

---

* आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारची घोषणा परिशिष्ट ड मध्यें वाचा.

राष्ट्रीय सेनेची स्थापना करण्यांत आल्यामुळें पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळीला वास्तवतेचा लाभ झाला, तिचें स्वरूप दिखाऊ राहिलें नाहीं. तिला तेज चढलें. ही सेना उभारण्यांत आली नसती तर पूर्व आशियांतील स्वातंत्र्यसंघ म्हणजे केवळ एक प्रचाराचें साधनच ठरलें असतें. राष्ट्रीय सेनेच्या स्थापनेमुळें आझाद हिंदचें (स्वतंत्र हिंदुस्थानचें) एक तात्पुरतें सरकार निर्माण करणें शक्य आणि आवश्यकही झालें. हें सरकार स्वातंत्र्य-संघानें जन्माला घातलें असून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामांतील अखेरचा मुकाबला देणें आणि त्याचें मार्गदर्शन करणें हा या सरकारचा उद्देश आहे.

हें तात्पुरतें सरकार स्थापन करून हिंदुस्थानला तीव्रतेनें भासणारी उणीव जशी आपण दूर करीत आहोंत त्याचप्रमाणें इतिहासाचेंही अनुकरण करून त्याच्या पावलावर पाऊल टाकीत आहोंत. अलीकडच्या इतिहासांत १९१६ सालीं आयरिश जनतेनें स्थापन केलेल्या तात्पुरत्या सरकारचा दाखला आमच्या पुढें आहे. गेल्या महायुद्धांत झेक लोकांनीं ह्याच मार्गाचा अवलंब केला आणि गेल्या महायुद्धानंतर तुर्कांनीं सुद्धां आपला नेता मुस्ताफा केमाल याच्या नेतृत्वाखालीं अनातोलिया येथें असेंच स्वतःचें एक तात्पुरतें सरकार स्थापन केलें होतें.

तथापि आमची परिस्थिति अम्मळ भिन्न आहे. आमचें हें आझाद हिंदचें तात्पुरतें सरकार शांतता काळांतल्या सर्वसामान्य सरकारांप्रमाणें असणार नाहीं. ह्या सरकारची घटना आणि त्याचें कार्य सामान्य सरकारपेक्षां वेगळें, अपूर्व, असें आहे. हें सरकार लढाऊ सरकार आहे आणि हिंदुस्थानांतील ब्रिटिश आणि त्यांचे दोस्त यांच्याविरुद्ध चाल करून जाऊन त्यांच्याशीं अखेरची लढाई देणें आणि या लढाईचें नेतृत्व स्वीकारणें हें त्याचें कार्य आहे. अर्थातच या युद्धकार्याला आवश्यक वाटतील तेवढींच खातीं निर्माण करून त्यांचा कारभार हें सरकार पाहात राहील.

या सरकारमध्यें सरकारच्या मुलकी खात्याचे कांहीं प्रतिनिधि असतील; पण त्याचबरोबर सरकारच्या लष्करी खात्याच्या प्रतिनिधींचाही त्यांत समावेश होईल. स्वातंत्र्यसंपादनासाठीं लढाई करणें हा या सरकारचा प्रधान हेतु असल्यामुळें ह्या सरकारच्या कार्यकारी मंडळांत लष्करी प्रतिनिधींचा भरणा अर्थातच जास्त प्रमाणांत करण्यांत आलेला आहे.

कार्यकारी मंडळांतील इतर मंत्र्यांखेरीज कार्यकारी मंडळाला सल्लामसलत देण्यासाठीं कांहीं सल्लागारांचीही योजना करण्यांत आली आहे. या कार्यकारी मंडळाची रचना अशा प्रकारें करण्यांत आल्यामुळें पूर्व आशियांतील हिन्दी जनतेशीं घनिष्ठ संबंध ठेवतां येऊन तिच्या सर्व साधनसंपत्तीचा उपयोग या सरकारला आगामी लढ्यासाठीं करून घेतां येईल.

हें तात्पुरतें सरकार हिंदुस्थानच्या भूमीवर जाऊन दाखल झाल्यानंतर स्वतःच्या राष्ट्रांत कारभार चालविणाऱ्या इतर सरकारांप्रमाणेंच तें स्वदेशांतील कारभार पाहूं लागेल आणि त्यासाठीं बरींच नवीं खातीं सुरू करण्यांत येतील.

आझाद हिंदचें तात्पुरतें सरकार स्थापन झाल्यामुळें हिंदी स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होण्यासाठीं ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता भासत होती त्या त्या सर्व गोष्टी आपल्याला आतां मिळून चुकल्या आहेत. स्वातंत्र्याची अखेरची मोहीम सुरू करणें हेंच कार्य तेवढें आतां शिल्लक राहिलें आहे. हिंदुस्थानची सरहद्द ओलांडून हिंदी राष्ट्रीय सेनेनें दिल्लीच्या रोखानें आपला ऐतिहासिक मोर्चा सुरू केल्यानंतर ह्या कार्याचा प्रारंभ होईल. हिंदुस्थानांतून ॲंग्लो-अमेरिकनांची हकालपट्टी होऊन नव्या दिल्लींतल्या व्हाइसरॉयज हाऊसवर हिंदुस्थानचा राष्ट्रीय झेंडा फडकविण्यांत येईपर्यंत ही चढाई बंद पडणार नाहीं.

## हिंदी महिला

झांशीच्या राणीचें पथक तयार करण्यासाठीं उभारलेल्या छावणीचें उद्घाटन करतांना केलेलें भाषण.

१८

बंधुभगिनींनो, झांशीच्या राणी पथकाला शिक्षण देण्यासाठीं ही छावणी उघडण्यांत येत आहे. हा प्रसंग महत्त्वाचा आहे, पूर्व आशियांतील आमच्या लढ्याची प्रगति दाखविणारा हा अत्यंत महत्त्वाचा असा एक उल्लेखनीय विशेष आहे.

या प्रसंगाचें महत्त्व लक्षांत येण्यासाठीं आपण ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आमची चळवळ ही कांहीं नुसती राजकीय चळवळ नाहीं. आमच्या राष्ट्राचा आम्हांला पुनरुद्धार करावयाचा आहे आणि तें प्रचंड कार्यसुद्धां आम्हीं हातीं घेतलें आहे. खरें सांगावयाचें म्हणजे हिंदुस्थानला आम्हांला नवचैतन्य प्राप्त करून द्यावयाचें आहे आणि ह्या उपक्रमाचा पाया अर्थातच भक्कम पाहिजे. हा प्रचाराचा 'येनकेन प्रकार'

नव्हे; हिंदुस्थानच्या पुनर्जन्माचे सोहळे आपण प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहात आहोंत हें आपल्या लक्षांत असूं द्या. तेव्हां जें नवचैतन्य आपण हिंदुस्थानला प्राप्त करून देणार आहोंत, त्या चैतन्याचें स्फुरण आमच्या महिलांमध्यें व्हावें हें प्रसंगोचितच आहे.

आमचा भूतकाळ दिव्य होता, उज्ज्वल होता. उज्ज्वल परंपरा मागें असल्याखेरीज झांशीच्या राणीसारखी तेजस्वी महिला हिंदुस्थानमध्यें जन्माला आली नसती. अशा तेजस्वी महिलांची परंपरा हिंदुस्थानांत वेदकालाएवढीच प्राचीन आहे. संस्कृत भाषेची संकृति हिंदुस्थानांत ज्या पुराणकालीं निर्माण झाली त्या कालांतच हिंदी महिलांच्या महात्म्याचेंही बीजारोपण झालें. प्राचीन कालीं ज्या हिंदुस्थाननें थोर थोर महिलांना जन्म दिला त्याच हिंदुस्थाननें आपल्या इतिहासांतल्या एका आणीबाणीच्या प्रसंगीं झांशीच्या राणीला जन्माला घातलें आणि आज आमच्या इतिहासांतली एक चिंताजनक घटका निर्माण झाली असतांना मलाही असा बळकट विश्वास वाटतो कीं, आमच्या महिला आज देखील आपल्या कर्तव्याला जागल्याखेरीज कधींही राहाणार नाहींत. एकट्या झांशीच्या स्वातंत्र्यासाठीं जर लक्ष्मीबाईंना हिंदुस्थाननें जन्म दिला तर उभ्या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं, ३८ कोटी हिंदी लोकांना दास्यमुक्त करण्यासाठीं आज देखील हिंदुस्थान हजारों झांशीवाल्या राणींना जन्माला घालील.

मैत्रेयीसारख्या महिला जशा प्राचीन कालीं हिंदुस्थानांत निर्माण झाल्या तशाच तेजस्वी महिला महाराष्ट्रांत अहिल्याबाईच्या आणि बंगालमध्यें राणी भवानीच्या रूपानें चमकून गेल्या. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत रोझिया बेगम आणि नूरजहान या महिलांनीं देखील ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानांत सुरू होण्यापूर्वी राजकार्यधुरंधर म्हणून चांगलाच लौकिक संपादन केला होता. हिंदुस्थानची भूमि सुपीक आहे, समृद्ध आहे. या समृद्ध भूमींत भूतकाळाप्रमाणेंच आजही अनेक स्त्रीरत्नें निपजतील अशी माझी श्रद्धा आहे.

१९२१ सालीं हिंदुस्थानांत राजकीय चैतन्याची नवी लाट आली आणि त्या वेळच्या चळवळींत भाग घेण्यासाठीं, त्याग करण्यासाठीं हजारों नव्हे लाखों भगिनी पुढें सरसावल्या. तुरुंगांत जाणें हा त्या कालांतला एक महान् संकेत होता आणि त्या वेळीं तुरुंगांतील खडतर जिणें स्वीकारण्यासाठीं आमच्या हिंदी बंधुभगिनी सज्ज होऊन राहिल्या होत्या. १९२१ च्या डिसेंबरमध्यें कलकत्त्यांतील दोन्ही तुरुंग कसे गच्च भरून गेले होते हें मला आजही आठवत आहे. हे तुरुंग भरल्यानंतर ब्रिटिशांनीं आणखी नवे दोन तुरुंग बांधले आणि थोड्या दिवसांत तेही भरून गेले.

तुरुंगाच्या भयाला हिंदी लोक बिचकत नाहींत असें जेव्हां ब्रिटिशांना आढळून आलें, तेव्हां त्यांनीं आपले धोरण बदललें. पुढाऱ्यांना तुरुंगांत टाकून जनतेचा समाचार लाठ्या आणि गोळ्या यांनीं घ्यावयाचें तंत्र त्यांनीं सुरू केलें. कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेणें याचा अर्थ लाठीमार आणि गोळीबार यांना तोंड देण्याची तयारी ठेवणें असा झाला आणि हिंदी लोकांनीं, पुरुषांनीं नव्हे तर स्त्रियांनीं सुद्धां त्याचीही तयारी केली. कलकत्त्यांत त्या वेळीं घडलेल्या एका प्रसंगाची विस्मृति मला कधींच होणार नाहीं. सरकारचा मनाई हुकूम मोडून आम्हीं त्या वेळीं एक मिरवणूक काढली होती. ही मिरवणूक उधळून लावण्यासाठीं जेव्हां पोलिसांनीं तिच्यावर लाठीहल्ला चढविला तेव्हां आमच्या कांहीं भगिनींनीं आमच्याभोंवतीं कडें करून (म्हणजे आमच्यामध्यें आणि पोलिसमध्यें उभें) राहून लाठीहल्ल्याला तोंड देण्याची सज्जता केली. त्या यत्किंचितही डगमगल्या नाहींत. आमच्या भगिनींचें तेज आणि त्याचा निर्धार उत्तरोत्तर कसा वाढत आहे ह्याचा अनुभव हिंदुस्थानांत असतां अशा प्रकारें मला आला आहे.

निःशस्त्र प्रतिकाराच्या या चळवळींतच नव्हे तर क्रांतिकारक पक्षाच्या चळवळींतही अशी तेजस्वी कामगिरी आमच्या शूर महिलांनीं केल्याचीं उदाहरणें आहेत. क्रांतिकारक म्हणून साहसाचीं कामें केलेल्या अनेक महिला

मला माहीत आहेत. निःशस्त्रप्रतिकारासाठीं विशिष्ट प्रकारचें धैर्य आवश्यक असतें, तर क्रांतिकारक कृत्यासाठीं त्याहूनही वेगळ्या प्रकारच्या आणि प्रत्यक्ष स्वरूपांत दृश्यमान होणाऱ्या धैर्याची आवश्यकता असते. या बाबतींतही आमच्या भगिनी कांहीं कमी नाहींत असें मला आढळून आलें आहे. १९३१ सालीं एका इंग्लिश मॅजिस्ट्रेटवर दोघां मुलींनीं गोळ्या झाडल्या, त्यांपैकीं एकीचें वय १६ वर्षांचें होतें, दुसरीचें १७ वर्षांचें होतें. हिंदुस्थानांत मॅजिस्ट्रेटसमोर जाणारा सामान्य इसम बिचकतो पण या दोघां भगिनींनीं मॅजिस्ट्रेटच्या घरांत बेडरपणें शिरून त्याच्यावर गोळ्या झाडल्या. त्यांचें धैर्य किती अलौकिक होतें याची आपल्याला सहज कल्पना होईल. असें धैर्य आकाशांतून पडत नाहीं; हिंदुस्थानच्या भूमींतच त्याची पेरणी झालेली आहे आणि त्याचीं पाळेंमुळें हिंदुस्थानच्या प्राचीन परंपरेमध्येंच खोल रुतलेलीं आहेत.

१९२८ सालापासून हिंदुस्थानमधल्या महिलासंघटनेमध्यें मी लक्ष घालूं लागलों आणि मला त्यामुळें असें आढळून आलें कीं, जर संधि मिळाली तर आमच्या भगिनी कोणत्याही कार्यांत चमकूं शकतील. बंगालमधील महिलांनीं राष्ट्र महिला संघ या नांवाची एक संस्था स्थापन करून महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. १९२८ च्या डिसेंबरमध्यें या महिलांनीं ५०० स्त्रियांचें एक स्वयंसेवक दल उभारलें. या दलाचा कारभार सुव्यवस्थितपणें चालत असे. एवढेंच नव्हे, तर त्याच्या कवाईती आणि त्याची शिस्त पाहून आम्हांला फार आशाही वाटूं लागली. योग्य चालना दिली आणि अवश्य ती संधि मिळाली तर आपल्यावर सोंपविलेली कामगिरी आमच्या हिन्दी महिला उत्कृष्ट प्रकारें बजावूं शकतील हा आमचा विश्वास त्यामुळें जास्तच दृढ झाला. गुलामांच्या देशांत उपलब्ध होणारीं लाठ्याजंबियांसारखीं हत्यारें घेऊन महिलांना त्यांचें शिक्षण देणाऱ्या महिलांच्या संस्थाही हिंदुस्थानांत मीं पाहिलेल्या आहेत. या बाबतींतही आमच्या भगिनींनीं उल्लेखनीय प्रगति केलेली आहे.

अर्थातच जेव्हां हिंदी स्वातंत्र्यसंघटनेचें हें कार्य मीं हातीं घेतलें, तेव्हां या कार्यांत आमच्या भगिनींनाही वांटेकरी करावें, या आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थानची सेवा करण्याची त्यांनाही संधि द्यावी असें मला साहाजिकच वाटूं लागलें. या बाबतींत मीं पुष्कळांचा विचार घेतला आणि कांहीं जणांनीं मला असेंही सांगितलें कीं, महिलांचें पथक उभारणें ही गोष्ट हिंदुस्थानांत कदाचित् शक्य आहे, पण पूर्व आशियांत तिचें नांव सुद्धां काढूं नका. पण त्यांच्या या उद्‌गारांनीं माझा विश्वास ढळला नाहीं. माझा संकल्प बदलत नाहीं. आणि आमच्या भगिनींनीं कोणतें श्रेय संपादन केलें आहे याचें प्रात्यक्षिक आपण आज स्वतःच आपल्या डोळ्यांनींच पहात आहोंत. त्यांच्या या कार्याला गेल्या जुलैमध्येंच प्रारंभ झाला आणि शिक्षणाची ही छावणी जरी आज आम्ही सुरू करीत असलों तरी त्यांच्यामुळें कांहीं हा विलंब झाला नाहीं. योग्य जागा मिळून इतर व्यवस्था लावतांना आम्हांला ज्या अडचणी आल्या त्यामुळें हा विलंब लागला. या कालांत आमच्या भगिनी अगदीं उतावळ्या आणि अधीर होऊन राहिल्या होत्या हें मला माहीत आहे. आम्हांला तुम्ही विसरतां कीं काय, अशी पृच्छा करण्यासाठीं माझ्याजवळ एक शिष्टमंडळ घेऊन येण्यासाठीं बेत त्यांनीं केला होता असें मला समजलें आहे. ही छावणी आज तयार झाली आहे आणि झांशीच्या राणीचा जन्मदिवशींच ती उघडण्याचा आज योग येत आहे हें पाहून मला अत्यंत समाधान वाटतें.

या निमित्तानें झांशीच्या राणीबद्दल मला चार शब्द बोलावेसे वाटतात. झांशीच्या राणीनें ज्या वेळीं आपला संग्राम सुरू केला त्या वेळीं तिचें वय अवघें २० वर्षांचें होतें. घोड्यावर स्वार होऊन आपली तलवार परजून रणांगणावर येऊन ठाकणाऱ्या या २० वर्षांच्या तरुणीचें शौर्य, तिचें तेज किती लोकोत्तर असेल याची आपणच कल्पना करा. तिच्याबरोबर दोन हात करणाऱ्या इंग्रज सेनानीनें तिच्याबद्दल असे उद्गार काढले कीं, “बंडखोरांत ही स्त्री सर्वांत शूर होती, सर्वोत्कृष्ट बंडखोर होती.” ही कबुली त्यानें दिली याचें कारण

झांशीवाल्या राणीचें शौर्य त्याला लपवून ठेवणें अशक्य होतें. तिच्याशीं प्रत्यक्ष दोन हात करण्याचा प्रसंग त्याच्यावर आला होता. ह्या राणीनें प्रथम झांशीच्या किल्ल्यावर राहून लढाई दिली आणि किल्ल्याला वेढा पडतांच निवडक लोकांसह तिथून निसटून ती काल्पी येथें गेली. काल्पीला तिनें कल्पान्त केला. काल्पी गाजवून तिनें माघार घेतली आणि तात्या टोपे यांच्याशीं संधान बांधून पुनः ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर हल्ला चढविला. हा किल्ला हस्तगत करून घेतल्यावर तिथें आपला तळ ठोकून तिनें लढाई चालू ठेवली आणि त्या शेवटच्या लढाइंत अखेर लढत लढत ती धारातीर्थी पतन पावली.

वरचेवर पराभव होत असतांही अशा प्रकारें झुंजत राहाण्यास किती विलक्षण शौर्य अंगीं असलें पाहिजे याची कल्पना करा. पण तें शौर्य या अल्पवयी राणीच्या ठिकाणीं होतें. तिनें जें शौर्य दाखविलें, जो पराक्रम गाजविला तो हिंदी जनतेला पिढ्यान् पिढ्या स्फूर्ति देत राहील.

दुर्दैवानें झांशीच्या राणीचा पराभव झाला, पण हा पराभव तिचा नव्हता; हिंदुस्थानचा हा पराभव होता. झांशीची राणी पतन पावली पण तिचें तेज अमर झालें. हिंदुस्थान आजही पुनः झांशीवाल्या राणींना जन्माला घालील आणि विजयाचा मार्ग आक्रमूं लागेल.

आज उघडलेल्या या छावणींत आमच्या एकशें छप्पन भगिनी लष्करी शिक्षण घेणार आहेत. पण सिओनानमधल्या छावणींतल्या भगिनींचा आंकडा लौकरच १००० पर्यंत जाईल असा मला विश्वास आहे. थायलंड आणि ब्रह्मदेश इथेंही महिलांना लष्करी शिक्षण देणाऱ्या छावण्या सुरू करण्यांत आल्या आहेत. पण सिओनानची छावणी ही आमची मध्यवर्ती आणि मुख्य छावणी आहे. या मध्यवर्ती छावणींतून निदान एक हजार तरी भावी झांशीवाल्या राण्या तयार होऊन बाहेर पडतील अशी मी आशा करतों.

## आपल्या थैलीची गांठ सोडा.

ता. २५ ऑक्टोबर १९४३ रोजीं भरलेल्या अखिल मलाय चेट्टियर आणि हिंदी व्यापारी परिषदेपुढें केलेलें भाषण.

११

मित्रहो, मलायाच्या सर्व भागांतून या परिषदेसाठीं इथें उपस्थित झालेल्या आपणां सर्व बंधुभगिनींचें मी प्रथम अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. या परिषदेंत भाग घेण्यासाठीं आपण आलां आहांत तेव्हां ही परिषद महत्त्वपूर्ण ठरेल असा मला विश्वास वाटतो. आमच्या उदात्त कार्याशीं एकनिष्ठ राहण्याचीं अनेक आश्वासनें आम्हांला मिळालेलीं आहेत. त्या निष्ठेची कसोटी आज या परिषदेंत लागणार आहे.

आपल्यापुढें एकादें लांबलचक भाषण करण्याचा माझा उद्देश नाहीं. कारण अशा लांबलचक भाषणांची जरुरी नाहीं. माझी आपल्याला एवढीच विनंति आहे कीं, हिंदुस्थानच्या दास्यमुक्ततेची जबाबदारी आपल्या शिरावर येऊन पडली असती तर आपण स्वतः काय केलें असतें याची आपण प्रत्येकजण

जाणीव बाळगा. हिंदुस्थान स्वतंत्र करण्याची जबाबदारी पूर्व आशियामधल्या प्रत्येक हिंदी रहिवाशाच्या शिरावर येऊन पडलेली आहे आणि त्या प्रचंड जबाबदारीची जाणीव आपल्याला झाली आहे असा मला विश्वास वाटतो.

जेव्हां एकादी सेना रणांगणावर जाऊन उभी रहाते तेव्हां तिथें लढण्याची आणि लढाई जिंकण्याची जबाबदारी या सेनेमधल्या सर्वांवर सारखीच पडते; मग लढणारी व्यक्ति अधिकारी असो अथवा साधा शिपाई असो. ज्या सेनेमधला प्रत्येक सैनिक आपलें कर्तव्य चोखपणें बजावणारा असतो तीच सेना अंतीं विजयी होते. पूर्व आशियांतली हिंदी जनता ही आज एक सेना झालेली आहे आणि तिला आज लढाई करावयाची आहे आणि ती जिंकावयाचीही आहे हें आपण लक्षांत ठेवा. आघाडीवरच्या प्रत्येक सैनिका-प्रमाणेंच पूर्व आशियांतल्या प्रत्येक हिंदी रहिवाशावरसुद्धां एक मोठी जबाब-दारी येऊन पडलेली आहे. आपल्यामध्यें कांहीं सधन आहेत, कांहीं निर्धन आहेत हें मला माहीत आहे. त्याचप्रमाणें आपल्यामध्यें कांहीं सुशि-क्षित आहेत, कांहीं अशिक्षित आहेत, पण कांहींही असलें तरी आपण ही गोष्ट लक्षांत ठेवा कीं, कर्तव्यपालनाच्या बाबतींत आपण सर्व सारखेच आहांत. पूर्व आशियांतल्या प्रत्येक हिंदी रहिवाशानें आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे, असें माझें आपल्याला सांगणें आहे.

सैन्यांत एकाद्या इसमाची अधिकारी म्हणून नेमणूक होते आणि इतरांना बरोबर घेऊन स्वतः पुढें चाल करून जाणें हें त्याचें अशा वेळीं कर्तव्य ठरतें. पूर्व आशियामध्यें सुरू केलेल्या आमच्या या संग्रामांत सिओनानला फार महत्त्व प्राप्त झालें आहे. हिंदी स्वातंत्र्यसंघाची मुख्य कचेरी इथें आहे. हिंदी राष्ट्रीय सेनेचें मुख्य ठाणेंही इथेंच आहे आणि आझाद हिंदचें कालपरवां स्थापन झालेलें तात्पुरतें सरकारही इथेंच स्थापन झालें. सिओनान हा एका-काळीं ब्रिटनचा किल्ला होता पण आज तिथें पूर्व आशियांतील हिंदी स्वातं-त्र्याच्या चळवळीचें मुख्य ठाणें आहे.

एकाद्या सेनाविभागाचा सेनापति आणि त्याचे सैनिक यांच्यामध्यें जें नातें असतें तेंच नातें सिओनान आणि पूर्व आशियांतील इतर ठिकाणें यांच्यामध्यें आज निर्माण झालेलें आहे. लढाईंत यश मिळण्यासाठीं प्रत्येक सैनिकानें आपली कामगिरी चोख बजावली पाहिजे हें तर खरेंच, पण हें यश जेवढें सैनिकांवर अवलंबून असतें तेवढेंच तें सेनापतीच्या योग्य मार्गदर्शनावर आणि त्यानें आंखलेल्या योजनेवरही अवलंबून असतें.

अर्थात् आपल्याला आतां हें समजून आलें असेलच कीं, सिओनानमध्यें जो ध्वनि उमटेल त्याचाच प्रतिध्वनि पूर्व आशियांत सर्व ठिकाणीं होईल; इथें आपण ज्या पद्धतीनें आपल्या कार्याचा श्रीमन्महा करूं त्याच पद्धतीचें अनुकरण पूर्व आशियांत सर्वत्र होऊं लागेल. पूर्व अशियांतील हिंदी लोकांना जी कामगिरी पार पाडावयाची आहे ती कोणत्या प्रकारें पार पाडली जावी हें दाखविणारा धडा सिओनाननें घालून दिला पाहिजे. अर्थात् तुमच्यावरची जबाबदारी मोठी आहे आणि पूर्व आशियांतल्या इतर ठिकाणांना तुम्हीच प्रेरणा देणार आहांत हें तुम्हीं लक्षांत ठेवणें जरूर आहे.

असें महत्त्व तुम्हाला प्राप्त झाल्याबद्दल तुम्ही स्वतःच आपले आभार माना, आणि त्याच वेळीं परचक्रासारखी एकादी आपत्ति निर्माण झाली असती तर स्वतंत्र हिंदी सरकारनें अशा वेळीं काय केलें असतें याचाही आपण विचार करा. आपण असें धरून चाला कीं, हिंदुस्थान आज स्वतंत्र आहे आणि परका शत्रु त्याच्यावर चालून येण्याचें संकट आज ओढवलें आहे अशा परिस्थितींत स्वतंत्र हिंदी सरकारनें काय केलें असतें ? सर्वस्व संघटनेलाच या सरकारनें हात घातला नसता काय ? कोणत्याही स्वतंत्र राष्ट्राचें अशा प्रसंगींचें हें कर्तव्यच असतें. तेव्हां ही गोष्ट नीट लक्षांत ठेवून स्वातंत्र्य-संपादनाच्या आणि तें टिकविण्याच्या आपल्या महान् कार्यांत आपलें स्वतःचें कर्तव्य कोणतें आहे याची आपण जाणीव बाळगा असें माझें आपल्याला सांगणें आहे.

युद्धपरिस्थिति निर्माण झाली म्हणजे कोणाही स्वतंत्र राष्ट्रांत कोणत्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यांत येतो याचाही आपण विचार करा. आम्ही जशा आतांपर्यंत आमच्या सभा भरवीत आलों आहोंत आणि अर्ज-विनंत्या करीत आहोंत तसेंच ह्या राष्ट्रांनींही केलें असतें काय ? मुळींच नाहीं. उलट विशिष्ट वयोमर्यादा असलेल्या राष्ट्रांतल्या धडधाकट पुरुषांनीं, विशिष्ट दिवशीं, विशिष्ट ठिकाणीं, विशिष्ट वेळीं येऊन हजर राहावें असाच हुकूम कोणाही स्वतंत्र सरकारनें काढला असता. कोणतीही कुरकूर न करतां आपखुषीनें हा हुकूम मान्य करणें प्रजाजनांना भाग पडलें असतें, कारण आपल्या स्वातंत्र्या-साठीं हा त्याग करणें क्रमप्राप्तच आहे, ह्याची जाणीव स्वतंत्र राष्ट्रांतल्या प्रजाजनांना नेहमींच असते आणि आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं स्वतंत्र सरकारला ज्या वेळीं पैशाची आवश्यकता भासते त्या वेळीं ही सभा भरवून भिक्षा वाढा असा पुकारा करीत तें वणवण फिरत नसतें.

उलट, आपल्या युद्धकार्यासाठीं लागणाऱ्या खर्चाचें अंदाजपत्रक तयार करून, त्यासाठीं कोणत्या मार्गानें पैसा उभा करतां येईल याचा तें सरकार विचार करतें आणि प्रजाजनांची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन आवश्यक ते कर सरळ सरळ लादूं लागतें. कोणत्याही स्वतंत्र देशांत, सैनिक म्हणून लष्करांत दाखल होण्यास अथवा युद्धकार्यासाठीं लादलेला कर देण्यास कोणत्याही नागरिकाला नकार देतां येईल काय ? असा माझा आपल्याला सवाल आहे. हिंदुस्थान अजून स्वतंत्र झालेला नाहीं. पण आम्ही स्वतंत्र आहोंत; मनानें स्वतंत्र आहोंत, वृत्तीनें स्वतंत्र आहोंत आणि तात्पुरतें सरकार स्थापन केल्यामुळें हिंदी प्रजाजन या नात्यानेंही आम्ही स्वतंत्र झालों आहोंत.

हिंदुस्थान स्वतंत्र करण्याची आणि हिंदुस्थानचें स्वतंत्र सरकार जन्माला घालण्याची जबाबदारी आतां आपण स्वीकारली आहे. स्वातंत्र्याला आपण पात्र आहोंत असें जर आपल्याला वाटत असेल, स्वातंत्र्यसंपादनाची तळमळ जर खरोखरच आपल्याला लागून राहिली असेल, तर राष्ट्रीय आपत्तीच्या वेळीं,

स्वतंत्र हिंदुस्थानांत, आपल्या स्वतंत्र सरकारच्या अंमलाखालीं आपण जसे वागलों असतों, जें कार्य केलें असतें, तसेंच या प्रसंगींही आपण सरळ सरळ वागलें पाहिजे, तेंच कार्य केलें पाहिजे. स्वतंत्र हिंदी सरकारच्या हांकेला ओ देऊन स्वतंत्र हिंदुस्थानांत आपण जें केलें असतें तेंच कार्य आज तावडतोब करणें आपलें पवित्र कर्तव्य आहे. जर्मनींतल्या आणि जपानमधल्या प्रजाजनांकडे दृष्टि फेंका आणि या देशांतल्या प्रजाजनांची सर्व साधनसंपत्ति त्यांच्या सरकारांनीं कशी संघटित केली आहे ह्याचें निरीक्षण करा. स्वतःच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें हें जेव्हां एकाद्या सरकारचें कर्तव्य होऊन बसतें तेव्हां वाटेल तें मोल द्यावें लागलें तरी तें देऊन हें कर्तव्य बजावणें त्याला क्रमप्राप्त असतें आणि त्यासाठीं देशांतील सर्व साधनसंपत्तीचें बळ एकवटावें लागतें.

कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास कोणताही देश युद्धपरिस्थितींत सांपडला असतां खासगी मालमत्ता ही अस्तित्वांतच राहूं शकत नाहीं. अशा आणीबाणीच्या परिस्थितींत प्रजाजनांचे प्राण आणि त्यांची मालमत्ता यावर सरकारचीच संपूर्णपणें हुकमत चालते. आम्ही सुद्धां स्वतंत्र प्रजाजन आहोंत आणि आमचेंही एक स्वतंत्र सरकार आहे. तुमची संपत्ति आणि तुमची मालमत्ता ही तुमची स्वतःची आहे असें जर आपण समजत असाल तर तो तुमचा भ्रम आहे. राष्ट्र युद्धांत गुंतलें असल्यामुळें तुमचे प्राण आणि तुमची मालमत्ता राष्ट्राची झाली आहे. तुमचे प्राण आणि तुमची मालमत्ता तुमची स्वतःची नसून ती हिंदुस्थानच्या, एकट्या हिंदुस्थानच्याच मालकीची झाली आहे.

कोणत्याही साधनानें आणि कोणतेंही मोल देऊन आपल्याला आपलें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें पाहिजे आणि युद्धपरिस्थितींत सांपडलेले आपण स्वतंत्र प्रजाजन आहोंत हें साधें सत्य आपण ओळखलेंत तर आपलें स्वतःचें असें आपल्याजवळ कांहींही नाहीं; आपले प्राण, आपली मालमत्ता,

आपली सर्व चीजवस्त आपली स्वतःची नाहीं ह्याची आपणांस जाणीव होईल असा मला भरपूर विश्वास वाटतो.

हें सार्वसुधें सत्य आपल्याला गळीं उतरवून घ्यावयाचें नसेल तर तुम्हां पुढें स्पष्ट दिसणारा असा दुसरा मार्ग आहे. स्वतंत्र होऊन, स्वतंत्र सरकारच्या अंमलाखालीं नांदणारे स्वतंत्र प्रजाजन या नात्यानें आपलें कर्तव्य जर तुम्हांला पार पाडावयाचें नसेल, जर तुम्हांला स्वातंत्र्य नको असेल आणि त्या स्वातंत्र्याचें मोल देण्याची जर तुमची तयारी नसेल तर एकच मार्ग तुमच्या पुढें आहे आणि तो मार्ग इंग्लिश लोकांनीं स्वीकारलेला आहे.

राज्यकर्ते या नात्यानें त्यांनीं इथें एकदां वास्तव्य केलें होतें. पण आतां त्यांना तुरुंगाखेरीज दुसरें कोणतेंच स्थान शिल्लक राहिलेलें नाहीं. तुमची इच्छा असेल तर तुम्हीही तुरुंगाचा रस्ता धरा आणि इंग्लिश लोकांना सोबत करा. पण हें लक्षांत ठेवा कीं, जेव्हां हें युद्ध समाप्त होऊन हिंदुस्थान स्वतंत्र होईल तेव्हां स्वतंत्र हिंदुस्थानांत तुम्हांला स्थान असणार नाहीं. तुमची कींव करण्याची बुद्धि हिन्दी सरकारला झाली तर हें स्वतंत्र सरकार जास्तींत जास्त औदार्य दाखविण्यासाठीं फार फार तर तुम्हांला तिसऱ्या वर्गाचीं इंग्लंडचीं तिकिटें काढून देईल आणि हिंदुस्थानच्या पवित्र भूमीवरून इंग्लंडमध्यें तुम्हीं निघून जावें अशी व्यवस्था करील.

मलायामधील कांहीं सधन हिंदी लोकांची अशी तक्रार माझ्या कानीं आली आहे कीं, मीं त्यांचा छळ चालविला आहे. या लोकांबरोबर मला खुली भाषा करावयाची आहे. कारण त्यानंतर आपला मार्ग त्यांना खुला राहील. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यासाठीं आपल्याच खिशाला खार लागूं नये म्हणून आपलें राष्ट्रीयत्व बदलण्याच्या विचारांत कांहीं सधन हिंदी लोक आहेत असेंही मीं ऐकलें आहे. त्याचप्रमाणें आपली मालमत्ता परकीयांच्या मालमत्तेचा ताबा घेणाऱ्या रखवालदाराच्या हवालीं करून युद्धसमाप्तीनंतर तिच्यावर हक्क सांगण्याचाही कांहींचा विचार आहे ही गुणगुण मला लागलेली आहे.

त्याचप्रमाणें कांहीं तरी देण्याचें अभिवचन देऊन म्हणजे समजा, एखाद्या लाखाची देणगी जाहीर करून नंतर लहान लहान हप्त्यांची कालगत लावून ती देत राहाण्याचा आणि आज उद्यां आम्ही ब्रह्मदेशांत व तिथून हिंदुस्थानांत जाऊं या आशेवर झुलवत राहून ती चुकविण्याचा कांहीं लोकांचा डाव आहे असेंही मला समजलें आहे.

पण हे त्यांचे केविलवाणे प्रयत्न व्यर्थ आहेत आणि आम्हांला फसवून स्वतःच्या कर्तव्याकडे डोळेझांक करणें ही गोष्टही त्यांना वाटते तेवढी सोपी नाहीं. आम्ही सिओनानमध्यें असूं, ब्रह्मदेशांत असूं अथवा खुद्द हिंदुस्थानांतही असूं. पण आमची संस्था इथेंच राहणार आहे आणि हिंदुस्थान पूर्णपणें स्वतंत्र होऊन शेवटचा इंग्लिशमन तिथून हांकलण्यांत येईपर्यंत इथेंच राहून ही संस्था आपलें कार्य चालू ठेवणार आहे.

प्रत्येक हिंदी इसमाला, मग तो हिंदु असो, शीख असो, मुस्लीम असो अथवा ख्रिश्चन असो; माझी त्याला अशी विनंति आहे कीं आपल्या कर्तव्यपालनांत तूं कुचराई करूं नको. आपलें कर्तव्य कोण बजावीत आहेत आणि त्यांत अंगचोरपणा कोण करीत आहेत हें मला माहीत आहे.

हिंदुस्थान मला दास्यमुक्त करावयाचा आहे आणि काय वाटेल तें करून आणि वाटेल तें मोल देऊन मी तो स्वतंत्र करीनच. तुमची इच्छा असो वा नसो, तुम्हांला आवडो, वा न आवडो ही जबाबदारी तुम्हालाही स्वीकारली पाहिजे याची तुम्ही जाणीव ठेवा अशी माझी आपल्याला विनंति आहे. जर तुम्हाला टाळाटाळ करायची असेल तर आपल्याला स्वातंत्र्य नको असें आपण स्पष्टपणें सांगा. तसें सांगितलेंत म्हणजे मीं पूर्वी सांगितलेला मार्ग तुम्हांला मोकळा राहील.

जोंपर्यंत आपण हिंदी आहोंत असें तुम्ही म्हणवून घेतां आणि पूर्व आशियांत हिंदी इसम असा हक्क सांगून जोंपर्यंत तुम्ही पैसे मिळवीत राहतां तोंपर्यंत स्वतंत्र हिंदी जन म्हणून जी जबाबदारी तुमच्यावर येऊन पडलेली

आहे ती तुम्हांला टाळतां येत नाहीं. आपलें कर्तव्य आपण पार पाडावयाचें कीं नाहीं हा प्रश्न आपल्या खुषीचा आहे असें आपण समजूं नका.

सिओनानमध्यें यापूर्वी केलेल्या माझ्या भाषणांत मी अखेरची विनंति करीत आहें असें मी म्हणालों होतों. पुनः विनंति करण्यासाठीं मी आज इथें उभा राहिलेलों नाहीं अथवा भिक्षेकरी म्हणूनही मी तुमच्यापुढें हात पसरीत नाहीं. तुमच्या प्राणांवर आणि तुमच्या मालमत्तेवर संपूर्ण हुकमत असलेल्या तात्पुरत्या आझाद हिंद सरकारचा प्रतिनिधि म्हणून आज मी तुमच्यापुढें उभा आहें.

मित्रहो, उगीच वायफळ बडबड करून पोकळ धमक्या देणाऱ्यांपैकीं मी नाहीं. मी जें कांहीं बोलतों, तें पूर्ण विचार करूनच बोलतों. आणि मी जें बोलतों तोच माझ्या बोलण्याचा आशय असतो. मनांत एक आणि बोलण्यांत भलतेंच असें माझें धोरण नाहीं, हें माझ्या शत्रूंनाही ठाऊक आहे. हिंदी स्वातंत्र्य कोणत्याही मार्गानें आणि कोणतेंही मोल देऊन आपल्याला संपादन करावयाचें आहे आणि त्यासाठीं शक्य तर खुषीनें अथवा अवश्य तर सक्तीनें आपल्याला आपली सर्वस्व संघटना केली पाहिजे असें मी बोलून चुकलों आहें. मी तुम्हाला पुनः एकदां बजावून सांगतों माझ्या या बोलण्यांतला शब्दन् शब्द पुरा आशय लक्षांत घेऊनच मी वापरला आहें.

हें मी परोपरीनें आपणास सांगत आहें याचें कारण एवढेंच कीं, आपण कोणत्याही प्रकारच्या भ्रमांत राहूं नये; खुषीनें सहकार्य करण्याची पूर्ण संधि आपल्याला मिळाली नाहीं असें आपल्याला पुढेंमागें म्हणतां येऊं नये. आपण जर खुषीनें पुढें सरसावलात तर हा मार्ग आपल्या दृष्टीनें मानाचा ठरेल आणि मलाही तुमचा अभिमान वाटेल. पण जर तुम्ही खुषीनें पुढें येत नसाल तर केवळ तेवढ्याच कारणासाठीं कांहीं गुलाम राहाण्याची आमची तयारी नाहीं.

आपली संपत्ति मिळविण्यासाठीं आपल्याला पुष्कळ वर्षें घालवावीं लागलीं आणि आपल्या बऱ्याच मुलाबाळांचीही आपल्याला तरतूद करून ठेवावयाची आहे असें म्हणणारी कांहीं मूठकर मंडळी आहेत हें ऐकून मला खरोखरच आश्चर्य वाटतें. केवळ या कारणामुळेंच जर त्याग करण्याची त्यांची तयारी नसेल तर स्वतंत्र हिंदुस्थानांत, स्वतंत्र सरकारच्या अमदानींत अशा लोकांची काय अवस्था झाली असती याची आपण कल्पना करा. त्यांना शत्रु लेखून शत्रू-प्रमाणेंच वागविण्यांत आलें असतें याची मला खात्री आहे.

एक तर मित्र म्हणून अथवा शत्रु म्हणून आपल्याला राहातां येईल. ब्रिटिश लोक हेच तेवढे आमचे शत्रु आहेत असें समजूं नका. ब्रिटिशांना जो जो कोणी मदत करीत आहे, आमच्या कार्याला मदत करण्याची ज्या ज्या कोणाची तयारी नाहीं, तो तो प्रत्येक इसम आमचा शत्रु आहे. कारण जीवनमरणाचा लढा लढण्यांत आज आम्ही गुंतून गेलों आहोंत.

हिंदी राष्ट्रीय सेनेंत खुषीनें सामील होऊन आवश्यक तें शिक्षण आज घेत असलेल्या लोकांकडे पाहा. हिंदुस्थान स्वतंत्र झालेला पाहाण्यास आपल्या-पैकीं कितीजण जिवंत राहतील, याची त्यांना कल्पना नाहीं. रक्ताचा अखे-रचा बिंदु आपल्याला सांडला पाहिजे, या एकाच विचारानें ते आज तयारी करीत आहेत. स्वतंत्र हिंदुस्थानांत प्रवेश करूं अथवा मार्गांतच प्राणत्याग करूं या निर्धारानें त्यांची तयारी होत आहे. माघार घेण्याचा कार्यक्रम त्यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर नाहीं. हा माघार घेण्याचा कार्यक्रम फक्त वेव्हेल आणि त्यांची सेना यांच्यासाठींच राखून ठेवलेला असूं द्या.

ब्रिटिश सरकारनें त्याला बढती देऊन हिंदुस्थानचा व्हाइसरॉय केलें आहे. कारण माघारीमागून माघार घेत राहून स्वतःचे प्राण बचावण्याच्या विद्येंत आपण पारंगत आहोंत हें त्यानें सिद्ध केलें आहे. माघार घेऊन आपला जीव बचावण्याची योजना हिंदी राष्ट्रीय सेनेजवळ नाहीं. एकतर विजय प्राप्त करून घेऊं अथवा रक्ताचा अखेरचा बिंदु सांडून मार्गांतच प्राणत्याग करूं, या

निर्धारानें हिंदी राष्ट्रीय सेनेंतले सैनिक तयार होत असतां श्रीमंत लोक असे विचारीत आहेत कीं, सर्वस्व संघटना याचा अर्थ काय होतो ? मिळकती-पैकीं १० टक्के कीं ५ टक्के ? ही टक्केवारीची भाषा जे लोक बोलत आहेत त्यांना मला असें विचारावयाचें आहे कीं, तुम्ही या लढाईत फक्त १० टक्के रक्त सांडून बाकीचें रक्त सुरक्षित ठेवा असें आम्हीं आमच्या सैनिकांनासुद्धां सांगावें काय ?

लष्करांत दाखल झालेल्या आमच्या तरुणांमध्यें कोणतें तेज उसळलेलें आहे, आणि आमच्या झेंड्याखालीं गोळा झालेल्या माझ्या भगिनींमध्यें कोणतें चैतन्य स्फुरण पावलेलें आहे, हें तुम्ही आपल्या डोळ्यांनींच पाहात आहां. सुदैवानें आपलें मनुष्यबळ कमी नाहीं. आम्हांला मिळालेला पाठिंबा एवढा जबरदस्त आहे कीं, दीर्घकाळ युद्ध चालवावें लागलें तरी आम्हांला सैनिकांची वाण पडणार नाहीं.

असाच पाठिंबा, पैसा आणि साधनसामुग्री या स्वरूपांत आम्हांला मिळाला पाहिजे. आम्ही सर्वच लोक दरिद्री असतों तर परक्यांची मदत आम्हीं मागणें रास्त ठरलें असतें, पण आमच्यामध्यें श्रीमंत लोकसुद्धां बरेच आहेत आणि आमच्या परक्या दोस्तांना ही गोष्ट माहीत आहे. आमच्या स्वतःच्या लोकांकडेच भरपूर द्रव्यबळ असतां मदतीसाठीं आम्हीं इतरांपुढें हात पसरणें आम्हांला लांछनास्पद आहे.

आपल्या प्राणांवर उदार होऊन ते अर्पण करण्यासाठीं आमच्या बंधु-भगिनी प्रचंड संख्येनें पुढें येत असतां, प्राण देण्याची ज्यांची इच्छा नाहीं अशा लोकांनीं आपल्याजवळचा थोडाफार पैसाअडकाही देण्यास कां कुरकुर करावी हेंच मला समजत नाहीं. पैसा पैसा म्हणजे काय गोष्ट आहे? प्राणाशीं तुलना करतां पैसा म्हणजे कःपदार्थ आहे. स्वतःजवळ असलेले एक कोटी रुपये दे अथवा तुझे प्राण दे असें एकाद्याला एकाद्या परक्या सरकारनें

सांगितलें, तर स्वतःचे प्राण न देतां तो आपल्या पैशांवर पाणी सोडायला खात्रीनें तयार होईल.

स्वतःचे प्राण देण्यासाठीं ज्याप्रमाणें तरुण लोक पुढें आले आहेत त्याचप्रमाणें स्वतःचें सर्वस्व अर्पण करण्यासाठीं गरीब लोकही स्वखुषीनें आणि उत्साहानें पुढें येत आहेत. पहारेकरी, धोबी, न्हावी, छोटे छोटे दुकानदार आणि गवळी अशा लोकांचा गरीब हिन्दी समाज आपल्याजवळ असेल नसेल तें देऊन आम्हाला मदत करीत आहे.

आणि हा त्याग करूनही कांहीं लोकांनीं स्वयंसेवक म्हणून सुद्धां काम करण्याची आपली तयारी दाखविलेली आहे. "सर्वस्व संघटना" म्हणजे काय, असा प्रश्न माझे कांहीं स्नेही मला करीत असतात. स्वतःजवळ असलेली सर्व मालमत्ता अर्पण करून आपले प्राणही अर्पण करण्यासाठीं स्वखुषीनें पुढें आलेल्या या लोकांनींच 'सर्वस्व संघटना' या शब्दाचा अचूक अर्थ कोणता होतो हें स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे.

या गरीब लोकांपैकीं कांहीं लोक माझ्याकडे आले आणि आपल्याजवळची सर्व रोकड त्यांनीं मला दिली. पण एवढेंच करून ते थांबले नाहींत, तर आपल्या आयुष्याची कमाई असलेलें आपलें 'सेव्हिंग्ज बँक बुक' सुद्धां त्यांनीं माझ्या हवालीं केलें. हीच वृत्ति दाखवून, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-संपादनासाठीं "हें घ्या माझें बँक बुक" असें मला सांगणारा एकही सधन इसम मलायामधल्या हिंदी रहिवाशांमध्यें नाहीं काय ?

त्यागाची शिकवण राष्ट्र या नात्यानें हिंदी जनतेला मिळालेली आहे आणि त्यागाचे आदर्शही तिच्यासमोर उभे आहेत. हिंदूंमध्यें संन्यासी आणि मुसलमानांमध्यें फकीर या त्यागाचीं चालतीं बोलतीं उदाहरणें आहेत. आपल्या इतिहासामध्यें धर्मचिंतनासाठीं वानप्रस्थाश्रम स्वीकारून फकिरी बाण्यानें आपलें उर्वरित आयुष्य कंठणाऱ्या अनेक राजे लोकांचींही उदाहरणें आहेत.

३८ कोटी मानव जीवांना दास्यमुक्त करण्यापेक्षां अधिक महान्, अधिक उदात्त अथवा अधिक पवित्र असें दुसरें कोणतेंही कार्य असूं शकेल काय ? आणि अशा या महान् कार्यासाठीं "हें माझें बँक बुक" असें म्हणत एकही सधन इसम पुढें येणार नाहीं काय ?

प्राणार्पण करून त्याग करण्याएवढी आपली कुवत नसेल कदाचित् पण "आमचे प्राण तेवढे वांचवा, बाकी सर्व कांहीं आम्ही आपल्याला देतों" असें सांगणारे थोडेसे लोकसुद्धां आपल्यामधून कां निघूं नयेत हेंच मला कळत नाहीं.

आतां यानंतर आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारचा कार्यक्रम मी आपल्या समोर ठेवतों. हा कार्यक्रम इतर कोणत्याही सरकारप्रमाणें आम्हांला आस्ते आस्ते, धीरे धीरे आणि पद्धतशीरपणें पार पाडावयाचा आहे. मलायामधील हिंदी रहिवाशांची संपात्ति युद्धपूर्व कालांतील अंदाजाप्रमाणें १०० कोटी रुपये एवढी भरते आणि त्यानंतर वस्तूंच्या किंमती वाढल्या आहेत हेंही आपल्याला ठाऊक आहे. सामान्यतः कुठलेंही सरकार आपलें वार्षिक अंदाजपत्रक तयार करतें आणि अवश्य झालें तर आपलें पुरवणी अंदाजपत्रकही त्याच वर्षी पुढें मांडतें. माझाही तसेंच करण्याचा बेत आहे.

सर्वस्व संघटनेचा अर्थ लक्षांत घेऊन एकतर आम्हाला खुषीनें मदत करण्यासाठीं आपल्याला पुढें आलें पाहिजे अथवा युद्ध समाप्त होईपर्यंत जी मागणी वेळोवेळीं आम्ही आपल्याकडे करीत राहूं ती आपल्याला पुरी करीत आलें पाहिजे.

मलायाकडे मी १० कोटी रुपयांची पहिली मागणी करीत आहें. मलायामधील हिंदी लोकांच्या संपत्तीपैकीं सुमारें १० टक्के एवढी ती भरते आणि आजच्या या परिषदेला मलायामधील पुष्कळ सधन लोक हजर असल्यामुळें इथल्याइथें निदान १ कोटी रुपये तरी तावडतोब गोळा होतील अशी माझी अपेक्षा आहे. या एका महिन्यांत मलायामधून हे १० कोटी रुपये मला मिळूं शकतील अशी मी आशा करतों.

मुक्रिंगला विज्ञप्ति

ता. २१ नाव्हेंबर १९४३ रोजीं शांघाय येथून ध्वनि-क्षेपित केलेलें भाषण.

२०

शांघायचें एकलीकरण होऊन त्याचा कारभार ज्या वेळीं एका म्युनिसि-पालिटीच्या सत्तेखालीं, एका सरकारच्या अंमलाखालीं आणि एका मेयरच्या नेतृत्वाखालीं आला, त्या वेळीं मी टोकियोमध्यें होतों. आतां शांघाय तिभंग-लेलें राहिलें नाहीं. एकच शांघाय आतां अस्तित्वांत आलें आहे. भावी घट-नांचें हें प्रसादचिन्ह आहे असें मी समजतों. चीनचें अखिल राष्ट्रसुद्धां आतां एका सरकारच्या आणि एका नेत्याच्या नेतृत्वाखालीं एकत्रित होण्यास फार विलंब लागणार नाहीं असा मला विश्वास वाटतो.

इथून आतां मी दाक्षिणेंतल्या माझ्या मुख्य ठाण्याकडे जाणार आहें. तिथून लौकरच ब्रह्मदेशांत जाऊन मी हिंदुस्थानची सरहद्द गांठणार आहें.

ब्रह्मदेशांत जाऊन दाखल हो अशी कर्तव्याची हांक आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याकरितां हिन्दी सरहद्दीवर जाऊन उभें राहिलों कीं तिथें ब्रिटिशांच्या सैनिकांबरोबर आणि कदाचित् चिनी सैनिकांबरोबरसुद्धां आम्हाला लढावें लागेल हें मला माहीत आहे; पण चिनी सैनिकांनीं ब्रिटिशांसाठीं हिंदुस्थानांत कां लढावें आणि हिंदुस्थानवरचें आपलें वर्चस्व कायम ठेवण्यासाठीं ब्रिटिशांना कां मदत करावी हें मला कळत नाहीं. लोकांचें सरकार असणाऱ्या आणि स्वतःला राष्ट्रीय सरकार असें म्हणवून घेत असणाऱ्या सरकारनें आपल्याशीं मित्रत्वाचें नातें ठेवणाऱ्या एका देशांत आपलें सैन्य पाठवून, एका परक्या सत्तेला त्या देशांत आपलें वर्चस्व कायम ठेवण्यासाठीं कां सहाय्य करावें, हें कळणें खरोखरच अवघड आहे.

हिंदी जनतेला चीनबद्दल आणि चिनी जनतेबद्दल खरोखरच सहानुभूति वाटते. हिंदी कॉंग्रेसनें आणि हिंदी जनतेनें चुंकिंग सरकारला मदत केली आहे हें आपल्याला माहीत आहे. १९३८ सालीं मी कॉंग्रेसचा अध्यक्ष असतां चिनी जनता आणि चुंकिंगचें सरकार यांच्याबद्दल आम्हांला वाटणाऱ्या सहानुभूतीची खूण म्हणून हिंदी डॉक्टरांचें पहिलें वैद्यकीय पथक चुंकिंगला पाठविण्यांत आलें होतें आणि मीच ती सर्व व्यवस्था केली होती. त्यानंतर आमच्या सहानुभूतीचें दृश्यफल म्हणून औषधें, इतर वैद्यकीय सामुग्री आणि दुसरी कांहीं मदत आम्हीं चुंकिंगला वेळोवेळीं पाठवून दिली. ह्या आमच्या सदिच्छेची परत फेड चिनी सैनिक ब्रिटिशांच्या बाजूनें आमच्या विरुद्ध लढण्यासाठीं हिंदुस्थानांत पाठवून देऊन मार्शल चँग-कै-शेक यांना आणि त्यांच्या सरकारला करावयाची आहे कीं काय हें मला समजत नाहीं.

चुंकिंग सरकार आपले सैनिक हिंदुस्थानांत पाठवून देत असल्याचें पाहून मला अत्यंत खेद होतो. चुंकिंगबद्दल मला अत्यंत सहानुभूति वाटत आली आहे. पण चिनी सैनिक आमच्याबरोबर लढण्यासाठीं, ब्रिटिश साम्राज्यशाहीला मदत करण्यासाठीं हिंदुस्थानांत येतच आहेत. त्यामुळें मला असें म्हणावेसें

वाटतें कीं, कांहीं वर्षांपूर्वी जी परिस्थिति निर्माण होईल असें आम्हांला स्वप्नांतही कधीं वाटलें नव्हतें अशी पार अगदीं नवीनच परिस्थिति पूर्व आशियामध्यें आज निर्माण झाली आहे. पूर्व आशियामध्यें जपाननें आज नवें धोरण स्वीकारलें आहे आणि ब्रह्मदेशाच्या व फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याची घोषणा करून व स्वतंत्र हिंदुस्थानचें तात्पुरतें सरकार स्थापन होऊं देऊन या धोरणाचा आविष्कारही केला आहे. चीनच्या राष्ट्रीय सरकारबरोबर अलीकडे नवा तह करून शांतता प्रस्थापित झाल्यानंतर आपलें लष्कर काढून घेण्याचा आपला मनोदयही जपानच्या सरकारनें जाहीर केला आहे.

मी एक हिंदी राष्ट्रवादी असून क्रांतिकारक आहें. हिंदुस्थानच्या राष्ट्रकार्याशीं इमान राखणें हें प्रत्येक हिंदी इसमाचें जसें कर्तव्य आहे तसेंच चीनच्या राष्ट्रकार्याशीं एकनिष्ठ राहाणें हें प्रत्येक चिनी इसमाचें कर्तव्य आहे. तथापि बृहत् पूर्व आशियाचें युद्ध सुरू झाल्यापासून जपाननें जें धोरण प्रत्यक्ष अंमलांत आणलें आहे, तें पहातां माझ्या स्वतःच्या अनुभवावरून मी आपल्याला असें सांगूं इच्छितों कीं, पूर्व आशियामध्यें आज जी परिस्थिति निर्माण झालेली आहे ती चीनला आणि चिनी जनतेला लाभलेली एक सुवर्ण-संधीच आहे असें समजून चालण्यास मुळींच हरकत नाहीं.

राष्ट्रीय ऐक्य हा एकच प्रश्न चीनपुढें उभा आहे आणि अजूनही तो सुटलेला नाहीं. त्याव्यतिरिक्त चीनला जें कांहीं पाहिजे होतें तें जपानच्या नव्या धोरणामुळें त्याला पूर्वीच मिळून चुकलें आहे. पूर्व आशियांत मीं पुष्कळ प्रवास केला आहे आणि त्यामुळें आजच्या युद्धपरिस्थितीचा निष्कर्ष मी काढूं शकतों. हें युद्ध दीर्घ काल चालणार आहे आणि तें बिकट आहे हें मला माहीत आहे. तथापि मला असा विश्वास वाटतो कीं, या युद्धांत ब्रिटनचा पराभव होणार आहे. आमची बाजू न्यायाची आहे हेंच केवळ याचें कारण नाहीं; तर युद्धपरिस्थिति जपानला विशेष अनुकूल आहे हेंही

त्याचें आणखी दुसरें कारण आहे. ब्रिटनचा युद्धांत पराभव झाल्याशिवाय चीनमध्यें अथवा पूर्व आशियामध्यें शांतता नांदण्याचें नांवच नको.

एका नेत्याच्या नेतृत्वाखालीं चीनची संघटना होण्याचा दिवस फार दूर नाहीं. चीन आणि जपानमध्यें सन्मान्य तह होऊन जपान आपलें लष्कर चीनमधून काढून घेईल, चालू युद्धाचा शेवट होईपर्यंत शांततेसाठीं वाट पहाण्याचें आपल्याला मुळींच कारण नाहीं. शांतता प्रस्थापित करून चीनच्या राष्ट्रीय पुनर्घटनेचें आणि आर्थिक पुनरुज्जीवनाचें कार्य या युद्धकालांतच आपल्याला हातीं घेणें शक्य आहे.

# २१

दोन वर्षांपूर्वी, आजच्याच दिवशीं, पूर्व आशियाच्या इतिहासांत एक नवें प्रकरण सुरू झालें. पूर्व आशियाच्या नकाशावर त्या दिवसानंतर जे फेरफार झाले आणि पूर्व आशियांतल्या राष्ट्रांना ह्या स्थित्यंतराचें किती महत्त्व वाटतें हें सर्व परिचितच असल्यामुळे त्याची पुनरुक्ति मी इथें करीत नाहीं. या दूर परिणामी स्थित्यंतरांची पाहाणी आज मी एका वेगळयाच दृष्टिकोनांतून करणार आहें.

इतिहासाच्या अभ्यासानें आपल्याला असें दिसून येतें कीं, जगाच्या इतिहासांत जीं महत्त्वाचीं स्थित्यंतरें घडून आलेलीं आहेत त्यांचें स्वरूप एकाद्या लाटेसारखें आहे. ही लाट जोरानें पुढें जाते आणि जास्तींत जास्त प्रदेश

व्यापून टाकते. लाटेचा वेग कमी झाला कीं, ती मागें फिरते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें तर असें सांगतां येईल कीं, जगाच्या इतिहासांत जीं मोठीं स्थित्यंतरें झालीं आहेत तीं सर्व आक्रमक स्वरूपाचीं होतीं; विस्तारवादी आणि आकुंचन अथवा माघार ही त्यांची क्रमप्राप्त प्रतिक्रिया असे. ब्रिटिश साम्राज्याचा विस्तारसुद्धां याच न्यायानें झाला. ब्रिटनमधून मूळ प्रारंभ होऊन साम्राज्याच्या देशविस्ताराची धडक पूर्वेकडे दूरपर्यंत गेली. ब्रिटिश साम्राज्याची वाढ आणि विस्तार हीं गेल्या महायुद्धांत शिगेला पोंचलीं. पण त्यानंतरच्या दोन दशकांत या साम्राज्याच्या पौरुषाचा जोर ओसरला, क्षीण झाला. पूर्व आशियाचें युद्ध सुरू होतांच ब्रिटनच्या साम्राज्यविस्ताराची जी लाट हाँग-काँगच्या टोंकापर्यंत पसरली होती ती ओसरण्यास सुरुवात झाली. हाँगकाँग-पासून ब्रह्मदेशपर्यंत ब्रिटिशांच्या पराभवाची जी परंपरा सुरू झाली तिचें कारण हेंच आहे. आतां ह्यानंतर असा प्रश्न उपस्थित होतो कीं, "ही पिछे-हाट थोपवून धरणें शक्य आहे काय ? ह्या माघारीला पायबंद घालून कुजूं लागलेलें हें साम्राज्य मध्येंच वांचाविणें आतां शक्य होईल काय ?" ह्या प्रश्नाचें उत्तर इतिहास नकारार्थींच देतो. एकदां ऱ्हास सुरू झाला कीं पूर्व-नियोजित क्रमानेंच पुढच्या सर्व घटना घडूं लागतात. आणि त्या भवितव्या-ला अटकाव करणें जगांतल्या कोणत्याही शक्तीला शक्य नसतें. कॉन्स्टँटि-नोपलपासून व्हिएन्नाच्या प्रवेशद्वारापर्यंत एका काळीं पसरलेलें एवढें मोठें तुर्की साम्राज्य पण अखेर त्याला आपल्या मूळ स्थानालाच येऊन चिकटावें लागलें. रोगग्रस्त ब्रिटिश साम्राज्यालासुद्धां आतां माहेरीं परतणेंच भाग आहे. माझ्या मतें ही विधिघटना आहे. हा परमेश्वरी संकेत आहे.

पूर्व आशियांतलें हें युद्ध हिंदुस्थानच्या दृष्टीनें एक ईश्वरी वरदानच आहे. हिंदुस्थानमध्यें ब्रिटिशांची सजावट सुरू झाल्यापासून वायव्य सरहद्द ही एकच सरहद्द त्यांच्या डोळ्यांपुढें सतत नाचत होती. शत्रु आला तर तो याच बाजूनें येईल असा त्यांचा समज होता. कोणाही इंग्लिश सेनापतीला अथवा

इंग्लिश मुत्सद्याला हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीचा विचारच कधीं शिवला नाहीं. पूर्व सरहद्दीवर अकस्मात् येऊन शत्रू उभा राहील असें स्वप्नसुद्धां कोणा इंग्लिश इसमाला कधीं पडलें नाहीं. पण ह्या सर्व अपेक्षांना आणि अंदाजांना नाट लागून हिंदुस्थानची पूर्व सरहद्द आज खुली झाली आहे. हिंदुस्थानांत प्रवेश कसा होईल अथवा हिंदुस्थानांतून बाहेर जावयाला कसें मिळेल हें कोडें आतां शिल्लक राहिलेलें नाहीं. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, या पूर्व सरहद्दीमागें, तिला लागून जो प्रदेश आहे त्या प्रदेशांतल्या सुमारें ३० लक्ष हिंदी लोकांनीं पूर्व आशियांतल्या युद्धानें मिळवून दिलेल्या संधीचा अगदीं तत्परतेनें फायदा घेतला आहे. हिंदुस्थानची वायव्य सरहद्द खुली झाली असती तरी परदेशांत असलेल्या हिंदी लोकांना स्वदेशांतील आपल्या देशबांधवांना लष्करी आणि इतर कुमक पाठविणें शक्य झालें नसतें. हिंदुस्थानचे पूर्वेचे दरवाजे सताड उघडे टाकण्याची कामगिरी ज्या राष्ट्राला करतां आली पण त्याच राष्ट्रानें जगाच्या ह्या भागांतून अँग्लो-अमेरिकनांच्या सत्तेचें आणि त्यांच्या वर्चस्वाचें समूळ उच्चाटण करण्याचा निर्धार केला आहे. हिंदुस्थानचें हें सुदैवच म्हटलें पाहिजे.

कोणाला पटत असो अथवा नसो, माझी अशी पक्की खात्री झाली आहे कीं, ब्रिटिश साम्राज्य हें हिंदुस्थानांत आपली अखेरची लढाई देत आहे. कोणत्याही साम्राज्याचा अंत लढा दिल्याखेरीज झालेला नाहीं. अर्थात् ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत चिवटपणें लढतील आणि त्यासाठीं पृथ्वीच्या पाठीवर शक्य होईल तिथून सर्व प्रकारची मदत मिळवतील हें निसर्गसिद्धच आहे. पण इतिहासाचीं चक्रें सुरूच राहतील आणि त्यांना उलट गति मिळणें शक्य नाहीं. हिंदुस्थान सोडून जाणें ब्रिटिशांना अखेर भागच पडेल. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर पश्चिम आशियांतील दलित राष्ट्रें झोंपून राहातील असें समजण्याचा मूर्खपणा कोण करील ? ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं अथवा त्यांच्या दडपणाखालीं चेंगरून विव्हळत असलेलीं अरब, पर्शियन आणि इतर राष्ट्रें

ह्या संधीचा फायदा घेऊन आपल्या ब्रिटिश जुलूमशाहीविरुद्ध शस्त्र उपसतील. खरें सांगावयाचें तर हिंदुस्थानांतून ब्रिटिशांच्या पिछेहाटीला सुरुवात झाली ही इषाऱ्याची खूण केव्हां मिळते इकडेच मोठ्या उत्सुकतेनें तीं डोळे लावून बसलीं आहेत. इच्छेच्या पोटीं जन्माला आलेले हे माझे विचार आहेत, असें समजण्याचें कारण नाहीं. पश्चिम आशियांतील दलित राष्ट्रांच्या पुढाऱ्यांच्या आणि प्रतिनिधींच्या या युद्धकालांतच मीं भेटी-गांठी घेतल्या आहेत. जगांतल्या घडामोडींचें त्यांचें निरीक्षण किती सूक्ष्म आहे आणि ब्रिटिश साम्राज्य आणखीही कोसळून पडावें याची ते कशी वाट पाहात आहेत हें मला माहीत आहे. त्यांचे डोळे साफ उघडलेले आहेत आणि संधि मिळतांच तिचा फायदा घेतल्याशिवाय ते कधींही राहाणार नाहींत.

१९०५ मध्यें पाश्चात्यांच्या आक्रमणाला जपाननें यशस्वीपणें तोंड दिलें. गेलीं ३५ वर्षें आपलें सामर्थ्य संघटित करीत राहून, एका काळीं जवळ-जवळ आशिया व्यापून टाकणाऱ्या भरतीच्या या लाटेला जपाननें आतां मागें परतवून लावलें आहे. आक्रमणाच्या लाटेला आतां ओहोटी लागली आहे. जें जें कांहीं घडलें आहे तें तें सर्व दिसत असूनही ब्रिटिश साम्राज्याला अजून वांचवितां येईल असें ज्याला वाटतें त्याला खरोखरोखरच अर्भक समजलें पाहिजे. भूतकालीन साम्राज्यांची जी गत झाली तीच गत याही साम्राज्याची होणार आहे याबद्दल शंका नको.

१९४१ च्या डिसेंबरनें आशियाच्या इतिहासांत एक नवें प्रकरण सुरू केलें आहे. जगाच्या इतिहासांतही त्यामुळें एक नवें प्रकरण सुरू झालें आहे.

सिओनान, डिसेंबर ८, १९४३

# २२

आयरिश प्रजासत्ताक राष्ट्रांतील नागरिकांनीं मला पाठविलेल्या अभीष्टचिंतनपर संदेशाचा स्वीकार करतांना मला अत्यंत समाधान होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं करण्यांत आलेल्या ज्या ज्या लढ्यांचा आम्हीं हिंदी लोकांनीं सूक्ष्म अभ्यास केला आहे आणि ज्यांच्यामुळें आम्हांला स्फूर्ति मिळालेली आहे त्यांमध्यें आयर्लंडच्या स्वातंत्र्यसंग्रामाची बरोबरी करणारा असा संग्राम दुसरा कोणताच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आमच्यावर जुलूम-जबरदस्ती करून ज्यांनीं आमची पिळवणूक केली त्यांनींच आयरिश राष्ट्रालाही गांजलें. आमच्याप्रमाणेंच या राष्ट्रालाही त्याच क्रौर्याचा, त्याच पाशवी अत्याचारांचा आणि त्याच ढोंगीपणाचा अनुभव घ्यावा लागला. ब्रिटिश

साम्राज्यशाहीच्या उलट्या काळजाच्या धोरणामुळें आयर्लंडची फाळणी झाली आणि ह्या युद्धांत जर ही साम्राज्यशाही जगली तर हिंदुस्थानपुढेंही त्याच भवितव्याचें ताट वाढून येईल. १९१६ सालीं आयरिश प्रजासत्ताक-वाद्यांनीं आपलें तात्पुरतें सरकार स्थापन करून ईस्टर बंडाचा मुहूर्त केला. १९४३ सालीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-सैनिकांनींसुद्धां आपली अखेरची स्वातंत्र्याची मोहीम सुरू करण्यापूर्वीं आपलें तात्पुरतें सरकार स्थापन केलें आहे. आम्हां उभयतांमध्यें अनेक कारणांनीं असें साम्य असल्यामुळें आयरिश राष्ट्रामध्यें आणि आमच्यामध्यें जिव्हाळ्याचे व बंधुभावाचे संबंध निर्माण व्हावेत हें नैसर्गिकच आहे.

आयर्लंडच्या स्वातंत्र्यवीरांनीं ब्रिटिश जुलूमशहांबरोबर अतुल शौर्यानें, विलक्षण चिवटपणानें आणि कमालीचा त्याग करून शतकानुशतकें लढा दिला. सामर्थ्याच्या वरचढपणामुळें पुष्कळ वेळां त्यांना वांकावें लागलें पण ते मोडून पडले नाहींत. विशेषतः चालू शतकांत, उदात्त ध्येयवाद आणि हौतात्म्य यांची जी पायरी त्यांनीं गांठली, त्यामुळें स्वतःच्या जन्मसिद्ध हक्कासाठीं मानवानें चालविलेल्या लढ्यांतलें एक उज्ज्वल प्रकरण लिहिलें गेलें आहे. आयरिश वीरांनीं हिंदी देशभक्तांना स्फूर्ति देऊन कृतज्ञतेचें जें ऋण त्यांच्यावर केलें आहे त्याची परतफेड करणें कठीण आहे. खरें सांगावयाचें तर परक्या साम्राज्यशाहीविरुद्ध लढा देणाऱ्या ज्या लढवय्यांशीं व्यक्तिशः परिचय होण्याचें भाग्य मला लाभलें आहे त्यांपैकीं आयरिश प्रजासत्ताक राष्ट्रासाठीं इमानानें आणि बेडरपणें लढत राहाणाऱ्या शूर स्त्री-पुरुषांच्या स्नेहाची जपणूक मी जेवढ्या आपुलकीनें करीन तेवढ्या आपुलकीनें इतर कोणाच्याही स्नेहाची करणार नाहीं असें मीं म्हटलें तरी त्यांत किंचितही अतिशयोक्ति होणार नाहीं.

जगाच्या एका टोंकाला बसून माझ्या मातृभूमीच्या दास्यमुक्ततेची योजना मी करीत असतां, त्यासाठीं परिश्रम करीत असतां, आयरिश रिप-

ब्लिकन मित्रांचा स्नेहसंदेश मला मिळाल्यामुळें माझ्या अंतःकरणांत आनंदाची, स्फूर्तीची एक चमक उठून गेली. माझ्या अनेकविध व्यापांत मी व्यग्र झालों असतां हा संदेश आल्यामुळें पाचूप्रमाणें हिरव्यागार असलेल्या आयर बेटांत जे नाना स्नेहसंबंध मीं जोडले आहेत आणि स्वातंत्र्यसंपादनाप्रीत्यर्थ केलेल्या शौर्यशाली कृत्यांनीं पुनीत झालेलीं जीं अनेक पवित्र स्थळें मीं पाहिलीं आहेत त्यांचीं दृश्यें माझ्या मनश्चक्षूंसमोर ठळकपणें उभीं राहिलीं आहेत.

माझ्या आयरिश रिपब्लिकन मित्रांनीं मला पाठविलेल्या संदेशांतील शुभेच्छेचा मी त्यांना उलट अहेर करतों आणि प्रत्युत्तर म्हणून असा स्नेहसंदेश पाठवितों कीं, " आमची बाजू न्यायाची आहे. आमची मागणी आमच्या जन्मसिद्ध हक्कासाठीं आहे. त्याचें मोल द्यावयाची आमची तयारी आहे. अखेर विजय आमचाच होईल. स्वातंत्र्याचा दिवस उजाडेल ! "

सिंगापूर, २ नव्हेंबर, १९४३

# २३

हिंदुस्थानावर बाहेरून चाल करून येणाऱ्या प्रत्येक सैन्याचा रोख दिल्लीवर असावयाचा ही परंपरा अनादिकालापासून चालत आलेली आहे; मग तें सैन्य शत्रूचें असो अथवा मित्राचें असो. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचें स्वामित्व मिळविण्यासाठीं अनादिकालापासून प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक हिंदी सैन्याचें उद्दिष्ट दिल्ली गांठणें हेंच असे. दिल्लीच्या सभोंवार असणाऱ्या पठारांवर हिंदुस्थानचा इतिहास दगडांनीं लिहिलेला आहे असें म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. "ज्यांचें राज्य दिल्लीवर त्यांचें राज्य हिंदुस्थानवर" अशा अर्थाचें एक वचन हिंदी जनतेंत प्रचलित आहे. हिंदी कवींची मजल तर एका काळीं " दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा " असेंही म्हणण्यापर्यंत गेली होती.

रोमला जाण्यासाठीं चारी वाटा मोकळ्या सांपडतात पण दिल्लीचें तसें नाहीं. हिंदुस्थानच्या पश्चिमेकडून अथवा अचूक सांगावयाचें तर त्याच्या वायव्येकडूनच आतांपर्यंत प्रत्येकानें दिल्लीमध्यें प्रवेश मिळविला आहे. इतिहासाचा हा धडा आहे आणि १८५७ मध्यें हिंदुस्थान कायमचें अंकित करून घेतांना ब्रिटिशांनींही हाच धडा लक्षांत ठेवून तो चांगला पाठ केला. हिंदुस्थानांतील आपलें साम्राज्य सुरक्षित ठेवण्यासाठीं ब्रिटिशांनीं प्रथम अफगाणिस्थान व्यापण्याचा उद्योग आरंभिला. पण अफगाणिस्थानमध्यें आपली डाळ शिजणें शक्य नाहीं हें शेवटीं कळून आल्यानंतर, हिंदुस्थान व अफगाणिस्थान यांच्यामध्यें एक संरक्षक तटबंदी उभारण्यास त्यांनीं सुरुवात केली.

प्रचारकार्याचें महत्त्व ओळखण्याचा गुण ब्रिटिशांच्या रक्तांत आहे. सिंगापूरची तटबंदी ही अभेद्य आहे अशी ज्याप्रमाणें त्यांनीं बाहेरच्या जगाची अलीकडे समजूत करून दिली, त्याचप्रमाणें प्रारंभींच्या काळांत त्यांनीं असा प्रचार चालविला कीं, हिंदुस्थानच्या सरहद्दीची तटबंदी अशी भक्कम करण्यांत आली आहे कीं, त्यामुळें ही सरहद्द जवळ जवळ अनुल्लंघ्यच झाली आहे. तथापि वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदी-अफगाण सरहद्द जरी त्या मानानें मजबूत करण्यांत आलेली असली तरी पर्शियाच्या बाजूनें, बलुचिस्थानमधून हिंदुस्थानवर हल्ला चढविणें सोपें आहे. पण लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनें पर्शिया ( इराण ) जोंपर्यंत कमकुवत आहे तोंपर्यंत ब्रिटिशांना धास्ती बाळगण्याचें कारणच नाहीं. एकाद्या दिवशीं अफगाणिस्थानमधून रशिया हिंदुस्थानवर चाल करून येईल हीच त्यांना वाटणारी खरी भीति होती आणि म्हणूनच वायव्येकडून कोणाही सैन्याचा हल्ला होऊं नये ही खबरदारी बाळगून त्यांनीं आपली सर्व तटबंदी हिंदी-अफगाण सरहद्दीवरच उभी केली.

जगांतलें एक सामर्थ्यवान् राष्ट्र हें झारशाही रशियाचें महत्त्व कायम असेपर्यंत, अफगाणिस्थानमधून रशिया हल्ला चढवील ह्या धास्तीची तलवार हिंदु—

स्थानांतल्या ब्रिटिशांवर कायमची लटकत राहिली; पण झारशाही निकालांत निघाली आणि ब्रिटिशांनीं सुटकेचा श्वास टाकला, त्याच्या उलट १९१७ सालीं मॉस्कोमध्यें बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित होऊन आशियांतल्या सर्व गुलाम राष्ट्रांबद्दल तिनें सहानुभूति व्यक्त केल्यामुळें आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल तळमळ दाखविणारा अमानुल्ला १९१९ मध्यें अफगाणिस्थानच्या सिंहासनावर आरूढ झाल्यामुळें हिंदी क्रांतिकारकांमधल्या पुष्कळांना अशी आशा वाटूं लागली कीं, अफगाणिस्थान अथवा बोल्शेव्हिक रशिया यांच्यापैकीं कोणाकडून तरी आपल्याला मदत मिळूं शकेल. अशी मदत मिळविण्याच्या नादांत १९१९ सालीं आणि त्यानंतर बऱ्याच हिंदी क्रांतिकारकांनीं काबूलची वाट धरली आणि तिथून मॉस्कोचा रस्ता पकडला.

हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरची संरक्षक तटबंदी अभेद्य आहे हें निव्वळ थोतांड आहे हें ओळखून कलहप्रसंग निर्माण होतांच राजा अमानुल्ला यानें ब्रिटिशांबरोबर युद्ध पुकारण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. १९१९ मध्यें अफगाण सैन्यानें हिंदुस्थानांत मुसंडी मारून प्रवेश करतांच ब्रिटिशांचें धाबें त्यांनीं दणाणलें आणि अमानुल्लाच्या अटी मान्य करून त्याच्याशीं तह केला. पण त्यानंतर दहा वर्षांनीं, ब्रिटिशांनीं आपल्या कारस्थानांनीं अमानुल्लावर मात केली आणि सिंहासनाचा त्याग करून त्याला स्वदेश सोडावा लागला. १९२९ मध्यें ब्रिटिशांनीं पुनः एकदां सुटकेचा श्वास टाकला.

त्यानंतर दहा वर्षांनीं—म्हणजे १९३९ सालीं—पुनः एकदां परिस्थिति बदलली. १९३९ च्या ऑगस्टमध्यें सोव्हिएट रशिया आणि जर्मनी यांच्यामध्यें अनाक्रमणाचा करार होऊन पुढच्या सप्टेंबरमध्यें ब्रिटन आणि जर्मनी यांच्यामध्यें युद्ध सुरू झाल्यामुळें रशियाचा बागुलबोवा पुनः एकदां ब्रिटिशांपुढें ठळकपणें उभा राहिला. हिंदुस्थानवर होणारें सोव्हिएट रशियाचें संभाव्य आक्रमण थोपवून धरतां यावें या बुद्धीनें हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर नव्या तटबंदीचें काम सुरू झालें.

१९४१ च्या जूनमध्यें जर्मनी आणि रशिया यांच्यामध्यें युद्ध जुंपल्यामुळें भीतीनें ठाव सोडलेल्या ब्रिटिशांच्या काळजांतली धडधड थांबली आणि त्यांना हायसें वाटून त्यांचा जीव भांड्यांत पडला. रशियन कॉकेशसकडे आणि पर्यायानें इराणकडे सुरू झालेल्या जर्मनीच्या झपाट्याच्या प्रगतीमुळें किंचित् काल जरी चिंता निर्माण झाली तरी सोव्हिएट–जर्मन युद्धामुळें ब्रिटिशांना असें वाटूं लागलें कीं, हिंदुस्थानकडे आपलें साम्राज्य आतां सुरक्षित राहिलें.

पण पूर्व आशियांत युद्ध सुरू झाल्यामुळें सर्व परिस्थिति उलथीपालथी होऊन गेली. हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीचें जुनेंपुराणें महत्त्व नष्ट झालें आणि त्याची जागा नव्यानें प्रकाशांत आलेल्या ईशान्य सरहद्दीनें पटकावली. पण हिंदी–ब्रह्मी सरहद्दीवरची दुर्लंघ्य असलेलीं जंगलें आणि पर्वत अकस्मात् उल्लंघ्य होऊन त्यांवरून रस्ते खुले झाले आणि या नव्या रस्त्यांवरून ब्रह्म देशचा ब्रिटिश गव्हर्नर, त्याच्या प्रभावळींतले लोक आणि त्याचें धीर सुटलेलें सैन्य बंगालकडे पळून जाऊन तिथून त्यांनीं दिल्ली गांठली.

ब्रह्मदेशच्या ब्रिटिश गव्हर्नरांची प्रतिष्ठापना दिल्लींत सुरक्षितपणें करण्यांत आलेली असून स्वतःप्रमाणेंच ब्रह्मदेशांतून आश्रयासाठीं पळून आलेल्या इतर लोकांच्या मदतीनें तिथें तो आपला दरबार भरवीत राहिला आहे. पण ज्या रस्त्यांवरून त्याला आणि इतर ५ लक्ष स्त्री–पुरुषांना ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत पळून जातां आलें ते रस्ते मात्र त्यानें आमच्या उपयोगासाठीं मागेंच ठेवले आहेत.

रंगूनहून हा गव्हर्नर दिल्लीला गेल्यानंतर ह्या रस्त्यांची दुरुस्ती करून आणखी कांहीं रस्ते खुले करण्यांत आले आहेत. हिंदुस्थानमध्यें प्रवेश करूं देणाऱ्या वायव्येकडच्या मार्गाप्रमाणें हिंदुस्थानच्या ईशान्येकडचा हा मार्ग अवघड नाहीं. जमिनीवरूनच नव्हे तर समुद्रमार्गानें आणि आकाशांतूनही ह्या बाजूनें शिरकाव करण्यास अनेक वाटा आहेत. पूर्वेपासून ईशान्येपर्यंत जो प्रदेश आहे त्यांतून दिल्लीकडे जाणारा फक्त एकच रस्ता नसून असे

अनेक रस्ते त्यांत पसरले आहेत. हे सर्व रस्ते आम्हांला लौकरच सुलभ होऊन त्यांचा आम्हांला उपयोग करून घेतां येईल.

" सर्व रस्ते रोमकडे जातात " असें म्हणण्याचा प्रघात युरोपमध्यें पडला आहे. पूर्व आशियामध्यें सुद्धां वर उल्लेख केलेले हे सर्व रस्ते, ह्या सर्व वाटा हिंदुस्थानच्या राजधानीकडे आणि राजधानीच्या कोंदणांत बसविलेल्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्याकडेच जातात. दिल्ली हें आमचें उद्दिष्ट आहे आणि अनेक रस्त्यांवरून आम्ही दिल्लीला जाऊं. वायव्य सरहद्दीवरच्या तटबंदीप्रमाणें आमचा मार्ग कुंठित करणारी तटबंदी या रस्त्यावर नाहीं. नाहीं म्हणावयास जंगलें आहेत, पर्वत आहेत, लाटा आहेत आणि वारे आहेत. पण ह्या नव्या वाटा आम्हाला खुल्या आहेत ही निसर्गाची कृपा म्हटली पाहिजे. निसर्गानें निर्माण केलेल्या अडचणींतून पार पडणें आम्हांला फारसें काठिण नाहीं.

पण हिंदुस्थानच्या राजधानींत असलेल्या व्हाइसरॉयज हाऊसकडे आणि लाल किल्ल्याकडे इथून कूच करीत जाण्यास बराच काळ लागेल आणि श्रमही बरेच पडतील. म्हणून आतां आपण वेळ दवडतां कामा नये. कंबर कसून शक्य तेवढ्या लौकर आपण कूच करण्यास प्रारंभ करूं या. दिल्लीला जाणारे रस्ते हे स्वातंत्र्याचे रस्ते आहेत.

## परिशिष्ट अ

फिलिपाइन्स, ब्रह्मदेश आणि हिंदुस्थान यांच्यासंबंधीं जनरल टोजो यांनीं केलेल्या घोषणा.

## २४

फिलिपाइन्सबद्दल बोलावयाचें तर मी असें म्हणतों कीं, ह्या बेटांतील जनतेला जपानच्या खऱ्या हेतूंचें जर आकलन होईल आणि बृहत् पूर्व आशियाचें परस्पर समृद्ध क्षेत्र निर्माण करण्याच्या कार्यांत भागीदार म्हणून आमच्याशीं सहकार्य करण्याची जर ती तयारी दाखवील तर स्वातंत्र्याच्या सद्भाग्याचा उपभोग तिला घेतां यावा म्हणून जपान मोठ्या आनंदानें तिला सहाय्य करील. ब्रह्मदेशाबद्दल बोलावयाचें तर मी एवढेंच म्हणेन कीं, फिलिपाइन्सबाबत जपानच्या ज्या अपेक्षा आहेत त्याहून ब्रह्मदेशाबाबतच्या अपेक्षा भिन्न नाहींत.

२१ जानेवारी १९४२

......हिंदुस्थानला लाभलेली ही सुवर्णसंधि आहे. हजारों वर्षांचा इतिहास आणि उज्ज्वल सांस्कृतिक परंपरा असलेल्या या देशाला ब्रिटनच्या कडव्या जुलूमशाहींतून स्वतःची मुक्तता करून घेऊन बृहत् पूर्व आशियाच्या परस्पर समृद्धिक्षेत्रांत भागीदार होण्याची ही सुवर्णसंधि प्राप्त झाली आहे. हिंदुस्थान हा हिंदी जनतेचा, ह्या तत्त्वाला जागून हिंदुस्थान आपला पूर्वीचा दर्जा प्राप्त करून घेईल अशी जपानची अपेक्षा आहे आणि हिंदी देशभक्तांच्या त्या दिशेनें होणाऱ्या प्रयत्नांना हातभार लावण्याच्या बाबतींतही जपान मुळींच अंगचोरपणा करणार नाहीं. आपल्या इतिहासाचा आणि परंपरेचा विसर पडून आपल्या ह्या कर्तव्याला जर हिंदुस्थान जागणार नसेल आणि ब्रिटिशांच्या खुशामतींना व कारवायांना फशीं पडून जर तो त्यांच्याच तालावर पूर्वीप्रमाणें नाचणार असेल तर मला अशी भीति वाटते कीं, नवयुगाचा अवतार घडवून आणण्याची हिंदी जनतेला मिळालेली ही संधि कायमची नष्ट होईल.

१६ फेब्रुवारी १९४२

हिंदी जनतेशीं वैर धरण्याची जपानला मुळींच इच्छा नाहीं; तथापि अमेरिकन आणि ब्रिटिश यांचा वरचढपणा पार नेस्तनाबूद करण्याच्या निर्धारापासून जपान यत्किंचितही परावृत्त होणार नाहीं हें स्पष्टपणें बजावून सांगणें मात्र अवश्य आहे.

ब्रह्मी लोकांसाठीं ब्रह्मदेश, ह्या तत्त्वाचा प्रयोग सफल होऊं घातला आहे. हिंदी लोकांचा हिंदुस्थान हें तत्त्व प्रस्थापित करण्याची, ४० कोटी हिन्दी लोकांचें हें चिरवांछित ध्येय संपादन करण्याची वेळ मात्र हीच आहे.

ग्रेट ब्रिटननें हिंदी लोकांना दीर्घकाळ फसवून हिंदुस्थानवरचा आपला एकतंत्री अंमल चालूच ठेवला आहे. पण गेल्या महायुद्धांत हिंदुस्थानला दिलेलीं आश्वासनें ब्रिटिशांनीं किती पाळलीं याची स्मृति अजूनही हिंदी लोकांच्या मनांत ताजी असल्यामुळें त्यांच्या आश्वासनांची खरी किंमत कळून येते.

अनेक प्रकारें आळवण्या, खुशामती करून ग्रेट ब्रिटन आतां पुनः एकदां हिंदुस्थानला फसवूं पाहात आहे. ब्रिटिशांच्या या खुशामतींनीं हिंदी पुढारी फसले आणि हिन्दी जनतेच्या आकांक्षांशीं प्रतारणा करून देवदयेनें लाभलेली ही संधि त्यांनीं जर झिडकारली तर हिंदुस्थानची मुक्तता करण्याचा योग त्यांनीं कायमचाच हुकवला असें होईल, याबद्दल मला तिळमात्रही शंका नाहीं. ४० कोटी लोकांचें यापेक्षां जास्त दुर्भाग्य तें कोणतें ?

बृहत् पूर्व आशियाच्या परस्पर समृद्धिक्षेत्रांत सन्मानानें भागीदारी पत्करण्यासाठीं, हिंदुस्थान हा हिन्दी लोकांचा असें म्हणून हिंदुस्थान उठून उभा राहाणार आहे कीं, गुलामगिरीचा वारसा भावी पिढ्यांना देण्यासाठीं अँग्लो-अमेरिकन राष्ट्रांच्या शृंखला तशाच आपल्या पायांत कायमच्या ठेवणार आहे ? आपला भूत काळ गाडून टाकण्याची, नव्या परिस्थितीचें योग्य आकलन करण्याची आणि अखेरचा निर्णय घेण्याची संधि देणारा काळ हिंदुस्थानच्या समोर येऊन आतां उभा ठाकला आहे.

ता. १२ मार्च १९४२

म. . . ठाणे.

परिशिष्ट ब

हिंदी स्वतंत्र्य संघातर्फे भरविण्यांत आलेल्या हिंदी प्रतिनिधि मंडळाच्या सभेस जनरल टोजो यांनीं पाठविलेला अभिनंदनपर संदेश

२५

आपले महान् पुढारी श्री. सुभाषचंद्र बोस यांचें स्वागत करण्यासाठीं पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्य संघ, पूर्व आशियांतील हिंदी प्रतिनिधींची एक सभा, ब्रिटिशांच्या बंधनांतून मुक्त करण्यांत आलेल्या सिओनानमध्यें भरवीत आहेत. सुभाष बोस यांचें असें स्वागत करून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य संपादन करण्याच्या आपल्या दृढ निश्चयाला निश्चित क्रियेचें स्वरूप आपण देत आहां आणि त्या दिशेनें मोठीच मजल मारीत आहांत.

अशा या प्रसंगीं मी आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. हिंदुस्थानलाच नव्हे तर अखिल पूर्व आशियाला होणारा हा शुभ शकुन आहे.

बृहत् पूर्व आशियाचें महायुद्ध सुरू झाल्यानंतर जपानच्या बादशाही फौजांनीं शत्रू जिथें सांपडला तिथें त्याचा फडशा पाडला आणि अगदीं अल्प

काळांत आशियाच्या या भागांतली अँग्लो–अमेरिकनांचीं लष्करी दृष्ट्या महत्त्वाचीं असलेलीं सर्व माऱ्याचीं ठिकाणें धुळीला मिळविलीं.

याच वेळीं जपान, मांचुकुओ, चीन आणि थायलंड यांच्यामधले ऐक्य-संबंध दृढ करण्यांत आले आणि पूर्व आशियांत परस्पर समृद्धीचें क्षेत्र निर्माण करण्याच्या ध्येयाकडे हीं सर्व राष्ट्रें दुर्दम्य उत्साहानें आपलीं पावलें आतां टाकीत आहेत.

अंतिम विजयाबद्दल दृढ आशा बाळगून आणि जपान ज्यासाठीं लढत आहे तो न्यायाचा पक्ष विजयी होईल अशी पूर्ण श्रद्धा ठेवून ब्रिटिशांचीं सांचलेलीं पापें आणि त्यांचीं दुष्कृत्यें आम्ही पुरतीं खणून काढणार आहोंत. बृहत् पूर्व आशियाची सुप्रभात उगवली आहे.

दास्यमुक्त होण्याची ही सुवर्णसंधि हिंदुस्थानला लाभलेली आहे. अशी दुर्लभ संधि पुनः कधींच येणार नाहीं.

बृहत्पूर्व आशियाचें महायुद्ध सुरू होतांच हिंदुस्थानांतल्या हिंदी राष्ट्र-वाद्यांनीं आपल्या राज्यकर्त्यांविरुद्ध उठाव केला आणि अशा रीतीनें निदान मनानें तर आधींच स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें.

ब्रिटिश साम्राज्याला अखेरचा श्वास लागला असल्यामुळें आजचें मरण उद्यांवर ढकलण्यासाठीं तें शिकस्तीचा प्रयत्न करील व त्यासाठीं वाटेल तो उपाय योजील. अमेरिकासुद्धां आपले सैतानी हात हिंदुस्थानवर टाकीत आहे.

अशा परिस्थितींत हिंदुस्थानचें संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करणें हें कार्य हिंदी लोकांच्या दृष्टीनें सोपें नाहीं. पण ४० कोटी हिंदी लोकांनीं त्यासाठीं अभंग एकजूट करून आणि स्वतःचें रक्त सांडून स्वसामर्थ्याच्या जोरावरच हें स्वातंत्र्य जिंकून घेतलें पाहिजे.

" हिंदुस्थान हा हिंदी लोकांचा " हें हिंदी लोकांचें दीर्घकालीन सुख-स्वप्न प्रत्यक्षांत अवतरावें म्हणून जपानला लागून राहिलेली तळमळ, जपानी

सरकारनें वेळोवेळीं केलेल्या घोषणांमध्यें प्रकट झाली आहे. त्याबद्दल किंचितही संशय राहिलेला नाहीं.

सर्व हिंदी लोकांना ज्या स्वातंत्र्याची तहान लागलेली आहे तें स्वातंत्र्य हिंदुस्थानला मिळवून देण्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याचा जपानचा ठाम निर्धार आहे.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंपादनासाठीं सुरू झालेली प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ हिंदुस्थानांत तीव्र व्हावी आणि शक्य तेवढ्या लौकर हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतून अँग्लो–अमेरिकन सैनिकांना पिटाळून लावण्यांत यावें असें जपानला अंतःकरणपूर्वक वाटत आहे.

जगांतली परिस्थिति उत्तरोत्तर जास्तच गुंतागुंतीची होऊं लागली आहे आणि या परिस्थितीचा फायदा मिळून अँग्लो-अमेरिकन शत्रूंच्या कारवायांना निःसंशय जोर चढणार आहे.

जिथें मित्रामित्रामध्यें विश्वास नांदतो तिथें त्याच भावनेनें पूर्ण विश्वास टाकून वागणें ही जपानची राष्ट्रीय परंपरा आहे आणि हिंदुस्थानची परंपरा देखील अशीच आहे.

अँग्लो-अमेरिकन कारवायांनीं फसून आपलें स्वातंत्र्य संपादन करण्याची देवदयेनें लाभलेली ही संधि हिंदी लोकांनीं हातची दवडूं नये अशी माझी हार्दिक इच्छा आहे. जपानच्या विजयाबद्दल दृढ विश्वास बाळगून हिंदी लोक न्यायासाठीं, सत्कार्यासाठीं आमच्या खांद्याला खांदा लावून लढतील असा मला विश्वास वाटतो.

आपल्या स्वातंत्र्याचा भाग्यशाली दिवस जवळ आणण्याचा हाच एक मार्ग हिंदी लोकांना उपलब्ध आहे असें मला वाटतें. त्यांच्या शौर्यशाली लढ्यांत त्यांना संपूर्ण विजय मिळो अशी सदिच्छा मी व्यक्त करतों.

परिशिष्ट क

हिज एक्सेलन्सी डॉ. बा. मॉ
यांनीं केलेलें भाषण.

२६

श्री. बोस आणि मित्रहो, आजच्यासारख्या प्रसंगीं आपणांसमवेत असण्याचा योग मला लाभला याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे.

आपल्या महान् नेत्यानें आतांच्या आपल्या भाषणांत ज्या रणघोषांचा उच्चार केला त्याच रणघोषाचा, 'चलो दिल्ली' या रणघोषाचा मी पुनरुच्चार करतों. आपला हा रणघोष आहे आणि आपण दिल्लीवर चाल करून जात आहां, तेव्हां आपण सर्वांनीं शेवटच्या हिंदी बादशहाच्या, दिल्लीच्या राजघराण्यांतील शेवटच्या पुरुषाच्या या कबरीजवळ एकत्र जमावें हें औचित्याला धरूनच आहे. स्वतःला स्फूर्तिलाभ व्हावा आणि आपल्या महान् कार्याला बळ चढावें या इच्छेनें अशा या पवित्र स्थानीं आपण यावें हेंही यथाक्रमच आहे. दुर्दैवी परिस्थितीमुळें आपण हिंदी आणि ब्रह्मी लोक आपला पूर्वेतिहास

विसरून गेलों आहों. या पूर्वेतिहासाची स्मृति ठेवणें हें आपलें नैतिक कर्तव्य आहे. अर्थातच ज्या ज्या वेळीं तसे प्रसंग येतील, त्या त्यावेळीं पूर्वेतिहासांत रममाण होऊन आपल्या राष्ट्रीय स्मृति आपणांस जागवणें क्रमप्राप्त आहे. कारण आमचा खरा वारसा तोच आहे.

आम्ही ब्रह्मी लोकही कांहीं विशिष्ट क्षेत्रें अत्यंत पूज्य मानतों. श्वेत्रो येथील पवित्र धूलीप्रमाणेंच विजय प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य पवित्र क्षेत्रांतल्या धूलीमध्यें आहे अशी आमची श्रद्धा आहे. श्वेत्रोच्या पवित्र भूमीवरून चालत गेलों तर आमचा कोणताही संकल्प सिद्धीला जाईल अशी ज्याप्रमाणें आम्हां ब्रह्मी लोकांची श्रद्धा आहे त्याचप्रमाणें या ठिकाणच्या धूलीला आपण वंदन केलेंत तर आपणां हिंदी लोकांनाही नक्की विजय प्राप्त होईल अशी मला आशा वाटते.

ब्रह्मी जनतेला उपयुक्त ठरणाऱ्या अशा कोणत्याही कार्यासाठीं आपल्या नेताजींनीं २॥ लक्ष रुपयांची देणगी हिंदी जनतेच्या वतीनें दिली आहे. ज्या भावनेनें ही देणगी आम्हांला देण्यांत आलेली आहे, त्याच भावनेनें मी तिचा स्वीकार करीत आहें. एक महान् कार्य आपण अंगीकारलें आहे, तेव्हां त्यासाठीं द्रव्यबळाची किती आवश्यकता आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. २॥ लाखांची ही रक्कम अल्प आणि क्षुद्र आहे असें जरी आपल्या नेताजींनीं म्हटलें असलें तरी ही रक्कम अल्पही नाहीं आणि क्षुद्रही नाहीं हें मला माहीत आहे. आपल्या प्रचंड, बिकट आणि खर्चिक कार्यांची कल्पना केली तर ही रक्कम खरोखरच लहान नाहीं.

आपण जो लढा सुरू केला आहे, हिंदुस्थानवर, दिल्लीवर चाल करून जाण्याची जी प्रचंड तयारी आपण केली आहे, ती पाहातां ही रक्कम म्हणजे आपण करीत असलेल्या त्यागाचें एक चिन्ह आहे असें म्हणणें जरूर आहे आणि ह्या रकमेचा मी स्वीकार करीत आहें तोसुद्धां ब्रह्मदेशाबद्दल आणि चालू युद्धांत ब्रह्मी जनतेची जी हानि झाली आहे तिच्याबद्दल आपल्याला

वाटणाऱ्या हार्दिक सहानुभूतीचेंच हें एक चिन्ह आहे, असें समजून करीत आहें.

आपल्या औदार्याची, या देशाकडून आपल्याला वाटणाऱ्या प्रेमाचीच ही खूण आहे आणि म्हणूनच या देणगीबद्दल मी आपला अंतःकरणपूर्वक आभारी आहें.

गतकालीन हिंदुस्थानच्या या महान् वीराला आपण श्रद्धांजलि वाहात आहांत तेव्हां आपल्याबरोबर मीही या कार्यांत सहभागी होत आहें आणि माझ्या सरकारच्या मंत्र्यांचीही त्यांत सहभागी होण्याची इच्छा आहे याबद्दल माझी खात्री आहे. आपण ज्या भावनेनें प्रेरित झालां आहां त्याच भावनेनें प्रेरित होऊन आम्ही ब्रह्मी लोक आपल्याबरोबर कूच करीत येऊं. आम्ही ब्रह्मी लोक तुमच्याबरोबर राहूं आणि बहादुरशहाच्या आत्म्याचें नेतृत्व स्वीकारून पुढें पाऊल टाकूं. बहादुरशहाचा आत्मा तुमच्या अग्रभागीं आहे ह्याबद्दल माझी खात्री आहे. दिल्लीच्या या अखेरच्या थोर बादशहाचा आत्मा तुमचा नेता असल्यामुळें हिंदुस्थानांत तुम्ही प्रवेश कराल याबद्दल मला मुळींच शंका नाहीं.

भूत आणि वर्तमान या उभयतांच्या सहाय्यानें भविष्य आपल्याला हस्तगत करून घेतां येईल अशी माझी श्रद्धा आहे. वर्तमानाशिवाय ज्याप्रमाणें भूतकाल मृतवत् ठरतो त्याचप्रमाणें भूतकालाशिवाय असलेला वर्तमान काळही फारसा उपयुक्त ठरत नाहीं. म्हणूनच उज्ज्वल भूतकाळाची आठवण करून देणाऱ्या या पवित्र क्षेत्रीं आपण आलां याबद्दल मला समाधान वाटतें. आपल्या या वर्तमानकालीन महान् नेत्याच्याही पावलावर पाऊल टाकून जर तुम्ही जाल तर विजय तुम्हांला नक्की प्राप्त होईल आणि आज ब्रह्मदेश जसा स्वतंत्र आहे तसाच हिंदुस्थानही स्वतंत्र होईल याची मला खात्री आहे.

परिशिष्ट ड

अझाद हिंदच्या तात्पुरत्या
सरकारची घोषणा.



इ. स. १७५७ मध्यें बंगालमध्यें ब्रिटिशांनीं हिंदी जनतेचा प्रथम पराभव केल्यानंतर पुढें एका शतकाच्या कालांत हिंदी जनता ब्रिटिशांशीं सतत संग्राम देत राहिली आणि तिनें अनेक घनघोर लढाया दिल्या. अतुलनीय शौर्य आणि त्याग यांच्या उदाहरणांनीं हा ऐतिहासिक कालखंड भरून गेलेला आहे. या कालखंडांतील इतिहासाच्या पृष्ठांत बंगालचे सिराजउद्दौला व मोहनलाल, दक्षिण हिंदुस्थानचे हैदरअल्ली, टिपू सुलतान व वेलु तंपी, महाराष्ट्राचे आप्पासाहेब भोंसले व बाजीराव पेशवे, अयोध्येच्या बेगमा, पंजाबचे सरदार श्यामसिंग अतारीवाला आणि शेवटीं झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, डुमरावचे महाराज कुंवरसिंग व नानासाहेब या सर्व वीराग्रणींचीं

नांवें सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवलेलीं आहेत. तथापि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ब्रिटिशांचें आक्रमण हें उभ्या हिंदुस्थानचें नष्टचर्य ठरेल याची कल्पना आमच्या पूर्वजांना होऊं शकली नाहीं आणि म्हणूनच संघटितपणें एकत्र होऊन त्यांनीं शत्रूंचा प्रतिकार केला नाहीं. परिस्थितीची ही जाणीव हिंदी जनतेला जेव्हां अखेरीला झाली तेव्हां तिनें १८५७ सालीं बहादुरशहाच्या झेंड्याखालीं एकत्र येऊन संघटित प्रतिकाराचा प्रयत्न केला आणि स्वतंत्र सैनिक या नात्यानें हिंदी लोकांनीं त्या वेळीं आपली अखेरची लढाई दिली. या युद्धाच्या प्रारंभीं जरी कांहीं नेत्रदीपक विजय मिळाले तरी निर्दोष नेतृत्वाच्या अभावीं आणि दुर्दैवानें मात केल्यामुळें अखेर हा प्रयत्न कोलमडून पडला आणि पारतंत्र्य नशिबीं आलें. तथापि झांशीची राणी, तात्या टोपे, कुंवरसिंग आणि नानासाहेब यांच्यासारखे वीराग्रणी या अपेशानेंही अमर झाले आणि राष्ट्राला त्याग व पराक्रम यांची प्रेरणा देण्यासाठीं ध्रुवताऱ्यांप्रमाणें अढळ राहिले.

१८५७ नंतर हिन्दी लोकांना सक्तीनें निःशस्त्र करून जुलूमजबरदस्ती व पाशवी अत्याचार यांच्याखालीं भरडण्यांत आल्यामुळें कांहीं काळ ते मृतवत् झाले. पण १८८५ मध्यें हिन्दी राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाल्यामुळें त्यांच्यामध्यें नवजागृति निर्माण झाली. १८८५ पासून गेल्या महायुद्धसमाप्तीपर्यंत आपलें नष्ट स्वातंत्र्य पुनः संपादन करून घेण्यासाठीं हिन्दी लोकांनीं आपल्या आटोक्यांतले सर्व उपाय योजले. असंतोष निर्माण करणें, प्रचार चालविणें, ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणें, क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करून घातपात करणें आणि अखेर सशस्त्र बंड करणें असे हे उपाय होते. तथापि हे सर्व प्रयत्न कांहीं काळ विफलच ठरले. अखेर १९२० सालीं अपेशाच्या भावनेनें पछाडलेले हिंदी लोक एकाद्या नव्या साधनाच्या शोधांत असतांनाच महात्मा गांधींनीं पुढें येऊन असहकार व कायदेभंग हें आपलें नवें शस्त्र त्यांच्या हातीं दिलें.

त्यानंतरचा वीस वर्षांचा काळ देशकार्याला उपयुक्त ठरतील अशा अनेक चळवळींवर आपलें लक्ष केंद्रित करण्यांत हिन्दी जनतेनें घालविला; स्वातं-

त्याचा संदेश घरींदारीं पोंचावण्यांत आला. आत्मक्लेश, त्याग आणि स्वातंत्र्यासाठीं आत्मबलिदान यांचे प्रत्यक्ष धडे जनतेला मिळाले. देशांतील प्रमुख केंद्रांपासून दूरदूरच्या खेड्यांपर्यंतच्या सर्व लोकांना एका राजकीय संघटनेखालीं एकत्र आणण्यांत आलें. अशा प्रकारें हिन्दी जनता राजकीय दृष्ट्या केवळ जागृत झाली एवढेंच नाहीं, तर राजकीय दृष्ट्या तीं पुनः एकदां एकसंधीही बनली. एकमुखानें तिला बोलतां येऊं लागलें आणि एकाच ध्येयासाठीं, एकदिलानें तिला प्रयत्नही करतां येऊं लागले. १९३७ पासून १९३९ पर्यंत आठ प्रांतांत कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांनीं जें कार्य केलें त्यामुळें स्वतःचा कारभार स्वतः पाहाण्याची हिन्दी लोकांची तयारी आणि त्यांची लायकी यांचे पुरावे मिळाले.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं करावयाच्या अखेरच्या संग्रामाची अशा प्रकारें सिद्धता, सध्यांच्या जागतिक युद्धाच्या आरंभीं होऊन चुकली होती. हें युद्ध सुरू झाल्यानंतर आपल्या दोस्त राष्ट्रांच्या साहाय्यानें जर्मनीनें युरोपमध्यें शत्रूवर दणदणीत तडाखे हाणले आणि जपाननें आपल्या दोस्तांच्या मदतीनें पूर्व आशियांत शत्रूला धुळीला मिळविलें. परिस्थितीचा असा सुंदर संगम जुळून आल्यामुळें आपलें राष्ट्रीय दास्यविमोचनाचें कार्य सिद्धीला नेण्याची हिन्दी लोकांना उत्कृष्ट संधि मिळाली आहे.

परदेशांतील हिंदी लोकांमध्यें राजकीय जागृति होऊन एका संघटनेखालीं तें एकत्र आणलें जाण्याचाही योग आमच्या अलीकडच्या इतिहासांत आतां प्रथमच आला आहे. हिंदुस्थानांतील आपल्या देशबांधवांच्या आशाआकांक्षांशीं हे लोक तद्रूप झाले आहेत एवढेंच नव्हे, तर स्वातंत्र्याच्या मार्गावर सुद्धां आपल्या देशबांधवांबरोबर त्यांचें पाऊल पडत आहे. विशेषतः पूर्व आशियामध्यें २० लक्षांपेक्षां जास्त हिंदी लोक आपली एक भक्कम फळी तयार करून उभे राहिले असून “ सर्वस्व संघटने”च्या ब्रीद वाक्यानें ते प्रेरित झाले आहेत. त्यांच्यासमोर सैनिकांनीं फुलून निघालेली हिंदुस्थानची

स्वातंत्र्यसेना खडी राहिली आहे आणि "चलो दिल्ली" हा रणघोष सैनिकांच्या ओंठांवर नाचत आहे.

स्वतःच्या ढोंगीपणानें हिंदी लोकांचा अंत पाहिल्यामुळें आणि लूटमार करून त्यांची अन्नान्नदशा केल्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या राजवटीला हिंदी जनतेच्या सद्भावनेवरचा हक्क आतां सांगतां येणार नाहीं. हा हक्क पार नष्ट झाला असून या राजवटीला जेमतेम कुडींत प्राण ठेवूनच आपला जीव कंठावा लागत आहे. ह्या दुर्दैवी राजवटीचा अखेरचा अवशेष नष्ट करण्यासाठीं आतां एखादी ज्वाला भडकण्याचाच काय तो अवधि आहे. ही ज्वाला भडकविण्याचें कार्य हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसेनेला करावयाचें आहे. देशांतील नागरिकांच्या उत्साही पाठिंब्याची खात्री बाळगून, त्याच-प्रमाणें ब्रिटनच्या लष्करांतील बहुसंख्य हिंदी सैनिकांच्या सहकार्यावर भिस्त ठेवून आणि परदेशांतील शूर आणि अजिंक्य अशा आमच्या दोस्तांचें पाठ-बळ मिळवून, पण प्रारंभीं तरी स्वतःच्याच सामर्थ्यावर भरंवसा ठेवून ही ऐतिहासिक कामगिरी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसेनेला बजावतां येईल असा आम्हांला विश्वास वाटतो.

स्वातंत्र्याची प्रभात आतां उगवत असल्यामुळें स्वतःचें एक तात्पुरतें सरकार स्थापन करून त्या सरकारच्या विद्यमानें आणि त्याच्या झेंड्याखालीं हिंदी लोकांनीं आपली अखेरची मोहीम सुरू करणें क्रमप्राप्त झालें आहे. तथापि सर्व हिंदी पुढारी तुरुंगांत असल्यामुळें आणि स्वदेशांतील हिंदी लोक पूर्णपणें निःशस्त्र असल्यामुळें हें तात्पुरतें सरकार हिंदुस्थानांत स्थापन करणें अथवा त्याच्या विद्यमानें सशस्त्र लढा सुरू करणें शक्य होत नाहीं. अर्थात् आझाद हिंदचें तात्पुरतें सरकार स्थापन करणें हें पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्य संघाचें आणि त्याच्या पाठीशीं असलेल्या स्वदेशांतील आणि परस्थ हिंदी देशाभिमानी हिंदी लोकांचेंच कार्य आहे आणि संघानें संघटन केलेल्या

स्वातंत्र्यसेनेच्या (आझाद हिंद फौजेच्या) मदतीनें स्वातंत्र्याचा हा अखेर-चा संग्राम लढविणें या संघाचें कर्तव्य आहे.

पूर्व आशियांतील हिंदी स्वातंत्र्य संघानें आझाद हिंदच्या आमच्या तात्पुरत्या सरकारची स्थापना केलेली असल्यामुळें आमच्यावर येऊन पडत असलेल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव ठेवून आम्ही आमच्या कर्तव्य कार्याला लागलों आहों. आमच्या कार्याला आणि आमच्या मातृभूच्या दास्यविमोचन-संग्रामाला परमेश्वरानें आशीर्वाद द्यावा अशी आमची प्रार्थना आहे. आमच्या मातृभूचें स्वातंत्र्य, तिचें कल्याण आणि जगांतल्या इतर राष्ट्रांमधील तिची प्रतिष्ठा यांसाठीं आम्ही आमचें आणि आमच्या शस्त्रधारी दोस्तांचें जीवित अर्पण करीत आहों.

हिंदुस्थानच्या भूमीवरून ब्रिटिश आणि त्यांचे दोस्त यांचें उच्चाटन होण्यासाठीं मोहीम सुरू करून तिचें मार्गदर्शन करणें हें या तात्पुरत्या सर-कारचें कार्य राहील. त्यानंतर हिंदी जनतेच्या इच्छेनें अस्तित्वांत येणारें व तिच्या विश्वासाला पात्र ठरणारें असें आझाद हिंदचें कायमचें राष्ट्रीय सरकार बनवणें हें कार्य, हें तात्पुरतें सरकार हातीं घेईल. ब्रिटिशांचें आणि त्यांच्या दोस्तांचें उच्चाटन झाल्यानंतर हिंदुस्थानांत आझाद हिंदचें कायमचें राष्ट्रीय सरकार निर्माण होईपर्यंत हिंदी जनतेचें विश्वस्त म्हणून हें तात्पुरतें सरकार देशाचा कारभार पाहील.

प्रत्येक हिंदी इसमाच्या निष्ठेला हें तात्पुरतें सरकार पात्र असून त्या निष्ठे-वर तें हक्क सांगत आहे. या सरकारच्या सर्व प्रजाजनांना धार्मिक स्वातंत्र्य, समान हक्क आणि समान संधि मिळतील याची हें सरकार हमी देत आहे. सर्व राष्ट्र आणि राष्ट्राचे सर्व विभाग यांच्या सुखसमृद्धीसाठीं झटण्याचा आणि राष्ट्राच्या सर्व लेंकरांना समान लेखून परकी सरकारनें भूतकालांत धूर्तपणें निर्माण केलेल्या भेदाभेदांना मूठमाती देण्याचा या सरकारचा दृढ निर्धार आहे असें तें घोषित करीत आहे.

परमेश्वराच्या नांवानें, हिन्दी लोकांना एकराष्ट्रीयत्वाचा मंत्र शिकविणाऱ्या जुन्या पिढीच्या नांवानें आणि शौर्य व त्याग यांच्या परंपरेचा आम्हांला वारसा ठेवणाऱ्या गतवीरांच्या नांवानें आमच्या झेंड्याखालीं गोळा होऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं तुटून पडा अशी समस्त हिन्दी जनतेला आमची हांक आहे. हिंदुस्थानांतल्या ब्रिटिशांविरुद्ध आणि त्यांच्या सर्व दोस्तांविरुद्ध अखेरचा लढा सुरू करण्यासाठीं आणि अंतिम विजयाबद्दल श्रद्धा बाळगून हिंदुस्थानच्या भूमीवरून शत्रूची हकालपट्टी होऊन हिंदुस्थान स्वतंत्र राष्ट्र होईपर्यंत हा लढा शौर्यानें आणि चिकाटीनें लढत राहाण्यासाठीं आम्ही हिंदी जनतेला साद घालीत आहों.

**आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारच्या वतीनें**

**सह्या करणार,**

**सुभाषचंद्र बोस** ( राष्ट्रप्रमुख, मुख्य प्रधान व युद्ध आणि परराष्ट्रीय खातें यांचे मंत्री. )

कॅ. सौ. लक्ष्मी ('महिला संघटना विभाग )

एस. ए. अय्यर ( प्रसिद्धि आणि प्रचार )

ले. क. ए. सी. चतर्जी ( अर्थ व्यवहार )

ले. क. अझीझ अहमद

ले. क. एन. एस. भगत

ले. क. जे. के. भोंसले

ले. क. गुलझारा सिंग

ले. क. एम. झेड. कियानी

ले. क. ए. डी. लोगनादन

ले. क. इहसान कादीर

ले. क. शहा नवाझ ( लष्कराचे प्रतिनिधि )

ए. एम. सहाय (मंत्र्याचा दर्जा दिलेले चिटणीस)
रासबिहारी बोस (मुख्य सल्लागार)
करीम गनी, देवनाथ दास, डी. एम. खान, ए. यल्लप्पा, जे. थिवी, सरदार ईशरसिंग (सल्लागार), ए. एन. सरकार (कायद्याचे सल्लागार).

सिओनान, ऑक्टोबर २४, १९४३

REFBK-0006849

# देशमुख आणि कंपनीचीं निवडक प्रकाशनें

**ना. धों. ताह्मनकर**

| | |
|---|---|
| १ तात्या भा. १ ला (आ. दुसरी) | ४ |
| २ तात्या भा. २ रा | ३ |
| ३ निवाडे भा. १ ला | २॥ |
| ४ निवाडे भा. २ रा | ४ |
| ५ संतु | २ |
| ६ चकमकी | १॥ |
| ७ बच्चा नवरा | १॥ |
| ८ अनेक आशीर्वाद | ३॥ |
| ९ दाजी भा. १ ला (आ. ति.) | ३॥ |
| १० बहीणभाऊ | -॥- |

**वा. म. जोशी**

| | |
|---|---|
| १ स्मृति–लहरी | २ |
| २ विचार–लहरी | २। |
| ३ विचार–विहार | ४। |

**चिं. वि. जोशी**

| | |
|---|---|
| १ आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| २ वायफळाचा मळा ( ,, ) | ५ |
| ३ नवें भारूड | २ |
| ४ स्टेशनमास्तर | २ |
| ५ नटश्रेष्ठ | -॥- |

**दत्त बांदेकर**

| | |
|---|---|
| १ सख्या हरि ( आ. दुसरी ) | २ |
| २ नवी आघाडी | १॥ |
| ३ तूं आणि मी | २। |
| ५ नजरबंदी | २। |

**प्र. के. अत्रे**

| | |
|---|---|
| १ साखरपुडा ( आ. दुसरी ) | २ |
| २ ललित वाङ्मय | ३॥ |
| ३ दुर्वा आणि फुलें | २। |

**ना. म. पटवर्धन**

| | |
|---|---|
| १ हितपत्रें | ३ |
| २ वा. म. जोशीचरित्र | ४। |

**द. र. कवठेकर**

| | |
|---|---|
| १ अपुरा डाव | ३ |
| २ रेशमाच्या गांठी | ३ |
| ३ आभाळाची सांवली | ८ |

**भाई बेके**

| | |
|---|---|
| १ रॉयचरित्र– | १॥ |

**अनंत काणेकर**

| | |
|---|---|
| १ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( आ. दुसरी ) | ३ |
| २ पिकलीं पानें ( आ. दुसरी ) | १॥ |
| ३ उघड्या खिडक्या | १॥ |

**काकासाहेब कालेलकर**

| | |
|---|---|
| १ ब्रह्मदेशचा प्रवास | १॥ |
| २ भक्ति-कुसुमें | ३ |
| ३ सामाजिक प्रश्न | ३ |

**य. दि. पेण्ढरकर**

| | |
|---|---|
| १ प्रापंचिक पत्रें | ३ |
| २ घायाळ | २ |

# देशमुख आणि कंपनीचीं निवडक प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड (आ. दु.) | ३ |
| २ | घरट्याबाहेर ( ,, ,, ) | ३ |
| ३ | पहिली लाट ( ,, ,, ) | ३ |
| ४ | स्त्री आणि पुरुष ( ,, ,, ) | २ |
| ५ | सूर्यकमळें ( ,, ) | २॥ |
| ६ | कालचीं स्वप्नें | ३ |
| ७ | आजचीं स्वप्नें | ३ |
| ८ | चंदेरी स्वप्नें | ३। |
| ९ | कलिका | २। |
| १० | सोनेरी सांवल्या | |
| ११ | मृगजळांतील कळ्या | २॥ |
| १२ | सुवर्णकण | २। |
| १३ | मंजिऱ्या | २। |
| १४ | सायंकाल (आ. दु.) | २॥ |
| १५ | अविनाश | १॥। |
| १६ | मंदाकिनी | १॥। |
| १७ | कल्पलता | ३ |
| १८ | आगरकर व्यक्ति आणि विचार | ३॥ |
| १९ | सहा भाषणें | २ |
| २० | तीन संमेलनें | २॥ |
| २१ | फुलें आणि कांटे | २। |
| २२ | मराठीचा नाट्यसंसार | ३ |
| २३ | हिरवा चांफा (आ. तिसरी) | ५ |
| २४ | दोन ध्रुव ( ,, ) | ५ |
| २५ | उल्का (आ. तिसरी) | ४॥ |
| २६ | पहिलें प्रेम (आ. दुसरी) | ३ |
| २७ | क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| २८ | पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| २९ | जळलेला मोहर | ३ |

## साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म (आ. दुसरी) | ३ |
| २ | आस्तिक ( ,, ) | ३ |
| ३ | संध्या | ५ |
| ४ | ना खंत ना खेद (कृष्णा हाथीसिंग) | ५ |
| ५ | सोन्या मारुति !(दु. आवृत्ति) | २ |
| ६ | निळा पक्षी ( ,, ) | २॥ |
| ७ | गोड निबंध (भाग पहिला) | ३ |
| ८ | गोड निबंध (भाग दुसरा) | ३ |
| ९ | गोड निबंध (भाग तिसरा) | ३ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | व्यक्तिरेखा | २। |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे संसार (जप्त) | ४ |
| ५ | चंदनवाडी | ६॥ |
| ६ | नागकन्या | २ |
| ७ | दोन तपें | ५ |

देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पुणें २.

किंमत ३॥ रुपये

●

पुढील प्रकाशनें

१ तेजस्वी तरुणी
महात्मा गांधी

२ वटपत्रें
वि. स. खांडेकर

३ स्वप्नांतरीत ५
ग. त्र्यं. माडखोलकर

●